# राजसंन्यास

**नाटककार**

**राम गणेश गडकरी**

टंकन

माधव काळे

मुद्रितशोधन

सोनाली सहस्रबुद्धे

# राजसंन्यास

**अंक पहिला**

---

**<u>प्रवेश पहिला</u>**

(पाच देवींचा पाळणा)

गुणि बाळ असा जागसि कां रे वायां ॥
नीज रे नीज शिवराया ॥ ध्रु०॥
अपरात्रीचा प्रहर लोटला बाई ।
तरि डोळा लागत नाहीं ॥
हा चालतसे चाळा एकच असला ।
तिळ उसंत नाहीं जिवाला ॥
निजवायाचा हरला सर्व उपाय ।
जागाच तरी शिवराय ॥
चालेल जागता चटका ।
हा असाच घटका घटका ।
कुरवाळा किंवा हटका ।
कां कष्टविशी तुझी सांवळी काया ॥
नीज रे नीज शिवराया ॥ १ ॥
ही शांत निजे बारा मावळ थेट ।
शिवनेरी जुन्नरपेठ ॥
त्या निजल्या ना तशाच घाटाखालीं ।
कोंकणच्या चवदा ताली ॥
ये भिववाया बागुल तो बघ बाळा ।

किति बाई काळा काळा ॥
इकडे तो सिद्धि-जमान ।
तो तिकडे अफजुलखान ।
पलिकडे मुलुखमैदान ।
हे आले रे तुजला बाळ धराया ॥
नीज रे नीज शिवराया ॥ २ ॥

(स्थळ : मालवणचा पाणकोट सिंधुदुर्ग. काळ : संध्याकाळ.
पात्रे : गडाच्या बुरुजावर श्रीसंभाजीमहाराज, सिंधुदुर्गचा किल्लेदार दौलतराव शिरके (दर्यासागर), सिंधुदुर्गचे गडकरी, रायाजी मालुसरे (सेनासागर) वगैरे. खाली घाटावर तुळशी, मंजुळा, घाटाजवळ होडी. तिच्यात उतरण्यासाठी तुळशी एक पाय टाकीत आहे; मंजुळा तिचा हात धरीत आहे. शेजारी संभाजीमहाराजांचे जहाज तयार आहे.)

**मंजुळा** : बाईसाहेब, माझ्या गळ्याची शपथ आहे. समुद्र इतका खवळलेला आणि अशांत. तुम्ही होडी टाकणार?
**तुळशी** : मंजुळे, सोड माझा हात! ही तुळशी मिळमिळीत मनाची नाही.
**मंजुळा** : बाईसाहेब, नावाजलेल्या नाखव्याची अक्कलसुद्धा अशा वेळी पाण्यात पडून जिवाचे पाणी व्हायचे; अशात उगीच जिवावर पाणी सोडायचे?
**तुळशी** : बेफाम दरिया पुळणी ओलांडून भेटायला आला, ओरडत्या लाटांनी आळवू लागला, तुफानी फेसाने हसायला लागला आणि अशा वेळी घरगौरीची पूजा बांधून बसायचे?
**मंजुळा** : बाईसाहेब, दर्यासागर अशाने रागास येणार नाहीत का? मी आपली सांगेन, माझा हात झिडकारून बाईसाहेब पुढे झाल्या.
**तुळशी** : दर्यासागर दौलतराव रागास येतील! लग्नाची माळ मला अशी जखडणार नाही! बाशिंग इतके डोईजड मी होऊ देणार नाही! तुझा हात झिडकारून-दौलतरावाचा हात तोच तुझा हात! अग लाखात एखादा हात खरा असतो. जगाच्या बाजारपेठेत माणसांची बाहुलीच फार विकायला येतात. त्या बाहुल्यांतल्या बायका-पुरुषांचे हात सारखेच! बांगड्यांनी बायकी हाताला खूण बांधून होत नाही!

**मंजुळा** : बाईसाहेब, असे कसे बोलावे! जनरीती बघायला नको का? घरात सुख थोडे का आहे?

**तुळशी** : सुखाला बाहेरचा वारा सोसत नाही वाटते? घराच्या कोंडवाड्यात जीव श्रमी करून घ्यायचा हेच बायकांचे सुख वाटते? इथे बसू नकोस, असे हसू नकोस, तिथे जाऊ नकोस, तसे गाऊ नकोस, इकडे पाहू नकोस, तिकडे राहू नकोस! इतक्या आडवाटेने सुखाचा पल्ला गाठायचा! मी अशी सांगितल्या बुद्धीची नाही. पांख मोडल्यावर मैना कसली! गळा दाबल्यावर कोयल कसली! दात पाडल्यावर नागीण नाही! डोळे फोडल्यावर वाघीण नाही! जा; सोड माझा हात.

(होडी चालू करते)

**संभाजी** : दर्यासागर दौलतराव ! तुमच्या छत्रपतीला भीती घालताना तुम्हांला भीती वाटत नाही?  समुद्र जरासा खेळायला लागला म्हणून तुम्हांला धास्ती वाटते?

**दौलतराव** : राजे, हा समुद्राचा खेळ नाही, पण कळिकाळाचा खेळ आहे! मोडल्या लाटेचा जबडा उघडून दर पळास बुरजाचा घास घेण्यासाठी – जमिनीला गिळण्यासाठी समुद्र बेगुमान बळाने धडपडताना दिसत आहे. चौदा रत्नांची चोरी हुडकण्यासाठी उभ्या-आडव्या अंगाने आकाशपाताळ धुंडाळीत आहे. अशा वेळी प्रत्यक्ष छत्रपतींना – रायगडाच्या कोंदणातल्या या रत्नाला – उघड्यावर टाकून चालायचे नाही. अशा प्रलयात समुद्रात गलबत टाकणे हिशेबी नाही.

**संभाजी** : मग अंगणात फिरविण्यासाठी गलबते केली आहेत वाटते? दर्यासागर दौलतराव, अशा बेहिमतीने रायगडाच्या रियासतीची आरमारी अब्रू तुम्ही कशी सांभाळणार? ही जलवंती म्हणजे सिंधुदुर्गाच्या जनानखान्यात अडविलेली रायगडची राणी आहे! जलवंतीच्या जीवनाच्या लाटेचा पदर वारा वाहील तसा उधळू लागला, तर आपल्या जिवाच्या जरबेने तिच्या जनानी जोराला दडपून टाकले पाहिजे!

**दौलत** : सरकार, कारणावाचून धोक्यात उडी टाकणे बऱ्या बुद्धीचे लक्षण नाही! गडावर आज गेले काय आणि उद्या गेले काय, सारखेच! ही काही घटका मोजण्याची वेळा नव्हे. तुफान दरिया डोळ्यांसमोर नाचू लागला म्हणजे नजरेचा भोवरा गरगरायला लागून जिवाला घेरी येते; जीव जाण्यापूर्वी मरण येण्याचा हा प्रसंग! बिनसबब जिवाची खैरात करण्यात काय हशील?

**संभाजी** : कारण पडेल तेव्हा नामर्दाचासुद्धा मर्द होतो, पण जातिवंताचा जीव हरघडी जातीला हुडकीत असतो. देवाची दांडगी दुनिया अशा रीतीने आभाळात तेजाच्या चमकीने नाचू लागली, गडबडून बादली बडबड करू लागली म्हणजे कच्च्या जिवाच्या जनावरांच्या माना मोडतात, जिभा जखडतात, जीव जडावतात; पण त्या वेळी जंगलशाहीच्या बादशहाची सिंहगर्जना सुरू होवून वरच्या अस्मानी सवालाला जमिनीचा जबाब मिळतो! धरणीमातेचे हृदय या तुफान दरियाच्या अवताराने उचंबळून आले म्हणजे तिच्या अस्सल बाळाचा – मैदानमाप छातीच्या मर्दाचा – दिलाचा दरिया बेदरकार नाचायला लागतो! तुम्हांला नुसत्या ऐकिवाने जाणवायचे नाही! राया, तू सिंहगडच्या सुभेदारांचा – तानाजी मालुसऱ्यांचा – बच्चा आहेस, मराठ्यांचा सेनासागर आहेस. तुला वाटते ना माझ्यासारखेच? बेडर जीवाने तू टाकशील का उडी या भेसूर मौजेत?

**रायाजी** : बेशक! पण केवळ माझ्या शिवांगीसाठी! माझी हरवलेली शिवांगी या दरियाने गिळली आहे अशी कुणी माझी खातरजमा करून दिली, तर या खवळलेल्या दरियाचा एका ओंजळीने उपसा करीन; अलम देशदुनिया नजरेच्या टापूत आणून देण्या इतकी एखादी लाट उभी चढली तर माझ्या शिवांगीला न्याहाळण्यासाठी त्या ताडमाड लाटेच्या कळसाला जाईन! शिवांगी! शुभांगी! शिवगंगा! तिच्यासाठी वाटेल ते करीन! तिच्यावाचून मात्र मन रमत नाही, जीव रमत नाही!

**संभाजी** : राया, इष्काचा शिपाई तुझ्यासारखा बेदर्दच असतो. जिवाशी जडविलेल्या जिवासाठी अंतकाळाला लाभकाळ समजावे लागते!

(पडद्यात – मंजुळा : धावा हो धावा! होडी उलटली! धावा हो धावा!
बाईसाहेब दिसेनाशा झाल्या)

कोणाची आरोळी ही?

**किल्लेदार** : ही मंजुळेची आरोळी. बाईसाहेबांची होडी उलटली वाटते!

**संभाजी** : बाईसाहेब म्हणजे दर्यासागरची तुळशीच ना? दौलती, अजागळासारखा आ करून का उभा राहिला आहेस? तुला प्रसंग पाहिजे होता ना?

**दौलत०** : बेताल जिवाची धडपड म्हणजे प्रसंग नाही. तिला आज राखली तरी ती उद्या मरेल. अष्टौप्रहर काळाच्या कडेवर खेळणाऱ्या या बेमुर्वत बायकोसाठी जिवांचे मोल ठरविण्याइतका मी मूर्ख नाही. वाऱ्याच्या लहरींनी दरिया नाचायला लागला, मनाच्या लहरीने या वेळी तुळशी नाचायला लागली! असे बेताल नाचताना एखादे पाऊल मृत्युलोकाच्या हद्दीबाहेर पडायचेच!

**रायाजी** : (स्वगत) नशिबाचा शिकंदर पण करणीचा कमकुवत! इष्काच्या शिपायाला अशी मोलाची मोहीम लाभायला या दौलतीसारखे संगीन भाग्य असावे लागते. माझ्या शिवांगीची बुडती आरोळी अशी माझ्या कानांवर येईल तर शेषाच्या लांबणीने हा हात काळाच्या असा तोंडात घालून त्याच्या आतड्यासकट शुभांगीला बाहेर काढिली असती!

**संभाजी** : दौलतराव, साबाजी शिरक्याच्या पोटी तुझा जन्म झाला – बेअब्रूला बेहेत्तर करील, पण या वेळी तुला असा पाहिला तर साबाजी आपली अवलाद नाकबूल करील! तुळशीचा तु नवरा आहेस. हिरोजी फरजंदाने आपल्या गोठ्यातील गाय तुझ्या राखणीला घातली असे का तुला वाटते? साबाजी मेल्यावर त्याची तलवार त्याच्या शवाच्या कमरेलाच बांधली पाहिजे. तुझ्यासारख्या मेल्या माणसापेक्षा त्या जित्या मुड्याची सोबत तिला मानाची वाटेल.

(पडद्यात – मंजुळा : धावा हो धाव !)
नवऱ्याचे नाव सांगणाऱ्या नामर्दा, देवाखातर तरी उडी टाक.

**दौलत०** : राजे, माझ्या मनाची मुखत्यारी तुमच्याकडे नाही!

**संभाजी** : नवऱ्याने बायको बुडविली तरी राजाने प्रजा तारली पाहिजे. राया, तुळशीच्या बांगड्यांची बेडी करून या नामर्दाला कैद कर. ती सोडण्याची याच्या अंगात ताकद नाही. दौलतराव, हिंमतमर्दा तो मदतखुदा. तुळशीच्या मर्दानी हिंमतीला हात देण्यासाठी, हा पहा, रायगडचा परमेश्वर समुद्रात उडी टाकतो आहे!

(उडी टाकतो)

**रायाजी** : दौलतराव, मराठेशाहीच्या दऱ्यासागराची नालायकी दाखवून तू मोकळा झालास. किल्लेदार, गलबत घेऊन राजाच्या मागोमागच चला.

**किल्लेदार** : सेनासागर, दौलतरावांनी राजांना सांगितले तेच मी पुन्हा तुम्हाला -
**रायाजी** : या सिंधुदुर्गावरची सारीच माणसे मृतमुखी दिसतात. किल्लेदार, गलबत टाक म्हणजे टाक! सागर खवळला तरी मर्यादेत राहील; पण हा सेनासागर खवळला तर सीमा सुटतील!
**दौलत०** : जाऊ देत किल्लेदार, नाखव्याला म्हणावे नांगर सोड – (एकीकडे) खुशाल यांच्या घरादारावरून फिरू देत.

(तुळशीला हातावर घेतलेली असा संभाजी दृष्टीस पडतो)

**संभाजी** : तुळशी, घाबरू नकोस; डोळे उघडून नीट पहा.
**तुळशी** : कोणी मला हात दिला? तुळशीचे यश कुणी हिरावून नेले?
**संभाजी** : रायगडाच्या रणमर्दाने! (तुळशी डोळे उघडून पाहते) तुळशी, अजून भेदरल्यासारखी का दिसतेस?
**तुळशी** : तुळशी कधी भ्याली नाही! त्रिखंड धुंडाळून मला भीती सापडली नाही, म्हणून तिला पाहण्यासाठी आज या दरियाच्या तळाचा ठाव मी पाहत होते.
**संभाजी** : तुळशी, जिभेचा भरवसा कुणी धरावा! माणसाला जीभ खोटे बोलण्यासाठी मिळाली आहे; जिवाची खरी भाषा अवघ्या अंगांनी बडबडते. तू भ्याली नाहीस, मग हे काय आहे? नुसत्या फेसाचा मारा चुकविण्यासाठी भित्री नजर पापणीच्या पडद्याआड होते आहे; उसळत्या पाण्याने गाला-ओठावरली गुलाबी शोभा धुऊन गेली आहे. छातीच्या धरणीकंपाने जोबनशाहीच्या किल्लेकोटांना चळ भरल्यामुळे भ्यालेल्या जिवाने साऱ्या देहावर ही काटेरी शिबंदी उभारली आहे. ही भीती नाही का?
**तुळशी** : नाही, एकदा नाही; लाखदा नाही. चतुरा आपण चुकला. या चपळ पाणभुईवर आपली नजर न ठरल्यामुळे आपल्या डोळ्यांना प्रीतीचे पहिले रूप भीतीसारखे दिसले. इतके का हे पाणी चंचळ आहे? मला अजून भीतीप्रमाणेच प्रीतीचीसुद्धा – वीरा, नेटकी नजर रोखून असे निरखून पाहू नका. माझ्या पहिल्या बोलण्याची - मर्दुमकीची शेखी केल्याची रायगडच्या रणमर्दा, नारीजातीला क्षमा करा. ही तुळशी आज भ्याली आहे.

(मान खली घालते)

**संभाजी** : साजणी, आपण काय बोलता हे! पाणी चंचल आहे, पण मन पाण्याहून चंचल आहे. माझ्या मनाची उडी आपल्या बोलांच्या पलिकडे जात आहे का? साजणी, तुमच्या जिवाखातर समुद्राचा ठाव काढण्यासाठी मी झटलो; पण तुमच्या मनाच्या ठाव –

**तुळशी** : देवा, आता तेही कष्ट घेऊ नका आणि हेही कष्ट घेऊ नका. मानसीच्या राजहंसा, मझ्या मनी उडी घेऊ नका. जे कधी काळी घडायचे नाही त्यासाठी रडायचे कशाला? आजवर कोणत्याही पुरुषाच्या डोळ्याला डोळा भिडविताना तुळशीची नजर चळली नाही, पापणी ढळली नाही. नवख्या नजरेचा नेम चुकविण्यासाठी कधी पदर सावरला नाही. कधी जीव बावरला नाही. आज तुळशीचा अभिमान उतरला. रायगडच्या राजाला पाहण्यासाठी डोळ्यांत जिवाची प्रभा दाटली, ताजिमीसाठी देहावर काटेरी सभा थाटली, नजरेच्या एकाच फिरतीने डोळ्यात रूपरेखेची साठवण झाली. तुळशीला पदराची आठवण झाली. पुन्हा आपल्याकडे पाहताना नजरेची ज्योत पापणीने मालवली – उरीची लाज पदराने पालवली. आज जवानमर्दीच्या बादशहाने माझ्या जोबनवंतीला काटेरी भूषणे बहाल केली. आपल्या देहाच्या स्पर्शाने माझा देह नटला, पण जीव हटला. महाराज! तुळशीच्या हटलेल्या जीवासाठी या दांडग्या दरियाशी झगडून देह कष्टवू नका. आता जीव नकोसा वाटतो.

**संभाजी** : रायगडच्या रणमर्दाला यात कष्ट होणार? साजणी उचंबळती लाट डोक्यावरून निघून गेल्यावर, घाबरल्या हातांनी तोंडावरचे केस मागे सारताना चुकार केसांचा एखादा गोफ तसाच गालावर खेळत आहे! लाटेच्या माराला भिऊन झिरझिरीत पदर आपल्या उराशी लपत आहे! उघडत्या पापणीवरच्या तुषारांमुळे डोळ्यांची धांदलीने उघडझाक होत आहे. आपल्या मस्तकी बसल्यानंतर पुन्हा पाताळपाणी पाहावे लागणार म्हणून एकेक पाण्याचा थेंब आपल्या केशपाशावरून सावकाश दिलगिरीने सुटत आहे! गर्दीने उघडत्या झाकत्या डोळ्यांवरून पळणाऱ्या एखाद्या थेंबातून मावळता सूर्यनारायण आपल्या तिरप्या तीरांनी सोनेरी नेम साधून तुमच्या डोळ्यांना दिपवीत आहे! नजरबंदीने क्षणभर घाबरल्यामुळे आपली माझ्या अंगाभोवतीची मिठी किंचित जोराची होऊन मला माझ्या बळाचं सार्थक वाटत आहे. अशा वेळी कष्टाचा कोण केवा! सौंदर्याची नाजूक सेवा करिताना पराक्रमाला

कौतिकाची कोवळीक लाभते! सुंदर साजणी, या वेळी माझ्या रंगलेल्या मनाला दिलगिरीचे बोल ऐकवू नका. लाटांचे बोल आदळून देह कष्टत नाही; पण उदासवाणी बोल ऐकून माझ्या जिवाला मात्र कष्ट होतात. जगाचा – जीवाचा – असा कंटाळा करायचे काय कारण आहे?

**तुळशी** : जगाचा–जिवाचा कंटाळा? दुबळ्या संगतीत स्वर्गाचा, देवांचासुद्धा कंटाळा येईल. आता रायगडच्या रणमर्दाने काया शृंगारल्यानंतर – आता दौलतरावासाठी जीव जगवायचा! जातीच्या जिवाशी ओळख पटल्यावर कमजिवाशी खेळायचे? रामाशी मन रमल्यावर माकडाशी मिठ्या मरायच्या! काळ्या मातीच्या मोलाने कस्तुरीची किंमत करणाऱ्या दौलतरावाचा भातुकलीचा संसार थाटण्यासाठी रायगडच्या देवाला अशा कष्टात पाडायचे! देवा, पुन्हा या मर्दुमकीच्या छातीवर मान विसावून, डोळे झाकून पडू द्या. माझा जीव अशा सुखाच्या सागरात बुडाला असताना माझा देह या सागरात बुडवून टाका! ज्या हाताने मला जीवदान दिले त्याच हातावर मझ्या देहाचे दान करण्यासठी मी उदंड दरियाचे पाणी सोडले आहे. आता मला वाचवू नका. जोबनशाहीच्या बादशहा, आपल्या स्पर्शाने या देहावर चढविलेली ही सोळा शिणगारांची काटेरी लेणी आता उतरू नका. अशा थाटात मला मरणाच्या दारी पोचवा. सह्याद्रीच्या राजसिंहा, सिंधुदुर्गाच्या वाघिणीची अशी गाय करून तिला चार भिंताडांच्या कोंडवाड्यात गुजरू नका. दुबळ्या दौलतरावाच्या पलंगाच्या पाळण्यातल्या प्रेमाच्या पोरखे – (एकदम लाजून) रणमर्द, दौलतरावाला नाही – उभ्या जगाला नाही – तुळशी तुम्हांला लाजली आहे.

**संभाजी** : आपली मर्जी आम्हांला हुकमतीने वाकवील. साजणी, याच पावली रायगडावर चला. भगीरथ प्रयत्नाने लाभलेली ही शृंगाराची रसगंगा रायगडच्या शंभुदेवाला तिन्ही त्रिकाल शिरसावंद्य होईल. दुबळ्या दौलतरावाची तुळशी दरियात बुडून मेली! रायगडच्या रणमर्दाने पाताळातून एक नागकन्या बाहेर आणिली.

**तुळशी** : दिलदार, इतका आपला धीर होईल का? लग्नाच्या बेडीने आपले जीव निरनिराळ्या जिवांशी जखडले आहेत.

**संभाजी** : दिलवर, गालावर सांडलेली ही गुलाबी शराब पाजून या जीवाला धुंद करा, म्हणजे मातीच्या मोलांनी घडलेल्या लग्नाच्या दुबळ्या बेड्या ती तुफान ताकदीने तडातड तोडून टाकील! अशा वेळी मृत्युलोकीच्या पामर नियमांची काय पर्वा आहे!

एकाच क्षणाच्या आरंभी, हेलकाव्याने पाताळापर्यंत खालावून आपल्या डोळ्यांची किरणे शेषाच्या फणीतल्या मण्यांच्या किरणांशी खेळत आहेत, तर त्याच क्षणाच्या शेवटी डोंगरलाटेसरशी आम्ही आभाळाला भिडून आमचे डोळे चांदण्यांशी गोष्ट सांगत आहेत. अशा रीतीने क्षणमात्रात आकाशपाताळ एक होतांना मृत्युलोकावर नजर कशी ठरणार! प्यारी, मानवलोकीची लग्नं रद्द करून, रायगडचा राजा आज तुझ्याशी पुन्हा लग्न करीत आहे. मस्तकावरून सुटणाऱ्या या थेंबांची – सौंदर्याच्या या मोत्यांची – बिनसरांची मुंडावळ तुझ्या कपाळी शोभते आहे! समोर संध्याकाळचा होम पेटला आहे! तुफान दरियात मरणाचा नेम नसल्यामुळे काळाचा एकच पाश आपल्या दोघांच्या कंठांत आहे; त्याचीच लगीनमाळ करून डोंगरलाटेच्या बोहल्यावर, मावळत्या देवाच्या साक्षीने, मरणाचा मुहूर्त साधून रायगडाचा राजा मनाच्या मुक्या मंत्राने, तुळशी तुझ्याशी लग्न लावीत आहे.

(तिचे चुंबन घेऊ लागतो. पडदा पडतो)

---

**<u>प्रवेश दुसरा</u>**

(स्थळ : रायगड, जिवाजीचे घर,
पात्र : जिवाजीपंत कलमदाने लेखणी करीत आहे )

**जिवाजीपंत :** (लेखणीचा टाक तोडून – स्वगत ) वारूळातली दोन जीभांची पिवळी नागीण चावली तर एकाच पिढीचा घात होतो; पण कारकुनी कानावरची ही दोन जिभांची काळी नागीण डसली तर सात पिढ्यांचा सत्यानाश करिते. काय लेखणी झाली आहे पण! आम्हां कलमदान्यांच्या घराण्यामध्ये लेखणी करण्यात हा जिवाजी म्हणजे केवळ शिवाजीसारखा शककर्ता पुरुष निपजलेला पाहून माझ्या वाडवडिलांना इतका आनंद झाला असेल की, अखेर वहिवर त्या आनंदाची जमा करिताना चित्रगुप्ताच्या कैक लेखण्या बोथट झल्या असतील! वडिलांच्या पुण्याईने आस्ते आस्ते मी असाच लौकिक बढवून ठेवणार आहे, की भवानीच्या जोरावर शिवाजीने रायगडची दौलत मिळविली, पण या कलमेश्वरीच्या करामतीवर जिवाजीने ती सारी

आपल्या घरी पळविली! अशी लेखणी हाती आल्यावर वाटेल त्याच्या हातचे वळण काढून दाखविणे म्हणजे या शाईभरल्या हातचा मळ आहे नुसता! गाईच्या एका देहात तेहतीस कोटी देवांचे देह सामावतात; तद्वत या जीवाजीच्या एकाच लेखणीत उभ्या दक्षिण देशाचा दस्तूरखुद्द एकवटलेला आहे! चिटणिशी वळण पाहिजे तर चिटणिशी वळण! राजांच्या हातचे कलम म्हटले की राजांच्या हातचे कलम! जसे काही तुमच्या हाताचे कलम करून माझ्या देहाला लाविले आहे! या कलुशा कबजीचे कनोजी कसब म्हणजे खरे म्हटले तर परदेशी वळण; पण तेही वळणीवर आणले अखेर! अक्षरांच्या तऱ्हा अगदी हुकमी? गिचमिड अक्षरे काढली तर वडारणीचे केस उकलता येतील, पण अक्षरी उकलयची नाहीत! मोकळ्या लिपीत दोन दोन अक्षरांत एकेका गावठाणाची ओसाडी सोडायची! एका अक्षरावरून दुसऱ्यावर नजर टाकण्यासाठी वाचणाराला घोडदौडीनेच मैदान कापावे लागायचे! बरें आपल्या खतांच्या अक्षरांत एका लिखाणाचे दुसऱ्या लिखाणाशी सगोत्र वाटायचे नाही. एकात नवशिक्या पोरीने केलेल्या तिळगुळाचे ओबडधोबड दाणे तर दुसऱ्यात नुसते मोत्यांचे दाणे! एक अक्षर अगदी आंधळ्याने वाचावे, तर दुसरे डोळसाची आंधळ्यासारखी दिशाभूल करणारे! पण अक्षर बदलले तरी मजकुराच्या धोरणात मात्र सर्रास कारकुनी कावेबाजी! लिपी बाळबोध असो की मोडी असो, मजकूर एकजात नागमोडी चालीचा! आता इतके केल्यासारिखे आमचा भावार्थ सिद्धीस जातो की नाही बघायचे. नाहीतर ललाटीच्या रेषाही नागमोडीच असायच्या! नाही; पण, संभाजीराजांनी या कलुशाला प्रधान केल्यापासून आमच्या सद्दींचा जोर असा बळावत चालला आहे, की नशिबाच्या रेषा कपाळावर साखळीने आखलेल्या गंधागत नीटस वठलेल्या आहेत असेच वाटते! ही असामी मात्र खरी नागमोडी मनाची आहे! अगदी इरसाल असामी! इतका नीच माणूस इतक्या उंच जागी बसलेला कधी कुणी पाहिला नसेल! कुठून कनोजी उंची अत्तरे विकायला आला काय आणि मराठेशाहीचा प्रधान झाला काय? त्याच्या अत्तराच्या पेटीचे नवखे नशीब थेट सिंहासनाच्या पाय-या चढत चालले आणि आमची कलमेश्वरी मात्र तशीच कानावर अढळपद भोगीत राहिली! अत्तराच्या फायाबरोबर एखादा कानमंत्र फुंकून तर याने राजांना भारून टाकिले नसेल? काही का असेना, तुर्त कानावरच आमच्या कलमाने कुरघोडी केल्यामुळे राजांचे कानसुद्धा आमच्यापर्यंत लांबले आहेत, हे काय थोडे झाले?

येसूबाईसाहेबांकडे जरा असेच बस्तान बसले तर चांदणीकडे नीट बघता येईल! तिच्या जिवाभावाचा मैत्र तो पहिलवान पोऱ्या आमच्या खाजगी खात्याकडे गुंतवून घेतला हे बेश झाले! हा देहू दसरी अगदी पुरा आपलासा करून टाकला पाहिजे; म्हणजे चांदणी हाती लागलीच म्हणायची! आलीच ही आडमाप स्वारी! (प्रकट) ये देहू, तुला अगदी शंभर वर्षे  आयुष्य आहे! (देहू दसरी पहिलवानी थाटात प्रवेश करतो) बाकी असे तालिमाबाजीचे निकोप शरीर असल्यावर शंभर सोडून दोनशे वर्षे जगायला तरी काय मरण आहे? (देहू एकदम उडी मारून दोन बैठका काढतो व पावित्र्यात उभा राहतो)

**देहू** : बजरंगबलीकी जय!

**जिवाजी** : अरे, अशा आडव्यातिडव्या उड्या काय मारतोस?

**देहू** : या उड्या नाहीत! जिवबा, या उड्या नीट यायला दंगलीत दिवस घालवावे लागतात!

**जिवाजी** : दंगल म्हणजे? धिंगामस्ती?

**देहू** : अहो, दंगल म्हणजे आखाडा! आता मी उड्या मारिल्या नाहित, दोन बैठका मारिल्या.

**जिवाजी** : या बैठका मारायला शिकण्यात आजवर वेळ घालविलास म्हणून तर तुझ्या नशिबाने ही अशी बैठक मारिली आहे! तांबड्या मातीत लोळपटणी घेऊन सारा जन्म मातीत मिळवलास!

**देहू** : अहो, ह्या तांबड्या मातीला मुलतान माती म्हणतात.

**जिवाजी** : मुलतान माती म्हण नाही सुलतान माती म्हण. अशाने मातीला मोल येते वाटते! वाकड्यातिकड्या उड्या काय मारतोस, ही मुंडेछाट पेहरण काय घालतो, असे पचंगी धोतर काय नेसतोस! कायरे हे? तसेच, गुद्याच्या माराने मुरडलेल्या कानांची शुद्ध घिरडी झाल्याने तुझी कानउघाडणी करणे रामदासालासुद्धा साधले नसते! अरे, तू चांगला पांढरपेशा ना!

**देहू** : आमचा पांढरपेशा या मुलतान मातीखाली पार दडून गेला आहे आता! मुलतान मातीची पुटांवर पुटे चढून बजरंगबलीच्या रंगात मी इतका बुडालो आहे, की माझ्या पुढच्या सात पिढ्या उपजत तांबड्या निपजतील! अहो, फुकट होत नाही देहाची तयारी! अशी मेहनत करावी लागते!

**जिवाजी** : तुझ्या देहाच्या तयारीसाठी तुझ्या जातभाईंना मात्र खरी मेहनत पडेल! तुझे मरण म्हणजे तुझ्या गोतावळ्यावर प्राणसंकटच म्हणावयाचे! आणि तसेच, जाळायला उभ्या गावातल्या वासेतुळ्या पुरायच्या नाहीत, की पुरायला खासे गावठाण पुरायचे नाही! तुझ्या अंगाचे हे धटिंगण धूड पाहिले म्हणजे पहिल्याने एवढेच मनात येते, की हा पुरुष अंतकाळी बाभूळबनाच्या वणव्यात सापडून मरावा! खरे सांगतो तुला, मरताना जिवाबरोबर शरीरालाही न्यायची देवाने वहिवाट घातली असती, तर तुझ्या बाबतीत यमदूतांना आपला बोजा खास झेपला नसता आणि तू चिरंजीव झाला असतास! काय अवीट अंग रे हे!

**देहू** : वाः ! जिवबा, मग, शरीर कमावणे वाईट आहे वाटते?

**जिवाजी** : वाईट नाही तर काय? शरीर कमावून बसायचे पण अक्कल गमावून बसायचे! हे अवलक्षण शुद्धा बेवकुफाखेरीज तिसऱ्याच्या मनी येणे नाही कधी! हे कसले शरीर कमावणे?

**देहू** : कसले शरीर कमावणे? अहो, नाक उडवायची बाब नाही ही. आज या देहात बारा रेड्यांची ताकद खेळते आहे! उगीच नाही!

**जिवाजी** : त्या ताकदीबरोबर बारा रेड्यांचा रगेल मूर्खपणा पण सामावला आहे तुझ्या देहात! कशाला रे हवी एवढी ताकद?

**देहू** : ताकदीवाचून मुलुखात पुंडाई करता येते वाटते?

**जिवाजी** : पुंडाई करायची? म्हणजे पुंडाई करण्यासाठी हा इतक्या मांसाचा असा अवाढव्य अवतार आहे का? पुंडाई का करायची?

**देहू** : पुंडाई का करायची? पंत, जिवाची गोष्ट सांगू तुम्हाला? जरा हेरून पाहा बरे, मी पुंडाई का करणार आहे ती? का? बुद्धीला ठाव लागत नाही?

**जिवाजी** : नाही बुवा. आपली मती हरली.

**देहू** : हरली; अगदी चीत! बजरंगबलीकी! शिवाजी सोळा वर्षांचा झाला नाही तोच त्याने आडदांड लोकांची संगत धरून मुलखात पुंडाई आरंभिली!

**जिवाजी** : बरे मग? असे अवसान भरल्यासारखे काय करितोस? का आखाड्यातला एखादा शेंदरा सैतान संचारला आहे तुझ्या अंगात?

**देहू** : शेंदरा सैतान नाही – शिवनेरीचा शिवाजी संचारला आहे! सही थोरल्या राजांसारखी पुंडाई करून हा देहू शिवाजीराजा होणार! बजरंगबलीकी जय!

(भराभर करेल फिरवतो)

**जिवाजी :** ए, ती करेल ठेव खाली! ते भीमसेनी लाटणे फिरवून विराटघरीच्या पोळ्या लाटायच्या आहेत वाटते?

**देहू :** नाही, आल्यागेल्याची कणीक तिंबून दिल्लीची दौलत लाटावयाची आहे! मला शिवाजी व्हायचे आहे!

**जिवाजी :** ते कसे काय व्हायचे?

**देहू :** राजांच्या पावलांवर पाऊल टाकून! आडदांड लोकांची संगत करून ठेविली आहे; पुंडाई चालू आहेच; हमरस्त्यात मारामारीशिवाय पाऊल टाकित नाही पुढे! आता चार गड घ्यायचे, कुठे तरी कुणाच्या अटकेत गवसायचे, बुरडी पेटाऱ्यातून पसार व्हायचे, नावाची नाणी ठोकायची अन सोन्याचा पुतळा लुटवायचा, की एकदम बजरंगबलीकी! अहो, धिमेधिमे मी थेट थोरल्या राजांची छबीसुद्धा वटवून घेतो बघा! रोज सकाळी ओढून ओढून नाकाला गरुडाच्या चोचीसारखी अणकुची आणतो; खरे म्हटले तर आमची पहिलवानपेशाची शेंडी म्हणजे शिवराईएवढी असायची! पण राजांसारखी केसाळ ऐट साधण्यासाठी हा डोकीभर संजाब ठेवून दिला आहे असा! जिरेटोपाला जोड देण्यासाठी वडिलांच्या पागोट्याच्या दीडशे हातांच्या चाकातून तेवढी कोकीच काढून डोकीवर चढवायची आहे! वाघनखे नाहीत म्हणून तुर्तास मी मांजरीच्या नख्यांवरच भागवून नेत आहे.

**जिवाजी :** (स्वगत) अस्से! या रक्तामांसांच्या चालत्या किल्ल्याची गनिमी माऱ्याची ही जागा आहे तर! देवाघरची योजना चहूंकडे सारखी असते खरी! बढत्या ताकदीचा असो, की चढत्या अकलेचा असो; असा म्हणून एकही सिंहगड सापडायचा नाही, की ज्यावर, घोरपड लावायला द्रोणागिरीचा कडा नाही! या स्वारीला या जाळ्यात गुरफटलेच पाहिजे! (उघड) शाबास! मग तू हुबेहुब शिवाजी होणार तर?

**देहू :** यात काय शक? अहो, मरताना गुडघा मोडून घ्यायलासुद्धा मी एका पायावर तयार आहे. जनमकाळी तेवढी गोष्ट हातची गेली! अगदी कळत नव्हते इतक्या लहानपणी माझा जन्म झाला म्हणून फसले हो; जरा समजूत असती किनाही त्यावेळी, म्हणजे शिवनेरीवरच जन्माला आलो असतो मी! पंत, आता आले काय धोरणात, मी कशासाठी शरीर कमावले एवढे ते?

**जिवाजी :** पण काय रे, नुसत्या अंगबळाने तू कसा होणार छत्रपती?

**देहू** : अंगबळाने नाही, तर काय हत्तीघोडे लागतात काय छत्रपती व्हायला? जरा अंगीपिंडी भरला गडी की झाला शिवाजी!

**जिवाजी** : अगदी वेडा आहेस! बेटा देहू! नुसत्या ताकदीने नाहीत होत असली कामे; त्याला श्री कलमेश्वराची कृपा असावी लागते!

**देहू** : हा कलमेश्वर कोण?

**जिवाजी** : आम्ही कलमदान्यांचा कुलस्वामी! आमच्या परसातल्या बोरूच्या बेटातला एक दगड आणून आमच्या वडिलांनी त्याला देव्हाऱ्यात पुजला आणि त्याचा श्रीकलमेश्वर केला.

**देहू** : पंत, कसला तुमचा श्रीकलमेश्वर आणि काय वसुलाची त्याची कृपा! हो म्हटल्या दगडाचा देव होतो का कुठे?

**जिवाजी** : का होऊ नव्हे रे त्याने देव! अरे, प्रयागजी अनंताला यवताच्या म्हणजे कळकाच्या बेटात एक स्वयंभू शिवलिंग सापडले, त्याचा नाही का त्याने यवतेश्वर केला? अरे, अशा कळकट कंकराचा जर शंकर होतो, तर मग आमच्या कलमेश्वरावर तरी का धोंड यावी? (लेखणी दाखवून) हा पाहिलास आमच्या कलमेश्वराचा त्रिशूळ? छत्रपती व्हायला या कलमाचे बळ असावे लागते. नुसत्या अंगमस्तीने नाही भागत!

**देहू** : हा बोरूचा तासलेला तुकडा म्हणजे तुमच्या कलमेश्वराचा त्रिशूळ का? अहो, माझ्या निम्म्या शिणेचा गडीसुद्धा तुमचे हे बोरुचे पेरे करंगळीच्या पेराने पिचून टाकील!

**जिवाजी** : तसे होण्यापूर्वी हाडांची काडे पिचून निघतील वेड्या! अरे, या कलमाचे म्हणजे सामान्य महत्व नाही बरे! या कलमाच्या करामतीने होत्याचे नव्हते आणि नव्हत्याचे होते करून दाखविता येते! जादूगाराच्या नळकांड्याप्रमाणे या टिचभर कलमामध्ये काय काय इलमा खेचून भरल्या आहेत, त्याची तुला कल्पना नाही! जादुगिरी नजरबंदीने दृष्टी फसते; पण कारकुनी कलमबंदीने सृष्टी फसते! दीन दुनिया तुमच्याबद्दल कुरकूर करायला लागली तरी बेफिकीर राहता येईल; पण कारकुनी कलमाची घडीभराची कुरकुर जन्मभर भोवल्यावाचून राहायची नाही! दोस्तांच्या दगलबाजीने तुमच्या नावावर काळे डाग पडिले तर एक वेळ धुऊन काढणे सोपे आहे; पण कारकुनाच्या लेखणीने तुमचे नाव खरडतान त्या भोवती

सहज चार शिंतोडे उठवून ठेवले तर ते मात्र कल्पान्तापर्यंत कायमचे! तलवारबहाद्दरांचा तांडा अंगावर चालून येत असला, तर घोडदौडीच्या दणदणाटाने इशारत मिळून तुम्हांला दडी मारून बसायला तरी अवसर मिळतो; पण कलमबहाद्दर तुमच्या घरादारावरून आपले कागदी घोडे नाचवायला लागला, तर टापांची चाहूल लागू द्यावयाचा नाही!

**देहू** : पंत, खरेच का इवल्याशा नळकांडीत इतकी ताकद असते!

**जिवाजी** : आस्ते कदम, आस्ते कदम! बेटा देहु, वेड्यावाकड्या बोलांनी ही कानावरची नागीण छेडू नकोस! अष्टौप्रहर कानावर बसून कानी पडेल ते ही नागिण ऐकून घेते आणि मग प्रसंग सापडताच शाईच्या विषाने ते ओकायला लागते! आणि एकदा बहकली की बेसुमार! वारा प्यालेले वासरू आवरता येईल, पण शाई प्यालेले कलम कळिकाळाला आवरायचे नाही! शाईची निशा कारकुनी मनाच्याच काय ती पचनी पडेल! ही शाई म्हणजे साक्षात कालकूट विषाची कन्या आहे! आणि तिखट पात्याच्या धारेच्या पोटी लेखणीचा जन्म! वेड्या मुला, कारकुनाला बिथरवणे भल्याचे काम नाही! शाईचा सोमरस आणि लेखणीची समिधा करून एखाद्याची आहुती घेण्यासाठी कारकुनाने एक ओळ खरडली की ती वेदवाक्य! ललाटीचे ब्रम्हलिखित ढळेल; पण आमची लिखिते अढळ!

**देहू** : पंत, तुम्ही तुमच्या कलमाचे एवढे महत्व सांगता, पण चारचौघांत काही तसे पटत नाही! शिवाजीराजांनी तर कधी कलम हाती धरिल्यावाचुनच एवढा ग्रंथ केला!

**जिवाजी** : काय, काय ग्रंथ केला रे त्या शिवाजीने? मी म्हणतो, तसे म्हटले तर शिवाजीने असे केले आही तरी काय?

**देहू** : त्रिखंडत्रिभुवन सांगेल राजांनी काय केले ते! एवढी हिंदूपदपाच्छाई उठवली आणि त्यांना तुम्ही नुसता हुंकार करिता? पंत, हे देवाघरी रुजु होणे मुष्कील नाही!

**जिवाजी** : आता उघड माप पदरात घालू लागलो तर म्हणशील, की पंत, आडमाप बोलता म्हणून! अरे, शिवाजी म्हणजे मूठ दाबल्या हाती साडेतीन हात उंचीचा, नाकीडोळी नीटस, काळगेल्या रंगाचा, राकटलेल्या अंगाचा, हरहुन्नरी ढंगाचा, लिहिणे-पुसणे बेतास बात, गुडघ्यात अंमळ अधू, असा एक इसम होऊन गेला! त्याची काय बरे मातब्बरी सांगतो एवढी? म्हणे हिंदूपदपाच्छाई उठवली! काय रे, मोगलाई मोडलिन मराठेशाही झाली म्हणून इकडची दुनिया तिकडे झाली वाटते?

शिवाजीच्या राज्यात लिंबोणीला आंबे लागले, का शेळीने आपली पोर वाघाच्या बेट्याला दिली, का कणसातून माणसे उपजली? अरे, केले काय शिवाजीने असे? मोगलाईत हुकमती केसांची टोळी दाढीखाली लोंबत होती ती मराठेशाहीत कवटीवर चढली एवढाच लाभ! शिवाजी नशिबाचा म्हणून नाव झाले इतकेच! त्यातून तुला खरे सांगू? अरे, खरा मोठेपणा अशा आरडाओरडीवर नसतो! शिवाजीची खरी लायकी चारचौघांना पुढे कळणार आहे! त्या माणसात काही जीव नाही रे!

**देहू** : ते काही का असेना, माझा तुम्हाला एकच सवाल आहे. तुमच्या कलमाच्या मदतीवाचून राजांनी आपल्या नावाचा एवढा ग्रंथ कसा केला ते सांगा.

**जिवाजी** : सागू तुला देहू? कलमाच्या मदतीवाचून कुठल्याही ग्रंथाचे पान हलायचे नाही बघ! अरे, शिवाजी नुसता नावाला पुढे झाला, पण खरी करणी त्या रामदासाची आहे! त्याने आपला दासबोध ग्रंथ लिहिला नसता, तर शिवबाचा एवढा ग्रंथ कदाकाळी होताच ना! आणि दासबोध ग्रंथ कशाने लिहिला सांग बघू? शिवाजीच्या भवानी तलवारीने? नाही! दासबोध लिहिणाऱ्या लेखणीने? हो, घेण्यासारखी गोष्ट काय की, नुसत्या भवानी तलवारीच्या नाचाने मराठेशाहीला रंग चढला नाही, तर दासबोध लिहिणारे कलम त्या सगळ्या भानगडीच्या मुळाशी होते! आता तूच सांग बघू भवानीचे हातवारे करणारा शिवाजी थोर का कलमाने दासबोध रेखाटणारा रामदास थोर?

**देहू** : समर्थांची ऐपत भारी वाटते बुवा!

**जिवाजी** : बरोबर बोललास! अरे, शिवाजी किस चिडियाका नाम है! शिवबाने जो एवढा ग्रंथ केला त्याची एकुणएक पाने समर्थांनी खरडली होती! अरे, माझा तर असाच होरा वाहतो की, शिवाजीच्या नावात रामदासाइतका काही राम नाही! आता तुला व्हायचे आहे शिवाजी! पण एखाद्या रामदासावाचून तू कसा होणार शिवाजी? बेटा देहू, बच्चा, बोल, आता तुझा रामदास कोण ते?

**देहू** : (जिवाजीच्या पायांवर डोके ठेवून) बजरंगबलीकी, जय जय रघुवीर समर्थ –

**जिवाजी** : समर्थाघरिचे श्वान, त्यास सर्वही देती मान! बेटा देहू, अखिल त्रैलोक्य तुझ्यासारख्या कुत्त्याल्या मान देईल!

**देहू** : पंत आज माझे डोळे उघडले! पण पंत, तुम्ही समर्थासारखे कसे, ते एकदा नीट पढवा मला. ते बालब्रह्मचारी आणि तुम्ही तर असे कुटुंबवत्सल!

**जिवाजी** : अरे, बालपणी म्हणजे सुमारे सात-आठ वर्षेपर्यंत मी सुद्धा बालब्रह्मचारीच होतो. पुढे मत्र शेजारीपाजारी –

(कावेबाजपणाने हसतो)

**देहू** : पंत, आता हसण्यावारी नेऊ नका! मला शिवाजी करण्यासाठी तुम्ही समर्थ कसे होणार? समर्थांना तर लहानपणीच लग्नाचा तिटकारा येवून ते सावधान होऊन पळत सुटले!

**जिवाजी** : बेटा देहू, ह्या जगात खऱ्याकडे कोणी खोल नजरेने बघत नाही! ऐन मुहूर्तावर नरायण कुलकर्णी "सावधान" ऐकून सावध झाला आणि संसार सोडून श्रीसमर्थ रामदास झाला एवढेच काय ते लोक बघतात! पण नारायण पळाला का याचा कुणी नीट विचार करित नाही! त्याला सांगून आलेली मुलगी काय चेहऱ्यामोहऱ्याची, कुलशीलाची होती याचा कुणी विचार केला का आजवर? अरे, बाबत अगदी साधी आहे! समर्थांच्या गळ्यात बांधण्यासाठी आणलेल्या त्या लग्नाच्या घोरपडीत काहीतरी मोठी गोम होती! आवत्याभवत्यांनी नवऱ्यामुलाला खूप चिडविले असेल म्हणून आयत्या वेळी पोराच्या जातीने पळ काढिला आणि दुसरे काय? सावधान कसले नि समर्थ कसले? पुढे अशा फकिरी बाण्याने अंगाला राख चोपडून नारायणाचा रामदास झाला, झाले. बाकी खरे म्हणशील तर समर्थाला तर संसाराची मनापासून आवड होती! का म्हणून नाही विचारलसं? तर त्यांनी स्पष्ट म्हटलेच आहे की, आधी प्रपंच नेटाका करावा आणि मग म्हातारपणी परमार्थ पहावा म्हणून! आणि एवढ्यासाठीच अटकळीचा मनुष्य आधी प्रपंचाचा पसारा फैलावून सोडतो! शिवाजीने सहा बायका का केल्या? नेटका प्रपंच साधावा म्हणून!

**देहू** : पंत, नेटका प्रपंच कसा करावा हेच ठीक पढवा आधी मला!

**जिवाजी** : नेटका प्रपंच शिकणे फुकाचे काम नाही बाबा! त्याला रुका पाहिजे! त्याला रोकड पाहिजे! तसा शिकायला तयार हो. प्रापंचिकांच्या उद्धारासाठी समर्थांनी जसा दासबोध लिहिला, तसा तुझ्यासाठी मी 'कलमबोध' लिहून टाकीन! श्रीकलमबोध! दासबोधाची वीस दशके तर कलमबोधाची वीस पेरे! कबूल?

**देहू** : मग त्याला पैसा कशाला हवा?

**जिवाजी :** दाम करी काम! दाम घेतल्यावाचून केल्या कामाचे मोल राहत नाही. दाम घेतल्याविना काम करणाराला नेटक्या प्रपंचाची खूण कळली असे कोण म्हणेल? कलमबोध उपदेशायला तो कसला अधिकारी पुरुष? कारकुनी गादीचा कोपरा म्हणजे बारमहा पिकणारे पैशाचे शेत! तिथे पैसा पेरावा, कामाचे पीक घ्यावे!

**देहू :** पण माझे काम करण्यासाठीसुद्धा पैसा खाणार?

**जिवाजी :** शिवाजीजवळून समर्थांनी साऱ्या राज्याच्या सनदा काढून घेतल्या आणि त्याला भगवी वस्त्रे धारण करायला लावली! तू कोण? नाणी मोजली नाहीस तर तू कोण? अरे, वडिलांनी सरकारी कामात पैसे नापत्ता केल्याचे पहिल्याने जेव्हा लक्षात आले - त्या वेळी मी म्हणजे नुसता आठ वर्षांचा चिमखडा होतो -

**देहू :** वडील पण पैसे खात होते का?

**जिवाजी :** आम्हा कलमदान्यांत हा वडिलोपार्जित गुण आहे! आमच्या घराण्यातले पुरुषन् पुरुष एक पिढीजाद धोरणाचे होऊन गेले! राम जसा एकबाणी - तसे आम्ही एकटाकी, म्हणजे लिहिताना टाक एकजात! राम एकवचनी - तर आम्ही एकचाकी, सारे एका चकारीने रस्ता काढणारे! तिकडे राम एकपत्नी - तर आम्ही एकराखी! किमानपक्ष एकेकाला एकेक राख ही असायचीच!

**देहू :** राख म्हणजे काय?

**जिवाजी :** राख म्हणजे बायको नसलेली बायको - नाकापेक्षा जड मोती! बेटा देहू, तू अजाण बच्चा आहेस! कलमदाने म्हटला की तो एकटाकी, एकचाकी आणि एकराखी ठरलेला! बरे पुढे वडिलांची ही खादाड खुबी पहिल्याने ध्यानात आल्याबरोबर त्यांना धाक घातला, तिच्याबद्दल भरदरबारात होलीपुनव गाजवायचा! त्यासरशी वडिलांनी माथ्यात राख घालून घरीच फाल्गुन उरकुन घेतला! अखेर त्यांच्याकडून दुप्पट रकमेचा रोखा लिहून घेतला तेव्हा घरातली अब्रू घरात ठेविली! वडिलांशी हे वागणे; मग तुझे काय उरले? अरे, कारकुनी कसबाला प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे डोके लागतं! थोरल्या राणीसाहेब - सईबाईसाहेब जेव्हा मेल्या - आपले वारल्या, तेव्हा तर ह्या जिवाजीची तारीफच करायला हवी होती. खाजगी खात्यातून सव्वा खंडी चंदनाचा हुकूम झाला; पण सव्वा शेर चंदनाच्या उटीने सव्वा खंडी बाभळीचे चैत्री हळदकुंकू आटोपले आणि पंधरा मोहोरांची बचत

केली! गडावर धूम बोलवा, की सव्वा खंडी चंदनाने मातोश्रींना मुक्ती दिली म्हणून; पण खरी गोष्ट एक देवाला ठाऊक, त्या जळत्या जिवाला ठाऊक, की या जिवाला ठाऊक!

**देहू** : पंत भलतेच काय सांगता? इतक्या हलक्या मनाने तुम्ही पंधरा मोहरांची मिळकत केली असे कुणालासुद्धा खरे वाटायचे नाही!

**जिवाजी** : नाही वाटायचे; साध्याभोळ्यांना नाही खरे वाटायचे! "तुका म्हणे येथे पाहिजे जातीचे!" जातीच्या इरसलांना माझे म्हणणे बेचूक पटेल.

**देहू** : मग हे सारे खरे म्हणता?

**जिवाजी** : खरे, म्हणजे? अरे, मग नेटका प्रपंच कशाला म्हटले आहे? आमक्या कामात पैसे खायचे व तमक्यात खायचे नाहीत, असा पंक्तिप्रपंच मुळी प्रपंचात चालतच नाही! प्रपंचात म्हणजे सुतळीच्या तोड्यापासून जपावे लागते! आता सांगू तुला आणखी? वडील वारले तेव्हा त्यांची तयारी चालली होती आणि आमच्या मातोश्रींनी मंगळसूत्र तोडून टाकिले - आमची बाळबुद्धीच; पण दूरदृष्टीची पोच केवढी - मंगळसूत्रातला टिचभर दोरा, पण वावडीसाठी काढून ठेवला! अरे, डाव्याउजव्या हातांनी इंद्रजाळ करीत नाही त्याने लेखणी टाकून नांगर धरावा आणि आपल्या मानेवरच जोखड ठेवावे.

**देहू** : पण पंत इंद्रजाळाच्या अशा नजरबंदीत खोडा पडून वेळेवर पायबंदी व्हायची नाही का?

**जिवाजी** : पायबंदी होईल कशी? या गोष्टीची कुठे वाच्यता करायची नसते! कारकुनाच्या लेखणीप्रमाणे, शेंडा कापून जिभेचाही टाक तोडावा लागतो! तुला म्हणून या अंतर्यामीच्या खुणा सांगितल्या! जिभेचे कलम करायचे आणि कलमाने दस्तुर कुठे गुंतवायचा नाही! जमा रकमेची पोच म्हणून हाताचा लेख कुणाला देणे नाही. कालपरवाची गंमतच ऐक; सालमजकूरची पट्टी भरण्यासठी एक कूळ आले होते! भरणा जमा झाल्यावर कुळाने पावतीचा हट्ट घेतला. तेव्हा हल्ली पट्टीची पावती म्हणून त्याला जे चिठोरे खरडून दिले ते पेस्तर पट्टी थकल्याबद्दल वित्तविषय जप्तीचे ताकीदपत्र! आणि दस्तूर ठोकला सरकारकुनांचा! कुत्ता जाने, चमडा जाने!

**देहू** : सरकारकुनाचे अक्षर तुम्हाला कसे हो काढता आले?

**जिवाजी :** काशीची गंगा राजापुरी कशी रे उपटते? अरे देवास करणे न दुसरे काय!

**देहू :** बरे पंत, सगळ्यांच्या जवळून पैसे खाता खरे; पण हाताखालच्या माणसाजवळ हातचलाखी करणे धोक्याचे नाही का?

**जिवाजी :** अरे, माझ्या हाताखालच्या माणसाची तर गोष्टच सोड. नंदीच्या शिंगांनी शंकराचे अंग खरचटत नाही. पण मी ज्याच्या हाताखालचा कारकून आहे त्यालासुद्धा हात दाखवीन. तुझ्या देखतच कलुशा कबजीला कबज्यात घेऊन दाखवितो बघ! मग तर म्हणशील ना की आहे!

**देहू :** पंत, ते पाहा कबजीबाबाच येताहेत.

**जिवाजी :** (स्वगत) अरे बापरे, ही परदेशी पीडा आमच्या घराकडे का वळली? दैवाच्या कळसाला जाऊन भिडला तरी उंबरठे झिजवायची खोड जात नाही! (प्रकट) देहू, जरा हुशारीने राहा! यावे; यावे; आज - (कबजी येतो) धन्यांनी गरिबाच्या घरी पायधूळ झाडली! घर पावन झाले! बेचाळिशीने मुक्काम गाठला! अभाग्याच्या घरी कामधेनू आली! (स्वगत) लागला नंदीबैल झुलायला!

**कबजी :** जिवबा, तुमच्या घरी यायला आम्हाला कसला संकोच आहे? आम्ही तुम्हांला नक्कर भाऊप्रमाणे लेखतो! जरा निकडीचे काम निघाले म्हणून तातडीने तुमच्याकडे आलो झाले. अहो, जिवाजी म्हणजे या कलुशाचा उजवा हात!

**जिवाजी :** (स्वगत) कलुशाचाच काय, पण ज्याला म्हणून लिहिता येते त्या हरएकाचाच उजवा हात ! (प्रकट) पायांच्या चाकराला असे हाताशी धरणे हा धन्यांचा मोठेपणा आहे! (एकीकडे देहूस) बेटा देहू, आज ह्या कारकुनाच्या घरी कोण आले आहे? काय बोलते आहे? कसे बोलते आहे?

**देहू :** (जिवाजीस एकीकडे) बजरंगबलीकी जय!

**जिवाजी :** (देहूस एकीकडे) कलमेश्वरीकी जय! स्वदेशे पूज्यते राजा विद्वान सर्वत्र पूज्यते! (उघड) धन्यांना घर कसे सापडले पण?

**कबजी :** का बरे? घर माहीत होते! आम्ही अव्वल अत्तरे विकण्याकरिता गडावर फेरी घालताना तुमच्या घरी एकदा नव्हतो का आलो? आमच्या पेटीतली अत्तराची एक कुपी खरेदीवाचून खपली ती याच घरात!

**जिवाजी :** त्या कुपीतले अत्तर उडून गेले; पण धन्यांच्या डोक्यातून ती गोष्ट अजून उडून गेली नाही! काय तारीफ आहे! बरे, कामाचे राहते आहे तसेच!

**कबजी** : काम जरा नाजुक आहे; आपलेपणाने करायचे आहे. राजश्रींनी आज सिंधुदुर्गावर दौलतराव शिरक्याच्या तुळशीला आणली आहे!

**जिवाजी** : आले लक्षात! तेव्हा ती खजगी खात्याकडे जमेस घालायची. तिची तैनात तरकीब राखायची. खलास! हेच ना काम?

**देहू** : (जिवाजीस एकीकडे) तुळशीबाईंना आणले कसे हो पंत?

**जिवाजी** : (देहूस एकीकडे) बेटा देहू, ती सरकारी सफाई आहे; हा दरबारी दरवडा आहे; हे रंगेल राजकारण आहे! कलमबोधात तुझ्यासाठी या खुबीचा खुलासा करीनच मी.

**कबजी** : (काही कागद देऊन) आणि जिवबा, हे त्या प्रकरणी सरकारी शिक्क्याचे कागद! पंत, या गोष्टीकडे नीट ध्यान पोचवा. येसुबाई साहेबांची आपल्यावर ठीक कदर नाही; तेव्हा गोषात अशी दुफळीची गडबड उडाली तर एका फळीच्या आधारावर या तुफानातून आपल्याला सलामत तरून जाता येईल. दरबारत अजून आपल्या विरुद्ध थोडी आग धुमसते आहे. तो साबाजी शिरके, हिरोजी फरजंद, ही माणसे आपल्या बऱ्यावर नाहीत! तो बेवकूब रायाजीसुद्धा जरा वाकूनच असतो. त्याच्या प्रेमाच्या वेडाबद्दल राजश्रींकडे एकदा बोलणे काढून त्याला कामावरून काढण्याचा मझा मनसूबा आहे. सेनासागराच्या जागेसाठी चांगलासा मनुष्य हेरून ठेवा! हो, वेळेवर अडचण नसावी!

**जिवाजी** : ठीक आहे; ऐसा खासा जवान आणून देतो, की ज्याचे नाव ते!

**कबजी** : बरे तर, मी जातो आता. राज्याच्या बंदोबस्त नीट ठेवा!

(कबजी जातो)

**जिवाजी** : ठीक आहे! बेटा देहू, हो पुढे आता. आज मराठ्यांचा सेनासागर, रायगडचा सेनापती कोण आहे? तू आहेस? नाही! सुभेदार तानाजी मालुसऱ्यांचा रायाजी आहे? आहे. उद्या मराठ्यांचा सेनासागर कोण? रायाजी? नाही! तू आहेस? हो! कोणाचे नाव उद्या पुढे करणार मी? बोल!, बेटा देहू, बोल!

**देहू** : बोल बजरंगबलीकी जय! (करेल भराभर फिरवतो)

**जिवाजी** : एका दिवसात उनाड पोऱ्याचा सेनासागर कसा होतो हे कलमेश्वराच्या कृपेने तू पाहिलेस! आता उद्याची बात उद्या! देहूचा रायाजी; रायाजीचा शिवाजी! देहू,

हे कलम काय करीत नाही? पहिलवानी करून काय होणार? तुम्ही पहिलवानांनी रोजी हजार बैठका मारण्याचा सराव केला, तरी कारकुनापुढे तुम्हाला उठून उभे राहणे भाग आहे! तुमचे कान नापत्ता झाले असले तरी कारकून त्यांना उपटून ठिकाणावर आणल्याखेरीज सोडायचा नाही. तुमचे गर्दन रुंदावले तर कारकुनाला तुमच्या मानगुटीस बसणे सोईचे पडते. तुमची शेंडी अगदी शिवराईएवढी करा, की तिचे हवे तर दुसऱ्याच्या डोक्यावर कलम लावा, ती नेहमी कारकुनाच्याच हाती राहणार!

**देहू** : पंत, तुमच्या कलमाची करामत पाहून आमचा नक्षा उतरला! पंत, मी तुम्हांला सर्वस्वी शरण आहे! मला तुमचा गुरूपदेश करा!

**जिवाजी** : त्या सलकड्यांच्या सनदा काढून माझ्या झोळीत टाक! गुरुकृपा फुकाची नाही!

**देहू** : (सलकडी जिवाजीस देतो) सदगुरूच्या चरणी अर्पण असो!

**जिवाजी** : चरणी नाही - हाती! बेटा देहु, भाषा हमेष बेतशुद्ध असावी! आज तुला आमच्या धर्माची दिक्षा देतो! आजपासून माझ्या संध्येची तू व्यवस्था ठेवीत जा!

**देहू** : बस? एवढेच काम? संध्येसाठी पळीपंचपात्री आणून ठेवायची?

**जिवाजी** : धीरे, धीरे, जरा धीरे! बेटा देहू, मी शक्तीचा उपासक आहे! माझी संध्या साधीसुधी नाही! आम्ही दारूच्या पाण्याने आचमन करतो आणि स्मरणीचे मणी ओढण्याऐवजी गोमुखीत - कान कर इकडे! अरेरे, तुला चांगलेसे कानसुद्धा नाहीत; तुझ्याशी कानगोष्ट करायची तरी कशी? गोमुखीत सागोतीचे कबाब ठेवायचे असतात! ही उपासना कोणाला सांगितलीस तर तुझ्या मुलतान मातीसकट तुझ्या अंगाची राखरांगोळी करीन! शेवेला उतरला तर शिवाजी होतोच आहेस! बोल, आहे कबूल?

**देहू** : मी आता सर्वस्वी आपला शिष्य आहे! पंत, माझे आणखी एक काम मात्र आहे!

**जिवाजी** : आम्ही ओळखतो; अगदी मनातले ओळखतो' चांदणी नावाच्या पोरीसंबंधाने बोलणार आहेस ना तू?

**देहू** : सत्य आहे! पंत, हे कसे ताडले तुम्ही?

**जिवाजी :** ते राहू दे! ही कलमेश्वराची कृपा आहे! चांदणीच्याबद्दल मी तुझ्यासाठी खटपट करीन. बरे, चल आता. संध्येबद्दल नीट व्यवस्था ठेवणार ना तू? तसेच उद्या रायाजीच्या जागी उभा राहणार ना तू?

**देहू :** बोल बजरंगबलीकी जय!

(दोघे जातात, पडदा पडतो)

---

## प्रवेश तिसरा

(स्थळ: साबाजी शिरक्याचे घर, पात्रे: ज्ञानेश्वरी वाचीत असलेला साबाजी; हुक्का तयार करीत असलेला हिरोजी फरजंद)

**साबाजी :** (एकेक अक्षर लावून) "माझा मराठाचि बोल निके! परि अमृतातेंही पैजा जिंके ! ऐसीं अक्षरें रसिकें! मेळवीन!" वाहवा! अमृतातेंही पैजा जिंके ऐसीं अक्षरें मेळवीन!" काय एकेकाचा हातगुण असतो. ज्ञानोबारायांनी भलतीशी पैजहोड घातली आणि अक्षरान अक्षरांशी खरेपणाची मिळणी केली. हिरोजी, ऐक हे; "माझा मराठाचि$_0$"

**हिरोजी :** साबाजी, असले एकेक अक्षर मेळवायला त्यांना वेळ लागला नसेल तितका तुला ते लावायला वेळ लागतो आहे. ज्ञानोबारायांना रेड्याकडून वेद वदवायला इतका सायास खचित पडला नसेल.

**साबाजी :** भाग्यवंतांच्या घरच्या गोष्टी, तुम्ही आम्ही बोलायच्या आता! आळंदीच्या विधात्याने शेंद्रीच्या रानमाळातल्या मराठी दगडांनी देवपूजा रचिली; शिवनेरीच्या शिवशंकराने मावळच्या माकडांना अमृताला लाथाडणारे देवरूप दिले! अमृताशी आळी करणारी एकाची वाणी, तर अमृताला औषध चारणारी दुसऱ्याची करणी! ज्ञानोबाची मराठी वाणी, शिवबाची मराठी करणी - दिगंत उजळून दोघांनी ऐन मराठी हाकेने भूमंडळ गाजविले. मराठी मोहिनीने जीवकोटीला भारून टाकले. आज आठ वर्षे झाली. अजून राजांच्या नावाची निशा उतरत नाही!

**हिरोजी** : बरे, पुराणिकबुवा! आता गुडगुडीची गोड गंमत प्या की जरा. हं, ही घे.
**साबाजी** : जरा थांब, सोवळ्याने गुडगुडी ओढणे पाप आहे.

(येथून कोठीवाले यांचे नाट्यलेखन सुरु होते.)

**हिरोजी** : काय तुमचं सोवळं? चांगलं लफ्फेदार धोतर नेसला आहा, रेशमी पैरण घातली आहे. डोक्याला भरजरी मुंडासे आहे आणि तुमचं हे सोवळं?
**साबाजी** : हिरोजी, आणि या अंगावरल्या शेल्याचं नाव यादीत घालायला राव तुम्ही विसरलात! हिरूबाबा, तुला माहीत नाहीत ही वस्त्रं कुणाची आहेत ती?
**हिरोजी** : नाही बा; मला कशी ठाऊक असणार?
**साबाजी** : अरे, ही वस्त्रं शिवप्रभूंची आहेत. बादशहा नवरंगाच्या हातावर तुरी देऊन महाराज नर्मदापार होऊन जेव्हा दक्षिणेत आले, तेव्हा महाराजांनी आपली ही वस्त्रं पहिल्या भेटीत मोठ्या खुशीनं मला बहाल केली. तेव्हापासून मी या वस्त्रांचं जीवापाड जतन करतो. देवपूजेच्या वेळी आणि ज्ञानेश्वरीच्या वाचनाच्या वेळीच तेवढी ती मी वापरतो! आता माऊलीची ही एकच ओवी ऐक -

की टिटिभू चांचुवरी । मापसूये सागरी ।
मी नेणतु त्यापरी । प्रवर्ते एथ ॥3॥

हिरुबा, ज्ञानी ज्ञानदेवाची ही वाणी म्हणजे अमृतसागरात न्हाऊन निघालेली साक्षात देववाणीच समज. विश्वमोहिनी श्रीशारदेच्या तोंडूनच जणूकाय माऊलीनं या ग्रंथात शब्दब्रह्मा कवटाळलं आहे! नादब्रह्माला झंकारलं आहे! अहाहा! विनयभाव तरी केवढा! म्हणे समुद्रासारखं गीताशास्त्र अपार आहे! आणि त्याचा अर्थ करण्याच हा माझा प्रयत्न टिटवीसारखा आहे!
**हिरोजी** : पुराणिक बोवा, माऊलीनं दिलेला हा टिटवीचा दृष्टांत सांगा.
**साबाजी** : ऐक तर. एका टिटवीनं आपली अंडी खडकात लपवून ठेवली. पण समुद्रभरतीत ती वाहून गेली! टिटवी दुःखित झाली; मनोमय रागास आली! तिनं आपल्या इवल्याश्या चोचीनं समुद्र कोरडा करण्याचा प्रयत्न केला; पण तो वाया गेला नाही! पक्षिराज गरुडाला टिटवीचा भगीरथ प्रयत्न पाहून दया आली! आणि त्यानं समुद्रात वाहून गेलेली तिची अंडी परत आणून दिली.
**हिरोजी** : साबाजी, आज आपल्याला थोरल्या महाराजांच्या, -

**साबाजी** : (ज्ञानेश्वरीला वंदन करून ती बांधीत ) सामर्थ्याच्या गरुडभरारीची उणीव वाटते, होय ना हिरू? (अंगावरील कपडे काढीत) देशाचा धनी वागणुकीत सोवळा असला म्हणजे परक्या सत्तेचा विटाळ देवराज्याला लागत नसतो! सर्जेराजांनी, ज्ञानोबा-तुकोबांचा पंथमार्ग 'वारकरी' होऊन पत्करला! आणि राष्ट्रसंत श्रीसमर्थांचा 'जशासतस' हा धारकरी बाणाही अंगी बाणवून घेतला! कमरेची आईभवानी परजून दोन्ही पंथांना पराक्रमी बनविलं! (उसासत) थोरल्या राजांनी रोहिडेश्वराला रक्ताचा अभिषेक केला! आणि करांगुलीतल्या गोविंदाला रक्तानं जागं करीत स्वराज्याचा गोवर्धन उचलायला हलकारलं. शंभुमहादेवाला सर्जेराजांनी रुधिराभिषेक केला! दोस्ता, आठवतो का रे तुला तो प्रसंग?

**हिरोजी** : जीवाभावाचा देशोद्धाराचा तो प्रसंग! आपण मेलो तरी तो विसरणार होय? आई भवानीच्या मुहूर्तावरच तू ही आपली कमरेची 'बिजली', या खिणासारखी बांधली; (साबाजी ती बांधतो)

**साबाजी** : (मध्येच) आणि तू ही आपली 'तुळशी' सर्जेराजांच्या पायावर वाहिलीस!

**हिरोजी** : योगायोगाच्या गोष्टीतून ऋणानुबंधाच्या गाठीभेटी कशा बांधल्या जातात बघ. त्या वख्ताला आपण एकमेकांच्या जिवाचे सच्चे सोबती होतो. जिगरी दोस्त होतो. लंगोटीयार होतो. (हसतात)

**साबाजी** : आज दोस्तीतून आपण सोयरीकीत आलो! मझ्या दौलतीला तुझ्या तुळशीची जोड मिळाली. जिवाच्या जोडीदार दोस्ताची दैवानं इवाई इवाई म्हणून इरेची निवड केली!

**हिरोजी** : ती होऊनच आज पाच वर्षं लोटली. बर पण इवाईबोवा! घ्या की आता ही गुडगुडी! वरचा विस्तव विझायला लागलाय म्हणतो!

**साबाजी** : (सुस्कारत) हिरोजी, मागील आठवणीचा मनात अंगार फुलला म्हणजे सर्जेराजांच्या तळपत्या तेजाची आठवण येते.

**हिरोजी** : खरंच, थोरल्या धन्यानं पोरांच्या सोयरीकीला असायला हवं होतं, नव्हं?

**साबाजी** : हवं होतं! पण हिरूबा, आशा ही संसारात निराशेनंच वावरत राहते, गड्या! आता तू म्हणालास की, "ज्ञानोबारायांना रेड्याकडून वेद वदवायला इतका सायास खचित पडला नसेल!"

**हिरोजी** : आं-ते आपलं उगीच थट्टेनं म्हणालो जी!

**साबाजी** : मग मी सुद्धा तुला खरं सांगतो. मन सागराप्रमाणं शांत ठेव. म्हातारपणात उतावळी घडी, जिवावर बेतते! ज्ञानोबाची वाणी चिंतनात घे. उगीच मी' "गाढवापुढं गीता वाचली, 'असा पस्तावा पुढं मागं मला करायला लावू नकोस. कर्मधर्माचा आरंभ हा सृष्टीकर्त्याच्या मर्जीतच असतो. तुम्ही आम्ही निमित्ताचं धनी! पण भगवंताची करणी, कुणी जाणावी!

**हिरोजी** : कर्म माझं! अहो, पुराणिकबोवा, तुम्ही आता मला पोथी सांगत नाही; तर ती संपवून आपण अगोदर ही गुडगुडी ओढयचीया! घ्या ही. मारा अदूगर एक झुरका. (गुडगुडी पुढं करतो)

**साबाजी** : घे, तूंच मार अगोदर.

**हिरोजी** : छे! छे! अरे, पहिला मान दोस्ता तुझा! इवायाचा. कारण तुझा पडला वरपक्ष! म्हणून म्हणतो, हिरोजी काय - वधुपक्षाचा धनी! घ्या इवाईबोवा! गुडगुडी ओढायला बी, नगं आता लई मानपान!

**साबाजी** : (गुडगुडी ओढत पण हसत) हिरजी, लई तुझा हा बग घाईगर्दीचा हट्ट! आरं आपल्या पोरांची लग्नं होऊन आज अर्धं तप उलटलं! आं. आत्ता रं कसचा आपण इवाईपणाचा मानमरातब बघायचा; बोल? (गुडगुडी पुढं करतो) घे. मार बघू एका दमात हिचा झुरका!

**हिरोजी** : (झुरका मारित) सवंगड्या, अरं गुडगुडीच्या झुरक्याचा दम मला काय मारायला सांगतोस? त्या कानोजी कलुषा कबजीचा या माझ्या तुळशीनं एका दमात 'एक घाव दोन तुकडे' करायला सांग की?

**साबाजी** : (गुडगुडी ओढत) सांगेन! पण मर्दा जरा धीर धर. अरं समुद्राच्या लाटेला मिठाचा बांध अडविणारा नसतो! हे ध्यानात घेऊन जरा शांत रहा. आपल्या शक्तीचा, घाईनं शंभूराजासारखा दुरुपयोग करायचा नाही. तर सदुपयोगानं शक्तीचं म्हातारपण, देशाच्या कारणी लावयचं आहे! कबजी म्हणजे सांबाच्या पिंडीवर चढलेला विंचू. एका वहाणेचं काम. कमरेच्या तुळशीला घाईगर्दीनं उतावळीपणानं उत्सुक होऊ देऊ नकोस.

(पडद्यात: साबाजीबाबा, अहो साबाजीबाबा, असं म्हणत चांदणी प्रवेश करत्ये. दोघेही गुडगुडी ओढायचे थांबतात)

कोण?

**चांदणी** : मी चांदणी.

**साबाजी** : आँ. ऐन उन्हाच्या दोपारात, - मझ्या घरात या वख्ताला का उगवलीस? बाळ,

**चांदणी** : मासाहेबांनी तुमास्नी लगोलग महालात भेटायला बोलावलंया चला लवकर जल्दी करा.

**हिरोजी** : अग पन पोरी, जल्दी करण्यासारखा असा बाका वखुत तरी कोणता गुदरलाय त्यो तर सांगशील?

**चांदणी** : आता कसं सांगू तुमास्नी. खरं सांगितलं तर म्हणाल की, पोरीच्या चहाड्या, पोरच कराया धावली. पण तुमी तुळशीचं बाप आहात! तवा पोरीच्या बेअब्रूला बापानं लई जपायला हवं.

**साबाजी** : (चकित होतो) चांदणे, जरा खुल्या दिलानं उघड करून बोल ना बेटा?

**चांदणी** : साबूबाबा, अहो उघड करून मोठ्यानं बोलण्यासारखी कां ही गंमतीची गोष्ट हाय! पण सांगत्येच आता फोड करुनश्यान! महाराजांनी तुळशीला मालवणाहून पळवूनश्यान आणलंया! आन् मासाहेबांच्या रंगमहालात ठेवलंया! तवा चला अदुगर दोघंबी. मी म्होरं होते. (जाते)

**हिरोजी** : (संतापून) बोल, गड्या! काय करू या वख्ताला? बोल, साबाजी! मन कसं शांत ठेवू? अरं आपण मराठमोळ्यांची मर्द माणसं! पोर, नांदलेली ऐकावी; नाही तर मेलेली बघावी.

**साबाजी** : हिरू, हिरू, शांत हो राया! अरं तुझी पोर, माझ्याच घरची लक्ष्मी आहे. कालकूट विष हे संसर्गानं मरत नसतं बाबा! अरं एकट्या तुळशीलाच बोल कसा लावता येईल? कापूर आत बाहेर शुद्ध असला तरी तो विस्तवाशी संबंध आला की, जळून खाकच होणार! तसंच हे झालंया बघ आपल्या पोरांचं!

**हिरोजी** : छे! भलतंच बोलतोयस तू साबाजी! अरं, बाबा! या मायेच्या मांगणीनं मोठमोठ्या साधुसंतांचं समुदाय भ्रष्ट केलं आहेत. तिथं तुमची आमची काय मतब्बरी रं? माया ही संतोषाचं वन उजाड करत्ये! जित्या उपरागाची मान तोडत्ये! मनोधैर्याचा किल्ला जमीनदोस्त करत्ये! अब्रूला साफ धूळ चारत्ये रे धूळ चारत्ये!

**साबाजी** : कबूल! दुतोंड्या जगात माणसाल ही अब्रूची आग, जितं ठेवून जन्मभर होरपळत ठेवत्ये; पण मारीत नसत्ये! हिरु, शांत रहा! दिव्याच्या वातीनं उजेडाबरोबर काजळीही साठतेच! दौलतीची गाठ पडल्याबिगर, मला माझ्या सुनबाईचा राजविलास समजणार नाही! पण दोस्ता, नक्की यात कुणाचा तरी हात, काळ्याबेऱ्यानं बरबटलेला दिसतोय! हे बग, तू असाच टाकोटाक मालवणला जा. सिंधुदुर्गाचा किल्लेदार, सिद्दी-आंग्र्याच्या फंदफितुरीत गवसलेला दिसतोय! हे बग, तसा जर तुला कट आढळला, तर कमरेच्या तुळशीनं, - काय करायचं ते तुला सांगायला नकोच!

**हिरोजी** : साबाजी, अरं एकट्या आरमारी किल्लेदाराच्या कटाचीच काय, तुझ्या माझ्या पोरांची फिसादी नजरेला आली, तर त्यांनाही आपली जान गमवावी लागेल!

**साबाजी** : बेशक! बेमालूम बोललास बग. जा. जिभलीला लगाम लावून, घोड्याला टाच मार. अन दे धडक तडक सिंधुदुर्गाच्या तटाला! मी मासाहेबांच्या दर्शनाला जातो.

**हिरोजी** : जा. मासाहेबांना भेट. त्यांना चार धीराच्या गोष्टी सांग. द्राक्षाच्या वेलीला कामधेनूच्या दुधाचं शिंपणं चाललेलं पाहून त्या उदास झाल्या असतील! नीट त्यांची समजूत घाल. (गहिवरून) साबूराया, बालपणापासून मी तुला कैक वेळा वचनं दिलेलं आहे की, -" एका आईच्या पोटी आपल्याला जन्म घेता आला नाही; पण मरण तरी जोडीनं या मराठेशाहीच्या , श्रीमान श्रीयोगी सर्जेरावांच्या, या श्रीसमर्थांच्या देव राज्याच्या, रक्षणाकरता आपण दोघंही या एकाच धरित्रीमातेच्या कुशीत एक ठाय मरण मिळवायचं! बस्स. हे घे माझं वचन.

**साबाजी** : (हातावर वचन घेतान) शाब्बास रं माझ्या कलीजा! हिरोजी, चंद्रबिंबातून स्त्रवणाऱ्या अमृतधारांचा वर्षाव, चकोर पक्ष्यांनाच दिसतो! आणि तोच त्या पितो! अहाहा! परमाणूत विश्व दिसतं, ते हे अस्सं! (परस्परांना दृढ आलिंगन देऊन दोघं दोहोबाजूनं आत जातात)

---

## <u>प्रवेश चवथा</u>

(स्थळ: छत्रपती संभाजी महाराजांच्या विलास-मंदिरातील दर्शनी भाग.
देहू दसरी महाराजांचा बादशाही हुक्का तयार करीत आहे)

**देहू** : बस्स! बजरंगबलीच्या उड्डाणानं महाराजांच्या या श्रृंगारविलासात हा देहू दसरी तर दाखल झालाच! जिवाजीपंत कलमदान्याच्या गुरुकृपेचं फळ, चांदणीच्या लाभात तूर्तास ही हुक्कागिराची कामगिरी बेस आहे! (हुक्का पेटवीत) चांदणी नजरेला पडेल म्हणून हजार जोर बैठकांचा श्वास मोठ्यानं फुंकर मारून, जंगमासारखा शंख फुंकीत हुक्का फुंकतोय; पण चांदणीच्या ऐवजी या आगीच्या ठिणग्याच सगळीकडे पळ काढताहेत! नादब्रह्म वाद्यांत आलं नसतं, तर नादाचा शंखध्वनी गाढवांनाही करता आला नसता

(पडद्यातून जिवाजीपंत; "तुमचं आमचं ठरलेलं मेतकूट,
खाशा स्वारींच्या घशाखाली पचनी पडणं,
हे कालकूट पचविण्याइतकं प्राणघातक आहे खास!)

**देहू** : अरे, बाप रे! हुक्क्यातून निघालेल्या ठिणग्या कुठं तरी या गाढवाकडून आगडोंब भडकविण्याचं कारस्थान - शिजतंयसं दिसतंय!

**जिवाजी** : (कलुषासह प्रवेश करीत) बेटा, देहू -

**देहू** : आज्ञा गुरुजी! (हात जोडून) बोला, कुठं आग लावू? कशाचा भडका उडवू? (चुटकी वाजवीत.) कुणाचा मुडदा पाडून तो पेटवू? बोला-बोला लवकर! बजरंगबलीकी जय! (जोर बैठका काढू लागतो व दंड थोपटतो)

**कबजी** : (रागानं) देहू, तू सध्या तालिमखान्यात नाहीस, तर संभाजी राज्यांच्या श्रृंगारमहालात आहेस! इथे करेलीचे कुस्तीगीर नाहीत; तर इष्काचे प्रेमवीर छत्रपती संभाजी महाराज आहेत! चल हो बाहेर, देवडीवर पहारा कर.

**जिवाजी** : बेटा देहू! जा देवडीवर, धन्यांची आज्ञा मुक्यानं पाळावी, कारण, मुक्याला बोलणं वर्ज्य असतं! रागावून पाहू नकोस! वैद्याचा द्वेष करून रोगी बरा होत नसतो! जा. हाक मारल्याशिवाय, तोंड दाखवू नकोस! हां – देवडीवर.

**देहू** : (हिरवटपणानं) ठीक आहे. माझं तोंड दाखवायचं नसलं, तरी तुमची तोंडं मी पाहणारच! (दंड थोपटीत) बोल बजरंगबली! तोड दुष्मन की नली! (जातो)

**जिवाजी** : माझ्या या शिष्याची रग, पेहलवानी पेशाची आहे! देहू दसरी रगेल दिसला, तरी तो मुळात चांगला रंगेल आहे! मासाहेबांच्या महालामधल्या उगवत्या चांदणीचा हा चकोर चंद्र आहे! तेव्हा, आपल्याला महालातील बित्तंबातम्या बिनचूक कळायला हा शेंदरासैतान, तुम्हा आम्हा कर्णपिशाच्चांना धार्जिणा व्हायला फार उपयुक्त आहे. सोळा शिणगारांत विडा हा तोंडात चघळतच राह्यला हवा!

**कबजी** : जिवाजीपंत, देहूला बेशक ठेवा! आमची ना नाही! परंतू आम्हाला पैजेचा विडा न उचलताच एखद्याचं तोंड रंगविण्याची –

**जिवाजी** : (मध्येच) पण तोंडघशी पडण्याची ती रक्तरंगणी कला आहे;

**कबजी** : आणि तीच आमच्या महाकालिकेनं आम्हाला उपजत दिली आहे!

**जिवाजी** : (उपरोधीत) जय नग्न चंडीके! तर मग धन्यानं हा पाठ, या चाकराला लवकर द्यावा म्हणजे इकडच्या स्वारीला राजागत विश्रांती लाभेल!

**कबजी** : पंत, हाही पाठ आम्ही तुम्हांला लवकर देऊ. पण याकरता, एखादी चांगली सोज्वळ कुमारिका नव चौदाची हेरून ठेवा! तोपर्यंत आम्ही शिकविलेली शक्तिपूजा नित्यनेमानं करीत जा. या शक्ति-उपासनेनंच आम्ही राजाचं मन जिंकून ते आम्ही पुरतं मुठीत ठेवलेलं तुम्ही पाहत आहातच.

**जिवाजी** : पाहतो का? अहो चांगला धन्यानं हुकूम दिल्यावर तो उस्सेभी जियादा समजून गाय कसायाच्या सफाई सुऱ्याप्रमाणं, लेखणी चालवितोय! नाहीपेक्षा, धन्याच्या हुकूमात नसता, बाळाजी आवजी सारखा थोरल्या महाराजांचा महान मुत्सद्दी म्हातारा, हत्तीच्या पायी कोणी दिला? या जिवाजीपंताच्या कलमानं! धन्याला पाण्यात पाहणारे दोनशे पराक्रमी जीव राजाज्ञेचं बनावट प्रमाणपत्र खरडून, त्या सर्वांना शाहुपुरीत कोणी ठार मारविलं? तर त्यावेळच्या काळ्या शाईचं काळकूट प्यालेल्या त्या माझ्या टीचभर बोरूच्या अघोरी लेखणीनं! मातोश्री सोयराबाईंना, महाराजांकडून भिंतीत चिणून मारायला आणि त्यांचा जीव घ्यायला कोणी लावलं? या जिवाजीच्या कलम बहाद्दर करामातीनं! फार कशाला? छत्रपती राजाराम महराजांना, आज राजांच्या बंदिस्त हुकुमतीत कोणी ठेवलंय? माझ्या कलमेश्वराच्या द्विजिव्ह नागिणीनं! कृतांतरूपी लेखणीनं! काय समजलांत?

**कबजी** : जिवबा आम्ही ते सारं जाणून आहोत! अहो, आम्ही उत्तरेकडचे आणि तुम्ही दक्षिणेकडचे! तेव्हा तुमच्या आमच्यात दक्षिणोत्तर – अंतर हे राहणाच!

**जिवाजी** : केव्हाही! कारण आमची पडली दक्षिण दिशा म्हणजे यमराजाची खुली वसाहत! मग धन्यानं आता कुणाकुणाला दक्षिणेत रवाना करायचं ठरवलयं?

**कबजी** : जिवबा, तुम्ही आमचे जीव की प्राण! अगदी उजवे हात! तेव्हा नक्कर भाऊपणाच्या भावनेनंच बोला पाहू?

**जिवाजी** : भावनेनं कशाला? धनी राजकारणात भावनेपेक्षा, निर्दय भांडणालाच रक्ताचा भडक रंग चढवावा लागतो! लाकूडतोड्याला झाड सावली देते, म्हणून तो ते तोडायचं थोडंच थांबतो?

**कबजी** : बरोबर! अजून आपल्या मार्गात थोरल्या महाराजांचे प्यार असलेले ते साबाजी-हिरोजी या महान मराठी रियासतीचे वठलेले वृक्ष आहेत! तेव्हा त्याना जमीनदोस्त करून महाराणी येसुबाईचा पक्का बंदोबस्त करावयास हवा! तुळशीच्या छंदात राजे सध्या बेबंद धुंदीत आहेतच.

**जिवाजी** : तेव्हा तुळशीला महाराणीचं मोल आणायचं! राणी येसुबाईंना तिच्या भोवती प्रदक्षिणा घालायला लावायच्या, असंच ना?

**कबजी** : ते काम तुळशीचं! तिनं राजांचं श्रृंगारभोग दासीपण स्वखुषीनं पत्करून, नवऱ्यासकट साबाजी-हिरोजीला आव्हान दिलेलं आहेच! जिवबा, घारीप्रमाणं माशीलाही उडावंसं वाटतंच! तेव्हा संभूराजांच्या या तुळशीदास प्रकरणातून आपल्याला महाराजांचे कान फुंकून त्या साबाजी-हिरोजीला अंधारकोठडीत कोंडून मारता आलं, तर तसा प्रयत्न करायला हवा! चिलटानं समुद्र ओलांडण्याइतकं हे कठीण असलं, तरी ते करायला पाहिजेच!

**जिवाजी** : बरोबर! शेवाळलेली शिळा वरकांती हिरवीगार दिसली, तरी ती पाय टाकणाऱ्याची तोडफोड ही करणारच!

**कबजी** : (पाहून) हुश्शीयार! ते पहा तुळशीच्या कंठालिंगनात मश्गूल झालेले संभूराजे, मद्याच्या मस्त गुंगीत इकडेच येत आहेत!

**संभाजी** : (तुळशीच्या तोंडाला मद्याचा पेला देत) तुळशी नवऱ्याच्या सुखावर पाणी सोडल्यावाचून प्रियकराच्या सुखाची प्राप्ती होत नाही! फळाची आशा धरायची झाल्यास फुलाची आशा सोडावी लागते! दिलवर गुलाबी शराब घेऊनही तुम्ही अशा खिन्न का? चंदनाच्या झाडाला, सुवासिक फुलं दिसत नाहीत म्हणून कोणी खिन्न झाला आहे काय? बोला?

**तुळशी** : राजसा, काय बोलू? इथं आल्यापासून माझं मन विकाराधीन होत नाही! लाकडाप्रमाणंच मायेची पेटती आग, माणसात असते. (सुस्कारत) लोकरीवाचून कांबळा आणि मातीवाचून गोळा, अशी माझी तऱ्हा चालली आहे! जीव वासनेनं आकळला जात नाही! मदन मोहात, गुंतत नाही!

**संभाजी** : का बरं?

**तुळशी** : जनरीतीचं भय! रायगडच्या रणमर्दा, तूफान दर्यातून तुळशीला तारलं! पण महालातल्या मंचकावर लोळताना अंगात कसलं तरी वारं शिरशिरलं! राजांच्या मांडीवर साकसुरत या तुळशीला कस! बसता येईल? भरल्या कुंकवावर मळवट भरून, सती जाणाऱ्या महासतीची ओटी, खणा-नारळानीच सवाष्णींना भरावी लागते? जिता नवरा सोडलेल्या रांडवानं नव्हे!

**संभाजी** : तुळशी, समजलो आम्ही! तुला मझ्या गणगोताची भीती वाटते. तर मग तुला पट्टराणी करण्याकरता, सगळ्यांचं शिर्क्याप्रमाणं शिरकाण करायचा आम्ही कबजीमार्फत हुकूम सोडतो! कोण आहे तिकडे?

**कबजी** : (जिवाजीसह एकदम प्रवेश करीत) आम्ही आपलेच आज्ञाधारक! ना विष्णुः पृथिवीपतिः! भगवान श्रीविष्णूला गरुडासारखा दुसरा भक्त कोणता असणार!

**जिवाजी** : महारज, विषारी शेषासारखा भगवंताचं दास्यत्व पत्करणारा पाताळयंत्री गुलाम त्रिभुवनांत झाला तरी तो एकच.

**संभाजी** : अरे वा! या सिद्धसाधकाच्या जोडीनं आम्हाला कोणता मनसुबा सांगायला आला आहात!

**कबजी** : राजे, दर्यासागर दौलतराव खवळला, तो सूडाच्या प्रतिज्ञेनं परांगदा झाला आहे!

**संभाजी** : हिमालयाला थंडीतापाचं भय नसतं! सूर्याला उष्णता बाधत नाही! त्याच्या जागी नवीन नेमणूक करा!

**जिवाजी** : देहू दप्तरीची अर्जी, महाराजांच्या चरणी सादर करीत आहे!

**संभाजी** : एकदम मंजूर.

**कबजी** : राजांचा निर्णय विचारी आहे; कारण सध्याच्या आपल्या या राजवटीत, -

**जिवाजी** : (मध्येच) डोक्यापेक्षा हाताच्या मनगटी रगाचीच, आजच्या मराठी रियासतीला अत्यंत जरूरी आहे! कारण काळाच्या हाताच्या पंजातच स्वर्गाचं अरण्य

करण्याचं सामर्थ्य असतं!

**संभाजी** : आम्हाला वेदांत नको! वस्तुस्थितीनं जे करायचे असेल, ते करा! धावणाऱ्या ढगाबरोबर, आकाश पळत नसतं! तुळशी, तुझा दुबळा दौलती, साहसशून्य झाला म्हणूनच परांगदा झाला! तुझं बाशिंगबळ जिवंत असून मेलं! तेव्हा त्याच्या जित्या नावाचं सुतकीस्नान करण्याकरता, चल आपण दोघेही गंगासागरात स्नान करायला जाऊ!

**तुळशी** : (जाता जाता) दुबळा दौलती परांगदा झाला! तुळशीचा मार्ग निष्कंटक ठरला! आंधळ्याच्या हाती, सोन्याचा मेरुपर्वत लागला! पण तो ठेचाळतच वाटचाल करीत मेला! षंढाहाती पद्मिनी गवसली; पण ती वांझ राहून मेली! या तुळशीला अशी गत करून घ्यायची नाही! राजसा, गंगासागराकडं लवकर चला! मला दौलतीच्या जित्या मुड्याचं तिथं तर्पण करायचंय! रायगडच्या राजाच्या गळ्याला मिठी मारून, जिवंत पतीचं पिंडप्रदान तिथं जलक्रीडा करीत पुरं करायचय! राया, आटपा लवकर! गंगासागराकडं लवकर चला!

(तुळशी बेहोष बनून आत जाते)

**संभाजी** : सुंदर मुखचंद्रावरचा कलंक बहुधा दुसऱ्याच्याच वाटणीस जात असतो! नामवंत नवऱ्याची किंमत त्याच्याकडे फक्त निरखून पाहाण्यापुरतीच! कबजी, आटोपती घ्या ही आमची मुलाखत.

**कबजी** : गोवेकर फिरंग्यानं आपल्या मराठी मुलखावर चाल केली आहे!

**संभाजी** : गोव्यावर आम्ही उद्याच स्वारी करणार आहोत! तुम्हीही आमच्या बरोबर स्वारीतच राह्यला हवं! पाण्याची लाट वेगानं जरी किनाऱ्यावर आदळली, तरी ती भू-प्रदेशाची आक्रमक ठरत नसते! पुढं बोला?

**कबजी** : महाराजांनी, प्रेमवेड्या बनलेल्या सेनासागर रायाजी मालुसऱ्यासंबंधी काय विचार केला आहे?

**संभाजी** : शिवबाचा शिपाई राया आहे! तो इष्काचा बेदर्द गडी! आमची खात्री आहे की, तो आपल्या पवित्र प्रेमवेडातच आमच्या महाराणीसकट महाराष्ट्रराज्याचं – तुमच्यापेक्षा अधिक संरक्षण करील. त्यासंबंधी ब्रही बोलू नका!

**कबजी** : महाराजांच्या बऱ्यावर हिरोजी फरजंद, साबाजी शिरके ही जोडी ठीक दिसत नाही!

**संभाजी** : कशावरून तुम्ही हा संशय घेता आहात?

**कबजी** : गोषात तशी दुफळीची गडबड कुजबुजत्या कानानं मला समजली आहे. साबाजी शिरके यावेळी मासाहेबांच्या अंतर्महालात –

**पडद्यात-साबाजी** : शिवरायाचे आठवावे रूप ।
शिवरायाचा आठवावा साक्षेप ।
शिवरायाचा आठवावा प्रताप । भूमंडळी ॥

**कबजी** : ऐकलंत महाराज! मासाहेबांच्या कानी लागून साबाजी शिरके राजांच्या भेटीला इकडेच येतोय! तेव्हा आम्ही इथून जाणंच इष्ट! चला. जिवाजीपंत आपण आपल्या ठरलेल्या विरुद्ध दिशेनंच गेलेलं बरं. (कबजी व जिवाजीपंत हे आतल्या सदरेत गेल्यावर साबाजी, बालराजे शाहूसह प्रवेश करतो)

(खिन्न मुद्रेनं)
शिवरायाचे कैसे बोलणे । शिवरायाचे कैसे चालणे ॥
शिवरायाची सलगी देणे । कैसी असें ॥
सकल सुखाचा केला त्याग । करूनी साधिजे तौ योग॥
राज्य साधनाची लगबग । कैसी केली॥
त्याहूनि करावे विशेष । तरीच म्हणवावे महापुरुष ॥
या उपरी आता विशेष । काय लिहावे ॥५॥

काय बोलावे. वा! श्रीसमर्थांचा हा केवढा हा अनुग्रह!

**संभाजी** : साबाजी -

**साबाजी** : (कोपरापासून हात जोडीत) संभूराजे, अलम मराठेशाहीच्या वृद्ध इमानी चाकराचा हा घ्या कोपरापासूनचा हा अखेरचा दंडवत!

**शाहू** : (न बोलताच आपल्या कमरेची छोटी तरवार उपसून तिनं वंदन करतो.)

**संभाजी** : अरे, वा! आज आमच्या बालराजांनी आम्हाला तरवार उपसून वंदन केलं! म्हणजे आमच्याशी या बालवयात युद्ध करण्याची इछा झाली असं आम्ही शाहूराजे मानायचं, होय? बरं बुवा! नका बोलू आमच्याशी! साबाजी, राष्ट्रगुरु समर्थांनी आम्हाला लिहिलेल्या पत्राचं स्मरण आजच अचूक तुम्हाला का बरं व्हावं?

**साबाजी** : संभूराजे, देशहित पाहणारा आपल्यासारखा सार्वजनिक माणूस आणि खाजगी जीवन जगून देश संरक्षण करणारा आमच्यासारखा सामान्य माणूस यांच्या लढ्यांत जसजशी जबाबदारी मोठी असेल, तसतशी इच्छा मरत जाते! कर्तव्यक्षम रूक्ष आयुष्य हे निरिच्छ आयुष्यातील निष्काम क्रियाशीलवृत्तीला विजयिनी करावयास हवे! कारण सर्वात्मक परमेश्वर हा निर्विकार आहे ! आणि राजा हे परमेश्वराचं जडदृष्टीला दिसणारं स्थूल पण व्यापकतम स्वरूप आहे! सारांश, राजा हा जगाच इच्छाविरहित उपभोगशून्य स्वामी आहे!

**संभाजी** : असेल! पण हे तत्व तुम्ही आम्हाला पटवून देण्याचं आज कारण?

**साबाजी** : एकच आणि तेही थोरल्या महाराजांचं राजधर्मपालन! कठोर न्यायनिष्ठुरतेत झालेलं त्यांचं ते व्रतपालन! शिवरायांचं 'शुभावसान' होताना त्यांना आपल्या पित्याची शहाजीराजांची आठवण झाली! आज बाळाजी आवजी चिटणीस, माझ्या बोलाच्या साक्षीला नाहीत! सर्जेराजे आणि चिटणीस, दोघेही श्रीसदगुरू समर्थांचे शिष्य! आपली मुंजही श्रीसज्जनगडी दोघांनीच थाटात केली! संभूराजे, तुम्ही चिटणीसासारख्या ज्येष्ठ आणि श्रेष्ठ मुत्सद्याला, त्या कंगाल कबजीच्या सांगण्यावरून हत्तीच्या पायी जीवं मरलं! कडेखांद्यावर चिटणीसांनी राजांना खेळवलेलं! शिवबांनी मिळविलेल्या दैवी संपत्तीच्या मुलानं सैतानी विलासात राक्षसी श्रृंगार चालविलाय!

**संभाजी** : दैवी संपत्ती! साबाजी, दैवी संपत्ती आबासाहेबांनी मिळवली म्हणता, म्हणजे त्यांनी केलं काय? राजगडावर अनायासे सोन्याच्या मोहरांचा वर्षाव झाला, त्यालाच दैवी संपत्ती मानावयाची काय?

**साबाजी** : अरेरे! संभूराजे अशी कशी हो तुमची मती चळली आणि वृत्ती कृतघ्न झाली! मरताना सर्जेराजांना आपल्या पितृऋणाची आठवण झाली आणि मरणघडीला राजांची देववाणी अंतरात्म्यातून प्रगट झाली! शंभूला पन्हाळ्याहून आणता, तर बरं झालं असतं! त्याची प्रकृती फार उग्र! शिवाय तो आमचा ज्येष्ठ पुत्र आहे! युवराज आता आमच्या दौलतीचा धनी! चाळीस हजार होनांचा पुणे महाल! कर्यात मावळचा तीस गावांचा स्वतंत्र मोकासा! आम्हाला महाराजांकडून शहाजीराजे पित्याकडून मिळाला! त्यावर एक कोटी होनांचं राज्य आम्ही पैदा केलं! भगवंताचं देणं! समर्थचरणी समर्पण केलं; पण ते दासमाऊलीनं त्यागाच्या भगव्या

झेंड्यानिशी आमचं आम्हाला परत केलं! राष्ट्रगुरूनं दैवी संपत्ती ही – मोक्ष मार्गात मोह नसलेल्या, धर्मशील राजाला वाटचालीची – मशाल दाखविली खरी; पण तिला दिवटी लावून सर्वस्वाची होळी करणारी पापी पुत्राची करणी उमगली! सर्जेराजांना मरणघडी दिसली! शिवबा चिटणीसाना इषारा देत मराठशाहीचं भाकीत वर्तवू लागले! चिटणीस, गड, कोट, लष्कर, पागा मिळविल्या! उमद्या माणसांची पण संचणी केली! श्रीरोहिडेश्वराच्या समोर हिंदवी स्वराज्याचा केलेला संकल्प देवाब्राह्मणांच्या आशीर्वादानं, साधूसंतांच्या तपश्चर्येनं, पतिव्रतांच्या पुण्याईनं पूर्ण सिध्दीस गेलेला आहे! आम्ही उगाच निमित्तमात्र! तुम्ही सारे सूज्ञ आहात! कळेल तसा प्रयत्न करून राज्य आणि धर्म रक्षावा! बाळाजी, आमच्या मागं स्थीती नीट दिसत नाही! न्यायानं चला! राज्य निर्नायकी न होईल असा कारभार करा! औरंग्या टपून बसला आहे, एकविचारे वागा! संभू उग्र, उतावळा तापट आहे; पण तो जंगली शेराशी झोंबी खेळेल, असा आमचा बहाद्दर बेटा आहे!

**संभाजी** : आम्ही उग्र, उतावळे, तापट आहोत म्हणूनच आबासाहेबांशी वैर करण्याऱ्या त्या औरंग्याचा चौरंग्या करून त्याला या रायगडच्या दरवाज्यावर उफराटं टांगण्याची आम्ही भिष्मप्रतिज्ञा केलेली आहे!

**साबाजी** : संभूराजे, आपल्या या प्रतिज्ञेचे बोल ऐकून, ऐशी वर्षांच्या या साबाजीचा जीव हरकला! कानावर अमृताचा मेघ गर्जला! वाऱ्याच्या लहरीवर येणारा सुगंध म्हाताऱ्या मनाला आनंदाच्या माधवीत दिसला! पण राजे, काम, क्रोध आमच्यासारख्या सामान्य झाल्यागेल्या म्हाताऱ्यालाही जिथं पाण्याशिवाय बुडवितात, आगीविना जाळतात, शस्त्राविना मारतात; तिथं तरूण विलासी राजाचा अधःपात कुणी वर्णावा? माफ करा धनी अगर करूही नका! पण साबाजीच्या जिभेला खोट्याची लई चीड आहे! मांस, मद्यादि मादक पदार्थांचा खुराक! मायावी मदिराक्षीच्या मोहक आलिंगनाचा गळफास. संभुबाळा, नवरत्नाचा हार समजून तू गळ्यात कवड्या विषारी सापाचा विळखा घेतलेला आहे! झिंगून पडल्यावर त्रिभूवनात तल्लीन झाल्याप्रमाणे वागू नकोस! बदफैल्याप्रमाणं बोलण्यात काय अर्थ? राजा, तुझ्या चाललेल्या रोजच्या वागणुकीचं वर्णन कर पाहू? पापांची वाट सुरू झाली की, जिवंतपणीच माणसाला नरकयातना भोगाव्या लागतात! हा माझा म्हाताऱ्याचा इशारा नीट लक्षात घेऊन, राजधर्माला स्मरून वाग! (शाहूस) चला

बाळ राजे! (जाऊ लागतात)

**संभाजी** : साबाजी, थांब! धन्याचा उपमर्द करून चाललास कुठे? तुझ्या म्हाताऱ्या कुडीतला प्राण आणि त्याचा उरला सुरला श्वास हा आम्ही अत्ताच अंधारकोठडीत कोंडून तो कायमचा बंद करणार आहोत!

**साबाजी** : (बेफिकिरीनं परतत) काय, राजा! तू या साबाजी शिरक्याला कैद करून अंधारकोठडीत मारणार?

**शाहू** : अशक्य! साबाजी बाबा, हा तुमचा चिमुकला बाळराजा, या आपल्या तरवारीनं तुमचं संरक्षण करण्यास पूर्ण समर्थ आहे.

**संभाजी** : प्रत्यक्ष आपल्या पित्याच्या आज्ञेची अवज्ञा करून या थेरड्याचा –

**शाहू** : (तरवार उपसून) हं, सबूर! साबाजीबाबांना एका शब्दानं जरी दुखवलं, तरी राजमुखातली दारू पिणारी ती जीभ मला छाटावी लागेल! बोला पाहू परत! (साबाजीस) साबाजीबाबा, बस्स झालं इथं थांबण! भाजलेलं बी जमीनीत पेरून का कुणी पीक काढतात?

**संभाजी** : पहा पहा साबाजी! हा आमचा पोटचा गोळाही कडाडलेल्या विजेच्या लोळाप्रमाणं अंगावर झेपावू लागला! ही सारी तुझी आणि आमच्या राणीसाहेबांची फूस! बाल मनात विषारी फुत्कारांचे अंकुर तुम्ही दोघं रुजवीत आहात!

**साबाजी** : कासवी ही कृपादृष्टीनंच आपलं पोर पोशीत असत्ये! सूर्य आणि तेज निराळे कोण करणार? उमलत्या कळीतच फुलांचा मधुर सुवास दरवळत असतो! बालराजांना पितृनिंदा शिकवीत असेन, असे जर राजांना वाटत असेल तर मग आत्ताच मला कैद करा! पण मला वाटतं, तस संभूराजे तुम्ही करण्यास धजावणार नाही! कस ते आता आठवण झाली, म्हणून सांगतोच -

माझा दौलती या बाळराजाच्या शिणंचाच होता. चिमणा जीव, पतंगाच्या खेळात दंग झालेला! इतक्यात सर्जेराजे शेतवाडीहून घरी येतावख्त दौलुच्या पतंगानं तुफानी वाहत्या वाऱ्याबरोबर आस्मानात गिरक्या घेत घेत गोता घेतला आन तुटलेल्या दोऱ्याचा गुंता, थोरल्या महाराजांच्या पायाला शिकारी जाळ्यागत बिलगून राहिला. मटकन सर्जेराजे खाली बसले! आणि वावडीच्या दोराचा पायाला पडलेला गुंता सोडवायला लागले! संभूराजे साक्षात आपल्या जन्मदात्याला, शत्रूची जाळी तोडून हां हां म्हणता, हातावर तुरी देत निसटण्याऱ्या श्रीशिवाजीमहाराज छत्रपतींना,

माझ्या पोराच्या वावडीचा गुंता जिथं लवकर सोडविता आला नाही. तिथं मद्य आणि मदिराक्षीच्या मोहजालात फसलेला, पण सर्जेराजांचीच 'बिरूदावली' घेऊन मिरविणारा गोब्राह्मण प्रतिपालक श्रीमच्छत्रपती  संभाजीमहाराज हा मला कोणत्या पुण्याईच्या जोरावर कैद करून अंधारकोठडीत ठार करणार?

**शाहू** : साबाजीबाबा, आजोबा! चला व्हा पुढं! (तरवार उपसून) तुम्हाला या तुमच्या बाळराजांचा हा हुकूम आहे! तुम्ही इथल्या विषारी वातावरणात फार वेळ थांबून अमृताचे बोल, वाऱ्यावारी दवडू नका! कारण, वायुला अंधारकोठडीची शिक्षा कोण देणार? चला व्हा पुढं म्हणतो ना?

(शाहू तरवारीनं साबाजीला मर्ग दाखवितो. तो निमूटपणे चालू लागतो.
संभाजी सखेदाश्चर्य करीत अस्वस्थ व बेचैन होतो.
हुक्क्याची नळी तोंडात घेऊन पीत बसतो)
(पडदा पडतो)

---

**<u>प्रवेश पाचवा</u>**

(स्थळ: रायगडावरील थोरल्या महाराजांनी काशीची गंगा व रामेश्वरचा सागर एकवटून निर्माण केलेले राष्ट्रतीर्थ-गंगासागराचे महाद्वारावर चौघडा वाजंत्रीचा नौबतखाना! महाद्वारावरील दर्शनी दोन भव्य पुतळे शहाजीराजे व शिवाजीमहाराज यांचे. त्यावर सुंदर फुलबाग. आसपास निसर्गरम्य वनश्री. गंगासागरात जलविहार करण्याकरत संभजीराजे तुळशीसह आत उतरत असलेले लांबून स्पष्टपणे दिसतात. यावेळी महाद्वारावर दर्यासागर झालेला देहू दसरी हा एकटाच तरवारीनिशी सशस्त्र पहारा करीत येरझारा घालीत असतो)

**देहू** : दर्यासागर बनलेल्या या देहू दसरीच्या दैवानं, कशा डोंबाऱ्याच्या कोलांट्या उड्या सुरू केल्या आहेत बघा! मला पोहायला येत नाही म्हणून संभूराजांनी इथं पहारा करायची ही शिक्षा दिली! मला काय माहीत, की मी कधीकाळी या मराठेशाहीच्या आरमाराचा दर्यासागर होईन! पण आता आली का पंचाईत?

लहानपणी आमचा 'बा' म्हणायचा की, बेटा देहू! आरं तालमीच्या आखाड्यात इरबळ लाल मातीत तोंड खुपसून शहामृगावानी बसण्यापेक्षा, जरा वाईचं नदीच्या पाण्यात डुंबत राहून पोहायला शीक! म्हाताऱ्याच्या तोंडाची बोळकी बत्तीशी, आज ही मला बाजारबुणग्या शिपाई-गड्यांवानी लाचारीत भोवलीय बघा! (विचार) शिवाजी महाराज, असं कधी गरतीबाई बरोबर घेऊन, पोहायची मजा लुटत होते, हे कुणी मला आजपावेतो सांगितलंच नव्हतं! ते मला आज संभाजीराजांनी तुळशीला या गंगासागरात आणून छान पटवलं! बस्स! ते काही नाही! पोहायला उद्यापासूनच गडाखालच्या नागझरीत शिकायला हवं! कारण, मराठ्यांचा आरमाराचा दर्यासागर, आणि बेडकांच्या डबक्यातही त्याला पोहता येऊ नये, म्हणजे क्या बात है? उद्या जर चांदणीनं या तुळशीबाईवानी संगं घेऊन पोहायचा हट्ट धरला, तर माघार घ्यायची मी? छत! पोहायला शिकलंच पाहिजे! (गंगासागराकडे पाहत) जरा पाहू का महाराज तुळशीला कसं घेऊन पोहतात ते? (तसं करणार, तोच)

**जिवाजी** : (प्रवेश करून टाळी वाजवीत) शू शू हां हां बेटा, देहू! अरे महाराजांची तुळशीबरोबर चाललेली जलक्रीडा पाहू नकोस! अरे, वेड्या ते महान पाप आहे आणि त्या पापाला ताबडतोब प्राणांतिक शिक्षाही आहे! मागं फिर, नाहीतर महाराज इथल्याइथं तुला या गंगासागरात गळ्यात धोंडा बांधून बुडवितील ना? वेडा कुठला!

**देहू** : (परत जागेवर येत) पंत, राजाचं पोहोणं पाहाणं, हे मोठं पाप आहे?

**जिवाजी** : होय बेटा! महाभयंकर पाप आहे अरे, वारुळानजीक एकत्र खेळणारी नाग-नागिणीची जोडी आणि पाण्याच्या सरोवरात जलविहार करणारी, मदोन्मत्त हत्ती-हत्तिणीचा प्रणयशृंगार जर कुणी पाह्याला गेलं, तर त्याचा मरणकाळ हा ओढवलाच म्हणून समज!

**देहू** : (चिडून) अहो, असं होतं, तर मला तुम्ही दर्यासागर का केलं?

**जिवाजी** : आस्ते कदम बेटा, देहू! असा चिडून वर्दळीवर येऊ नकोस! हे संभूराजांचं रंगेल राजकारण आहे तेव्हा त्यातील खातेवाटप माणसाकडे सोपविताना, त्याची अक्कलहुशारी ही आम्ही बिनखर्ची खात्यातच जमा करीत असतो! राजाज्ञेची अक्षरं कातड्याच्या तुकड्यावर जरी असली तरी साऱ्या गोष्टी आम्ही "मंत्रीमंडळ" सहजच हस्तगत करतो! आमच्या मनात उद्या जर आई अंबाबाईच्या नावानं हातात माळ-परडी घेऊन जोगवा मागणारा चतुःश्रृंगीवरचा नवरात्रातला तृतीयपंथ माणूस, -

**देहू** : (मध्येच) म्हणजे कोण हो पंत तुम्हीच का?

**जिवाजी** : अरे, तृतीय पंथी म्हणजे माणूस नसलेला माणूस, शिखंडी-हिजडा, आम्ही त्यालाही राज्याचा सेनासागर बनवू थोडक्यात, उदरातला गर्भ जसा मातेचं वय पाहत नसतो, तसा नेमणूक करताना शहाणा व मूर्ख हा भेद आम्ही राजकारणी लोक लक्षात घेत नसतो, समजलास ना?

**देहू** : (पाय धरीत) या सदगुरुचरणांजवळ मागणं आहे! पंत, मलाही तुम्ही नसतीच उपाधी पाठीस लावून दिली. यापेक्षा, सेनासागर बरा; पण हा दर्यासागराचा मान म्हणजे आंधळ्या घोड्यावरून घोडदौड करीत लंगड्यान, फड्यानिवडुंगाचा फड, साफ करण्यासारखा आहे! एकसारखा आखाड्यातल्या तांबड्या मातीत लोळून, आडमाप शरीर मात्र वाढवून बसलो! आता मला पोहायला कसं येणार?

**जिवाजी** : हात्तेच्या! त्यात रे काय? मी तुला चांगलं पोहायला शिकवीन.

**देहू** : (अधीरतेनं) कसं-कसं?

**जिवाजी** : (मिस्किलपणात) अरे दोन भोपळे दोन्ही हातांनी घट्ट दाबून धरायचे आणि वर पलथं पडून, नुसतं पाय हालवीत राह्यचं की बस्स, आलंच पोहता!

**देहू** : अस्स म्हणता? तर मग पंत, घरी गेल्यावर मी दोन भोपळे घेऊन आज रात्रीतूनच पोहायला शिकतो बघा!

**जिवाजी** : कुठे? अरे, अडाण्या, गादीवर नव्हे, पाण्यात, नदीत, सागरात!

**देहू** : अहो पण तुमच्या डोळ्यांत – छे, बोलण्यात 'पाणी' नव्हतंच मुळी!

**जिवाजी** : ते वारंवार प्रसंगान पहावं लागतं! माशांचे दुःखाश्रू, पाण्यात पाहूनही कोणाला दिसत नाहीत! ते लक्षात घ्यावं लागतं! संसाराला भवसागराचं भय दाखवावं लागतं! चांदणीसारख्या पाणीदार डोळ्याच्या सुंदर तरुणीला पाणी पाजावं लागतं! तुलाही आपल्या डोळ्यातून पाणी काढाव लागेल. समजलास, बेटा देहू!

**देहू** : अहो, चांदणीकरता मी स्वर्ग-पाताळ एक करीन! डोळ्यांतलं पाणी माझचं काय, पण पंत तुमच्याही डोळ्यांतलं ते खलास करीन.

**जिवाजी** : असं म्हणतोस? तर मग ती पहा चांदणीच इकडे येत्येय! बेटा देहू, सावध रहा. (इकडे कान कर) आता इथं मोठं महाभारत रचलं जाणार आहे! महाराणी येसुबाई इथं येणारसं दिसतंय!

**देहू** : कशाला? राजांचा जलविहार पाह्याला की तुळशीला पाणी घालायला?

**जिवाजी** : कदाचित दोघांनाही चांगलं पाणी पाजायला येत असतील! बेटा, आबासाहेबांच्या कारकीर्दीत या गंगासागरात ठराविक सोवळ्या ब्राह्मणांनाच सोवळ्यान तांब्याभर तीर्थ आणावयाची मोकळीक होती! त्याला आत पाय सुद्धा धुता येत नसत! अरे, फार काय पण, मरणोत्तर खुद्द थोरल्या छत्रपतींच्या अस्थी , इथं टाकायचा बाळाजीपंत चिटणीसांनी आग्रह धरला; परंतु त्या शेवटी काशी-रामेश्वरीच विसर्जन कराव्या लागल्या! आम्ही मात्र सोयराबाईंची हाडं , रात्रीतून या गंगासागरात टाकली आणि काशी-रामेश्वर यात्रेचं पुण्य, हजारो होनांचा खर्च सरकारी खजिन्याच्या माथी मारला! आम्ही त्यावेळी पैसा खाल्ला; पण त्याचं पाप आज आता उघडं पडणार आहे? जरासंधाच्या हाडाचे फासे, कौरवांना अनुकूल दानात पडले, तद्वतच सोयरा मातोश्रींची हाडं. आजच्या या तुळशीच्या नग्न अभ्यंग स्नानामुळं संभूराजांना रायगडला रामराम करीत, रामचंद्राचा वनवास पत्करावा लागणार आहे! म्हणून म्हणतो, अक्कलहुषारीनं पहारा कर! पण वेळ, प्रसंग बांका वख्त पाहून पलायनाचा सोपा मार्ग पत्कर! (पाहून) ती पहा, चमकती चांदणी जवळ येऊ लागली! हा ताईत, गंडा दोरा जवळ ठेव. म्हणजे ती तुझी होऊ लागेल! जातो मी! आस्ते कदम, बेटा देहू! आस्ते कदम! (जातो)

**देहू** : (पाहत) अहाहा! या शुक्राच्या चांदणीजवळ चांदीची पंचारती दिसत्येय! कदाचित ती मला या दर्यासागर देहू दसरीला ओवाळायला आलीय की काय? मदनमस्त चालीनं ही आभाळातली चांदणी इकडं येतीया :-

लावणी

बिजलीवानी चमकत ।
हरिणीवानी ठुमकत ।
वाघिणीवानी लबकत ।
आली नागिण जणू ही सरसरा।
हा दर्यासारंग सामोरा हो जी ऽ ऽ ऽ ॥
रंगाचा ढंग दाविती हो
डोळ्यांचा घाव मारिती।
गरगरीत डोळे फिरविती हो!

हाय! हाय! हृदय फोडिती॥
सखा असा खुबसुरत ।
मदनावानी लकाकत ।
सर्व्यानारी उसासत ।
कोण करील मझी बरोबरी ।
आवो राव सांगा
कोण करील मझी बरोबरी ।
ही चंद्र कोर नवरी हो – जी जी  ऽऽऽ ॥ १ ॥

(चांदीची पेटती पंचारती घेऊन चांदणी पुढं येते.
देहू आकशाकडे पाहात मनाशीच बोलू लागतो)

सागराच्या खळाळाची लगबग, चांगली खळाळावी म्हणून का चंद्राचं चंचलपण चमकत्या चांदणीनं खेळायला घ्यावं? वेडे, अग आकाशातल्या चांदण्यांना पारिजातकाच्या फुलाप्रमाणं पृथ्वीवर सडा टाकता येत नाही! म्हणून म्हणतो, हे चांदणे! चांगलं आकाशात चंद्राजवळ राह्यचं सोडून या दगडामातीच्या धरणीवर कशाला ग बये उगवलीयास?

**चांदणी** : (त्याच्याकडे पाहून) ऑ कोन ह्यो धटिंगण हथं उभा राहून, वायू झाल्यावानी बरळतुया? ए कोन हैस रं तू?

**देहू** : (रागानं) तू कोण आहेस? हथं का आलीस? सरकारी सही-शिक्क्याचा परवाना आहे?

**चांदणी** : (साश्चर्य)  तू मला परवाना इचारनारा कौन हैसे बाबा!

**देहू** : मी या मराठी आरमाराचा दर्यासागर देहू दसरी!

**चांदणी** : (हसत) कोन? इरबळ लाल मातीत माकडावानी तोंड रंगवून, मैदानमाप छातीचा, आडमाप बोलणारा उनाड पोर देहू? समद्या गावचा उतारा! कवापासनं दर्यासागर झालायस?

**देहू** : अग, दर्यासागर दौलतरावाची तुळशी संभूराज्यांच्या गळी पडली. आणि त्याची ही बिरुदावली मला कबजीबाबाकडून मिळाली.

**चांदणी** : अन ती तू निलाजऱ्यासारखी पत्करलीस!

**देहू** : पत्करायला पाहिजे! अग मला शिवाजी व्हायचं, तर अगोदर दर्यासागर, मग सेनासागर की थेट छत्रपती शिवाजी महाराजकी जय!

**चांदणी** : देहू, तू लई भोळा आन सरळ सीधा माणूस हैस बग. तवा तुला थोरल्या राजावांनी छत्रपती व्हावसं वाटत असेल, तर त्या कलुषा कबजीची संगत सोड! नाय तर उद्या तुझं लगीन झाल्यावर, तुजीबी बायको त्यो पळवूनशान संभूराजाची राख करील राख!

**देहू** : खरं ग खरं! बरं झालं की, अजून मी बिन लग्नाचा पेहेलवान गडी राहिलो आहे! नाहीतर माझ्या बायकोशी संभूराजांनी डोळ्यांदेखत असाच जलविहार मला पहाऱ्यावर ठेवून दाखविला असता! ते काही नाही! मी हा किताब आत्ताच्या आत्ता जिवाजीपंताकडं जाऊन परत करतो!

**चांदणी** : थांब! असा एकदम उतावळी घाई करू नंगस! जरा दमादमानंच तू आन मी एकत्र संगनमत करू! म्होरं कसं कसं वागायचं ते ठरवू! हे बग, आपून एकमेकांच्या इच्यारा-इचारानंच वागू!

**देहू** : बरंय! पण चांदणे, आपण दोघांनी कुठं भेटायचं? ते सांग ना.

**चांदणी** : त्ये मी तुला गडाखालच्या एका दरीतली जागा, उद्या सांजची दावून ठेवते! अन मंगच आपुन आपलं पुढचं मनसुभं रचित राहू. मात्र सांगून ठेवत्ये की, फंदफितुरी करुनश्यान मला फसवलंस तर या चांदणीकडून तुझा मुडदाच पडेल! है अट कबूल?

**देहू** : एकदम कबूल! पण मला शिवाजी महाराज कसं व्हायचं ते शिकव.

**चांदणी** : शिकवत्ये! पन तू अगोदर हा बुळ्यावानी पत्करलेला पहारा सोड आन जरा वाईच मर्दावानी वाग! घडीभरानं मांसाहेबांच्या मुदपाकखान्यात मला येऊन भेट. (चौघडा नौबत वाजू लागते) हं, पळ हथनं.

**देहू** : (जाता जाता) पण काय ग सजणे, ही चौघड्याची नौबत एकदम का बरं वाजू लागली?

**चांदणी** : देहूराया, अरं नसत्या पंचायती करायची हथं ही वेळ नव्हं! “नवरा बायकोचा झगडा आन राजवाड्यावरला चौघडा” कवाबी वाजतो अन बंदबी पडतो! नीघ जा राया पळ काढ लवकर.

**देहू** : (स्वगत) काय राया! पंताच्या किमयेचा पडताळा, प्रत्यक्षात छान पटला! बोल बजरंगबलीकी जय! छत्रपती शिवाजीमहाराजकी जय! (ओरडत गर्जत आत जातो)
(तो गेल्यावर महाद्वारावरील चौघडा नौबत जोराजोरानं झडू लागते. महाराणी येसुबाई ह्या बालराजे शाहूसह प्रवेश करतात. व राजांना ओवाळण्यासाठी त्या चांदणीजवळची पंचारती घेऊन तलावाच्या काठावर शांतपणे मौन धरून उभ्या राहतात! तोच जलक्रीडा संपवून संभाजीराजे तुळशीसह वर्तमान होडीतनं काठावर पाय ठेवितात न ठेवितात; तोच पंचारते घेऊन ओवाळायला आलेल्या महाराणी येसुबाई, या तिथं उभ्या असलेल्या दिसतात. संभूराजांच्या नजरेवरची विलासी निशा एकदम उतरते. ते व तुळशी चकीत होतात! चौघडा-नौबत बंद पडते. सर्वत्र गंभीर वातावरण होते!)

**संभाजी** : (गांभीर्यात) महाराणीसाहेब, आपल्या हातात ही पंचारती? आजच इथं ओवाळायला यायचं कारण?
**येसुबाई** : पतिव्रता राज्ञीपणाचं कठोर कर्तव्य! कुलधर्म कुलाचाराचं पवित्र व्रतपालन! पराक्रमी भोसल्यांच्या घराण्यातील राण्यांनी आपापल्या शूरवीर पतींना रीतीरिवाजात दिलेली ही मानवंदना. (संभाजी एकीकडे तोंड फिरवितो, तर तुळशी चरफडत मुठी वळून दातओठ खऊ लागते.) हं, महाराज, या मंगलप्रसंगी खाशा स्वारीनं माझी निराशा करून नये! इकडे तोंड करा. मी या पंचारतीनं ओवाळून आपली दृष्ट काढणार आहे! स्वारींना, दैवानं बाळपणीच्या खऱ्या मातृप्रेमाला आचवून पोरकं केलं! आई सती पुतळाईनं इकडचं लालन-पालन केलं! वाढविलं, परंतू तीही साध्वी सती झाल्यानं आजचा हा आपला डोळे भरून येणारा पराक्रमी श्रृंगार त्याही पाह्याला जिवंत नाहीत! बलवत्तर विषयतृष्णाही आत्मसुखाला विघ्न करीत असते, असा उपदेश करणारे मझे थोरले मामंजीही आज ही आपली अमोल कर्तबगारी पाहून स्वारीची पाठ थोपटायला हयात नाहीत!
**संभाजी** : बस्स करा राणीसाहेब! आम्हाला सर्व काही समजतंय!
**येसुबाई** : पण मातृप्रेमाच्या स्त्रीला, आपल्या पुत्राचा पराक्रम मायेपोटी वेळेवर दिसत नाही! बाणांचा सेतू स्वर्गापर्यंत अर्जुन धनुर्धारी पुत्रानं बांधला आणि वरून भीमानं स्वर्गात युद्ध करून आईच्या गजगौरीव्रताला इंद्राचा ऐरावत पाठकुली घेऊन

पृथ्वीवर आणला! त्यावेळी कुंतीमाता भीमार्जुनाची दृष्ट कढायची विसरली! आजचा हा आपला पराक्रम मी त्याच तोलमोलाचा मानून आपली दृष्ट काढायला इथं ताटकळंत उभी आहे! खरं म्हणजे आणखी पाच सुहासिनींना बरोबर घेऊन मी ही पंचारती ओवाळायला हवी होती! पण आपल्या आश्रयाला असलेले सारे सरदार आणि इमानी इभ्रतदार मानकरी, हे सरहद्दीवर पसरलेल्या चौफेर शत्रूंना मिळाले! मराठेशाहीत स्त्रीयांच्या शील संरक्षणाला मामंजीनी स्वतःच्याच वर्तनाने केवढं सूर्य-कवच घालून जबर दहशत बसविली होती! कल्याणच्या सुभेदाराच्या पाक मुस्लिम मुलीला 'आई' म्हणून चोळी-बांगडी केली! दिल्लीश्वरांनी बेगमेला पाठवून थोरल्या छत्रपतींना दुवाई दिली!

(संभाजीला तुळशी बिलगू पाहते तो तिला दूर सारीत राहतो)

**संभाजी** : (रागानं) माहीत आहे ते सर्व! पण त्या गतकाळच्या गोष्टींचा यावेळी पुकारा कशाला? केवळ या तुळशीला पाहुनच ना?

**तुळशी** : होय-होय! मला पाहूनच ही पंचारतीची उपरती आपल्या या आवडत्या राणीला झाली आहे! पण राया समुद्राहून गंगा जर निराळी असती, तर ती त्याला मिळालीच नसती, हे हिला काय माहीत?

**येसूबाई** : पती-पत्नीच्या संवादात श्रृंगारिक रतीपेक्षा उजळत्या उपरतीच पवित्र होतात! त्यात पतीनं परस्त्रीची इच्छा धरणं म्हणजे विश्वाचा एकच घास घेण्याची मूर्ख हाव बाळगण्यासारखं आहे!

**संभाजी** : (दरडावून) राणीसाहेब लहानपणी थोर पुरुषांच्या निकट सहवासात राहून कुणीही थोरवी मिळवीत नसतो!

**तुळशी** : (संतापून चरफडत) राजीवा, सख्या! या वेळी तुळशीच्या गजबजलेल्या अंतःसृष्टीला, आपल्या या बडबडण्याऱ्या लग्नाच्या बाह्यसृष्टीला आपल्या अंतरीच्या कोलाहलानं गप्प करा पाहू?

**संभाजी** : शांत रहा, दिलवर! प्रशांत जलाशयात एकादा लहानसा अचेतन दगड जरी पडला, तरी त्यात सारख्याच वर्तुल-लहरी दूरवर एकाच आकारात पसरत जातात! आमच्याही खंबीर मनाची स्थिती,-

**येसूबाई** : ( मध्येच शांतपणानं) धृव ताऱ्याप्रमाणं अढळ ठेवावी! आणि विषयसुखाची लालसा, आहे तशीच कामक्रोधाने कळसाला न्यावी! शृंगाराचा

पाठीराखा लोभ, हाच खरा पापाचा परमेश्वर आहे! तो कामक्रोधांना मोहाच्या घरी प्रतिष्ठा देत राहतो, हे मी जाणते! याकरिता जर स्वारीनं, बाळाजी आवजी चिटणीसासारख्या महान लोकोत्तर पुरुषाला कबजीकडून हत्तीच्या पायी मारविलं! मातोश्री सोयराबाईंना भिंतीत चिणून जिवं मारलं! हे सारे प्रकार झाल्यावरही मी स्वारींना या पंचारतीनं ओवाळायला आले नाही! माझा झालेला अपराध मी कबूल करत्ये! पण आजचा हा आपला इंद्रालाही लाजविणारा रतिविलासाचा श्रृंगार, कैलासशिखरी गेलेला आहे! या वेळी मी या पंचारतीनं आपल्याला ओवाळलं नाही, तर थोरल्या मातोश्री जिजामहाराणीसाहेब, आणि सख्या सासुबाई सईआई, ह्या दोघी मला स्वर्गातून हसत राहतील! म्हणून म्हणते महाराज! आपण दोघेही निश्चल उभे रहा! मी दोघांनाही या पंचारतीनं ओवाळून, आपली अलाबला-काढून टाकते. हं करा पाहू इकडे तुमची मुखकमलं! (दोघेही निरुत्तर होतात)

**संभाजी** : राणिसाहेब, उपरोधानं तुम्ही ही आमची खूपच शोभा चालविली आहे?

**येसूबाई** : तसं खाशा स्वारीला वटतं, इतकचं! पण अदभूत पराक्रम गाजवून परत घरी येणाऱ्या वीराला, या पंचारतीनं ओवाळण्याचा आपल्या भोसल्यांच्या कुळात रिवाज आहे! शहाजीराजे, दौलताबादच्या दरबारात वजिरी मिळवून परत आल्यावर, जिजामातोश्रींनी यांच पंचारतीनं प्रथम त्यांची ओवाळणी केली! पुढं थोरले राजे मामंजी हे दिल्लीच्या बंदीवासातून स्वदेशी परत आल्यावर रायगडी पाऊल टाकताच सईआईंच्या ठिकाणी, सतीचं वाण घेऊन धन्य झालेल्या साध्वी पुतळाआई, हीच पंचारती घेऊन ओवाळायला सामोऱ्या गेल्या!

**संभाजी** : पुर्वजांच्या स्तुतीपेक्षा, समकालीनाची ही होत असलेले निंदा तुळशी माझ्या कानाला जरी तिखट वाटली, तरी पण आमच्या कानाला ही अमृताची मधुरवाणी गोडच वाटते! कारण माहात्म्यांचं मरण, हे परिस्थित जीवन्मृतांना नवजीवनच देत राहते! तुळशी, बुद्धीनं मिळविलेल्या सत्तात्मक सार्वभौमत्वाची खूण जो राजमुकुट तो मस्तकावर राहतो आणि काळाकडून कलंडलाही जातो! परंतू हृदयजन्य प्रेमाच्या स्वामित्वाचं निदर्शनभूत म्हणजे हृदयावर रुळणारी ही लग्नाची माळच! तेव्हा, राणीसाहेबांच्या देखत अशी निर्लज्ज लाडात येऊन आम्हाला बिलकुल बिलगू नकोस! (तिला बाजूला ढकलतो) चल, हो दूर!

**तुळशी** : (जवळ येत) का बरं? मनी बाळगून उरा पोटाशी धरलेल्या या तुळशीच्या राजहंसा! जवळ येण्यात मझी काय चूक आहे? सांगा!

**संभाजी** : तुळशी, बुद्धीचा मान तुला ब्रह्मदेवाकडून उपजतच हक्कानं मिळाला आहे! पण तो प्रेमाच्या, हृदयाच्याही जगात बुद्धीच्या गुणावाचून मिळावा, अशी अपेक्षा करण्यात प्रथम तुझीच चूक झाली! (दूर लोटीत) चल, लघळपणानं अशी आम्हाला लगट करू नकोस! लांब उभी रहा! यावेळी तुझा कोमल स्पर्श, हा आम्हाला पेटत्या अंगाराप्रमाणं वाटतो! खदिरांगारासारखा खायला निघालेला दिसतो.

**येसूबाई** : (विनयपूर्वक) नका, महारज! तुळशीबाईना अशी दूर करू नका! त्यांच्या नावाचं पावित्र्य इतक मंगल आहे की, भोसल्यांच्या कुळात, आजवर कोणी, कधीकाळी केला नव्हता; असा अलौकिक पराक्रम, आज आपण त्यांच्या एका नेत्रकटाक्षानं ऋद्धि-सिद्धीच्या प्रसन्नतेत मिळवून परत आला आहात! काशीची गंगा आणि रामेश्वरचा सागर एकवटून थोरल्या महाराजांनी रायगडावरील हे राष्ट्रतीर्थ, हा गंगासागर निर्माण केला, तो आता आपल्या या श्रृंगारिक पराक्रमानं, आपण उभयंतांनी पावन केलात! तेव्हा थोरल्या छत्रपतींची आपणांवर स्वर्गातून पुष्पवृष्टी व्हायच्या अगोदर या आपल्या येसूला ही पंचारती ओवाळायची सुवर्णसंधी द्या! नाहीतर आपल्या पूर्वजांच्या उद्धाराकरिता स्वारीला हिमालयावर जाऊन भगीरथ प्रयत्नाची दूसरी स्वर्धूनी-गंगा, या रायगडावर आणावी लागेल! म्हणून म्हणत्ये, आता खाशा स्वारीनं विलंब न लावता माझ्या समोर सन्मुख हसत उभं रहावं! ही हातातली पंचारती पंचत्वाला जवळ करू लागली.

(ओवाळायला लागणार तोच संभाजी महाराणीला वंदन करतो)

**संभाजी** : बस्स! राणीसाहेब, पुरे झाला हा शब्दास्त्रांचा मार! या मारानं ज्याचं काळीज दुभंगत नसेल, तो कलिपुरुषच म्हणावा लागेल! आज आमच्या डोळ्यांत झणझणीत अंजन पडलं! गौण श्रृंगाराची उन्मादक बनलेली बेफाम धुंदी आमच्या डोळ्यांवरून साफ उतरली! आत्मत्वाची जाणीव झाली! केलेल्या वैषयिक करणीची किळस वाटू लागली! तुळशी तू वाट फुटेल तिकडे निघून जा! तुझा माझा संबंध सुटला!

**तुळशी** : काय? मला अशी फशी पाडून, जायला सांगता? कुठं मी जाऊ? का जीव देऊ?

**संभाजी :** बेलाशक! कारण, पतीचा आधार सोडताच स्त्रिया पतित दशेला पोचतात! वेली वृक्षाला सोडताच, मातीत मिळतात! विजेची अधोगती तिला पाताळात नेऊन सोडते!

**तुळशी** : (संभाजीस प्रतिज्ञेन उद्देशून) अस्सं काय? पैशाच्चिक विषयांधा, स्त्रीलंपटा! नावाची मी तुळशी आहे! लोखंडाची कांब वाकत नाही, पण वाकली म्हणजे मात्र कायमचीच! (रागाने निघून जाते)

**संभाजी** : (येसूबाईला वंदन करीत) राणीसाहेब, आम्ही महान अपराधी आहोत! आम्हाला क्षमा करा! भ्रष्ट झालेला गंगासागर, वैदिक ब्राह्मणांकडून शुद्ध करून घ्या! आम्ही सांगाल ते प्रायश्चित्त घ्यायला तयार आहोत!

**शाहू** : मासाहेब, महाराजांना प्रायश्चित्त द्यायचंच असेल तर हा गंगासागर; हे राष्ट्रतीर्थ – भ्रष्ट केल्याबद्दल रायगडाहून त्यांना हद्दपार करा!

(शाहू रागानं निघून जातो! दोघेही चकीत होतात)

**अंक पहिला समप्त**

****

## अंक दुसरा

---

---

**<u>प्रवेश पहिला</u>**

(स्थळ: श्रीसमर्थांच्या आनंदभुवनातील चाफळ खोऱ्यातील एक भयाण दरी. सूर्यास्ताचा समय. साबाजी शिरके, हा आपल्या परांगदा झालेल्या दौलतीच्या शोधात वणवण करीत एकटाच प्रवेश करतो)

**अंतरिक्षध्वनी** : समर्थाचिया सेवका वक्र पाहे! असा सर्व भूमंडळी कोण आहे?
जयाची लिला वर्णिती लोक तिन्ही! नुपेक्षी कदा रामदासाभिमानी!

**साबाजी :** जय जय रघुवीर समर्थ! आनंदवन! महाराष्ट्राचं श्रीसमर्थांनी वसविलेलं हे आनंदवनभुवन! सर्जेराजांनी इथंच राष्ट्रगुरूंची पहिली भेट घेतली आणि आपल्या

षड्गुणैश्वर्यांकित गुणांनी मिळविलेलं महाराष्ट्रराज्य जरीपटक्यासह रामदासचरणी समर्पण केलं पण,

"दास डोंगरी राहतो। यात्रा देवाची पाहतो।
देव भक्तांसवे जातो। धान्य रुपें ॥"

राजांनी बैराग्याला,--वैराग्य घेऊन राज्यदान केलं! पण बैराग्यानं भिकेचं दान राजाल परत दिलं! अहाहा! काय तो या आनंदवनभुवनातला राज्यदान समारंभ! भगव्या भणंग भिकाऱ्याचा त्याग, आजही आम्हा ऐशीवर्षांच्या स्वामिनिष्ठ सेवकांना, महाराष्ट्राच्या जरीपटक्याबरोबर, मराठ्यांच्या भगव्या झेंड्याच्या दर्शनात हरघडी ताजातवानाच तो घडलेला दिसतो! समर्थांचा उपदेश, समर्थांसारखाच! मनाचे श्लोक स्वतःकरता केले, पण पटले मात्र जनाला! दास बनलेल्या गुलामाकरता 'दासबोध' लिहिला आणि महाराष्ट्रधर्म वाढविला!

(पडद्यातून संतापलेला दौलतराव) " मोरे, मी केवळ मराठेशाहीच्या इमानाचाच काय, पण महाराष्ट्रधर्माचा सुद्धा सन्यास करीन."

(कानोसा घेऊन मनःसंतापात) कोण? वैतागलेला मझा दौलती, (पाहून) होय, तोच? आपल्या अभद्र वाणीनं बरळत, मोऱ्यांबरोबर इकडे आलेला दिसतोय! होय, नक्की तोच! अरेरे, या हरामखोर मोऱ्यांनी मझ्या दौलूला फितुरीत गोवलेलं दिसतं! समर्था, या वेळी मला तुझंच मनोधैर्य दे! कारण, हा साबजी – महाराष्ट्रधर्माच्या, तुमच्याच उपदेशाप्रमाणे वागायला बांधलेला आहे!

मुख्य हरिकथा निरुपण । दुसरें तें राजकारण ॥
तिसरें तें सावधपण । सर्वाविषयी ॥

तेव्हा, सावधपण राखण्याअकरता तरी मला या फितुऱ्यांचं बोलणं आडून ऐकाला हवंच!

(एक करवंदीच्या जाळीत दडून बसतो.
नंतर मोरे-मानेसह दौलतराव संतापाने प्रवेश करतो)

**दौलतराव** : मोरे, मी केवळ मराठेशाहीच्या इमानाचाच काय, पण महाराष्ट्रधर्माचा सुद्धा संन्यास करीन! पण मझ्या लग्नाच्या बेताल बायकोची राख केल्याबद्दल त्या

संभाजीचा सूड उगविल्याविना राहणार नाही! हे घ्या तुम्हाला मझं वचन. (हातावर हात देत घेत)

**मोरे** : शाबास दौलतराव! आता तुम्हांला साहस नाही, असं कोण म्हणेल?

**माने** : दौलतराव सारे शहाण्णव कुळीचे मराठे, तुम्हाला तुमच्या नामर्दपणाविषयी हसत आहेत! अहो, शेजेबाजेची बायको - राजा झाला म्हणून काय झाले? त्यानं आपली ‘शय्या-रक्षा’ करावी?

**मोरे** : आणि राव, तुम्ही ती उघड्या डोळ्यांनी पहावी! जग काय म्हणेल?

**माने** : अहो, मोरे! जगाचं काय घेऊन राहीलाहात; पण मराठमोळ्यांच्या तरण्या-ताठ्या मुलीबाळी आपापसात कुजबुजून बोलतात.

**दौलतराव** : (संतापून) काय बोललात, बोला पाहू?

**माने** : त्या म्हणतात, तुळशीच्या नवऱ्याला ब्रह्मदेवानं जे दोन डोळे दिले आहेत, ते त्याच्या उपयोगाकरता नसून, निव्वळ मनुष्यदेहाच्या रचनेची परंपरा चालू ठेवण्याकरताच दिलेले दिसतात!

**मोरे** : तेव्हा शिरके! बदफैली बनलेल्या संभाजीवर तुमच्या बायकोला बदचालीनं जे उठवळ बनविलेलं आहे, ते सूड म्हणून!

**दौलतराव** : (मध्येच) होय! सूड घेण्याकरताच हा दौलतराव शिरके तुमच्या पक्षात आज येऊन मिळाला आहे!

**माने** : मिळायलाच हवं! त्याशिवाय बेमुर्वतखोर बनलेली बायको, बेअब्रूविना कशी नांदेल?

**दौलतराव** : संभ्याच्या राजविलासामुळं तुळशी आज नादावलेली बाजिंदी बनलीय!

**मोरे** : अहो, उद्या ती वेशीवरच्या आरशाप्रमणं राजरोस बाजारबसवी बनेल! आणि तुमच्या पराक्रमाचं पाप, घरोघर पोहोचवील! म्हणून म्हणतो, दौलतराव! तुम्ही बादशहा आलमगीरच्या फौजी लष्करात भरती व्हा!

**माने** : तुमच्यासारखा नावाजलेला मराठ्याचा दर्यासारंग, बादशहा मोठ्या खुषीनं तुम्हाला आपल्या पदरी ठेवून घेईल!

**मोरे** : मानाची मनसबदारी मिळेल! वजिरी मिळाली की, तुम्ही बादशाही सैन्य घेऊन या दक्षिणेत संभाजीवर चाल करून या!

**माने** : पण अगोदर आपल्या बायकोला ताब्यात घ्या. नवऱ्यानं आपल्या बायकोवर तुळशीपत्र ठेवलं की, मग सगळ्यांनी तिचं 'निर्माल्य' केलंच म्हणून समजा!

**दौलतराव** : माने, मोरे! बदचाल बनलेल्या बेमुर्वत बायकोचा नवरा म्हणून इथं या महाराष्ट्रांत राहण्यापेक्षा, मी बादशाही जनानखान्यातला 'खानसामा' 'संदल" म्हणूनही उत्तरेत जगेन! परंतू इथं, -

**मोरे** : (मध्येच) मुळीच राहू नका दौलतराव!

**माने** : म्हणच आहे की, स्वदेशी घरीदारी चोरी; पण परदेशी भिक्षा बरी! शिवाय उत्तरेकडील तो परदेशी कनोजा कलुषा कबजी -

**मोरे** : साऱ्या स्वामीनिष्ठ सरदारांच्या उरावर मुख्यप्रधान बनून सर्वांच्या डोक्यावर मिरी वाटून भांगेच्या तारेत तर्रर्रर्र होऊन मिरवितोच ना? साबाजी-हिरोजीवर हुक्मत गाजवीत शेर बनलाच की नाही?

**माने** : तसं दौलतराव! तुम्ही बादशाही सव्वाशेर बनून त्या संभाजीवर - तुमच्या प्रियेच्या प्रियकरावर–सूड का उगवू नये?

**दौलतराव** : (त्रासून) राव तुम्हाला एकदा वचन दिलंय ना? मग तीन तिनदा मला ही फंद-फितुरीची फुंकणी फुंकून मझ्या कानाला त्रास का देता? जा मला बादशाही गोटात शक्या तितक्या मानानं रवाना करण्याची व्यवस्था करा. तोपर्यंत निःश्वासाच्या वाऱ्यांनी उडण्याऱ्या आणि अश्रुसिंचनांनी वाढण्याऱ्या या स्मशानवृक्षांना हा सूडाच्या कल्पनेचा आनंद आणि त्यापोटी उफाळून येणारं विकटहास्य हे या दौलतीला शिकवायला जरासा वेळ मिळेल!

**साबाजी** : (पुढं येत) कोण ही बेजबाबदार बोल बोलून सूडाची भाषा बोलत आहेत? सिंहाबरोबर कोल्ह्यानं कुस्ती करायची नाही; तर सश्यांच्या तांड्यात सिंहाच्या वल्गना करायच्या असतात! लाकूड अग्नीला भस्म करीत नाही; तर अग्नीच त्याचं भस्म करीत राहातो; मग लाकडाचं भस्म झाल्यावर त्यात तूप ओतलं तरी अग्नी पेटत नसतो!

**मोरे** : (एकीकडे मान्यास) माने, म्हातारा पेटला! आपलं काम फत्ते! चला पुढच्या तयारीला लागा! नाहीपेक्षा, साबाजीच्या तिखट तलवारीला आत्ताच आपण हाकनाक बळी पडू! (दोघेही पळ कढतात!)

**साबाजी** : (न्याहाळून ) कोण? दौलती,

**दौलतराव** : होय! तुमच्याच सुपुत्रानं ही प्रतिज्ञा या तिन्हीसांजच्या कातर वेळेला केलीय! मी मोगलाकडं निघालो आहे!

**साबाजी** : कशाला! बादशहा नवरंगाचा जनाना सांभाळायला? का मोरे मान्यासारखा मोगलांचा शिकारी कुत्रा व्हायला? गोंडा घोळून लाळ घोटायची तुला लाज नाही वाटत? का फितूर झाला आहेस तू दौलती? सांग.

**दौलतराव** : मी सांगण्यापेक्षा तुम्हीच बोला ना? बाबा, हा आपल्या पोटचा गोळा का मोगलाकडं निघाला आहे? एकुलत्या एक मुलाची बायको-आपली सून, ज्या विषयांध राजानं आपली श्रृंगारभोगदासी बनविली, त्या तुमच्या संभूराजांना मी हजार दंडवत घालीत इथं जित्या मुड्यावानी राहू? का बापाची स्वामीनिष्ठा पाहून महाराष्ट्रराज्याचे पोवाडे गात हिंडू? काय करू मी ते बोला ना बाबा? या दौलतीच्या सुखाबरोबर, भरल्या संसाराचीहि राखरांगोळी राजानं केल्यावर मी संभाजीचा सूड घेऊ नको; तर काय आई यल्लाम्माचा हिजडा बनून बायकोच्या छिनालपणाचं तुणतुणं वाजवीत गावभर हिंडू?

**साबाजी** : (शांत होत.) भवाचे भय काय भितोसि लंडी! धरी रे मना धैर्य धाकासी सांडी। दौलत, शांत हो! आणि विचार कर! अरे, संभूराजाकडून व्यक्तीगत का हा गुन्हा झालेला आहे? त्यात तुझ्या बायकोचेही अंग आहेच! अरे, बाबा आपला दाम मुळात खोटा निघाला, त्यात तुझं नि माझं दैवच जबाबदार म्हणायला हव! राजाकडून व्यक्तीस्वरूपात घडलेल्या अपराधाबद्दल, त्याच्या सार्वजनिक स्वरूपाला अपाय करण्यात काय अर्थ? आणि कसला पुरुषार्थ? दौलूबाळा, 'ना विष्णुः पृथिवी पतिः' या देव वचनावर आपला अख्खा महाराष्ट्र-धर्म श्रद्धा ठेवून जिवंत आहे! तेव्हा याकरिता तरी संभूराजांना तू क्षमा कर! भलतीच प्रतिज्ञा करून, विकाराच्या गळी पडू नकोस! ती तुझ्या गळ्याशी येऊन प्राणाशी बेतेल! उगीचंच उद्याचं मरण, आज ओढवून घेऊ नकोस!

**दौलतराव** : बेहत्तर आहे! पण मी केलेली प्रतिज्ञा, बिल्कुल मागं घेणार नाही! संभाजीवर सूड घेऊन मराठेशीची मी मोडतोड करणारच!

**साबाजी** : (रागानं) कुणाच्या सल्ला मसलतीनं? त्या देशद्रोही मोरेमान्यांच्या संगतीन? दौलू, सूर्याच्या अंगाला सुगंधित उटणं लावून त्याला कोणी आंघोळ

घालावी? मृगजळाच्या ओलाव्यानं जमिनीतून पीक निघत नसतं बाबा! विचार कर, आणि शांत रहा? मराठेशाहीशी तू बेईमानी करायला मोहाकडे गेलास, तर अस्सल जातकुळीचा जातिवंत मराठा, तुझ्या मझ्या तोंडावर थुंकेल!

**दौलतराव** : चालेल! पण मी केलेली सूडाची प्रतिज्ञा, प्राणांत होईतो पाळणारच! बाबा, महाप्रलयाच्या वेळी यम कोपल्यावर तो जसा एकवीस स्वर्गांना सप्तपाताळासह गिळून टाकतो, तसाच तो तुमचा दौलती. भोसले कुलाचा निर्वंश करून महाराष्ट्र राज्यधर्माची राखरांगोळी करायला मोगलांकडे मी जाणारच!

**साबाजी** : अस्सं! म्हणजे तू चतुरंग सेनेच्या जोरावर कृतांताबरोबर स्पर्धा करायला निघाला आहेस? गगनाला गवसणी घालून पाताळाचा शोध आकाशाची चौघडी पांघरून तू करायचा घाट घातला आहेस?

**दौलतराव** : वाटल्यास चिलटानं समुद्राला प्रदक्षिणा घलण्याची हवी तर उपमा द्या! पण मी केलेल्या सूडाच्या प्रतिज्ञेपासून तीळभरही माघार घेणार नाही!

**साबाजी** : बेटा दौलत! अरे, कोणत्या इरेला पेटून तू ईश्वराबरोबर भांडण करायला निघाला आहेस? स्वतःच्या संसाराची राखरांगोळी बेहत्तर मानून सुभेदार तानाजी-बाजी प्रभूंनी आलम मराठेशाहीचा राजसंसार शाबूत राखला! मराठी छत्राखाली एकनिष्ठ राहाणं, हे मराठ्याचं कर्तव्य आहे!

**दौलतराव** : ते छत्रपती थोरल्या महाराजांच्या बरोबर निजधामास गेलं! आज काय त्याचं? बाबा, माझी प्रतिज्ञा तुम्हांला पुन्हा, ऐकवितो! ऐका! "केवळ मराठेशाहीच्याच इमानाचाच नव्हे, तर मी महाराष्ट्र-धर्माचासुद्धा संन्यास करीन, पण संभाजीवर सूड उगविल्याविना राहणार नाही! याला स्वामीनिष्ठ चरणसेवकाचे-ऐंशी वर्षाच्या माझ्या साबाजीबाबांचेच हे पाय साक्ष आहेत! (पायांवर हात ठेवून गुढघ्यावर खाली मान घालून बसतो.)

**साबाजी** : (गहिवरत) समर्था, तुझ्या या आनंदवनभुवनात हा केवढा तू पिता-पुत्रामध्ये प्राणांतिक संघर्ष निर्माण केलास!

बहुत धरिता हट । तेथे येऊनी पडले तट ॥
कोणाचा एकाचा शेवट । झालाच पाहिजे!

(विचार) " महाराष्ट्र धर्माचा सन्यास करीन," हे या नादान पोटच्या पोराचे पापी शब्द, ऐकून घेण्याचा आदेश मला सहन करवत नाही! समर्था, अरे ज्याला मरण

द्यायला हवं होतं त्याला मी जन्म दिला! दौलती, जातिवंत मराठा जीव गेला तरी ओठाबाहेर काढलेली प्रतिज्ञा, ऐकणार नाही! पण, महाराष्ट्रधर्माचा संन्यास करीन आणि मराठेशाही मातीला मिळविण्याच्या पिसाट कल्पनेनं ज्या अर्थी तू बेहोष बनत, असे शब्द उच्चारून शिरक्यांच्या आजपर्यंतच्या इमानी अब्रूला काळोखी फाशीत आहेस, त्या अर्थी असली कम अस्सल अवलाद जिवंत ठेवणंही मला पापच वाटतं! दौल्या कुपुत्रा! हे घे तुझ्या कृतघ्नतेच्या केल्या पापाचं बापाकडून पुण्याईचं प्रायश्चित्त!

(दौलतरावावर आपल्या कमरेच्या बिजलीनं प्राणांतिक वार करतो.)

जा! कुत्र्याच्या मोतीचं मरणच तुला जन्मोजन्मी तो चित्रगुप्त नोंद करीत राहील. (दौलतराव घायाळ होऊन विव्हळत राहातो. ते पाहून गहिवरत) समर्था, तुझा उपदेश कठोर आहे! आज्ञा पण निर्दय आहे! पोटचं पाप, तुझ्या रामदासी कामधेनूत – झोळीत घातलं आहे! याबद्दल स्वामी मला क्षमा करा! क्षमा करा!

एक अकरा, काय अकरा, कोण अकरा, कळेचिना ।
गुप्त ते गुप्त जाणावे । आनंदवन भुवनीं!

(रक्ताचा टिळा कपाळाला लावून, कमरेची उपसलेली बिजली म्यान करतो! साबाजी गेल्यावर तुळशी ही महाराणी येसूबाईवर चिडलेली व सूडाच्या प्रतिज्ञेनं वेडीपिसी झालेली, केस मोकळे सोडून कृत्या बनलेली भेसूरस्थितीत येते)

**तुळशी** : तुळशीचं बाशिंग पाळण्याला बांधलं! आन दुबळ्या दौलतीच्या नावं कुंकू लागलं! त्याच्या जित्या नावाचा लगीनचुडा भरला! पण कुंकवाचा करंडाच कोरडा निघाला! लगीन माळ तुटली आणि तुळशीची माळ राजांच्या गळ्यात पडली! पण ती राणी कवडी मोलाची केली! राम म्हणून मिठी मारली, पण त्यानं सवाई रावणाची आठवण करून दिली! तुळशी आज बेवारशी झाली! बेअब्रूची वेसवा बनून रानावनातून भटकू लागली! (दौलतीच्या कण्हण्याचा आर्त स्वर ऐकून) ऑ कोण दुःखीकष्टी जीव इथं कण्हून तळमळतुया! तिन्ही सांजला कवटाळतुया! (सभोवार वेड्यासारखी पाहत राहते)

**दौलतराव** : (आसन्नमरणस्थितीत कण्हून) या स्मशानवृक्षांना आनंदाची माहिती, काय ती सूड घेणाऱ्या माणसांच्या उत्कट आनंदावरून होईल तेवढीच! सूडकरी

आत्म्याचं अतृप्त हसणं, या वृक्षांनी पाहिलं, तर यांचे देहसुद्धा मोडून पडतील! पण तुळशी, तुला राजविलासात रतिसुख घेत माझा सूड उगवायचा होता!

**तुळशी** : कोण? मझ्या कुंकवाचा धनी! वज्र-चुड्याचा मालक? लगीन माळेचा फुलमाळी! माझ्या मुक्या मनाचा मिराशी! तुळशीच्या तनुलतेचा वृक्ष दौलतराव शिरके -(त्याचं मस्तक मांडीवर घेऊन रडू लागते) तुळशीच्या पंचप्राणा-दामोदरा कुणीहो तुमची दारुणदैना केली?

**दौलतराव** : काय? या दौलतीची तुळसा का माझ्या मरणघडीला, तोंडात ‘तुळशीपत्र’ घालायला आली आहे? चांडाळणी, राजमंचकावर बसून तुला आता माझी-मुड्याची ताटी आवळायची आहे का?

**तुळशी** : तुळशीच्या वृंदावना, मला मरणघडीला तरी ‘माझी’ म्हणा! पण या वेळी दूर लोटून मला असं हिणवू नका! सख्या, मला क्षमा करा! इष्काच्या मोहात तुळशी राजाच्या नादी लागली! पण संभाजीनं माझ्या मदनाची मंजिरीच खुडून पायदळी तुडविली! राज-श्रृंगाराचा फुलता फुलोरा हाती धरला, पण तो कवड्या सापाचा विळखाच माझ्या मानेभोवती पडला! तुळशीच्या दुबळ्या जिवलगा, वाकड्या पाऊलवाटेनं गेलेल्या या आपल्या आस्तुरीला क्षमा करा. दिवा अंधारातल्या चोरवाटा चोरांनाही उजेडात दाखवितोच!

**दौलतराव** : जारिणी! स्वैरिणी बनून राजमंचकी पहुडलीस आणि लग्नाच्या नवऱ्याचा नावाला मुकलीस! सटवे, तू अब्रूला पदरी बांधून राजमहाली श्रृंगाराची आरास सजवायला गेलीस, पण तुझा लग्नाचा नवरा असल्यामुळं, तुझ्या याराचा सूड घेण्याची मी प्रतिज्ञा केली! बाबांना ती आवडली नाही; म्हणून त्यांनीच माझ्यावर हा जिव्हारी बिजलीचा वार केला! तुळशे, मी आता घडीभरापुरताच तुझ्या संगतीचा नवरा, (-उचकी देतो ) जिता – (पुन्हा उचकी देतो)

**तुळशी** : तुळशीच्या मरत्या जिवा, नका आता बोलायचे फार कष्ट घेऊ! आपण दोघं लग्नाच्या बेडीत, दैवानं जखडलो! पण अंगच्या गुणांत मुळातच तफावत आढळताच एकमेकांपासून दुरावत अलग राहिलो! या तुळशीच्या साहसप्रिय श्रृंगारात स्वर्थबुद्धीची चंचलता! तर तिच्याउलट तुमच्यात स्वर्थबुद्धीच्या साहसशून्य व्यवहारवृत्तीची दक्षता! त्यामुळं आपण आजवर तुटक वगणुकीत नवराबायको असून दूर दूर राहिलो! पण आज सूडाच्या भावनेनं आपण दोघं पुन्हा नवराबायकोच्या

नात्यानं एकत्र बांधले गेलो! आपल्या जिवाचा सारखेपणा, सूडाच्या प्रतिज्ञेनं पुन्हा एकजीव झाला! तुटलेली लगीनमाळ तुमच्या मरणघडीनं फिरून फुलली! ताज्या टवटवीनं या तुळशीच्या हाती आली! (त्याच्या गळ्यात हात घालून कानाजवळ तोंड नेत) माझ्या दिलाच्या दौलती, ऐक! ज्या संभूराजानं मला घडीभरची शय्या सोबतीण करून, मला व्यभिचारिणी बनविलं, त्याचा मी पुरताच सूड घेईन! मराठ्यांच्या मानी राजाला मी पकडून मोंगलांच्या हवाली करीन आणि हाल हाल करून ठार मारवीन! मराठेशाही मातीला मिळवून, मराठ्याच्या महाराणीला, त्या येसूबाईला मोंगलांच्या गोटात दावणीला बांधलेल्या कसायांच्या गाईप्रमाणं ओढत नेईन! आणि भोसल्यांच्या जनान्यांचा गोषा मोंगल पादशहाच्या शहानशहा आलमगीर म्हणविणाऱ्या त्या औरंगजेबाच्या दिल्ली दरबारात उघडा करीन ! मग याकरता आलमगीराशी या तुळशीला निका लावून त्याची पडदानशीन बेगम बनण्याचा प्रसंग आला तरी बेहेत्तर! पण सौभाग्याच्या माझ्या ढळत्या मुखचंद्रा-दौलतराव, हे घे मझं वचनं! (त्याच्या हातावर हात ठेवून) आणि तुळशीच्या अखंड सौभाग्याच्या मरत्या जीवा, तुझ्या परख्या झालेल्या मुक्या अंतरीच्या बोलाला हे घे सजणा, प्रिय तुळशीचं पहिलं पण अखेरचं एकच चुंबन!

(दौलतरावाच चुंबन घेते)

**दौलतराव** : तुळशी, दौलतीचा जीव, मरण आल्यावरही तुझी प्रतिज्ञा पुरी झालेली पाह्यला पिशाच्चसृष्टीच्या भोवती गिधाडागत भिरभिऱ्या फिरत राहील! 'महाराष्ट्रधर्माचा संन्यास' मला करता आला नाही, तो तू धर्मातरानं पुरा कर, तरच माझ्या आत्म्याला शांती लाभेल! दिला बोल खरा कर! संभ्याला ठार कर! म-हा-रा येतो!

(उचकी नंतर दौलतरावाचे प्राणोत्क्रमण)

**तुळशी** : काय, सख्या सजणा! चाललास-गेलास! थांब, तुझा हा 'जीवखडा' मी पदरात (एक रक्ताळलेला दगड अश्मा म्हणून पदरात बांधते) बांधून तुझ्या आशेची आणि मझ्या निराशेची ही एकच गाठ घट्ट बांधते! आणि आपल्या दोघांच्या सूडाची चुडी पेटवून, उभ्या महाराष्ट्राला-संभाजी सकट मराठेशाहीला-आग लावायला ही तुळशी नग्न चंडिकेच्या नवीन अवतारात थयथयाट करीत हिंडत राहते! आता माझ्या अंगात दैव-दैत्यांचं हाडवैर सळसळतंय! तर कौरवपांडवांचं वैर धुमसतंय!

ऐका! आपल्या दोघांच्या प्रतिज्ञेत कालकूट विष ओकणाऱ्या कालसर्पाचा हा दाह आहे! विषोत्पादक वनस्पतीचं खत आहे! षडरिपूंचा संचार वाढविणारा स्त्री-मत्सर आहे! (विकट हास्य व थयथयाट करीत) या – या सूडाकरितां मेलेल्या, सूडाकरता जगलेल्या, आणि सूडाकरताच फिरून जन्माला येणाऱ्या जीवांनो! या या! आणि या मानी तुळशीच्या अंगात भूतावानी संचार करा! सारी तुळशीची श्रृंगारलोलुप झालेली काया, पिशाच्चयोनीच्या तोडीची करा! ज्या नीचानं आईला भिंतीत चिणून जीवं मारलं, त्या मातृहत्याऱ्या संभाजीला ही तुळशी पकडून आलमगीराकडून हालहाल करीत ठार करील! सारे शिर्के स्वराज्यद्रोही ठरवून त्यांचं शिरकाण करण्याऱ्या त्या संभाजीच्या विलासी शरीराचे कत्तल केलेल्या शिरक्यांच्या पिंडाइतकेच तुकडे तुकडे करून ते किड्या-मुंग्याकरवी खाववून घेईन! शिर्क्यांच्या बायका-मुलांचीसुद्धा ज्यानं कंसाप्रमाणं निर्दय बनून कत्तल केली, त्या स्त्रीबालहत्याऱ्या संभाजीच्या जनान्याच्या गोषा उडवून तो मोंगलांच्या गोटात उघडा करीन! तरच तुळशीच्या दौलतीला सदगती लाभेल! या दर्यासागर दौलतराव! ही दोघांच्या सूडांची इच्छा पुरी होईतो, रोज माझ्या स्वप्नात येवून सूडबुद्धीचा पिशाच्चश्रृंगारिक विलास करीत रहा! तुमच्या शेजेला मुकलेल्या या तुळशीला फुलवीत रहा! सती वृंदेच्या जालंदरा! तोवर ही तुळशी अहेवलेण्याचं कुंकु पुसणार नाही! वज्रचुड्याला सांडणार नाही! अखंड सौभाग्याचं तुमच्या नावानं निमित्ताचं बांधलेलं मंगळसूत्र तोडणार नाही! अहेवलेणी सोडणार नाही!

(पेटत्या मशाली घेऊन अंधारातून वाट काढीत
मोरे माने आपल्या सेवकांसह प्रवेश करितात)

**तुळशी** : (पाहून) कोण? कुणाच्या जवळ या जळत्या मशाली? यमाच्या की भूतांच्या? तुळशीच्या जित्या जीवाला, आशेचा अंधुक प्रकश द्यायला कोण आलं आहे ते बोला?

**मोरे** : काळ्याकुट्ट अंधारात आपपरभेट उरत नाही; त्याप्रमाणं काळ्याकुट्ट अंतःकरणात राहणारा जीव, शत्रु-मित्राचा भेद जाणत नाही! कोण आहे. दौलतराव,-

**तुळशी** : कोण तुम्ही आला आहात इथं! मनसुबदार की मुडदेफरास?

**माने** : (मोऱ्यास) मोरे, हा तुळशीचा आवाज कानावर येतोय?

**तुळशी** : होय! तीच आहे मी! मोरे-माने, दर्यासारंग दौलतीला देवाज्ञा झाली! त्या

बरोबरच त्याच्या प्रतिज्ञापूर्तीकरता ही तुळशी इथं धाऊन आली! चला, फार वेळ इथं थांबू नका! माझ्या मरत्या दौलतीच्या मूठमातीची मौत साजरी करा! आणि मग मी सांगत्ये, त्या पुढच्या तयारीला लागा!

---

**<u>प्रवेश दुसरा</u>**

(स्थळ: रायगडाखलीले एक डोंगर दरी.
देहू दसरी हा हुजऱ्याच्या वेषात खालील लावणी गुणगुणत येतो)

**देहू** : छुम छन छननना! लावणी नाद गुणगुणा! तिच्या वो चरणीचा! मंजुळ मैनेचा! लाख बोलाचा! बोली बोले घाटी! चाल तिची ऐटी! हा देहू दसरी भुले चांदणीसाठी!! नग कुणी!! इंद्रकामिनी! रंभा रागिणी! आणिक कंचनी! मेनकेवानी! माझी चटक चांदणी! हवी मला मोहिनी । १ ।

तब्बल पंधरवडावर माझी चांदणी, रोज मला इथं काळोखातल्या अंधारात येऊन भेटते! लांबून गोडगोड बोलत, अंगाला हात न लाऊ देता, कोरडे प्रेमाचे लपंडाव खेळते! (उसासत) पण इष्क़ाच्या खऱ्या प्रेमाचे खेळ काही मला ती अजून खेळू देत नाही! खरं म्हणजे, शिव्या, मार आणि मुका घ्यायला दुसऱ्याची दोन तोंड आणि चार हात जय्यत तयार असावे लागतात! आमच्या या गाठीभेटीस ती रोज जवळ येऊनही धड शिव्याही देत नाही आणि मारामारी तर मुळीच करीत नाही! तोंड दाबून बुक्क्याचा मार परवडला! पण ही दुरून असलेली अलग अबोली तोंडं, मुक्यासाठी गप्प राहिलेली कशी मौन धरणार? मोठी आफत येऊन पडली आहे. इष्क़ाच्या झगड्यात, हाताच्या मारामारीपेक्षा, बायकांचं अंगच अगोदर पुरुषाला दिसायला हवं! तरच पुरुषाला पुढं पाऊल टाकता येतं! परंतू चांदणीनं असं काही न करण्याचा विडा उचलला आहे की काय? मी पेहेलवानी पेशेचा माणूस! तेव्हा विडा खायचा नाही, असा मी विडा उचलला खरा! पण आज मात्र मी चांदणीला हा विडा खाऊ घालणारंच! (दोन विडे काढून) हं हा जिवाजीपंतांनी दिलेल्या पिकल्या पानांचा विडा! यांत त्यांनी होळी पुनवेला आणलेल्या जळक्या एरंडाची राख घातली आहे

म्हणे! तेव्हा हा विडा चांदणीनं खाल्ला की ती मदनमस्त बनून तुला ताबडतोब आलिंगनाच्या मिठीत चितपट करील! असं छातीला हात मारून पंतानं मला हा वशीकरणाचा विडा चांदणीला चघळायला दिलेला आहे! आणि दुसऱ्या हिरव्या नागवेली पानांचा मला खायला सांगितलय! बस्स! तूर्तास! पंतांच्या वशीकरणाचा पडताळा, या दोन विड्यातच पाहूया! नाहीतर गुरूशी मारामारी करण्याचा पैजेचा विडा, हा मनोमय मागंच उचललेला आहे!

(पडद्यात):- **चांदणी** : झुराबावरा, शिपाई मोहरा,

ढवळ्या घोड्यावरी पळवी नार ॥ धृ०॥

(ऑ ! चांदणीनं आज मनावर घेतलेलं दिसतंय! तेव्हा,

दुष्यंताच्या चालीनं झाडाआड जरा चांदणीचं लुकलुकणं बघू या! )

**चांदणी** : (प्रवेशून)

(लावणी)

झुराबावरा । शिपाई मोहरा ।
ढवळ्या घोड्यावरी पळवी नार ।
मुंडाश्याला, पिवळा जरीचा ।
रंग गुलाबी करतो यार ॥ धृ०॥
रंगीत भाला । ढाल पाठीला । पीळ मिशाला ।
डबडबलेल्या अंगी घाम पुसतांना मग शेला मळला ।
ख्याली खुशाली हार्दम लाल ॥ १ ॥

आज अजून माझा भोळाभाबडा जीव, वेडाबागडा बनलेला देहूराया कां बरं काही खबरच घ्यायला आला नाही! कसा पण माझ्या अर्ध्यावचनात मी त्याचा जीव गुंतवून जीवाभावाचा सखासोबती करुनश्यान मनोमय पुजलाया. पण पेहेलवानगडी, अजून नीटसा माझ्या काबूत कां बरं येत नाही? काल त्याला मी पान घ्यायला लागले, तर तो मला म्हणाला, -

**देहू** : (पुढे येतो) सखे, चंद्रावळी! काल चुकलो, पण विचार करून आज दोन प्रकारचे विडे तुझ्या-माझ्याकरता करून आणले आहेत! (विडे काढून) हा पिकल्या पानांचा आपल्या रंगरंगतीचा! हा तू खा! (तो देतो, ती खाते!) हा दुसरा, हिरवा

विडा! हा माझ्या हिरवट पेहेलवानी पेशाचा हा मी खातो! (खाऊन) बोल आता, काय आहे तुझी आज्ञा! तुझ्या आज्ञेप्रमाणं, तू हा काल दिलेला हुजऱ्याचा पोषाख घालून बंदा तुझ्या हुकमतीला हजर आहे! बादशाही कुर्निसात करू? का मराठी दंडवत ठोकू?

**चांदणी** : नको! तो संभूराजांना केव्हा, कुठं आन कसा करायचा, हे छोटे छत्रपती आपलं बाळराजं शाहू महाराज तुला उद्या साताऱ्याला अजिमताऱ्याला-किल्ल्यावर गेल्यावर शिकवतील.

**देहू** : म्हणजे आपण हा रायगड उद्या सोडायचा?

**चांदणी** : होय! तेच मी तुला आज सांगणार हाय. हे बघ, सजणा! संभूराजे आहेत सध्या गोव्याच्या मोहीमेत! कबजीबाबाही त्यांच्यासंगं आहेतच! मुडदा हिवतापावानी राजाच्या हाडीमांसी खिळलेला! तवा संभूराजांचं राणीसाहेबांना फर्मान आलंया की, रायगडाहून साताऱ्याच्या अजिंक्य किल्ल्यावर आपला समदा कबिला कायमच्या वस्तीला आणा!

**देहू** : गंगासागर भ्रष्ट केल्याबद्दल, संभूराजांना भलताच पश्चाताप झालेला दिसतोय!

**चांदणी** : तर-तर! मांसाहेबांनी तुळशीचा ‘काढा’ महाराजांना असा पाजला, की पुन्हा त्याचा ‘निकाढा’ काढायलाच नको! बरं. पण देहूराया! तुझं आणखी काय गुपीत मला सांगायचं हाय? काय म्हणतुया तुझा त्यो गुरु कां गुरगुरू कबजीचं शिंगरू जिवबा कलमदान्या?

**देहू** : आगं, त्यांचा लेखणीचा थांगच अजून कुणाला लागत नाही; मग मनाचा ठाव घ्यावा कुणी?

**चांदणी** : मी पाहाते बग त्याच्या मनाचा ठाव! सातारला गेल्यावर त्याची मला एकदा भेट घडवून आण! म्हंजी मी त्येच्यासकट त्या कबजी कलुषाचंबी कबाब करून कोल्ह्या कुत्र्यासनी खायला लावत्ये बग.

**देहू** : पण चांदणे, ए सजणे! अग त्या दोघांचा मांसाहारसुद्धा त्याच्या चांगलाच हाडीमासी भिनलेला आहे!

**चांदणी** : अरं म्हून तर त्या दोघांचं ‘मावंदं’ करायला या चांदणीला लई सोपं जाणार आहे! दोघंबी त्ये कालीमातेचं भगत! तवा आई चंडिकेला सुंभ-निसुंभ राक्षुस

मारायला जेवढा त्रास झाला, तेवढा मला दोघांचा खिमा करायला पडणार नाय! या चांदणीच्या एक गहिऱ्या नजरेस दोघांचा बळी एकघावच!

**देहू** : (आश्चर्य) ओं! म्हणजे तुझ्या डोळ्यांतही 'नजरबंदीची जादू' जिवाजीपंताप्रमाणं आहे?

**चांदणी** : अर त्यो नजरबंदी करीत असंल कलमानं! पण या चांदणीला नजरबंदीचं खेळ डोळ्यातल्या जादूनं शिकविणारा, मझ्या नव्यानवतीचा मदन चांगला जादूगर हाय ना वेड्या!

**देहू** : असं म्हणत्येस? पण का ग मैतरणी, खरंच का प्रेम आंधळं असतं?

**चांदणी** : तुझ्यावर मी फिदा झालेया, यावरून तुला ते हेरता येत नाय?

**देहू** : अस्सं तोंडानं म्हणत्येस मात्र! पण जवळ येताच तू डोळे वटारून मला लांब व्हायला सांगत्येस. का? आंधळं प्रेम कुठं डोळे वटारीत असतं?

**चांदणी** : आरं बाबा! आखाड्यातला पेहेलवान गडी, निकाली कुस्तीचा मोहरा मारून जसा बरोबरीच्या गड्याला हुलकावण्या देत मैदानात झुलवीत राहतो; तसंच आंधळं प्रेम गिरक्या घेत डोळेफोड करीत डोळस होतं! समजलं राया!

**देहू** : छे! मला यातलं अजून कांही कळत नाही. कुस्ती, मलखांब, दांडपट्टा, फरिगदगा आणि रोज हजार हजार जोर बैठका काढायच्या, हत्तीची जोडी यांच्याशीच मी जवळचा संबंध ठेवला. त्यामुळं अस्तुरीची नजरबंदी आणि तिच्या डोळ्यांतली जादू या कशा बघायच्या आणि वापरायच्या असतात, हे मला आता तूच शिकव.

**चांदणी** : शिकवते! माझ्या भोळ्या मनाच्या जादूगरा! आरं तूबी माझी चांगलीच नजरबंदी करून, मला मदनाच्या मोहनबाधेत भारून टाकलयास रं राजा! (श्रृंगारिक आविर्भाव)

**देहू** : असं! तर मग बजरंगबलीकी जय! चांदणे, आज मी तुझ्या बोलण्यानं चितपट झालो! निकाली कुस्तीनं तूं मैदान जिंकलंस! (एकदम तिचा हात धरतो. ती लाजते) म्हणजे तुम्हा बायकांचं सारंच न्यारं असतं की? तुम्ही लाजला म्हणजे तुमची जीभसुद्धा पडजिभेसारखी मुकी पडते वाटतं!

**चांदणी** : माझ्या नौतीच्या नवख्या मुशाफिरा, बायका लाजल्या म्हणजे त्यांच्या तोंडाला तोंड देत, मर्दगडी दामदुप्पटीनं ते परत करीत राहतात! मग बोलायला तिसरंच तोंड नवराबायकोच्या संसारात देवाकडून दिल जातं!

**देहू** : (चुंबनाच्या तयारीत) असं म्हणत्येस? तर मग, एकदाच ...

**चांदणी** : अं हं! त्ये इतक्यात नाय! लगीन झाल्यावर मंग! म्होर वरातीच्या रात्री!

**देहू** : अग पण या आपल्या राजकारणाच्या धक्काबुक्कीत वरातीची रात्र, उजेडणार केव्हा आणि कुठं! सांग पाहू!

**चांदणी** : सांगत्ये! माझा ह्यो सर्जा, आज माझ्या बालराजांचा हुजऱ्या म्या बनविलाय; तवा तुला प्याद्याचा फर्जी म्या केला की आपुन दोघांनी मांसाहेबांपुढं उभं राहून त्यंचा आशीर्वाद घ्यायचा! कळलं.

**देहू** : तर मग सजणे! मला प्याद्याचा फर्जी व्हायला अगोदर घोड्यावर बसायला शिकलं पाहिजे!

**चांदणी** : अगबाई! माझ्या रायाला अजून घोड्यावर बसायला येत नाही?

**देहू** : खोडा घालून 'स्वारी' भरीत चितपट करावा एवढंच मी शिकलो! अग मला काय माहित की तू अशा अटीतटीनं माझ्याशी लग्नाला तयार होशील? तेव्हा आता असं कर, तू इथून अगोदर घोडेस्वार बनून मला पुढं घोड्यावर बसव.

**चांदणी** : (हसत) रडतराऊत म्हणू?

**देहू** : मग त्यात हसण्यासारखं काय आहे? मी का वावगं बोललो? हे पहा मोहनांना घोड्यावरून पळवून नेणारे मर्द शिपाई गडी बटाऊ म्हणून मराठ्यांच्या सैन्यात खूपच असतील! पण आपल्या भावी नवऱ्याला रडतराऊत बनवून घोड्यावरून पळविणारी छेलछबेली मोहना तूंच बनलीस तर -

**चांदणी** : (मध्येच) वा रे सख्या! अन मग मासाहेबांबरोबर मेण्यातून पाठराखणी कोण, तू लुगडं नेसूनश्यान करशील व्हय? अरं माझ्या सख्याहरी देहूराया! मासाहेबांच्या संगतीत राहूनश्यान मी आलेया श्रीमंती माजाला!

**देहू** : म्हणजे मग मोठ्यांचं सगळंच मोठं, पण मुदलात सारखं खोटं असं समजून मी तुझ्याशी वागायचं वाटतं?

**चांदणी** : व्हय! आरं बाबा, श्रीमंतांच्या बरोबर राहूनश्यान वागायचं तर आपली जीभ मोठी करून, पोट वाढवीत लाज सोडावी लागते! (देहू हसतो) अरं भोळ्या

जिवा, असं हसू नकोस! राया, लाजंचं भय कुनाला बाबा? गरिबांना! अन अब्रूची चाड तर श्रीमंतांना तीन ताड उडवायला लावत्ये! आलं ध्यानात!

**देहू** : (डोकं खाजवीत) ठेव मनात; पण बोलू नकोस जनांत! चांदणे, म्हणजे मला आता घोड्यावर बसण्यापासून तो श्रीमंतीच्या तोऱ्यावर तरंगत राहून, हवेवर फिरण्यापर्यंतचं शिक्षण घ्यायची आफत आली!

**चांदणी** : मग! फुकट वाटली व्हय ही चांदणी तुला? अरं बाबा, माझ्या बाल त्या फितुऱ्या मान्यानं मला आपली राणी करायची मागणी केली होती; पण त्येच्या 'बा' ला बी न भिता या चांदणीनं त्येला नकार देत, त्येच्या डोळ्यांपुढं काजवं चमकायला लावलं बग! तवा माझ्या जिवलगा! तुला जर मला लग्नाची अस्तुरी म्हून घरची लक्ष्मीजवळ बाळगायची असेल, तर माझ्या आवडी-निवडी या नीट ऐकून पाठ कर.

मर्द फांकडा, पायी तोडा, बसाया घोडा अबलख ।
पंचहत्यारी, स्वारी, शिकारी सरदारीचा नोंकझोक ॥धृ०॥
दारी नौबत झडे चौघडा, दरबारामंदी सरनौबत ।
मान मरातब, तशीच दौलत, पराक्रमाची खैरात ॥ १ ॥
असा असावा, घरधनी रावा, माझ्या महालांत ।
रंग नवतीचा संग सुर्तीचा चांदणीच्या या संगतीत ॥ २ ॥

चल, वेड्या! काळोख लई पसरत चाललाय!

**देहू** : अरं खरंच! सातारला निघायची तयारी मला जिवाजीपंतांना विचारून अगोदर करायला हवी! छे बुवा! बायकांसमोर पुरुष, काळवेळ विसरतात, हेंच खरं!

(हसत हसत दोघेही हातांत हात घेत जातात)

---

## <u>प्रवेश तिसरा</u>

(स्थळ: साता इस्ताव्याचा किल्ला. छत्रपती संभाजीमहाराजांकरिता उभारलेला व श्रृंगारलेला भव्य शामियाना! त्यावर महाराष्ट्र-जरीपटका 'हा' भगव्या शेंड्यानिशी

मोठ्या डौलाने फडकत असलेला! शामियानात खास संभूराजांकरता ठेवलेली रत्नजडित कलाबुतीची बैठक. गोव्याची स्वारी (इ.स. १८८३ सप्टेंबर) यशस्वी झालेली असून, पोर्तुगीजांचा वकील डॉ. निकोलो मनुशी हा तहाच्या वाटाघाटीस येऊ घातलेला. विजयी मुद्रेनं संभूराजे हे कलुषा कबजीसह प्रवेश करितात)

**संभाजी** : उन्मत्त बेटे! फिरंग्यांना वाटलं मराठे म्हणजे कोण्या झाडाचा पाला! जीर्णशीर्ण पाचोळा! उत्तर कोकणात चौलवर बिना आगळीक हल्ला केला! हिंदूना बाटविण्याचा सपाटा चालविलाय! अंजनदीव बेट घेतलं! आलमगीराच्या भूलथापांना भरीस पाडून आमची विलायत खराब केली! उभं फिरंगाण जाळून भस्म करीन! ही कुमारजुव्याची नुसती संभाजीची चुणूक आहे, म्हणावं!

**कबजी** : राजेसाहेब, आज आपण चंडिकेच्या, कृपेनं -

**संभाजी** : (संतापून मध्येच) छांदोगामात्य! चंडिकेची कृपा, आपल्या सारख्या जारण-मारण –उच्चाटन करण्याऱ्या खुळ्या मांत्रिकांना! आमच्या सारख्या वीरांच्या मनगटांत, आई तुळजीभवानीचाच वरदहस्त असतो, हे विसरू नका! तेव्हा खुळ्या तांत्रिक मंत्रानं आमच्या काळजाला तुम्ही हात घालण्याचा वेडगळ प्रयत्न करू नये हे उत्तम!

**कबजी** : (हांजी हांजी करीत) ह्यः ह्यः! तसं नाही, महाराज! पण दोन्ही रूपं अवतारी एकच! रणांगणीची चंडिका, हीच विजयाची आई भवानी तुळजा! पण राजांनी आज लढण्याची शर्थ केली! फिरंग्यांना आठवणीत राहील, असाच मार महाराजांनी दिला! फिरंग्यांचा तो गवनेर मोठ्या डौलानं फोंड्यावर चाल करून आला होता! भली खोड मोडली गुलामाची! महाराजांचा वार, असा त्याच्या पाठीवर बसला की, बेटा, जबर जखम घेऊनच पळाला तो!

**संभाजी** : आणि पळाला म्हणूनच तो फोंड्याचा किल्ला जमीनदोस्त करायला अवकाश मिळाला! बाकी या कुमारजुव्याच्या चकमकीत येसाजी कंकांनीही खूपच कामगिरी केली! त्यांतल्यात्यात, खंडबाच्या बहादुरीची फारच तारीफ करावीशी वाटते! आज सकाळी खाडीच्या मध्यभागी आम्ही आपला घोडा, बेदरकारपणे घातला तोच भरतीचं पाणी जीनास लागून, घोडा पोहोणीला लागला! इतक्यात खंडबानं मागून येऊन आपल्या घोड्यावरून उतरत आमच्या जिलेबी घोड्याचा

लगाम हाती घेतला आणि पोहत पैलतीरा जात जात त्यानं आमचा प्राण वाचविला! आधीच तो मदनगडावरल्या पत्रांची उत्तरे घेऊन येत असता, खंडूजी रक्त ओकला होता! म्हणून जोत्याजी केसकरानं आमच्या, 'अस्ताव्यातलं थंडगार पाणी' त्याला प्यायला दिलं! त्याबरोबरच आम्ही आमचा खासा 'जिलबी' घोडा खंडबाला बसायला दिला! आज त्यानं चाकरीची शर्थ केली! याला म्हणतात चाकरी! याला म्हणतात इमान! नाहीतर कबजी! या फंदफितुरीच्या जमान्यात एवढी स्वामिनिष्ठा कुठून राह्याला? तरी म्हटलं, आमच्या राणीसाहेब नेहमी खंडबाची कां कड घेतात? खरोखर, चिटणीसांच्या वंशाला स्वामिनिष्ठेचं बाळकडूच पाजलं आहे! कबजी, मुतालिकाला आम्ही खंडबाच्या आज्ञेत राहण्यास फर्मावलं असून, त्यांच्या सांगण्याखेरीज तेरीज व पत्रे लिहिली जाणार नाहीत, असा जादा अधिकार दिला आहे आम्ही. तुम्ही त्यात हस्तक्षेप करून ढवळाढवळ करूं नका! याद राखा!

**कबजी** : नाही, महाराज! आज्ञापालनात बिलकूल कसूर होणार नाही! परंतू ते पहा, पोर्तुगीजांचे वकील निकोलो मनुशीसाहेब इकडेच तहाच्या वाटाघाटासाठी येत आहेत!

(डॉ: निकोलो मनुशी प्रवेश करून मुजरा करीत खिन्न मुद्रेने उभा राहतो)

**संभाजी** : कोण, हकीमजी! तुम्ही फिरंग्यांची वकीली पत्करली वाटतं! दवाखान्यात रोग्यांना दवापाणी द्यायचं सोडून, या राजकारणात पडण्याची अवदसा तुम्हांला कुठून आठवली? बोला, कुठंय तो फिरंग्यांचा गवनेर?

**निकोलो मनुशी** : राजेसाहेबा, आपल्या शैन्याच्या भेटीनं, फिरंग्याच्या सर्व बायका-मुलानी आपला जीव वाचवण्याकरटा जमिनीचा आश्रय सोडला! हे सारे समुद्रांट होड्यांमधून जीव बचावट हायट! टे आकाशाटल्या डेवाला नवस करून, सेंट झेवियरची प्रार्थना करीट हायट! टेव्हा, राजेसाहिबा! फिरंग्यांवर डया करा! बुद्धीपुरस्सर मराठ्यांचा अपमान करण्याचा टेंचा हेटु नव्हटा! मी खरं सांगटो! कारण मी टटस्थ माणूस! इटली डेशांतील व्हेनीस शहराचा मी राहाणारा! टुमच्या हिंडुस्टाणाट, माजी सट्टावण्ण वसरं झाली!

**संभाजी** : (शांत होत) ते तुम्ही सत्तावन्न वर्ष रहा अगर या हिंदुस्थानात मरून फिरून जन्माला या! आम्हाला त्यात आनंदच आहे! पण तुम्ही आपलं काम निःपक्षपातीपणानं करा म्हणजे झालं!

**निकोलो** : ठीक हाय! राजेसाहिबा मी काही वरसं जयसिंगाकडे हकीम होटो! सढ्यां शहाजादा आलमचा मी डॉक्टर हाय! चार महिन्याची रजा घेऊन या गोव्यास कामाकरटाच आलो हाय! नायटर मी मड्रासलाच जाणार होटो!

**संभाजी** : मग जायंच होतंत! तुमच्यावाचून आमचं काम नडणार होतं, असं मुळीच नाही! हकीमजी, तुम्ही तहाचं बोलणं करायला आला आहात की आपली पूर्वपीठिका सांगायला आला आहात? तुमच्या पराभूत सैन्याच्या वाऱ्यानं, आमच्या झाडांची कोवळी पानंसुद्धा हट्टानं हलायची नाहीत हे समजून काय ते तहाचं बोला! फिरंग्यांचं काय म्हणणं आहे?

**निकोलो** : राजेसाहिबा! फिरंग्यांनी आगळीक केली! होऊ नये, पण चूक झाली! फिरंग्यांची आन टुमच्या वडिलांची फार जुनीपुराणी डोस्टी होटी! टिच्याकडे नजर डेऊन, ट्यांच्यावर डया करा, डया करा.

**संभाजी** : त्या देस्तीची, या तहात निष्कारण गुंफण घालू नका! आमच्या वडिलांच्या जुन्यापुराण्या दोस्तीची आठवण, या तहाच्या वेळी देणं गैरवाजवी बेहिशोबी आहे! राज्यारोहण प्रसंगी, आमच्या वडिलांनी जर डच वकील आब्राहमनं आणि हेन्री  ऑग्झेडनं हिऱ्यांच्या आंगठ्या नजर केलेल्या घेतल्या नसत्या; तर आज तुमच्याशी आम्हांला ही उरस्फोड का करावी लागती? हकीमजी तुमचे हे फिरंगी लोक, अत्यंत बेपर्वाई आहेत! मराठ्यांशी तुसडेपणानं वागून, ते आम्हा मराठ्यांना कस्पटाप्रमाणं मानतात! पण आजच्या आमच्या या विजयानं फिरंग्यांना कळून चुकलं असेल की, 'स्वताच्या सामर्थ्याचं अज्ञान, हेच फार वेळा पराभवाचं कारण असतं! शत्रूच्या गुप्त बातम्या काढण्यापेक्षा स्वताच्या उघड उघड गोष्टी पाहाण्याकडे लक्ष देणं अधिक श्रेयस्कर असतं!

**निकोलो** : एकडम कबूल हाय! पण राजेसाहिबा, जरा डया करा! आन गव्हर्नरसाहेबांस एकबार माफी करा!

**संभाजी** : माफीची वेळ गेली! बस्स, ते काही नाही, हकीमजी, एक कोट रुपये मोजून वाजवून घेईन. तेव्हाच हा संभाजी या सांताइस्ताव्याच्या किल्ल्यातून बाहेर पडेल! जा. त्या गवनेरास म्हणावं की, बऱ्या बोलानं पैसे टाक, नाहीतर उद्याच्या उद्या हे गोवं धुळीस मिळवीन!. या इस्ताव्याहून गोवा सारा देड कोस आहे! खांदेरी-उंदेरीच्या बाबबीत उद्भवलेला तंटा आणि शेवटी झडलेली चकमक ही इतक्यातच

विसरू नका! ले. थार्पच्या अविचारी साहसामुळं हकनाक दुसरे बरेच लोक प्राणास मुकले आहेत, त्याची नीट आठवण असू द्या.

**निकोलो** : पण राजेसाहिबा! एक कोट रुपये म्हणजे फार मोठी रक्कम हाय! फिरंग्यांना ती झेपणार नाही!

**संभाजी** : न झेपायला काय झालं? काय भीक लागली आहे फिरंग्यांना? म्हणे 'कोट रुपये म्हणजे फार मोठी रक्कम आहे आणि ती फिरंग्यांना ती झेपणार नाही!' त्यांना झेपत नसेल तर तुम्ही आपल्या पदरची भरा! आम्हाला त्याचे उपकार सांगता? आणि या दोनशे वर्षांत कोट्यावधी रुपये हिन्दुस्थानातून घेऊन गेलात ते? ते काही नाही. हकीमजी एक कोट रुपये घेईन, त्यांत आता एक छदामदेखील कमी होणार नाही, समजलात?

**निकोलो** : गव्हर्नराऐवजी ही टेंचा वकील निकोलो मनुशी आमल्याला डयेची सूट, -

**संभाजी** : (संतापून) बिलकूल मिळणार नाही. तुम्ही फिरंग्यांकडून, तहाच्या अटी समजावून घ्यायला आला आहांत की, त्यांचं दारिद्र्याचं रडगाणं गायला आहांत? हकीमजी, फिरंग्यांना तुम्ही दरिद्री समजत असाल; पण ते व्यापारी दरिद्री आहेत? व्यापारी हे पैशाकरिता नेहमीच रडत असतात!

**निकोलो** : राजेसाहिबा, आपली एक कोट रुपयाची मागणी आमी गोवा गव्हर्नरांना सांगटो! पण टेनी आपल्याला एकदोन नजराणा पेश केलेला हायट! टेचा टुमी स्वीकार करावा, अशी मी विनंटी करटो!

(टाळी वाजवून एका सेवकामार्फत दोन नजराण्यांची तबके संभाजीपुढी करतो.)

**संभाजी** : (हात लावून स्वीकारल्यानंतर) काढा पाहू ती तबकावरील आच्छादनं! वा! ही रत्नजडीत सुंदर तलवार! (किंचित स्मितहास्य करीत) एकूण " विमनस्क प्रतिस्पर्ध्यावरील विजय हा स्वतःच्या पराजयापेक्षाही अधिक निरुत्साहित करतो" हे या शस्त्रगौरवाच्या भेटीनं अनुभवास आलं! आणि हे काय? हिरे माणकांचं तबक? हे कशाला? रायगडचा राजा, हा हातात खडे धरील, तर त्याचीसुद्धा हिरे-माणिकं होतील! सबब असला नजराणा स्वीकारणं हे दरिद्रीपणाचं लक्षण, आम्ही तुच्छच मानतो! मात्र, ही तलवार शत्रूची शरणागती म्हणून आम्ही ती मानचिन्हाची निशाणी समजून तिचा स्वीकार करतो! कबजी, हे हिरे-माणकानी भरलेलं तबक, त्यांचं त्यांना परत करा! उचला -

**कबजी** : पण महाराज! फिरंग्यांकडून वसूल होणाऱ्या एक कोट रुपयांपोटी हे तबक ओलीस ठेवलेलं बरं!

**संभाजी** : ही तुमची मारवाडीवृत्ती आम्हाला मंजूर नाही! कनक आणि कांता झाकून वापराव्यात मारवाड्यांनीच! आम्ही वीरांनी नव्हे! वकीलसाहेब, घेऊन जा हे तबक! आणि याहीपेक्षा काही चैनीच्या, अत्यंत चित्ताकर्षक, मनाला रिझविण्याऱ्या सजीव सुंदर वस्तू असतील, तर त्या तुमच्या एकाद्या लावण्यशील फिरंगी स्त्रीमर्फत आम्हाला पाठवा!

**निकोलो** : राजेसाहिबा, आमच्या फिरंगणांट टैयार झालेली डारू,

**संभाजी** : जरूर पाठवा!

**कबजी** : बरोबर! कारण दारूमुळं मोठाली वैरंसुद्धा विसरली जातात! पंचमहाभूतांपैकी अग्नी आणि पाणी जर कुठं एकत्र नांदत असेल तर ती त्या पेटत्या पाण्यात! दारूतच!

**संभाजी** : वकीलसाहेब! झूट हे. थोरामोठ्यांचं जन्मजात हाडवैर हे प्रथमदर्शनी भरतभेटीप्रमणं वाटतं! नंतर त्या भेटीतूनच युद्धाचा वणवा भडकला जातो, हे विसरू नका!

**निकोलो** : ठीक हाय! राजेसाहिबांना आणंड होईल, आमी सुंडर नजराणी दारू घेऊन पाठवितो! टोपर्यंत महाराजांची करमणूक आमी बरोबर आणलेली ही आमची नृत्याची अप्सरा, नवीन नाचगाणा शिकलेली अभिसारिका राजांच्या मनाचं रंजन करील!

**संभाजी** : कबजी, वकीलसाहेबांबरोबर जा! तिथंच थांबून त्यांच्या गवनेरला आपल्या तहनाम्यातील एक कोट रुपयाची अट नीट समजून सांगा! जा, यांच्याबरोबर! आम्हाला आता खास विश्रांतीची आवश्यकता आहे!

(निकोलो मनुशी वकिलाला बरोबर घेऊन कलुषा कबजी जातो.
ते गेल्यावर तुळशी ही सुंदर व तरुण फिरंगी नृत्याप्सरेच्या वेषात,
झिरझिरीत अशा वस्त्रालंकारित अशी नृत्यांकित आकर्षक गायनाभिनय
करीत प्रवेश करत्ये. नंतर मद्याचा पेला भरून ती संभूराजांना देते व
सुरई पुढे ठेवून नृत्य करू लागत्ये)

**संभाजी** : अहाहा! काय मदनमस्त मादक सौंदर्य हे! रतिरंगातून रसरसलेली जणूकाय श्रृंगाररसाची मन्मथ शलाका! काय मौज आहे पहा! विधात्यानं स्त्रीसौंदर्याची मूर्ती घडविताना तिच्या डोळ्यांत सूर्याच्या प्रखरतेबरोबरच, चंद्राची शीतलताही नगराज हिमालयसुद्धा थंडगार पाडील, अशा योजनेनं केलेली दिसते! गगनात उंच भराऱ्या मारणारं हिमालयाचं डोकं ऋतुस्नात गंगेला पाहून ऋतुमानानं शुभ्र झाल्यास, त्यात अनैसर्गिक ते काय? पण त्याचच अनुकरण करणारे पर्वताचे माथे, पावसाळ्यापुरतेच हिरवट होतात, हा निसर्गाचा खरा दारुण दैवदुर्विलास! ही रूपगर्विता म्हणजे पृथ्वीची विशालताच भासते! आकाशाच्या पोकळीत पंचमहाभूतांच्या परस्परविरोधी गुणांचं संमिश्रण करून, ब्रम्हदेवानं स्त्रीहृदयाची भव्य उभारणी केली आणि म्हणूनच मृत्युंजय महादेवाला विश्व संहारणीचा आनंद तांडव नृत्यानं केवळ स्त्रीकरिता स्मशानवासी बनून लुटावा लागला! बृहस्पतीला निर्माण केलेल्या ब्रम्हदेवानं, चतुर्विध ज्ञानांचा साठा, स्त्रीच्या मस्तकात ओतप्रोत भरला! सहाजिकच मग बुद्धीवैभवाकरता सारे देव, दानव आणि मानव स्त्रियांचे गुलाम झाले आणि त्यांच्या अंकांवर खेळू-बागडू लागले! विषोत्पादक वनस्पतींबरोबर अमृतवल्लींची सरभेसळही स्त्रीदेहावर विश्वकर्म्यानं मोठ्या शिताफीनं केलेली दिसते! नागराज तक्षकाच्या सप्त पिढ्यांनाही पराभूत करील, असा हा स्त्रियांचा भारभूत झालेला केशसंभार! अहाहा! अमृतालाही आरोग्य देण्याकरता विधात्यानं जणूकाय त्या अश्विनीकुमारांनाच स्त्रियांच्या वक्षःस्थलात लहान अर्भकाप्रमणं मोहनिद्रेत रमवून, पुरुषाला त्यांनी जगविलं आहे! जोपासलं आहे! वा! स्त्रीसौंदर्य निर्माण करण्याऱ्या विरंचीची केवढी ही अपूर्व चिरंजीव झालेली जिवंत कृती! बस! बस! अभिसारिके, पुरे कर तुझं हे नृत्य!

**तुळशी** : (बुरख्यातून) का? महाराजांना मझं हे नृत्य पसंत नाही?

**संभाजी** : नृत्य पसंत आहे, पण ते करताना हे सौंदर्यरसिके! तुझ्या वक्षःस्थलांवरील ही जोबनवंतीची, स्तनयुग्म हंस पक्षाची जोडी, आमच्याकडे झेप घेण्याकरता, केविलवाण्या धडपडीत हळूच तुझ्या या बंदिस्त कंचुकीतून डोकावू पाहात आहे! (ती छातीवरील झिरझिरीत बुरखा सावरू पाहते तोच) नको! कामुक कुमारिकेचे स्तन, वृद्धिंगत होऊन कंचुकीबाहेर यायला लागले म्हणजे मन्मथानं संधी साधून तिच्या हृदयात चोरून प्रवेश केला, असं पुरुषांनी समजावयास हवं!

**तुळशी** : ते खरं! पण राजीवनयना! आपल्यासारख्या, अनेक प्रियकरणींच्या वल्लभावर प्रेम करणं म्हणजे प्रथम आनंद, नंतर हळहळ आणि मग दुःखाचं भांडार, असं होत असल्यानं मी फक्त राजांची नृत्य-गायनापुरतीच तेवढी करमणूक करीन म्हणत्ये!

**संभाजी** : नको! कारण वीरांच्या नग्न अर्धांगी, या तळपत्या तरवारी, आणि पडदानशीन अर्धांगी, या प्रतिपक्षीय वीरांच्या शूर सन्मानासाठीच सादर होत असतात! म्हणून म्हणतो की, तुझं हे नृत्य आणि गायन आता पुरे! ये, आमच्याजवळ बैस. नृत्यगायनाच्या परिश्रमानं तुझ्या मुखचंद्रावरची लाली-गुलाबी ओसरायला लागली! या आमच्या हातातील स्फटिकाचं आरक्त मदिरापात्र म्हणजेच तुझे अधरोष्ठ! तेव्हा मदिरेचा हा पेला तू घे आणि, (तिला जवळ बसवून मद्याचा पेला तिच्या तोंडाला लावू पाहतो, पण ती दूरदूर होत राहते)

**तुळशी** : नका - नका महाराज! मला जवळ घेऊन आपण आपल्या राजैश्वर्याला मुकू नका! कंचनीला जवळ घेऊ नका! आम्ही श्रृंगारभोगदासी म्हणजे सुगंधी अत्तराप्रमाणं! क्षणैक सुवास देणाऱ्या! उडून वाऱ्यावर विरणाऱ्या!! चंदनाला सुगंध आणण्याकरता कुणी अत्तराचं शिंपण केलं आहे का? सूर्याला चंदनाची उटी कोण लावणार?

(श्रृंगारिक मूक अभिनय)

**संभाजी** : वा! सुरेख! मूक अभिनय प्रगट करताना, श्रृंगारिक दृष्टी ही चातुर्याची सृष्टीच बनवीत असते, अस जे म्हणतात ते काही खोटं नाही! शृंगारांत स्त्रीयांच्या कामुक चाळ्यांतून जेव्हा प्रणयाचा विलास सुरू होतो; तेव्हा काव्यांतील नवरसांना नवखंड पृथ्वीचं मोल येतं! यावेळी आम्ही मराठ्याचा राजा नसून, तुझ्या नूतन लावण्यमयी सौंदर्यसृष्टीचा सम्राट आहोत! आणि म्हणूनच तुझं करग्रहण करून तुला जवळ घेत आहोत! (तिचा हात धरून जवळ बसवितो. ती घाबरून बावरते) घाबरू नकोस! भीतीनं बावरू नकोस! चतुर चंचल कुरंगनयने! सौंदर्याला शूर पुरुषांचं तारुण्यंच लुटत असतं! खवळलेल्या अथांग सागरात आम्ही उडी टाकून तुळशीला वाचविताना ज्या अनंग अंगनेचा आम्हाला कामुक स्पर्श जाणवाला, त्याचाच प्रत्यय या क्षणी आम्हाला पुन्हा होत आहे! तुळशीची त्यावेळची भेदरलेली गहिरी नजर आणि आत्ताची तुझी बावरलेली नजर, आम्हाला सारखीच शृंगारिक दिसते! म्हणून

म्हणतो, हे गोमंतकीय सुंदर स्त्रीये, हा तोंडावरचा बुरखा काढ! आम्हाला सत्यं, शिवं, सुंदरमचा अनुभव घेण्याकरता तू हा तोंडावरला बुरखा काढ! शृंगारांत स्वारस्य नसलेल्या पाशवी बलात्काराचा वाममार्ग आम्हाला नामंजूर वाटतो. फिरंग्यांनी मराठ्यांच्या राजाला नजराणा म्हणून तुला बहाल केली आहे ते विसरू नकोस!

**तुळशी** : (स्वगत) छे! फलद्रूप कल्पतरूला, फुलं येण्याची का कुणी वाट पहात असते! तेव्हा प्रगट व्हायला ही नामी संधी आहे!

(बुरखा काढून, रागानं फणफणत लांब उभी राहते)

**संभाजी** : (चकित होऊन) कोण! तुळशी -

**तुळशी** : होय! मराठ्यांच्या मानी राजानं तुळशीला पायदळी तुडविलेलीच ही तुळशी! आणि तिचं निर्माल्य करून फिरंग्यानं राजांच्या पायावर अर्पण केलेली हीच ती आपली शृंगारमंजिरी तुळशी! नवरा नसलेली तुळशी, प्रियकराकडूनही बिनवारशी बनली आणि ती फिरंग्यांच्या आश्रयाला आली. तिनं नृत्यगायनाची कला हाती तोंडी मिळवली! (उसासत) तुळशीनं कंचनी होत फिरंग्याच्या उपकाराची फेड केली; पण राजांच्या अपकारांचं ओझं घेऊन परत ही तुळशी, महाराणी येसूबाईच्या मूळावर सवत होऊन आली. अमृताचा कुंभ पाह्यला गेले पण फुटका रांजणच या तुळशीच्या हाती लागला! संभूराजे, तुम्ही या तुळशीची घाणेरी निर्गुडी केली हो!

(रडते)

**संभाजी** : (स्वगत) स्त्रियांनी सुधारसाचे पाट, आपल्या स्तनमंडलात साठविले, परंतू डोळ्यातल्या दुःखित अश्रूंनी ते कोरडे ठणठणीतच ठेवले! (उघड) तुळशी, झालं गेलं विसरून जा! नदीच्या महापुराचं गढूळ पाणी, समुद्रच आपल्या पोटात घेत असतो! या क्षणापासून हा मराठ्याचा राजा तुला महाराणीच्या मानानंच जवळ करीत आहे! बिल्कुल रडू नकोस! आजपासून तू माझी कुडी आणि मी तुझा प्राण! समजंल! या जिवाशिवाच्या शिवशक्तीतच, अभेद्य एकीकरणात, आपण आमरण राहू! हे घे वचन! तू मला पेलाभर वचन दे!

**तुळशी** : अहाहा! दिलदार उदारा! आज देशोघडी लावलेल्या तुळशीची लाज, राजसा! तुमच्या मुठीत पुन्हा दिली! अंगणात कल्पतरू लाविल्यागत तुळशीचा जीव आनंदला! कामधेनूचं वासरू मनोमय कासंला लागलं! फाश्याऐवजी नक्षत्र खेळायला दिलीत! कंदूकक्रीडेला चंद्राचा चेंडू दिला!

(आनंदाने बेहोष बनून मद्याचे पेले भराभर भरून ते स्वतः
पिते आणि संभूराजांनाही देते. दोघेही बेभान होऊन
परस्परांना मिठ्या मारून एकमेकांची चुंबनं घेत राहतात)

**संभाजी** : (अडखळत) तुळशी, बोलाव त्या फिरंग्याच्या गवनेराला! आणि त्याला दारू कशी पितात, याचा तोंडफोड करीत त्याला चांगला धडा शिकव!

**कबजी** : (घाईगर्दीतने येत) महाराज, फिरंग्याचा गवनेर एक कोट रुपये देत नाही म्हणतो!

**संभाजी** : जा! सूट द्या त्याला! या दिलेल्या नजराण्याकरता आम्ही एक कोट रुपये ओवाळून फेकून दिले! जा सांगा त्याला आणि सैन्यासकट साताऱ्याकडे चालू लागा! आम्ही मागाहून येतोच! जा, इथं आमच्या एकांतात थांबू नका! शपथ आहे या आमच्या चंडिकेची!

**कबजी** : कसूर माफ! जय चंडिके! (कबजी जातो)

**तुळशी** : महाराज! तोंडावर हा किती घाम आला आहे! कशानं पुसू बरं? मी तर या फिरंगी वेषात! फिरंग्या स्त्रीला कुंकूही नसतं आणि पदराचीही अडचण पडते! आता काय करावं?

**संभाजी** : (बेहोषीत) तुला पदर नाही! फाड हा मराठ्यांचा भगवा झेंडा! आणि कर त्याचा दस्तरुमाल!

(तुळशी भगवा झेंडा फाडून त्याच्या तुकड्यानं तोंड पुसते.)

**तुळशी** : (तोंड पुसून झाल्यावर) रायगडच्या राया, मला या जरीपटक्याची काचोळी घालाविशी वाटते!

**संभाजी** : कर त्याच्या चिंध्या! टाक तो जरीपटका टरकावून!

(बेशुद्ध होऊन पडतो)

**तुळशी** : (रागानं) मराठ्यांच्या विजयी जरीपटक्याच्या चिंध्या (जरीपटका घेऊन फाडते) करत्ये! मग मराठ्यांच्या महाराणीच्या राजभूषणांना आणि आहेव लेण्यांना पायदळी तुडविते! राणी येसूबाईला तिच्या नवऱ्यादेखत लाथेनं ठोकरते!

(विकट हास्याच्या उन्मादात तुळशीचा जलफळाट!)

(पडदा)

---

**<u>प्रवेश चवथा:</u>**

(स्थळ: सातारा वेताळ पेठेतील जिवाजीपंत कलमदाने यांचे घर. जवळ लिहिलेली तीन मोठी दप्तरे. एक राजकारणाचं! दुसरे कलमबोध लिखाणाचं? नि तिसरे जारण-मारण उच्चाटनादि मंत्रतंत्रयुक्त वशीकरणाचं. तीच तो पाहात असलेला जिवाजीपंत हा एकटाच ते चाळीत पण आपलं मनोगत मोठ्यानं बोलून पानतंबाखू खात असलेला दिसतो)

**जिवाजीपंत** : (उपहासित मुद्रेनं) या पृथ्वीच्या पाठीवर मूर्तिमंत मूर्खांची जर कुठं गणित-श्रेणीनं पैदास होत असेल, तर ती ह्या आमच्या महाराष्ट्र देशात! लोकभ्रमाचं बंड या बुभुक्षित देशात इतकं काही माजलं आहे की, याला महाराष्ट्र देश न म्हणता, खुशाल 'मूर्खराष्ट्र' म्हणून संबोधावं! काय एकेक मनाच्या दरेक माणसाचे न्यारे नमुने आहेत पहा! कुणाचा कुणावर विश्वास नाही; पण छाः छूः जंतर मंतर करण्याऱ्या मांत्रिकावर मात्र, नेसतं वस्त्र सोडून देण्याइतका विश्वास टाकतात! सहकारी तत्वाचा आश्रय घेऊन एकमेकांच्या कानी, काही हितगुजाच्या गोष्टी सांगतील तर शपथ! पण तेच कबजीसारख्या धूर्त, बिलंदर आणि इरसाल मांत्रिकाच्या परक्या कानाला लागून, जिभल्या चाटीत कमरेचे टाके ढिले करीत हिंडतील! फार काय, पण नवरा-बायकोमधील गुह्यागुह्य प्रकार, एकमेकांना एकमेकांची श्राद्धं-पक्ष जेवूनही जिथं कळणार नाहीत; तिथं ती कलुषासारखा कलिपुरुषांना, विशेष प्रयत्न न करताही इत्थंभूत - अगदी रोमनरोम कळत असतात! अर्थात जसं हे द्वैत आम्हा महाराष्ट्रीय कुटुंबात आहे, म्हणून तर कबजीसारख्या कंगाल परदेश्याचं वेळीअवेळी चांगलंच फावत असतं! (पाहून) ऑ! आली वाटत ही कबजीची संक्रांत! संकटं एकदम नाहीशी होत नसतात, ती ही अशी! (उठत) काय करायचं “बख्त पडे बांका! तो गधेकु कहेना काका!” नारायण आडला दारात! सामोरे गेल्याशिवाय, हा कुंभार राजा हलणार आहे थोडाच? राजांनीच चूक केली आणि कामधेनूच्या बदल्यात, हे घोड्याचं शिंगरू गळ्यात बांधून घेतलं! (सामोरा होत) यावं यावं! म्हटलं गोव्याची सफर पंतप्रधानांना कशी काय जाणवली?

**कबजी** : छान झाली! सुरेखच रंगली!

**जीवाजी** : भाग्यानीच पाह्यचं असतं सारं! मग येतांना एखादी गोमंतकी,

**कबजी** : राजांनी बरोबर आणली! आम्ही मात्र भरल्या समुद्रातून शंखही न घेता हात हालवीत आलो! मग मोती हो कुठले? बरोबर जर गोमुखातली नथनी असती तर --

**जिवाजी** : फांकडी नथ घालणारी नववधू धन्यांना लाभली असती! कारण, स्वाती नक्षत्राचा पाऊस जर समुद्रात पडला नसता, तर स्त्रियांच्या नथीतील टप्पोरे मोती, पुरुषांना आपल्या डोळ्यातील मोतीबिंदूनंच पाहायची पाळी आली असती!

**कबजी** : बरं, ते राहू द्या. पंत आपल्याला आता बऱ्याच गोष्टींचा खल करायचा आहे! तेव्हा आसपास .........

**जिवाजी** : चिटपाखरूसुद्धा इकडं फिरकण्याची धन्यांनी धास्ती घेऊ नये. या घरातले धूराचे लोटसुद्धा वाऱ्याबरोबर पळत नाहीत. कारण, इथं मूर्खत्व बळावण्याला, शहाणपणाची अक्कल, बेहिशेबीच जमा झालेली आहे! अहंकारानं अज्ञान वाढविणं, हाच इथला रोजखर्डा लिहावा लागतो! आणि कामविकार वाढवायला, या माझ्या लेखणीची ही, चक्रवाढीची पतपेढी कुणालाही मोकळी आहे! खाशा स्वारींचा कबिला, राजमाचीच्या राजवाड्यात! पण या जिवाजीपंताचा मुक्काम हा सातारच्या या वेताळ पेठेत! इथं हडळीलाही प्रवेश बंद! शिवाय, आमची एक राखी रुद्राक्षी, ही सालगुदस्त दम्यानं गेल्यापासून, या जिवाजीपंतांचा चारूदत्ताचा प्रपंच उध्वस्त झालेला आहे. तेव्हा आता धन्यानं बेलाशक कामाला लागावं! बोला, कोणत उघडून दप्तर?

**कबजी** : (पाहून) म्हणजे? ही तीन तीन दप्तरं, आहेत तरी कसली?

**जिवाजी** : उत्पत्ती, स्थिती आणि लय करण्याऱ्या या जिवाजीपंतांच्या कलमदानी खानदानी चाललेला लेखणीचा हा त्रिगुणावतार आहे! पहिलं हे दप्तर, माझ्या मूळ घराण्याच्या कारकुनी कलमकसाई कसबाचं! त्यानंच मी "इतिश्री कलमबोध!" हा समर्थांच्या दासबोधाला उत्तर म्हणून लिहीत आहे! वीस पेरांपैकी बाराच झाली!

**कबजी** : त्या ग्रंथाचे सध्या बाराच असू द्या! कारण आपल्याला लवकरच मराठेशाहीचे -

**जिवाजी** : (मध्येच) आलं लक्षांत. संभूराजांच्या नऊ वर्षांच्या कारकीर्दीत धन्याला नऊ बारा आणि तीन तेराचा उतारा करायचाय!

**कबजी** : पंत, काय मनकवडे आहात हो!

**जिवाजी** : (उपरोधी हास्यात) धन्यानंच मंत्रविद्येची दीक्षा दिली आहे तेव्हा कर्णपिशाच्चाचं मूर्तिमंत दर्शन आपल्या पायानं रोज घडत आहे! म्हटलं प्रधानजींनी फार वेळ पायी तिष्ठत बोलणं बरं नव्हे! गादीवर बसून सेवकाला हुकूम सोडावेत!

**कबजी** : (गादीवर बसतो) पंत, तुम्ही खूपच धूर्त-धोरणी आहात हो! कावेबाजपणानं आमच्या तोंडावर नाचणारे प्रश्न तुम्ही आधीच विचारून टाकता! पण त्यामुळं आम्ही निष्काळजी मनाचे ठरतो, त्याची काय वाट! (चोरून आणलेली मद्याची सुरई पुढं ठेवीत) पंत, अगोदर आपण हा माताजीचा, गोव्याहून तुमच्याचकरता खास आणलेला प्रसाद घेऊ या! आणा दोन पात्रं (तो आत गेल्यावर) फक्त प्यायचीच आणा!

(दोन रिकामे पेले घेऊन येतो)

**जिवाजी** : हो! कारण, फुलपात्र सध्या घरातच शिल्लक राहिलेलं नाही!

**कबजी** : (प्याल्यात मद्य ओतीत) तीही गैरसोय मंजुळेच्या कानी आम्ही आत्ताच घालून आलोय! घ्या. प्या ही खास फिरंग्यांनी आपल्या शृंगाराकरता तयार केलेली आहे! घ्या.

**जिवाजी** : (पितो) छान! आठवणीतून सेवकाला बालकाची माया लावलीत! (गात व पाया पडत) माझ्या हृदयीच्या वैकुंठेश्वरा, - 'माता कापी गळा! कोण सांभाळी विठ्ठला!'

**कबजी** : जिवबा, गोमंतकात संध्याकाळी सगळे लोक, साधारणतः इतक्याच जड वाणीनं बोलतात! त्यामुळं दिवसा फिरंग्याचा आणि रात्री दारूचा अम्मल – **जिवाजी** : स्वारींना विशेष दिसून आला असेल! पण घेतल्यानंतरची 'सोय' म्हणून जी आवश्यक होती, ती गैरसोईची झाली नाही ना? सारांश, "पचेल ते पोटी घ्यावे! दिसेल ते हातीं धरावे! मिळेल ते हातीं धरावे! मिळेल ते ते ढापीत जावे! गरजे पोटी!" कलमबोधात घालण्यासाठी मी ही आत्ताच नवीन ओवी केली. हा आम्हा एकराखी कलमदान्यांचा मनोधर्म! धन्याच्या बरोबर जर मी गोव्यात स्वारीत असतो, -

**कबजी** : (मध्येच) तर काय गोमंतकीय मदिराक्षी घेऊन आला असता? पण ते कसं शक्य झालं असत? इकडे कान करा! ( कानात सांगून झाल्यावर) मोठ्यांदा कुठं वाच्यता करू नका! अवघड जागी झालेलं, हे राजांचं दुखणं आहे!

**जिवाजी** : छान! म्हणजे शेवटी, 'हडळीला नाही नवरा' असंच घडलं कां हें पुन्हा "तुळशी माहात्म्य!"

**कबजी** : पंत, अहो आपल्या पथ्यावरच! राजांची ही साडेसाती आपल्याला लाभदायक – सुवर्णपादीच होणार!

**जिवाजी** : (दप्तर सोडून) मग तुळशीच्या पुनरागमनाप्रित्यर्थ, राजांच्या नावे किती रक्कम खर्चाची टाकू?

**कबजी** : राजाकडून मराठीराज्य जितक्या लवकर कर्जात बुडेल, तितक्या रक्कमा रोज खर्ची घालत रहा! मात्र खर्चाचे आकडे लहान सहान असता कामा नयेत! फार काय, उद्या संभूराजे तुळशीला घेऊन महारदऱ्याच्या खोऱ्यात वाघाच्या शिकारीला जाणार आहेत.

**जिवाजी** : मग हजारो होनांचा खर्च, राजांच्या नावे रोजखर्ड्यात खर्ची घालतो! आणि बुडीत रक्कम आपल्या जमेत लिहितो!

**कबजी** : ती तरच लिहाच! पण राजांच्या वाईटावर असलेल्या त्या माल सावंताला तुळशीच्या गुप्त शिकारीची बातमी पत्रानं कळवा! तुळशी ही राजाची वैरिण होईल, असा मजकूर लिहा!

**जिवाजी** : लिहितो! कळवतो! आत्ताच हे सारं करतो!

(पत्र लिहावयास बसतो)

**कबजी** : (वाचून) हे काय? पंत, पत्राखाली दस्तुर खुद्द माने?

**जिवाजी** : (आढ्यतेनं) दस्तूर खुद्द मानेच! अगदी मान्यांच्या हस्ताक्षरांत! धनी, तुम्ही आहात परके! मी पडलो नोकर! तेव्हा आपण आपले, "रामाय स्वस्ति, रावणाय स्वस्ति", असं तटस्थ राहिलेलं बरं! अहो, हा मराठ्यांच्या ब्याण्णव शहाण्णव कुळीचा वाद! त्यात शहाण्यांनी डोकं खुपसून उरस्फोड करून घ्या कशाला? पुन्हा तो मूळ धरायला? तेव्हा या उद्भवलेल्या प्रकरणात, तुम्ही-आम्ही उचल्याप्रमाणं कमरा बांधून आपापला स्वार्थ साधावा हे बरं! नाहीपेक्षा, उचल्याच्या धंद्याला बट्टा लागेल ना!

**कबजी** : वा! पंत, मुत्सद्दी डोकं आहे खरं तुमचं! बरं, आता दुसरं खर्चाचं प्रकरण कोणतं?

**जिवाजी** : (वह्या चाळून) दुसरं खर्चाचं प्रकरण म्हणजे! म्हणजे! हं, सांपडलं, हे दुर्गादास अकबर भेटीचं भिजत घोंगडं! आज राजांनी तब्बल दोन वर्ष, मराठी सैन्याच्या खर्चात दरमहा एक लाख रुपयांच्या तुटीत – खर्ची पडतंय! रोज त्यांच्या पाचशे रजपूत जवानांचा 'डाळ-बाटीचा भोजनखर्च' आणि तितक्याच घोड्यांचा चंदीचारा खर्च करावा लागतो! उपयोग म्हणाल, तर खातेबाकी शून्यच!

**कबजी** : कां बरं? पंत, असं बिनहिशोबी बोलू नका? जंजिऱ्याच्या सिद्दीला आंग्र्यांनी उठावणी दिली आणि शेवटी साबाजी-हिरोजींनी दुर्गादास राठोडांचं सैन्य कामी लावून दोघांचा पराभव केला. हिरोजी फरजंद आज उद्या त्यांची शरणागतीची पत्रं घेऊन आल्यावर कुणाच्या नावे खर्च लिहिणार?

**जिवाजी** : साबाजी-हिरोजी फरजंदच्या?

**कबजी** : आणि त्यांचं घेणार काय? खोपटातलं 'कण्या-माडग्याचं गाडगं' की भाकरी करायची काथवट?

**जिवाजी** : पण त्यांनी महाराजांच्या अनुज्ञेविना, जंजिऱ्यावर चाल केलीच कां? देशाचं हित, स्वामिनिष्ठेच्या नावावर जर म्हातारे सेवक पाहू लागले तर, तरुण विलासी राजांनं काय करावं? हिरोजीला स्वतःची मुलगी आणि साबाजीला आपली सून जिथं नीट नांदविता येत नाही, तिथं स्वदेशहिताच्या खर्चिक उठाठेवी कराव्यात कां? मोठी गंमत आहे!

**कबजी** : पंत, असं बोलून तुम्ही साबाजी-हिरोजीवर मोठा अन्याय करीत आहात! अहो, साबाजीनं तर आपल्या पोटच्या मुलाचा – दौलतराव सेनासागराचा – तो मोरे-मानेपक्षातून मोंगलाकडे जाऊ पाहाताच त्याला ठार केला! केवढी ही प्रखर देशनिष्ठ स्वामिभक्ती!

**जिवाजी** : (तुच्छतेनं) ह्यः! कसली प्रखर देशनिष्ठा! आणि कसली स्वामिभक्ती! धन्यांना साबाजीच्या पुत्रहत्येचं मोठं कौतुक वाटतं! पण मी तर म्हणतो की, आपली मुलगी आणि आपली सून, संभूराजांच्या शेजेबाजेच्या सेवेला निर्वेध राहावी, म्हणून साबाजी-हिरोजींनी एकदिलानं दौलतरावाच्या मृत्यूचं नाटक केलेलं उघड दिसतंय! तेव्हा त्यात देशहितापेक्षा, राजवल्लभ प्रीतीच्या स्वामिभक्तीची बेगडी किमयाच अधिक!

**कबजी** : जे काय असेल, ते तुळशी आणि राजेच जाणोत! निष्कारण या दोघांच्या लालझगड्यात आपण साठमारी घेत शिराच कशाला? बरं पंत, त्या चांदणीला आपलीशी करायला काय युक्ती करावी?

**जिवाजी** : हं-धन्यानं ते काम मोहिनी विद्येनंच उरकून घ्यावं. मलाही तसा एखादा 'अदृश्यसंबंध' ठेवण्याविषयीचा तोडगा असेल, तर तो जरूर शिकवावा! बंदा लिहून घ्यायला दोन्ही हातांनी बद्धपरिकर आहे!

**कबजी** : घ्या टिपून!

**जिवाजी** : (तिसरे दप्तर काढून) सांगा (लिहून घेण्याच्या तयारीत बसतो)

**कबजी** : स्त्रीच्या अदृश्यसंबंधाला मेलेल्या घुबडाची विष्टा काढून, ती निर्भेळ एरंडेलात मिसळून अंगाला लावावी. पंख उंबरठ्यात पुरावेत.

**जिवाजी** : कुणाच्या? धन्याच्या की माझ्या?

**कबजी** : कुणाच्याही? अगदी गाववेशीतसुद्धा! तसंच त्याच्या कपाळामध्ये सशाची चरबी घालून, सरड्याच्या शेपटीची वात करून ती पेटवावी आणि तिचं काजळ धरून दोन्ही डोळ्यांत अंजन केलं की मग अंधारात, 'अदृश्यसंबंधाचा उजेड' पडलाच म्हणून समजा! बरं पंत! फार वेळ झाला. राजांच्या शिकारीची तयारी आम्हाला करायची आहे! जातो आम्ही (कलुषा कबजी जातो)

**जिवाजी** : 'दिवसा उजेडीच घुबडाचे डोळे फुटतात,' या म्हणीचा अर्थ मला आज कळला आणि आंबे द्राक्षाच्या मोसमांत कावळ्यांना मुखरोग का होतो? हेही या कबजीच्या आजच्या भेटीवरून पुरतं लक्षात आलं! खऱ्याची अस्ताव्यस्त बेपर्वाई आणि खोट्याची काटेतोल सावधगिरी, ही कशी लेखणीनं सांभाळावी लागते, हे या कनोजाला माझं कलमच पुढं पटवून देईल! शहाजादा अकबराला, आलमगीराशी भांडायला लावून, या कबजीनंच त्याला दुर्गादाससह दक्षिणेत आणला, असा वीरमंत्र चांदणीकडून राणीसाहेबांच्या कानी बनावट पत्राच्या पुराव्यानिशी पुढं करतो. दस्तुरखुद्द कबजीच्याच सही शिक्क्याचा! काय विलक्षण दुनियेची रीत आहे पहा! काही लोक इतक्या हलक्या प्रकृतीचे असतात की, दुसऱ्याच्या पोटात समाधानाचे चार घास गेले, तरी त्यांच्या पोटात दुखू लागते! या पोटशूळाला औषध नाही! (जातो)

(पडदा)

---

<u>**प्रवेश पाचवा**</u>

(स्थळ: महारदऱ्यातील खोऱ्यातील जंगलरस्ता.

देहू दसरी हा पंचहत्यारी बनून शिकाऱ्याच्या वेशात प्रवेश करतो)

**देहू:**

लावणी

पंच हत्यारी झालो शिकारी ! देहू दसरी !
आलो महारदरी । शिकार केली नामी !
चांदणीनं सजविलं मला पंचहत्यारी ॥धृ०॥
बांधली ढाल पाठीला । धरलं वेठीला ।
हाती तलवार, बर्चीला धार ।
खुनी कट्यार कमरेला दिली, भालाईत वीर ॥१॥
पारध शिकारी भेद लई न्यारा ।
पारध घरोघरा । नारीचा नखरा ।
मर्दाचा घसरा । बळीचा दसरा ।
पाळत राखून सावज पाळीते ।
मुळी न मारते, नार खरीच,
शिकारी हो जी sss ॥२॥

चांदणीनं मला पंचहत्यारी बनविलं! आणि आज शिकारीला या महारदऱ्याच्या खोऱ्यात मुद्दाम पिटाळलं! कां, तर म्हणे संभूराजे तुळशीला बरोबर घेऊन कशी शिकार करतात, ती अगोदर पहा आणि नंतर मला शिकारीला न्या! पाठीवर हे ढालीचं ओझं कशाला? म्हणून विचारलं तर चांदणीनं ताबडतोब उत्तर दिलं, की लग्न झाल्यावर मी तुमच्या नावानं ढाली एवढं कुंकू लावणार आहे! कारण, बायकांना कुंकू हे ढालीसारखं संरक्षक, तसच त्यांना ते नवऱ्यासाठी सौभाग्याचं रक्षक! पण तुळसाबाईकडं पाहिलं, तर लढाईत दौलतराव मेला असूनही कपाळाचं कुंकू करवंदाएवढं काळंच आहे अजून! मला 'पारध' आणि 'शिकार' यातला फरक जो कळत नव्हता, तो या हत्यारी अवजारांच्या भारामुळं आज कळला! पुरुषांची पारध

करायला बायकांचे नयनबाण, नेहमीच सज्ज असतात; पण पुरुषाला शिकारी व्हावयाचं तर ढाल-तलवार, भाला-बर्ची, धनुष्य-बाण, भाता-कट्यार, कुकडी-कुऱ्हाड – अरे बाप रे! किती ही भयंकर हत्यारांची संख्या! सर्वांना हाती धरायचं तर रावण किंवा सहस्रार्जुनच माणसाला बनायला हवं! चला, हे असले विचार करण्यापेक्षा काही तरी शिकार ही करायलाच हवी! वाघाच्या शिकारीला पंचहत्यारी बनाव; तेव्हा ससा हाती लागला तर लागला! नाहीपेक्षा माशा मारीत चांदणीजवळ जावं लागणार! पण तिनं मला शिकार केल्याबिगर येऊ नका अस तीन-तीनदा बजावलेलं आहे आणि कानमंत्र असा दिला आहे की, शिकाऱ्याला दिलाचा दगड केल्याशिवाय शिकार मिळत नसते!

(पडद्यात “धावा महाराज, हरिणीच्या वाघीण लागली!”
शिकारी हुल्लड व वाघाच्या डरकाळ्या)

(पाहून) अरे बापरे! वाघाच्या डरकाळ्या खऱ्या अशा आजच मी पहिल्यानदा ऐकतोय! ताबूतात मोहरमचा वाघ बनून, मी कैक डरकाळ्या लोकांवर फोडल्या पण आज बेटा देहू! घाबरू नकोस! शिकाऱ्याला पळत्या सावजाबरोबर पळूनच शिकार गाठावी लागते! चला, वाघ पाठीशी लागल्याप्रमाणंच इथून अगोदर पळ काढायला हवा! (पळ काढणार तोच)

**हिरोजी** : (प्रवेश करून) थांब! कोण पळ काढतोय रे?

**देहू** : (घाबरून) मी पंचहत्यारी, देहूदसरी!

**हिरोजी** : आळंदबाबा शिकाऱ्याचा तालीमबाज पोऱ्या देहू, तो तूच होय?

**देहू** : जी! माझ्या वडिलांना तुम्ही ओळखत होता?

**हिरोजी** : अरे बाळ! आळंदबाबा आणि हा हिरोजी, -

**देहू** : कोण, फरजंदबाबा! या देहूचा अगोदर दंडवत घ्या!

**हिरोजी** : बाळ शिकारीत विजयी हो! तुझा पराक्रम देशाकरता उजळून चमकू दे! तुझ्या वडिलानं खूपच शिकारी बाणा गाजवला! देशाचं नाव राखून आपल्या नावाचा बोलबाला केला!

**देहू** : होय ना हिरूबाबा हे! आणि म्हणूनच मला शिवाजीराजा व्हावसं वाटतंय!

**हिरोजी** : नुसतं वाटतंय म्हणून नकोस! तर त्याप्रमाणं वागायला लाग. आज या घडीला अंगी बळ असणाऱ्या उमद्या पोरांचीच देशाला उणीव आहे! आपली मराठेशाही फंदफितुरीनं आतून बाहेरून सारी पोखरलीय!

(पडद्यात : धावा महाराज! हरिणीचा पाठलाग
वाघिणीनं केला! पूर्वोक्त गलबला आणि डरकाळ्या)

काय ऐकतोय मी? हा तर माझ्या तुळशीचा आवाज! देहू,

**देहू** : (हळूच) हिरुबाबा, जरा शांत व्हा! चला, आपण त्या चोरदरीचा आश्रय घेऊन राजाची शिकार पाहू या.

**हिरोजी** : (दातओठ खात व देहूबरोबर आत जात) तुळशे, घरबुडवे! काय चालवलं आहेस तू? (दोघे आत जातात. ते गेल्यावर माल सावंताच्या चार-सहा हस्तकांसह माने प्रवेश करतोअ)

**माने** : (सेवकांस उद्देशून) तो पहा! तुळशीसह संभ्या इकडंच येतोय! तेव्हा तिच्या या पत्रातील सूचनेप्रमाणं हे जाळं घ्या! (देतो) त्या झाडावर दबा धरून नीट बसा! वाघाशी झुंजत तो या झाडाखाली आला की, द्या हे जाळं टाकून त्याच्या अंगावर! मग मी आन तुळशी ऐनवेळी येतोच पुढं! समजलं! (ते जाऊ लागतात) ए गड्यांनो! इकडं या. सावध राहूनही जर तुमच्यापैकी कुणा एकाला त्या संभ्यानं पकडलं, तर "हिरोजी फरजंदाचे आम्ही ताबेदार नोकर," म्हणून बेलाशक नाव घ्या! कळलं! जा आपापल्या जागी.

(माने सर्वांना घीऊन आत जातो. ते गेल्यावर
शिकाऱ्याच्या वेषात संभाजी व तुळशी प्रवेश करतात)

**संभाजी** : तुळशी, वीराला परक्याशी आणि शिकाऱ्याला जंगली जनावराशी नेहमीच झुंज द्यावी लागते!

**तुळशी** : दोन्ही पराक्रम गाजविण्याचं राजांच्या अंगी सामर्थ्य आहे!

**संभाजी** : खरंय! पण यावेळी आमची स्तुती नको. तर प्रत्यक्ष कृतीच! कारण ही शिकार आहे! जा, आत! हा भाला घे आन करवंदीच्या जाळीत झोपलेल्या त्या शेरखाँला उठव हुल्लड करून! कालच त्यानं एका गरीब ब्राह्मणाची गाय मारून खाल्ली आहे! जवळ ही आमची तरवारही असू दे!

(भाला व तरवार घेऊन तुळशी आत जाते व परत येते.)

**तुळशी** : राया! सावजं दोन असून नर-मादीचं जोडपं, आपल्या पेट्याला खेळवीत जागं आहे!

**संभाजी** : असं आहे काय? तर मग फारच उत्तम! उठव हुल्लड करून त्या दोघांना! एकदमच आम्ही त्यांचा समाचार घेतो!

**तुळशी** : वा! आणि मग ही तुळशी काय, वृंदावनातील समजून माझी पूजा करणार? अहो, महाराज! आजची शिकार राजांची नाही, तर ती या तुळशीची! राजांनी मला शिकार खेळायला चल म्हणून बरोबर आणलंय! पाह्यला नव्हे! एक कोणती तरी शिकार मी आज एकटी साधणार आहे!

**संभाजी** : तुळशी, तू हिरोजी फरजंदाची हट्टी पोर! बेडर मुलगी! तेव्हा आमचं थोडंच तू ऐकणार? ठीक आहे. आज तुला जी शिकार करायची असेल ती बेधडक कर. वाटल्यास दोन्ही सावजं हाकून ती आमच्या अंगावर लोटण्याचं शिकारी कसब तू दाखवून आमची शिकार केलीस तरी चालेल! (तुळशी चरकते) का? तू अशी चरकलीस का?

**तुळशी** : नाही राया! ही तुळशी चरकली नाही; पण राजांच्या भीमशक्तीच्या बोलानं जरा हादरली आहे खरंच!

**संभाजी** : शिकार करणाऱ्यानं असं दचकता कामा नये! जा, आता उगीच वेळ गमावू नकोस! दिवे लागणीच्या आत आपल्याला गडावर जायला हवं. (तुळशी आत जाते व हुल्लड माजवून शिकारी रान उठविण्याचे ठरलेले संकेत आतून मोठ्यांदा बोलू लागते.)

**तुळशी** : (आतून) रायगडच्या रणमर्दा! सावध रहा! तयार असा! मादी पेट्याला घेऊन पळाली. भ्याली! वाघ बिथरला! शिकार मोहरा करून तुमच्या अंगावर येऊ पाहत्येय!

**संभाजी** : (वाघाच्या डरकाळ्यात पुढं होत होत) चल, ये इकडे! चल! चल आजाव पठ्ठे! हमभी तुम्हारे साथ लढनेके लिये यहाँ मौजूद, खडे हैं! आव, बेटा आव!

(संभाजी आत जातो न जातो तोच वाघ अंगावर यायला आणि वरून जाळं संभूराजांच्या अंगावर पडायला एकच गाठ पडणार; तोच हिरोजी फरजंद पुढं होत ते जाळं वरचेवर उचलून आपल्या हातात घेतो! राजे अंगावर चलून आलेल्या वाघाचा जबडा धरून

त्याला उभाच्या उभा दोन्ही हातांनी फाडून शिकार करतात)

**हिरोजी** : अरे, दगलबाज दरोडेखोरांनो! तुम्ही या सिंहाच्या छाव्याला असं गैरसावधपणानं जाळ्यात पकडू पाहता, पण हा हिरोजी फरजंद, (हातातली तुळशी तरवार उपसून त्यांना दाखविणार तोच हळूच मागाहून तुळशी येते व तरवार ती आपल्या हातात घेते. हिरोजी रागानं तिच्याकडे पाहातो)

**तुळशी** : होण? माझे बाबाच का महाराजांचे मारेकरी बनून इथं आले आहेत? हं, राया! ही घ्या आपली तरवार! शिकारीचं संकट साधून हा मझा बापच आज राजांच्या जिवावर उठला आणि कंबरेच्या या तुळशीनं, (देहू दसरी हळूच मागाहून येतो व तुळशीच्या हातची फरजंदाची तुळशी आपल्या हाती हिसकावून घेतो व हिरोजीला देतो.)

**देहू** : कंबरेच्या या तुळशीनं नव्हे, तर हिरुबाबांच्या या पोटच्या तुळशीनं! राजे, फरजंदाच्या पोटी ही तुळशी म्हणजे मोळापोटी केरसुणीच! थांबा. राजे मी हिच्या कटवाल्यालाच हजर करतो! (जातो)

**संभाजी** : फरजंद! काय आहे हा प्रकार?

**हिरोजी** : आईभवानीच न्याय निवाडा करो! संभूराजे थोरल्या राजांच्या संगतीत मराठ्यांचं राज्य, इरेनं पैदा केलं जरीपटक्याचा हत्ती मिरविला, जंजिऱ्याच्या सिद्दीनं जुलुमांचा जुलूस केला. आंग्र्या फिसादी झाला! मराठ्यांची आरमारी सत्ता बळकावू पाहताच हा हिरोजी, साबाजीच्या हाकेला धावून गेला! आंग्र्यासकट सिद्याची दाढी हलवून, त्या दोघांचा पाडाव केला! शरणागतीची ही इसार पावती, राजांच्या चरणी रुजू करतो! (पत्रे संभूराजांना देऊन) राजांना कोणी त्रास दिला, तर फरजंदाच्या कंबरेची ही तुळशी, प्राणावर तुळशीपत्र ठेवून, बिजलीबरोबर हिनंही विजय मिळविला! शहाण्णव कुळीचा हट्ट पुरविला! पण हट्टानं जातकुळीला बट्टा लावणाऱ्या या पोटच्या तुळशीनं तर आज फरजंदाच्या इमानालाच कलंक फासला! हिरोजीच्या कंबरेच्या तुळशीनं दुष्मनाचा काटा जिरविला. तिनंच आज पोरीचं नावरस सांगून राजाचा खुनी म्हणून माझा पुकारा केला! तेव्हा ही सुद्धा राजांनी आता खुशाल पायदळी तुडवून माझ्या मानेवर चालवावी!

(हिरोजी आपली तुळशी-तलवार संभाजीच्या पायावर ठेवणार् तोच-)

**संभाजी** : परत घ्या! तिची किंमत आम्ही जाणतो! घ्या ती (स्वतः ती परत देत) हिरोजी, आमची सारी मदार, तुम्हा जोडीवर आहे! आकाशाला झोळ येईल म्हाणून त्याचं छत, तणावानं कोणी ताणण्याचा प्रयत्न केला, तर तो जसा वेडेपणाचा ठरेल, तसाच तुम्हा ऐंशीवर्षांच्या अजोड नि अतूट राजनिष्ठांना-आबांच्या साबाजी-हिरोजी जोडीला राजद्रोही-राष्ट्रद्रोही ठरवणं हे महापापातच जमा होईल!

**देहू** : (पकडलेल्या फितुऱ्यास पुढं करीत) महाराज, हा पहा मान्यांचा म्होरक्या! याला जाळं टाकताना मी पाहिलं! हिरुबाबांच्या प्रसंगावधानामुळं राजांच्या जिवावरला प्रसंग टळला! हा पळून जात होता; पण मी झाडाला याला बांधून ठेविला! याला साक्ष घ्या मी पकडलेला वाघाचा बच्चा! (दाखवतो)

**संभाजी** : (त्याची मान धरून) बोल रे फितुऱ्या! खरं सांग, कोण आहेस तू?

**सेवक** : (पत्र पुढं करीत) मी ss मी  माल ममम,

**संभाजी** : (पत्र घेत) मी – मी – मामा काय करतो? मरायचंय? मर तर फितुऱ्या! (गळा दाबून त्याचा प्राण घेतो. पत्र वाचतो) आमच्या आड येणाऱ्यांची आम्ही अशीच वासलात लावतो! तुळशी, आपल्या शिकारीची गुप्त मसलत, मान्यांना कशी कळली? आणि या महारदऱ्याच्या खोऱ्यात मालसावंत पाचशे लोकानिशी आमच्यावर हल्ला करण्याच्या बेतात असूनही कबजीला खबर नसावी. यावरून आम्हाला आता सर्वांचा संशय येतोय! या पत्रानं आम्ही या प्रकरणाची पुरतीच शहानिशहा करीपर्यंत, तुळशी, तूही आमच्या जलमंदीरातील आरसेमहालाबाहेर कुठं जाता कामा नये! देहू, तुळशीवर तुझा सक्त पहारा असू दे! चल, (तुळशीला घेऊन जातो)

**देहू** : (सगळे गेल्यावर) बोल बजरंगबलीकी जय!

**अंक दुसरा समाप्त**

*****

**अंक तिसरा**

---

**<u>प्रवेश पहिला</u>**

(स्थळ: श्रीमच्छिवछत्रपती महाराजांची सती गेलेली पत्नी पुतळादेवीची समाधी. समाधीवर जरीपटका व भगवा झेंडा. दोहो बाजूस फर्जंद हात जोडून, महारष्ट्र गीत' मंगल वाद्यांच्या तालासुरात सर्वजण म्हणत आहेत. महाराणी येसूबाई हाताने पंचारती ओवाळत असून सगळे उभे आहेत. पूजाविधी झालेला असून, समाधी पुषपमालांनी सजविली आहे)

**श्री महाराष्ट्र गीत**

मंगल देशा !पवित्र देशा । महाराष्ट्र देशा ।
प्रणाम घ्यावा अमुचा हा श्री महाराष्ट्र देशा ।।धृ०॥
ध्येय जे तुझ्या अंतरी
निशाणावरी नाचते करी
जोडी इह-पर लोकांसी
व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी
जरी पटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा ॥
प्रणाम घ्यावा अमुचा हा श्रीमहाराष्ट्र देशा ॥१॥

**येसूबाई** : (सद्गतीत होत) साबाजीबाबा, पुतळाआई आपल्या प्रखर पतिनिष्ठेनं साध्वीपदास गेल्या. इच्छामरणानं देवरूप झाल्या. सई-आईनं तिकडच्या स्वारींना या सासूबाईच्या ओटीत घालून लहानाचं मोठं करायला सांगितलं. तेव्हा राजांनी सुबुद्धी चिंतण्याचं हेच आपल्या नव्या नवसाचं पवित्र मंदिर!

**साबाजी** : (गहिवरत) मुली, पुतळाआईची पुण्याईच पवित्र! माहेरच्या पालकर मोहित्यांच्या कुळाबरोबर, भोसल्यांच्या बेचाळीस पिढ्यांनाही पुण्यसंचयानं दान दिलं. शीलधनाचं भांडार कुबेरागत वाढविलं. या माऊलीच्या समाधिदर्शनाला आलं, म्हणजे मला आन या हिरुबाला,-

**हिरोजी** : (हुंदका अनावर होत) कैक गतगोष्टींचं स्मरण होतं अन ऊर भरून आनंदाचं आऊर सुखदुःखात मिसळतं! थोरल्या महाराजांच्या अपरोक्ष या माऊलीची पुण्याई, तुम्हा-आम्हा सर्वांना सात आठ महिनं लाभली. शत्रुंना चकविण्याकरिता आबासाहेबांनी आपल्या तोंडावळ्याची दहाबारा माणसं जी जवळ करून विश्वासात

घेतली होती तीच आज मासाहेब मी अन साबाजी, दोनंच करंट्याचं जिणं जगत मुर्दाडावानी गप्प-

(रडू लागतो)

**साबाजी** : (मध्येच धीर देत) हिरू! मुर्दाडावानी गप्प का म्हून? अरं तुम्ही आम्ही थोरल्या राजांच्या तोंडावळ्याची माणसं, जिजामातोश्री सर्जेराजांना म्हणायची, ' माझं शिवबाचं नाक गरुडासारखं अन दृष्टीही गरुडासारखीच.' 'हिरू, आठवतं ना तुला? गनिमांना पळवणारी त्यावेळे आपण सोंगं सजवली. ती वेड्या राजांच्या मर्दुमकीवर. आज आपल्याला यावख्ती महाराजांच्या वीरश्रीचा संचार, अंगी बाणवून घ्यायला व्होवा. गड्या, मरत्याला औषधापेक्षा परमामृताचा जसा उपयोग, तसाच तुला मला राजांच्या दिगंत पराक्रमाचा साठा, मान ताठ करून उपयोगात आणायला पाहिजे. वणव्याने पर्वत पेटल्यावरच, त्याच्या माथ्यावर हिरवळ उगवत असते. दोस्ता, धीर सोडायची ही जागा नव्हं, कळलं?

**येसूबाई** : खरंय! पुतळाआई माहेरी होत्या. मामंजींचं 'शुभावसान झालेलं' त्यांना खरं वाटलं नाही.  पण जेव्हा त्यांच्या अस्थी हाती लागल्या; तेव्हा आठ दहा महिनं लोटल्यावरही पुतळामाईनं सतीचं वाण इथं पुरं केलं.

**साबाजी** : आज आता आपल्या सगळ्यांना तेच सतीचं वाण, हाती घेऊन महाराष्ट्र-राजधर्माचं संरक्षण करायला हवं. मग त्याकरता पोटचं पोर आड आलं, तर त्यालाही -

**हिरोजी** : (मध्येच) तू कापून बाजूला केलास आणि बापाच्या कर्तव्याला जागलास? मी मात्र पोरीचा नंगानाच बघून शेळपटावानी माशा मारीत गप्प बसलोय, नाहीतर काय बिशाद होती रांडंची की, तिनं महाराष्ट्र जरिपटक्याच्या आणि भगव्या झेंड्याच्या टरकावून चिंध्या कराव्यात. राजांच्या अहंकारात कामक्रोधाचा उगम झाला. तो इंद्राला जसा उर्वशीच्या सहवासात नर्काच्या किड्याप्रमाणं सुखी वाटला, तसा राजांना तुळशीच्या संगतीत आनंद गवसलाय. मासाहेब. संभूमहादेवाच्या पिंडीवर विळखा घालून बसलेली ही नागिण,-

**येसूबाई** : हिरूबाबा शांत रहा. तुम्हाला मझी शपथ आहे. तुळसा तुम्हांला सांबाच्या पिंडीवर नागिणीसारखी चढलेली वाटते; पण ती आपल्या भोळ्या महाराजांना स्मशानवृक्षाची सावली दिसते. याला कोण काय करणार? सृष्टीचं हृदय भरून

अश्रुवृष्टी झली म्हणजे पाषाणहृदयी पर्वताच्या पोटातूनसुद्धा आपोआप जलाशयाचे पाट वाहू लागतात. म्हणून म्हणत्ये, आशा ही धीराची जन्मदात्री आई मानून, आपण स्वारींच्या चालू विलासाकडे संपूर्ण दुर्लक्ष करावं. कारण, ज्वालामुखीवर धान्य कोणी पेरावं? जेव्हा राजांनाच चांगल्या ठेचा बसतील, तेव्हा ते ताळ्यावर येतील.

**साबाजी** : खरंय! मुली, तुझंच म्हणणं विचारात घेणं भाग पडतं. संभूराजांशी नशिबानं बांधली गेलीस खरी, पण तुला महाराष्ट्र-राज्यलक्ष्मीची काळजी करायलाच हवी. आज तू आपल्या आईभवानीच्या देव्हाऱ्यातला हा सतीचा पदर, जरीपटक्याकरता पुढं केलास. सती गेलेल्या पुतळाराणीच्या पैठणीचा हा जरीचा पदर, मराठेशाहीच्या अब्रूला कर्णाच्या कवच्याप्रमाणं लाभला. सती साध्वीच्या समाधीसमोर महाराष्ट्र-धर्माला नवचैतन्य आणलंस. आज मी आणि हिरुबा, ऐंशी वर्षाचे जख्खड म्हातारेही, तरुणाप्रमाणं ताठ मान करून तरणे बांड झालो. महाराष्ट्र-राज्यधर्माचं जडजोखीम, मानेवर वाहून नेण्याइतकं अंगी बळ आलं. हिरुबा, संभूराजांच्या चाललेल्या लीलांकडे आपण कानडोळा करायचा पण राज्यरक्षणाची शर्थ करायची, सावलीवर हत्यार चालवायची. ही वेळ नव्हं.

**हिरोजी** : साऊबाबा! अरं हे कळतंया सारं पण वळतुया कुठं? राज्याचा धनी, बेफिकीर मनानं बेदर्द इष्काचे खेळ खेळतुया, आन माझं नशीब असं खडतर, की याला कारण माझी घर निघालेली पोर झालीया. विकाराच्या भरात राजांचा उन्माद, शृंगारविलासात तुळशी उद्दामपणानं वाढवतीया आणि संभूराजांनाही आपल्या इच्छेचा अनावरपणा अवेरनासा झालाया.

**येसूबाई** : हिरूबाबा, विषयांधाला वेड लागल्यावर तो सैरावैरा धावणारच, तेव्हा, तिकडच्या वर्तनाचा पुनरुच्चार तीनतीनदा करण्यात काय अर्थ! आपल्याला अगोदर राज्यावर आलेल्या संकटांशी झगडून महाराष्ट्र-धर्माचं संरक्षण करायंचय, हे लक्षात घ्यायला हवं.

**साबाजी** : संकटं कशी दिलजमाईनं एकी करून हात धुवून मागं लागलीयात पहा! चौफेर रान उठवल्यावानी झालंया. एकीकडे बादशहा नवरंग, तर दुसरीकडे गोव्याचा फिरंग्या, तिसरा मुंबईचा टोपीवाला, बगळ्यावानी मराठेशाही खायला टपून बसलाच आहे. तर चौथा जंजीऱ्याचा शिद्दी, आंग्र्याला अधूनमधून फूस देत मराठ्यांचं

आरमार बिघडवून खराबा चालविला आहे. मुली, सर्जेराजांची पुण्याई थोर, म्हणून तर दुर्गादासजी राठोडांना शहाजाद्या अकबराला दक्षिणेत घेऊन यायची बुद्धी सुचली.

**हिरोजी** : रजपूत लढवय्ये पाचशेवर त्यांनी बरोबर आणले. म्हणून तर या हिरोजीनं सिद्याची दाढी उपटून, आंग्र्यांना पाणी पाजलं. पण संभूराजांना त्याची गंधवार्ता कुठंय! पालीहून मुक्कामाची मजल दरमजल करीत, दुर्गादासजी राजांच्या भेटीला आले आहेत. आज उद्यां भेटीचा दिवस ठरला, तर नशीब म्हणायचं!

**येसूबाई** : हिरुबाबा, नशिबाचा खेळ, राजांना खेळू द्या. आपण आता देशाचं संरक्षण करण्याचा स्वतंत्र मार्ग शोधू या. सागराला पुष्कळ नद्या मिळाल्या, तरी तो सगळ्यांना सामावून घेतोच.

**साबाजी** : मुली, कशी बिनतोड उपमा दिलीस! शक्ति-युक्तीची कल्पना सुचविलीस! अहाहा! कामधेनूचं दुभतं हातीतोंडी आल्यावानी जीव आनंदला. हिरुबा, मनाचा दुबळेपणा सोड. राहू दे पोरीला बेअब्रूच्या गर्तेत. ठेव रागाला टांगता आणि घे पुतळाआईचा कौल. तू या रायगडच्या राणीला सांभाळ. मी बादशाहा नवरंगाचा पाठपुरावा करतो. मोंगली सैन्याला जेरीस आणतो. मुली, तूं मात्र या छोट्या आबासाहेबांना खिणभरही विसंबू नकोस. हा भोसले कुळाचा चिमुकला दिवा, पदराखाली नीट जतन कर. उमल्या कळीतला सुगंध जसा सुप्त राहातो, तसंच लहान बालकांतलं तारुण्य आणि शौर्य गुप्तच राहतं. बालराजे आजच्या महाराष्ट्र-धर्माचे श्रद्धास्थान जसे आहेत, तसेच ते उद्यांच्या मराठी रियासतीचे अढळस्थान आहेत.

**येसूबाई** : (शाहूस) बालराजे, या आपल्या आजोबांना नमस्कार करून दोघांचा आशीर्वाद घ्या बरं.

**शाहू** : वडिलांच्या आशिर्वादात विश्वाचा विजयच वास करीत असतो.

(नमस्कार करतो. प्रथम हिरोजी, नंतर साबाजी)

**हिरोजी** : अहाहा! आकाशाचं मोठेपण आकाशालाच. पृथ्वीचं वजनही पृथ्वीलाच. साऊबाबा, या मायलेकरांना जपण्याकरता, हा हिरोजी फरजंद हाडाची काडं करील. हजारो हत्तींच्या बळानं हा जीर्ण झालेला देह, जिताजागता ठेवून, यांचं मरेतो संरक्षण करीन. या प्रतिज्ञेला आई पुतळादेवीची ही समाधीच साक्ष राहील. (समाधीवर हात ठेवीत.)

**साबाजी** : अहाहा! मुली, माझा हिरू हा वचनांचा सच्चा सोबती, त्याच्या या प्रतिज्ञेनं मलाही संभूराजांना वाचविण्यासाठी दहा हजार नागांचं बळ, बादशाहा नवरंगाशी मुकाबला करायला सन्मुख झालंय. राजाचं रक्षण तुळजाभवानीच करील.

**येसूबाई** : (समाधी पुढं जाऊन वंदन करीत) आई पुतळादेवी! माते, आम्ही तुझी लेकरं तुला वंदन करीत आहोत. तुझी कृपादृष्टी आम्हा सर्वांवर पूर्ण असू दे. सासूबाईंनी तुमच्या ओटीत स्वारींना घातलंय, आज मी तुझ्या ओटीत हा माझा चिमणाराजा (शाहूला समाधीवर डोकं ठेवायला लावून) घातला आहे. आमच्यावर तुझं कृपाछत्र असू दे, तूच आम्हा सर्वांना कर्तव्याची जाणीव करून दिलीस. आज आमच्या चरित्राला नवीनच वळण लावलंस. आशीर्वादाचं पसायदान मला एवढंच दे म्हणजे झालं.

पद

मंगल सौभाग्या । सती पाया ।
वरिते मी ध्येया । कर्तव्य मोहवी ॥धृ०॥
कलह काल धुमसत वरि दैन्या ।
घालवी माते । व्यामोह हा रक्षि देशा ॥१॥
(सर्वजण समाधीला वंदन करतात)

---

**<u>प्रवेश दुसरा</u>**

(स्थळ: राजमाचीवरील देवडी. देहू दसरी शिकार करून बरोबर आणलेल्या वाघाच्या पेट्याला कुरवाळीत प्रवेश करतो)

**देहू** : मी मानलेला गुरू पंत कलमदाने काही थापा मारीत; पण कलमापेक्षा कमावलेली ताकदच भारी ठरते! काय पण अचाट शक्तीनं, संभू राजांनी वाघाचा जबडा दोन्ही हातांनी धरून त्याला उभायाच्या उभा फाडला. जीव घेऊन वाघीण पळाली म्हणून हा तिचा पेटा, भित्र्या मांजरावानी मझ्याजवळ आला. (त्याला

कुरवाळीत) बच्च्या, तू मला हत्यार न चालविताही शिकारी बनविलंस. आणि चांदणीलाही चकीत केलंस, नव्हे बेट्या पुरतं लाजविलंसही. तिनं मला पंचारतीनं ओवाळलं. आणि पंचप्राणाचा परमेश्वर म्हणून जवळ केलं. बस्स मला पंतांच्या कलमी किमयेची करामत, आता कशाला समजावून घ्यायला हवी. चांदणीच येत्येय. तिलाच विचारून काय ते करावं हे बरं.

**चांदणी** : (प्रवेश करीत) सख्या देहूराया..

**देहू** : काय म्हणत्येस प्रिये चांदणे! बोल कोणती आज्ञा आहे तुझी?

**चांदणी** : तू थोडासा लिहायला-वाचायला शिक.

**देहू** : शिकतो, दे धूळपाटी आणून. शिकण्याकरता कोणता पंतोजी मला तू पाहून ठेवला आहेस? शिवाजीमहाराजांना मलठणचा दादोजी कोंडदेव पंतोजी होता. आता तुझ्या देहू दप्तरीला शिवाजी बनविणारा गुरुजी -

**चांदणी** : (मध्येच) जिवाजी कलमदान्याच सध्या असू दे. कारण तू झालायस कोतवाल. तेव्हा त्याची अन् कलुषा कबजीची लफडी कुलंगडी आपल्याला बिनधोक समजाया व्होवीत.

**देहू** : हां हां चतुर साजणे, हे मात्र मला उमगलं नव्हतं. कबजीच्या कारस्थानी डोक्याची कवटी, कलमकसाई पंतांच्या लेखणीनं उलटीसुलटी पत्रं जिकडे तिकडे रवाना करीत आहे. तेव्हा अशावेळी जिवाजीपंताजवळच 'श्रीगणेशा' शिकायच्या निमित्तानं जवळ असलेलं बरं.

**चांदणी** : बरोबर बोललास. तेव्हा, राया! अगोदर तू आपली सही शिकून घे. नायतर कबजीबाबाप्रमाणं तुझी गत व्हायची. मराठेशाहीचा प्रधानजी म्हणून मिरवितो आणि मोडीतर राहोच; पण बाळबोध अंकलिपीबी त्या मुड्याला धड वाचता येत नाही.

(पडद्यात – कलुषा : पंत, तुमची ही पत्रलेखनाची तऱ्हा
आपल्या दोघांचाही जीव घेईल. समजलं)

**देहू** : चांदणे, ये इकडे, काहीतरी गुप्त मसलती, दोघांच्या अंगावर उलटलेल्या दिसतात.

**चांदणी** : तर मग ऐकूयाच दडूनश्यान. (दोघेही लपून ऐकतात. जिवाजीपंत व कलुषाकबजी परस्परांवर तावातावानं भांडत प्रवेश करितात.)

**कबजी** : पंत, तुमची ही पत्रलेखनाची तऱ्हा, आपल्या दोघांचाही जीव घेईल, समजलं?

**जिवाजी** : धन्याच्या बोलण्याचा काय जीव आहे? निव्वळ निर्जीव शंकाकुशंका.

**कबजी** : त्या कशा? समजा ऐनवेळेला हिरोजी फरजंद तिथं आला नसता तर महाराजांच्या जिवावर केवढा तो प्रसंग त्या पत्रामुळं आला होता  माहित आहे?

**जिवाजी** : माहित नसायला काय झालं? मी मुद्दामच तसं पत्र लिहून, तुम्हालाच मान्याकडं रवाना करायला लावल. यात माझी चूक कोणती? हं, आता धन्याचं कर्मच खोटं, म्हणून हिरोजी फरजंद ऐनवेळी तिथं उचकटला! नाहीपेक्षा, संभाजीचा वध होऊन कलुषा कबजी हा महाराष्ट्र राज्याचा कुलमुख्त्यार – अगदी अनभिषिक्त राजा झाला असता राजा! पण तुमचं बिलंदर नशिब. सध्या शिकंदर नाही, याला मी कुरकुरु नको? मग काय माझ्या कलमानं कानावर बसून स्वस्थ रडत राहावं? अहो, कनोजराज, मराठी राज्याचं धनीपण मिळवायचं तर अशी उलट सुलट पत्रोत्तरी गंगाजमनी ही करायलाच हवी. ती केवळ कनोजी सुगंधी अत्तरं नि पुषराज गुलकंद विकून मिळत नाही. तर तिच्याकरतां “काळी शाई” आणि “लाल रक्त” हे सांडावं लागतं. फुकट नाही येत राजेपण!

**कबजी** : पहा बुवा, मी आपला संभवनीय धोका, तुम्हाला बोलून दाखविला.

**जिवाजी** : (बेपर्वाईने) ऊं: असे कैक संभवनीय धोके, मी माझ्या कलमेश्वरीच्या गूढगुंजनांत गुंगवत ठेविले आहेत. कलमबोधात मी स्पष्टच लिहून ठेवलंय की,

माझ्या कलमेश्वरीची कुरकुर ।
पाहुनी चित्रगुप्तासि लागे हुरहुर ॥
इंद्र वैभवाची टुरटुर ।
जिवाजी कलम चालू न दे ॥

महाराज, या कलमानं कडू भोपळ्याचा दुध्या हलवा बनवून कैक कुमारिकांना धष्टपुष्ट बनविलंय. तर देहूसारख्या आडदांड करेली फिरविण्याऱ्या कडू कारल्याला चांदणीचं आमीष दाखवून गुलाबी रंग चालविलाय, आहात कुठं?

**कबजी** : (हात जोडीत) आपल्याच सेवेत. नावाचे आम्ही पंतप्रधान, पण तुम्हीच आमचे खरे हुक्मतपन्हा. पंत, तुमच्या कलमेश्वराला आमची शरणागती. पतिव्रतेला गंगाभागीरथी म्हटल्याबद्दल आम्हाला क्षमा करा.

**जिवाजी** : छे, छे, धन्यानं इतक्यातच शरणागतीची भाषा बोलू नये कारण, तुमचं आमचं इप्सित एक आहे. पृथ्वी एक; पण ध्रुव दोन, नदीचं तीर म्हटलं की, तिला दोन काठ आलेच. महिना एकच असतो, पण पक्ष दोन पडतात. फार काय, पण चांदणीकडं पाहतानासुद्धा आपण चेहरा एक ठेविला, तरीपण प्रत्येकाचे डोळे दोन, दृष्टी भिन्न, कान मात्र दोन दोनदा धरावेच लागणार.

**कबजी** : ते सारं आपण एकच अंतःकराणानं पाहू. पण अगोदर ती मिळवायच्या प्रयत्नात आपल्याला राह्यला हवं. कारण, सध्या राजांनी देहू दसरीला शहर कोतवालीचा अधिकार दिलेला आहे. चांदणी त्याच्यावर निहायत खूष आहे. म्हणून म्हणतो, सावज जरा भारी वाटतंय, चांदणी, नीच वातावरणात वाढलेली पोर आहे.

**जिवाजी** : पण तुळशी प्रमाणंच, चांदणीची लोभबुद्धी आणि विलासप्रीयता, अंगभूत असून, उसळ्यत्या भर ज्वानीत ती सळसळत्येय. तेव्हा 'द्रव्येन सर्वेवशा' हे तत्व धन्यानं लक्षात घ्यावं. शिवाय स्त्रीच्या मूलतत्वात 'योषां जारमिव प्रियम' ह्या टाळी.

(दोघेही मिस्किल हास्यात टाळ्या देतात)

**कबजी** : बरंय, पंत जातो मी. संभूराजांनी आता दुर्गादास राठोडांना शहाजादा अकबरासह मुलाखतिला बोलाविलंय. मुलाखत किल्ल्यावर. तेव्हा साबाजी शिरके, बैठकीला हजर राहण्याचा संभव आहे. त्यानं हिरोजी फरजंदाला, जंजिऱ्याच्या स्वारीवर पाठवून, आग्र्यास त्याला नेस्तनाबूत केलेलं आहे. तेव्हा मुलाखत महत्वाची असल्यामुळं मला जातीनं तिथं जहर राह्यलाच हवं. (ग़डबडीनं तो निघून जातो)

**जिवाजी** : पोटाची टिचभर खळगी भरण्याकरतां माणसाला अभिमान मारावा लागतो. सदगुणांची गळचेपी करावी लागते. तर लाजेचा जाहीर लिलाव पुकारावा लागतो. तरी पण तिची भूक, ही बकासुराचीच. विधात्यानं पोटाची लांबी-रुंदी बेतासबात ठेविली खरी पण त्याची बरी वाईट उपजीविका करण्याचं अदृष्य काम, हे मात्र माणसांच्या चार दोन इंची ललाट रेषेतच लिहून ठेवलंय. नाहीपेक्षा, अकलेच्या नावानं शून्य भोपळा असलेला हा ढेरपोट्या कबजी, आज मराठी राज्यच गिळंकृत करायला का टपून बसला असता? पण या बच्चंजीला हे माहीत नाही की, रिकामे वेळीचं भरलेलं पोट, हे स्वर्गातून थेट नर्काच्या तळावर जाऊन आदळल्याशिवाय राहणार नाही, हे निश्चित.

(जिवाजी जाणार तोच देहू व चांदणी प्रगट होऊन पुढं येतात)

**देहू** : पंत, मनाशी का होईनात; पण मोठ्यांदा खरं बोललात.

**जिवाजी** : कोण, देहू. (चांदणी नमस्कार करते) आणि ही शुक्राची चांदणी, छान. कुठं निघाला आहात जोडीनं? साखरपुडा आहे की काय?

**चांदणी** : साखरपुडा! आन् तो कशाला बा?

**देहू** : पंत, आमच्या लग्नाची बात राहू देत तशीच. अगोदर हे सांगा की, तुम्हांला कबजीबाबा कोणत्या पत्राविषयी काय सूचना देत होते?

**जिवाजी** : बेटा देहू, तसं तुला चारदोन पत्रांचं काही असतं, तर ते मी सांगितलंही असतं. पण या कबजीची सत्राशे कुलंगडी आणि अनंत भानगडी, त्या तुला कळवायच्या तर, -

**देहू** : हे तुमचं जर तर मला नको. साऱ्या त्या मला कळल्याच पाहिजेत. कारण, मी आता शहर कोतवाल झालो आहे.

**जिवाजी** : तेही माझ्या लेखणीच्या कसबामुळंच, मग ते खरं खोटं कसंही समज. पण हे भाग्य कलमेश्वरीच्या आशिर्वादानंच बरं! तेव्हा माझा शिष्य नगर कोतवाल बनलाय खरा; पण स्वतःचा दस्तुर, सहीनं करायला नको का? निशाणी अंगठेबहाद्दर काय कामाचे रे?

**देहू** : सही करायला यायला हवीच.

**चांदणी** : (अंगविक्षेपात) पंत, माझ्या या देहूरायाला सही करायला शिकवा की?

**जिवाजी** : (सकाम दृष्टीने पहात) ती तुला शिकविता येत नाही वाटतं? का तू सुद्धा निरक्षर-ढ-आहेस?

**चांदणी** : पंत, गाढवावानेच बोललांत नव्हं? निरक्षर का म्हून? पण मला ते तुमचं हेमाडपंती मोडी वाचन फारसं येत नाही. पंत, मलाबी आडवळणाची नागमोडी भाषा शिकवा की,

**देहू** : पंत, आम्हा दोघांनाही तुमच्या कलमाचं शिक्षण सुरु करा.

**चांदणी** : हां-हां, ठीक, जोडीनं शिक्षण, जोडीनं संसार.

**जिवाजी** : कुठं? तुमचं हे दुतोंडी शिक्षण माझ्या घरीच सुरू केलं, तर दाम दुप्पटीनं ते वाढत जाईल. आणि मग एका तोंडाची अनेक तोंडं दिसायला लागून, त्या सर्वांची

तोंडमिळवणी करता करता माझी लेखणी पुरतीच झिजून बोथट होईल त्याची काय वाट?

**देहू** : ती काळजी तुम्हांला. आम्ही विद्यार्थी, गुरुगृही वास हा करायलाच हवा.

**जिवाजी** : अरे ते खरं, परंतु तुम्हा दोघांच्या सहशिक्षणात गुरूला चळ लागला तर?

**चांदणी** : गुरुजी, तसं वंगाळ-संगाळ मनात आणू नका. मी आहे माझ्या आईवानी मोकळ्या मनाची. माझ्या आईला माझा 'बा' म्हणायचा की माजी कारभारीन लई गुणाची, पावणा येवो, रावळा येवो, मावळा येवो, कुनी बी येवो, कसंबी करो, कुनाचंबी मन मोडत नाय बगा.

**जिवाजी** : अरेच्या म्हणजे मुळातच गंगेचं पाणी मुरलेलं आहे तर. मूळहाड इंद्रजाळ पाहिलेलं दिसतंय. ठीक आहे. तुमच्या निकडीनं मी तशी सवड काढतो. पण ती मध्यान्हीची म्हणजे अपरात्रीची,

**देहू** : वा! आम्हा दोघांना सध्या रात्रीपेक्षा, अपरात्रीचीच वेळ हवीय. कारण, रात्री मला जावं लागतं जलमंदिरात.

**जिवाजी** : जलमंदिरात आणि ते कशाला बुवा!

**देहू** : संभूराजांनी तुळशीबाईंना जलमंदीरातल्या आरसे महालात,-

**जिवाजी** : (मध्येच) काय घटस्थापना करून नवरात्र सुरु केलं की काय?

**देहू** : पंत, हळू बोला, मी कोतवाल तिथला पहारेकरी आहे सध्या. तेव्हा तुमच्याकडं अपरात्रीच चांदणीला घेऊन मला येता येईल.

**चांदणी** : मासाहेबांना काळजीनं झोपच येत नाय, तवा त्या महालात झोपाया गेल्या, की मी कोतवालीत येईन. अन् मग,

**जिवाजी** : तुमच्या सहशिक्षणाचा जागता पहारा मी करणार. ठीक  ठीक.

**देहू** : पंत ठरलं तर मग. चांदणे, जातो मी जलमंदिरात पहाऱ्यावर, वेळ भरत आली.

**जिवाजी** : कुणाची?

**देहू** : (जाता जाता) ते आता संभूराजेच ठरविणार. (जातो)

**चांदणी** : पंत, राजमाचीच्या राजवाड्यावर मला पोचवायला येता का?

**जिवाजी** : चांदणे, मग राजवाड्यात आम्हा कारकुनांना विचारतो कोण? आम्ही नट नाही, बीट नाही. गवई नाही किंवा परद्रोही हेर सुद्धा नाही. तेव्हा राजवाड्यात

शिरायला तुझ्यासारख्या डौलदार छातीच्या सुंदर स्त्रीया, जर पुढं येऊन आम्हाला असा हातभार देत-

(हात धरून पाहातो. ती झिडकारीत.)

**चांदणी:** पंत, जरा लांबूनच बोलत बोलत संगं या.

(ठुमकत मुरडत निघून जाते)

**जिवाजी :** आलं लक्षात, अनोळखीच्या जागीच मदनाचे बाण, अचूक जाऊन भिडतात. ते काही खोटं नाही. तेव्हा प्रगतीची चाल, हातापायापेक्षा, अशा कामात डोक्यानंच जास्त करावी  लागते. नाहीतर गोष्टी फारच पुढं गेल्यावर मागाहून निस्तारायला कठीणच पडतं. शिवाय कधीकाळी उघडणारा दरवाजा उघडताना थोडीशी कुरकुर हा करायचाच!

(जातो)

---

**<u>प्रवेश तिसरा</u>**

(स्थळ: किल्लेसातारा अजिंक्यतारा. संभाजीराजांची खास मुलाखतीची बादशाही बैठक. संतापलेले संभूराजे, कलुषा कबजीसह प्रवेश करितात)

**संभाजी :** (हातात पत्र) एकजात सारे निमकहराम. इथूनतिथून तुम्ही सगळे बेईमान. धन्यावर विषप्रयोग करण्यापर्यंत कारस्थानाची मजल गेली. आम्ही आता कुठपर्यंत धीर धरणार? शिकारीला गेलो तरी यांच्या कारस्थानाचं जाळं आमच्यावर आहेच. कबजी, हा पहा प्रत्यक्ष पुरावा. (पत्र देतो) वाचा हे आणि बोला काय ते? हीच का तुमची राज्यव्यवस्था? बोला, आम्ही आता किती शांती धरायची? तुम्हा कारभाऱ्यांच्या कारस्थानाची खबर, प्रथम आम्हाला दादजी रघुनाथ देशपांड्यांनी दिली; पण आम्ही तिकडे लक्ष दिलं नाही. महिना दोन महिने कारस्थान्यांच्या घरी चौक्या बसविल्या. तुमच्या सांगण्यावरून आम्ही परवा परत उठविल्या. दरख परत ज्याचे त्यास चलविले. म्हटलं, झाली चूक सुधारतील पुढं. पण नीच ते नीचच. सत्तेसाठी हपापलेली जुनी थेरडी ही, कधी सरळ होणार नाहीत. खोडकीच मोडून त्यांना कायमचं सरळ केलं पाहिजे. नाहीतर आबासाहेबांच्या पाठोपाठ आम्हाला तुम्ही पाठवावयाचे. वाचलंत हे पत्र.

**कबजी:** महाराज, मान्यांना हे पत्र लिहितांना तुळशीबाईच्या नावाचा निष्कारण गैरवापर झालेला दिसतो. मी याची चौकशी करून काय ते राजांना लवकर कळवितो. तथापि हा सारा संकटाचा वर्षाव परस्पर बाहेरून येत असावा. मला वाटतं, मोरे, माने आणि गणोजी शिरके सध्या महाराजांच्या वाईटावर आहेत. तेव्हा त्यांचे काटे दूर केल्याशिवाय,-

**संभाजी** : त्यांचीच – त्यांचीच आम्ही ही पूर्वतयारी चालविली आहे. हरामखोर हे त्रिकूट, आमच्यापासून अलग राहून आमच्या जिवावरली ही संकटं इतक्या बेगुमानपणे आमच्यशी अंगलगट करायला इथं येतात कशी? अर्थात त्याला सहाय्य करणारं तुमचंच हे नवं कारभारी मंडळ. या मंडळातले बुढ्ढे जांबुवंत, मासाहेबांना आम्ही भिंतीत चिणून मारल्यापासून आमच्या विरुद्ध कल्पनातीत गेले आहेत, हे आम्ही पूर्णपणे जाणून आहोत. शहजादा अकबर ज्येष्ठात पाली मुक्कामी आल्यापासून या थेरड्यांच्या कारस्थानांचा रंग चालला असून, आता तर तो अलिकडं जास्तच भडक व्हायला लागला आहे. आम्ही जरा हडसून खडसून त्यांना विचारलं की, ह्यँ ह्यँ ह्यँ करून बोळकं वासावं आणि चेहऱ्यावर उदासीनतेचा मुलामा चढवून झट्कन नामनिराळं व्हावं. तेव्हा आता यांनाही एकदम जगातून नाहीसं केलं पाहिजे मग – (हुजऱ्या येतो) कोण?

**हुजऱ्या** : (वंदन करून खलिता देतो)

**संभाजी** : (वाचून) जा. दे त्यांना आत पाठवून (तो जातो) कबजी आता या सगळ्या कारस्थानांचा उलगडा आपोआपच होईल. कारण, खुद्द शहाजादा अकबर आणि दुर्गादास राठोड, हे आमच्या मुलाखतीला साबाजी शिरक्यासह आले आहेत. तेव्हा तुम्ही इथं थांबू नका. जलमंदिरातील आरसे महालात जा. तुळशीची प्रकृती बरी नसल्याची खबर मघाशी आम्हाला मंजुळेकडून आली आहे. तेव्हा राजवैद्यासह तुम्ही तेथेच थांबा. आम्ही ही मुलाखत संपवून येतोच तिथं!

**कबजी** : जशी राजांची आज्ञा. (जातो. कबजी गेल्यावर उलट बाजूनं शहाजादा अकबर, दुर्गादास राठोड आणि साबाजी शिरके येतात.)

**संभाजी** : आयीए शहाजादे साहिबा आयीए.

**अकबर** : आदाब अर्ज (कुर्निसात करतो.)

**संभाजी** : आदाब बंदगी.

**दुर्गादास** : राजाजी प्रणाम.

**संभाजी** : दुर्गादासजी, मराठ्यांच्या राजाचा तुम्हाला स्नेहपूर्ण दंडवत.

**साबाजी** : संभूराजे, साबाजीचा हा मुजरा.

(नंतर सर्व आपापल्या आसनावर बसतात)

**अकबर** : छत्रपती संभाजीमहाराज. खुदा हाफिज. खुदा हाफिज. राजेसाहिबा, आपके मुलूखमे आकर और आपकी अज़्राहे-दोस्तीकी मेहमानी लेकर आज हमे करीब चार महिने हुए. लेकिन, आफसोसकी बात, के आपकी मुलाकात हमें मिलनाभी बडा मुष्कीलका काम हो गया था.

**संभाजी** : शहाजादेसाहेब. कसूर माफ कीजिये. लेकीन आपका आदाब, आतेही आपकी अज़्राहे-खानगी अलंग नौबतसे सब बरदास्ती तौरसे अछी तऱ्हा रखने का हुक्म फरमया था. और हिरोजी फरजंद के साथ आपको कुछ जवाहर गेहना नजराणोंसे भेजे थे वे शायद आपको मिलेंही होंगे. अच्छा. अब हमें यहॉ आने को क्यों देरी हुयी, वे सव आप जानते भी हो. फिसादीओंको पुरापुर बंदोबस्त करना, अब हम शुरू करना चाहते हैं.

**अकबर** : बेशक, ऐसा करनाही मुमकीन है. क्योंकी सब फिसादिओंको अच्छी तऱ्हा सजा मिलनाही जरूर है. ताकी फिसादी गुन्हे राजपाटमे कभी न होवें. हमारा यहाँ आतेही आपकी कारभारी मंडली हमारेसाथ बातचीत करने लगी. उन सबों का आशय यही है, के यह सब मरेठीराज हम आपको याने खुद मेरेको देएंगे. सिर्फ तुमने कुछ हमारे राजाराम महाराज को थोडासा मुलुख अलाहिदा तोडकर देना चाहिये. राजाजी, यह देखो इन सबों की मसलत की कागजाद. (पत्राची पुडकी स्वाधीन करतो.) खैर, अब हम आपसे मुलाखत के लिये क्यों आये हैं उसीकी जरा मसलत कीजिये. यह हमारे दुर्गादासजी राठोड, -

**संभाजी** : (हातानं नमस्कार करीत) आमच्या आबासाहेबांचे खास मित्र.

**अकबर** : जी हाँ. जोधपूरसे पांचसो उमदे रजपूत जवान लेकर, मेरेसाथ इधर आये हैं. इधर भी इन्होनें कुछ लढनेवाले आदमी पल्लू धरे हैं.

**दुर्गादास** : राजाजी, आपल्या वडिलांचे दोस्त जोधपूरचे महाराणे जसवंतसिंग आलमगीराच्या चाकरीत काबूलकडे वारले. आलमगीरानं त्यांच्या लहानग्या मुलांना पकडून बाटविण्याचा मनसुबा केला. आमचा मारवाड उध्वस्त केला. ठकूरजींची

मंदीरं जमीनदोस्त केली. हिंदूवर जिझिया लादला. आम्ही राठोडांनी धर्मासाठी, देशासाठी तळहातावर शिरं घेतली. दोन तीन वर्षे बादशाही सैन्याशी झुंज दिली. शहाजादे अकबरसाहेब आमच्याकडे आले. ते आणि मी आपली कीर्ती ऐकून दख्खनमधे आलो. आपण शिवाजी राजांचे पुत्र, त्यांचंच व्रत पुढं चालविलं पाहिजे. आपण रजपूत मराठे मिळून, या शहाजाद्यांना दिल्लीच्या तख्खतावर बसवू. ते आपल्याच सल्ल्यानं कारभार करती.

**अकबर** : राजसाहिबा, सिर्फ आप मुझे दिल्लीका तक्तनशीन बादशहा करीये. हम सिर्फ बादशहाही रहेंगे और दौलत की सलतनका कारोबार तो आपही देखा करो. अब फुजूल देरी न करो, यही मै आपसे आखरी बार बयान कर रहा हूं.

**दुर्गादास** : बरोबर. राजाजी, आता लवकरच या कामाला लागलं पाहिजे. कारण राजपुतान्यातील मोहीम नुकतीच संपली. महाराजा जयसिंगानं यांच्या वडिलांशी तह केला.

**अकबर** : और सुनिये राजेसाहिबा. हमारे भाई शहाजादे मुआझम और आझम मेरे पीछे धुंडतेही बऱ्हाणपूरतक आ पहुंचे हैं.

**दुर्गादास** : आणि यांच्या वडिलांचा म्हणजे औरंबजेब बादशहाचा मुक्कामही अजमेराहून हलल्याची आजच खबर आहे. कदाचित महिन्या दोन महिन्यांत सर्व मोंगल सैन्य दख्खनचा कोंडमारा करील.

**संभाजी** : करू द्या. रजपुतांनी तीन वर्षे अरवलीच्या खिंडीत मोंगलांना खडे चारलेत आणि आम्ही मराठ्यांनी काही हातात बांगड्या भरल्या नाहीत. येऊ द्या. आबासाहेबांच्या आशीर्वादानं या मनगटांत जोर आहे, तो मोंगलांना दाखवूच.

**साबाजी** : (आनंदून) ऐकलंत दुर्गादासजी. जंजिऱ्याच्या स्वारीत मी आपल्याला संभूराजांच्या मनगटी सामर्थ्याचा निर्वाळा दिला होता. तो आज ऐकून आम्हा सर्जेराजांच्या वृद्ध सवंगड्यांचं दिल, हर्षभरानं फुलून निघालं, अहाहा! अमृताची चव अमृतासारखीच, ज्ञानाला ज्ञानाचीच उपमा.

**दुर्गादास** : खरंय, मेघ एकट्या चातकाकरता वर्षाव करेत नाही; तर जगाला जीवन मिळावं म्हणून. अमृतात साखर मिसळून का गोडी आणायची असते?

**साबाजी** : नाही. पण चातकाला चार थेंबच पुरे होतात. चंद्रप्रकाशापासून चकोराला अमृत पिता येतंच. राजे, आत्तांच्या बोलण्यावरून आम्ही तुम्हांला कटिखांदी

खेळविल्याचं सार्थक वाटलं. जिवाची हैराणी जी चालली आहे, ती- आज थांबली. थोरल्या राजांच्या आठवणीनं छातीचं बांध फुटून डोळ्यांवाटे त्यांच्या पराक्रमाचे पाट वाहू लागले. आज तीच रग, सर्जेराजांच्या छाव्याच्या मनगटातली बघून आमचंही म्हातार रक्त सळसळू लागलं. ओशाळलेलं मन, आशाळभूतपणानं शौर्याच्या घोडदौडीत निघालं. म्हातारपण विसरलो आणि तरुणाप्रमाणं भरीव छातीनं ताठ झालो. वाकायचंही विसरलो.

**संभाजी** : शहाजादे साहिबा, आप कुछ फिकर न कीजिए. आप दिल्लीके तक्तनशीन जल्दभी हुएंगे. समझे.

**अकबर** : (कुर्निसात) वा! हुजुरके साल जाबाकेलिये हम इंतजार हुये थे. खुदाहाफिज, राजाजी अब, यह जहाँपन्हाँ को..

**संभाजी** : हे जहाँपन्हाँ कोण?

**अकबर** : राजेसाहिबा, इस दख्खनमें आतेवख्त मैनें यह एक नया किताब, ..

**संभाजी** : वा! दुर्गादासजी, शहाजाद्यांची हौस तर पृथ्वीपतीचीच वाटते. अन्नान्नदशा होऊन देशांतरापर्यंत पाळी आलेल्यांनी, या शहाजाद्यांची हौस उसनवारीनं अंगी बाणवून घ्यायला हवी. पण आम्ही दख्खनचे वीर बेगडी श्रीमंती आणि उधारी मोठेपणाला फसत नाही, हा आमचा मोठा दुर्गुणच म्हणावयाचा.

**अकबर** : खैर, कुछभी आप मानो. लेकिन मैं बहोतसा दिलदार और प्यार का प्यास, मुहब्बत का बडा शौकीन,-

**संभाजी** : (हसत) हो हो, दिसतंयच ते (स्वगत) हा बादशाही हुक्का बूड नसल्यामुळं कुठं तरी कलंडण्याच्या विचारात आहे. आणि कोंदलेल्या हुक्क्याप्रमाणं, याच्यातही पाण्याचा खडबडाट झालेला दिसतोय; नाहीतर हा जातीचा मोंगल रजपुतांचा आश्रय घेऊन इथं का धडपडत आला असता? (उघड) बरंय दुर्गादासजी, आणखी काय आपला सल्ला आहे?

**दुर्गादास** : राजेसाहेब, आमच्या सैनिकांची, जंजीऱ्याच्या आणि गोव्याच्या मोहीमेपायी हकनाक दीड दोन वर्षे गेली. आज आलमगीर आपल्या अफाट सैन्यासह मराठी मुलुखात उतरला आहे. त्यानं चारी बाजूनं पुरतीच नाकेबंदी केली. अशा वेळी या तुटपुंज्या लोकांशी झगडत बसण्यात काय हशील? अजून माझं ऐका. आलमगीराच्या सैन्याची आपण फळी फोडू. राजपुतान्यात जाऊ. तेथून आमचे

उमदे राठोड वीर मदतीला घेऊ. आणि दिल्लीच्या उघड्या पडलेल्या तक्तावर अकबरास बसवू. म्हणजे मग सारं हिंदुस्थान तुमचं नि आमचं झालंच म्हणून समजा.

**संभाजी** : आणि तोपर्यंत आलमगीरानं आमचा मुलुख जाळून खाक करावा, आणि आमचं राज्य संपूर्ण घशात घालावं. वा! ठीक सल्ला. दुर्गादासजी, आपला हा सल्ला आम्हांस बदसल्ला वाटतो. मंजूर करता येत नाही, माफ करा. आपल्या नावलौकीकामुळं आणि विशेष म्हणजे आबासाहेबांच्या दोस्तीमुळं, या अंजाम बच्चाला आम्ही आश्रय दिला, म्हणून तर आमच्या घराला ही आग लागली आहे. तेव्हा आधी ती आम्हाला विझवू द्या, नंतर आमच्या मदतीची पुढची बात. आल्यासारखं जरा दमानं घ्याल, तरच पुढच्या सर्व काही गोष्टी वचनाप्रमाणं होतील. पहा तर खरं, आमचा हा मराठी गनिमी कावा कसा आता ऐन रंगात येत चाललाय तो? या कोकणच्या कातळावर शहा आलमची दाढी धरून त्याला डोकं फोडायला लावतो बघा.

**अकबर** : लेकीन राजेसाहिबा, आपने हमारी सब फौज जंजीरा और गोवाके जंगपर बरबाद करके,-

**संभाजी** : (संतापून) खामोष. दुर्गादासजी, या तुमच्या उतावळ्या बादशाहाला गप्प बसायला सांगा. म्हणे जंजीऱ्याच्या आणि गोव्याच्या पायी माझं सैन्य खर्च पडलं. पण दरमहा लाख रुपये प्रमाणं आज तब्बल दोन वर्षे याच्या बादशाही सैन्याचा जो आम्ही खर्च चालविला, अलिज्याहा कारभार केला, तो काय याचा बाप भरून देणार. उल्लु नाही तर, दुर्गादासजी, आपण सूज्ञ आहात. तेव्हा या प्रसंगी आपणंच इथं राहून आपली चालू मदत आम्हा मराठ्यांना पुरवावी हे उत्तम.

**अकबर** : देखिये दुर्गामहाराज, दिलीका तक्तनशीन मोगल बादशहा, मुझे करना हो, तो अभीके अभी जल्दीभी करो. नहीं तो मै मक्का-मदीना जानेका इरादा करता हूं.

**संभाजी** : फार उत्तम. दुर्गादासजी, रूपाजी भोसले आणि मानसिंग मोरे, यांना आत्ताच्या आत्ता शहाजाद्याबरोबर देऊन ही पीडा मक्केला पोहोचवा. मक्केला जा नाहीतर इराणात कब्र करा. पण...

**दुर्गादास** : राजाजी, शहाजाद्यांची व्यवस्था आपण म्हणता, त्याप्रमाणे मीच आता करतो. आपल्याला यावेळी मला जर काही मदत करता आली, तर तसा मी प्रयत्न करणार आहे. आपण निश्चिंत असा, मी करतो सर्व व्यवस्था. चलिये, शहाजादे

**अकबर** : (दुर्गादासजींना उद्देशून) जहँपन्हाँ कहीये, महाराज,

(घाईनं निघून जातो.)

**संबाजी** : साबाजी, दुर्गादास राठोडजींना उबहत मंझीलतीनं 'अलीशानी' निरोप द्या. आबासाहेबांचे हे मित्र आम्हाला पित्याइतकेच शिरसावंद्य आहेत. सबब, अलंग नौबतीसह आजच्या आमच्या मुलाखतीचा आखरचौघडा झडू द्या. या आता (संभाजी निघून जातो)

**साबाजी** : चला, दुर्गादासजी! झालेली मुलाखत राजांच्या अलिज्याहा कारभारात संपली. शत्रूच्या सैन्यापासून स्वतःचे राज्य संभाळता येत नाही. हे मराठेशाहीचं दुर्दैव, दुसरं काय? (साबाजी दुर्गादास आत जातात.)

---

**<u>प्रवेश चवथा</u>**

(स्थळ: जलमंदिरापुढील बाग. चांदणी देहूच्या चिंतनात,
लावणी म्हणत प्रवेश करते)

**चांदणी** :

(लावणी)

खट-नट, नट-खट । देहू रायाचं ।
चालणं मोठ्या ऐटीचं । बोलणं-बघणं दौलाचं ।
पैलवानी छाती भरदार । दंड पीळदार, मर्द शिलेदार ।
जसा बाई मदनाचा चोर । इष्काचा माझा दिलदार ॥१॥
चांदणी शुक्र ताऱ्यांत । मदन नेत्रांत ! लाज पदरांत ! ।
ऊरीची सळसळती साद । नवथर, सुकुमार ।
नौतीला आलाया बहर ॥२॥

माझा देहूराया, मायंदळा भोळा-भाबडा पैलवान गडी! कुस्तीचं डावपेच तो खेळतो; पन पाजी मानसाचं पाचपेच, गड्याला उमगत न्हाईच. तालमीतल्या आखड्यात लोळला म्हनू त्येचा देह जिता-जागता या चांदणीला लाभला. नायतर जर का देहूच्या भजनी मंडळात तो विठ्ठल विठ्ठल म्हणू टाळ कुटत राहाता तर तुकारामबोवावानी त्यो विमानात बसून स्वर्गात गेला असता. पण ही चांदणी, जिजाबाईवानी त्याची लग्नाची पाठराखणी अस्तुरी झालीया, म्हून आज देहू दप्तरी कोतवालीचा मालक बनूनश्यान दरारा दावतुया. नायतर त्या ढेरपोट्या कबजीबाबानं कवाच त्याचे कबाब करूनश्यान मसणवटीतल्या मुडदेफरास जिवाजी कलमदान्यासंगं खात ढेकरा दिल्या असत्या. पण ही चांदणी आता त्या दोघांची कंदोरी करूनश्यान माझ्या देहूराजाला दोन बोकडांचा बळी द्यायचा खंडोबाला नवस म्यां केलाय!

(डोक्याला टापशी बांधलेल्या दर्भाच्या वेषात जिवाजी प्रवेश करतो)

**जिवाजी** : पांडुरंग, पांडुरंग.

**चांदणी** : (पाहून) आँ! कोण-जिवाजीबाबा, कुणाला पोचवायला गेला होतास? का तुम्हालाच मसणात जायचंय.

**जिवाजी** : मेलं नाही, पण मरू घातलय. राजांची खरी म्हणजे संभू महाराजांची शय्यारक्षा तुळशी बेमार पडली आहे. बेटा, हाडीमासी खिळलेल्या सुकुमार देहातल्या कामज्वरात कुपथ्य केलं की मरणाला कोण वाचविणार? त्याला वेळेवर काडेचिरायतीचा काढाच घ्यायला हवा.

**चांदणी** : मग तुळशीच्या काढ्याबरोबर, नव्हं ती उलथून जायच्या अगोदरच तुम्ही डोक्याला ही टापशी बांधलीया. पंत, अक्ष्क्षी मुडदे फरासावानी शोभतायसा.

**जिवाजी** : चांदणे, अग न्हाणोलीच्या मखराला केळीचेच खुंट शोभून दिसतात. त्याला काटेरी बाभळीचं कुंपण घालून नवराबायकोला मधुचंद्र साजरा करता येत नाही.

**चांदणी** : बाबा, मला एक सबूदबी तुमच्या बोलण्यातला कळला नाय बगा.

**जिवाजी** : बेटा चंदू, तू अजून कुमारिका आहेस. तुझं लग्न व्हावयाचंय. तेव्हा, फुलबागेला फुलमाळीच बघावा लागतो. तिथं घणाचा घाव मारणारा घिसाडी काय कामाचा बरं.

**चांदणी** : खरंय. झालरीला मोतीच शोभून दिसतात. तसा माझा मोतीराया, म्याँ देहूरायाला निवडलाया.

**जिवाजी** : छान. पण त्या मोती दाण्याला उजाळा देणारा एखादा चांगलासा श्रीमंत सराफसुद्धा तुला नजरेत घ्यावा हवा.

**चांदणी** : म्हणजे वो कसं?

**जिवाजी** : म्हणजे असं की, ? हां हां. सध्याचं आपलं हे संभूराजाचं तुळशीवरचं प्रेमच पहा. दर्यासागर दौलतीरावाशी लग्न करून, तिला जो शृंगार-विलास करता आला नाही; तो आज जलमंदिरातल्या ऐने महालात तिनं चालू ठेवलाच की नाही; कोणत्याही तरुण कुमारिकेनं आपलं तारुण्य, लग्न करून वाया जाऊ देता कामा नये. हा तुळशीच्या राजेशाही शृंगारभोगाचा दिव्यसंदेश. म्हणून म्हणतो, तुला जर देहूशी संसार थाटून विलासी जीवन घ्यायचं असेल, तर-तर.

**चांदणी** : (आतूर होते) तर कशी वागू? सांगा बरं माझ्या जिवूदादा.

**जिवाजी** : आहे, या वहात्या गंगेत चांगले हात धुवून घे.

**चांदणी** : (लाडात येत) जिवूबाबा, त्ये कसं काय धुवून घेत्यात? सांगा ना वाईच.

**जिवाजी** : सांगतो. नव्हे, नाव घेऊनच आता बोलतो. आणि सावध राहाण्याचा इशारा देतो. अग, महाराजांच्या गळ्यातला ताईत, तो गंडा-गणेश कनोजी कबजा आहे ना तो तुझ्या पाळतीवर! त्याला तू आवडलीस.

**चांदणी** : मग त्याला मी वाईच झुलवूत ठेवू म्हणता?

**जिवाजी** : ठेव. चांगला त्याचा झुलता मनोरा. सुंदर नखऱ्यानं उभा कर आणि मराठेशाहीची राजभुषणं तो लंपास करीत आहे, ती सारी तुझ्या पदरात पाडून घे. हे बघ, लक्ष्मी ही पुराण-पुरुषाची चंचल स्त्री आहे.

**चांदणी** : आपल्या तुळशीवाणी उठवळ कां?

**जिवाजी** : हो, अग, बायकांनी भटक-मटक वागल्याशिवाय, इंद्राचा महाल संसारात सजत नसतो. लग्न करणं काय, चारचौघं करतात म्हणून करायचं झालं. कारण, लग्नाचं वचन देत, हातात हात घालून फिरणारी जोडी, लग्न झाल्यावर एकमेकाच्या हातावर तुरी ठेवून सुंबाल्या करतात. उदाहरण तुळशीचं. परस्परांची पायधूळ गाठी-भेटीच्या नजरानजरीत लग्नाअगोदर भरपूर डोळ्यांनी धूळफेक करून सपशेल धूम

ठोकतातच. ताजंच उदाहरण, दौलतराव – तुळशीचं. सांगायची गोष्ट अशी की, लग्नाच्या सुनेला, वरात आल्यापासूनच लोक नाव ठेवीत असतात.

**चांदणी** : खरं वो खरं. बाप-सासरा जिता जागता बघूनही तुळशीबाई कशी राणीवानी संभूराजांना खेळवून राहिलिया. मग मी त्याच्या प्रधानजीला-

**जिवाजी** : (मध्येच) त्या परदेश्याला छानपैकी दरवेशाचं अस्वल बनवून गावभर नाचवत हिंडव. मांत्रिकाला जखीणच भुलवीत राहाते.

**चांदणी** : जिऊदादा, खरंच का हो कबजीबाबा जंतर मंतर करतो?

**जिवाजी** : हे पहा चांदणे, ए पोरी. बायकांनी चाळे केल्याशिवाय पुरुषांच्या भानगडी कळत नाहीत. तसच पुरुषांनाही अनंत लफडी कुलंगडी पाठीशी लावून घेतल्याशिवाय, त्यांना मोठेपणाची गुढी उभारता येत नाही. कबजी अत्तरं विकायला आला आणि महाराष्ट्राचा भुताखेतावरील असणारा मूर्ख विश्वास पदरी बांधून तो जादूटोण्याचा मांत्रिक बनला. अग, चार मंत्र म्हणून यज्ञात कोंबड्या-बकऱ्यांचा किंवा लग्नात नवरा-नवरीचा केसानं सपशेल गळा कापल्याचं पातक, भटा-भिक्षुकाला लागत नसतं. तसंच, मंत्रानं शत्रूंचा नाश होता, तर मग कमरेला कट्यार ग कशाला?

**चांदणी** : (चिडून) अवो पण तुमी मग का त्या चेटक्याच्या नादी लागलायासा?

**जिवाजी** : अशी चिडून बोलू नकोस., कबजी चेटकी म्हणून मी त्याचा नादी बनलो नाही, तर संभूराजांनी त्याला मुख्य प्रधानजी केल्यामुळं, त्याचा छंदी-फंदी-आनंदी जिवाजी म्हणून कारभारात राजी आहे. कबजीच्या मुठीत हा जीव गेला नाही; तर या जिवाजीनं त्यालाच आपल्या मुठीतल्या कलमात घट्ट पकडलेला आहे. त्याच्या ओंजळीनं मी पाणी पीत नाही, तर माझ्या कलमाचं 'काळंपाणी' मी त्याला रोज दाखवीत आहे, सखे चांदणे, 'वहात्या गंगेत हात' धुताना कधीही 'दुसऱ्याच्या ओंजळीनं पाणी पिऊ नये; तर त्याला 'तिलांजली' देत, अंगठ्यानं तर्पणकरावं समजलं! कबजीचं पींडप्रदान मी लवकरच उरकणार आहे.

**चांदणी** : (पाहून) पंत, गप्प राव्हा. कबजीबाबा येतुया जनू.

**जिवाजी** : वा! पिंडाचं नाव काढताच कावळा हजर.

**चांदणी :** (हळूच) जिऊभाऊ, मी जरा या जाई-जुईच्या मांडवात लपुनश्यान बसतो. तुम्ही टाळी वाजवा की, मग मी नन्हाटीवानी त्येच्या डोक्यावर येऊन कडकडीत चावा घेत्ये बगा.

(चांदणी आत जाते. कबजी येतो.)

**कबजी :** (हातात अत्तराची पेटी) कोण, जिवबा. कुठं अंत्ययात्रेला निघालांत?

**जिवाजी :** तुळशीबाईची प्रकृती एकाएकी बिघडल्याचं वर्तमान कळलं. राजवैद्यांना आपलं बोलावण गेलं. तेव्हा म्हटलं, या तयारीनंच लवकर जावं, म्हणजे झालं. शिवाय आपल्या दस्तूरचं पत्र, श्रीक्षेत्र संगम माहुलीच्या शिरस्तेदारांना लिहून कळविलं की,-

**कबजी :** (रागानं) काय कळविलं?

**जिवाजी :** पत्र काव्यमय लिहिलंय,

स्वैरिणी रतली रायासि । तिनें केली राणीची दासी ।
गुलाम राजा वनवासी । मग भाग्यांत ॥धृ०॥

अथ कलमबोध. तेव्हा तुळशी-स्मशानयात्रा, मरी आईच्या जत्रेसारखी निघावी. नंतर तुळशीची संगमरवरी समाधी उभारण्याचा विचार करू. समाधीवर देवांचा भोगविलास घेण्याऱ्या देवेंद्राचं मजेदार चित्र कोरण्यात येईल. वगैरे वगैरे अनेक मजकूर असा लिहिलेला आहे की, अस्ताला चाललेल्या या आपल्या मराठेशाहीचा जामदारखाना, हा अलिज्याहा कारभारात,-

**कबजी :** (मध्येच) म्हणजे? काय याचा अर्थ?

**जिवाजी :** गैरहिशेबी उधळपट्टीच्या कारभारी खर्चात जास्तीतजास्त आकडा खर्ची घालणे. त्याकरता ‘चाळा-कुचाळा’-

**कबजी :** (अर्थ न कळल्यानं) चाळा-कुचाळा म्हणजे काय बायकांचा पदर?

**जिवाजी :** छे! छे! चाल-ढकल न करणे. कालपेक्ष करू नये. दीर्घ दिरंगाई होऊ नये, ही सक्त आज्ञा. दसूर कब कलश. पंतप्रधान महाराष्ट्रराज्य सरकार,

**कबजी :** (संतापून) जिवाजीपंत, दररोज हवी तशी पत्रं खरडून माझ्या नरडीला खूपच फास लावता आहात?

**जिवाजी :** (शांतपणानं) पण अजून हुजूर जिवंत आहेत हे केवढं मराठेशाहीचं मंगल सौभाग्य.

**कबजी** : ते खरं हो. पण हे पाहिलंत का पत्र? मान्यांना तुळशीच्या शिकारीसंबंधी लिहिलेलं तुम्ही आणि त्यावर दस्तूर खुद्द माझा. राजांनी हे पत्र आत्ताच मला देऊन चौकशी करण्याचा हुकूम फर्मावला आहे.

**जिवाजी** : हात्तेच्या! एवढंच ना, द्या मग चौकशीकरता खास कोतवालीकडं. आपला अक्षरशून्य देहू दप्तरी आहेच अधिकारी. चौकशीच काम बेमुदत, तोपर्यंत संभूराजे तुळशीसह वृंदावनात बसतील.

**कबजी** : काय, तुम्हाला वेडबीड लागलंय की काय? अहो पंत, तुळशीला 'राजभूषणी' शृंगाराचे डोहाळे लागले आहेत. आहांत कुठं?

**जिवाजी** : आपल्यांच समोरे, बोला पुढं?

**कबजी** : काय बोलू. माझी तर बोबडीच वळलीय. मती कुंठित झालीय पंत, कामविकारातील शृंगार रसाचा रंग हो कोणता?

**जिवाजी** : सप्तरंगी इंद्रधनुष्याचा. ढंग चौऱ्यांशी लक्ष योनींचे. तथापि, शृंगाररसाचा मूळ अस्सल रंग गुलाबी! तो राजे-महाराजांनी दुसऱ्याच्या बायका जुलूम जबरदस्तीनं पळवून आणायच्या आणि मग आपली भोगलालसा ऐश्वर्यांकित रसिक शृंगारात मनसोक्त करायच्या-त्याला पहिला मान गुलाबी. दुसरा लालभडक शृंगार. म्हणजे नवर्याला ठार करून, प्रियकराला वाट करून मदनविलासात मग्न राहणं. दोहोंची मूर्तीमंत उदाहरणं म्हणजे संभूराजे + (अधिक) तुळशी (उणे) दर्यासागर दौलतराव शिर्के. तिसरा रंग पांढरा. म्हणजे वैधव्य व विधूर दशेतील प्रौढ स्त्री-पुरुषांसंबंधी, बहुवचनी रात्रंदिवस जोडणारा उभयांवयी! दृष्टांत कामचलाऊ व्यवहाराचा, पण ऊन-पावसात दिसणाऱ्या इंद्रधनुष्याचा. चौथा रंग हिरवा, हा लग्न बंधनानीच मखरातून तरूण स्त्रीपुरुषांना पलंगावर उडवावा लागतो. पाचवा रंग पिवळा. तो कौमार्य व ब्रम्हचर्य भ्रष्ट  करून कुठंही निर्दोष करता येतो. सहावा रंग काळा. त्याला जातपात, गणगोत, रंगरूप, वय, प्रीती भक्ती, सारं गुंडाळून बेधडक निर्लज्जपणे (हळूच) इकडे कान करा, सरकार! आपली कटिशूळव्यथा चोरून मारून जो पुरी करतो, तो म्हणजे राखेशी संबंध असलेला तुमचा आमचा ठरलेला अलिखित करार, आणि त्यावरच गरजू जिवा-भावाची सारी मदार! सारांश, माणसाला जसे षडविकार तसे, शृंगारालाही दशदर्शने, नेहमी कुठं ना कुठं 'भोग' म्हणून संसारात अनुभवावी लागतातच.

**कबजी** : आणि ईश्वरप्राप्तीच्या परमार्थात, शृंगाराला रंग नसेलच.

**जिवाजी** : तो भगवा शृंगार. याला लिंगभेद आडवा येत नाही. सारं कांही सर्वं-खल्विदं ब्रह्म म्हणत – चारी धाम यात्रेतून यात्रिकांनी अंगिकारायचा.

**कबजी** : वा! वा! पंत, आपल्याला बुवा या साऱ्या शृंगाराची लज्जत घ्यायची आहे.

**जिवाजी** : वासना बलवत्तर आहे. पण अर्थशास्त्रदृष्ट्या शृंगारिक स्त्रीची उत्पादनशक्ती, ही केवळ संहारकच असते, हे विसरू नका. हुजूर-

**कबजी** : छे! छे! ते आम्ही संभूराजांच्या तुळशी पात्र शृंगारावरून पुरते ध्यानात घेत आहोत.

**जिवाजी** : बरोबर. कारण, शृंगार रसाची किंमतच तशी बिनमोल आहे. तो सोन्याच्या सापळ्यात, मोत्याचा चारा खाऊनही रत्नांच्या राशीकडे भुकेल्या नजरेनं पाहात राहतो.

**कबजी** : अगदी खरं! महाराष्ट्र जरिपटक्याची काचोळी, तुळशीनं अंगात घालताच तिला आता महाराणी येसूबाईच्या राजभूषणांची हवा सुटली आहे. रागानं नुसती बेफाम घोडीप्रमाणं, काय पण राजावर रुसून खिंकाळत सुटलीय हो. अहो, औषधोपचाराकरता मी राजवैद्यांना बरोबर घेऊन गेलो, तो तिनं त्यांच्या श्रीमुखातच भडकवायला सुरुवात केली. कुपथ्यात रोग्यानंच वैद्य खाल्ला- असं म्हणत मी ही कामाग्नी प्रज्वलित करणारी माझी सुगंधी अत्तराची पेटी घेऊन तडक इकडे पळ काढला. नाहीपेक्षा, असंगाशी संग नि प्राणाशी गाठ' – अशी माझी अवस्था झाली असती.

**जिवाजी** : म्हणजे, पाहिलत ना हा शृंगाररसाचा अदभूत तडाखा. ज्ञानेश्वर महाराजांनी याचं बीभत्स शृंगारात असं वर्णन केलेलं आहे, नीट पाठ करा.

“खरी टेको नेदी उडे । लातैनी फोडी नाकाडे ।
तरी जेवीं न काढे । माघौता खरू ॥“

- म्हणजे ग़ा-ढ-वी शृंगार !

अर्थ उघड आहे. विशद करणे नलगे. कारण, माऊलीनं सिद्धांतरूपानंच म्हटलं आहे की, “सडपातळ स्त्रीलाच कामविकार अधिक प्रबळ करतो.” तेव्हा, पुरुषांनी पंचाग्निसाधनं जरी राखेच्या कामक्रोधाग्नीत आरंभिली तरी तिचा मत्सराग्नी कधीही शांत व्हायचा नाही.

**कबजी** : बरं, ते आता आपण अनुभवानंच ठरवू या. तुम्हाला मी माझ्या 'शतचंडी' च्या मंत्रसिद्धीकरता एखादी अक्षतयोनी कुमारिका पाह्याला सांगितली होती, तिचं काय झालं?

**जिवाजी** : कुमारिका तयार आहे; पण तिच्या अटी, अंगचोर महाभयंकर आहेत.

**कबजी** : अंगचोर अटी तिच्या असू द्या. या क्षणी मी मान्य करतो. कोण आहे ती?

**जिवाजी** : अहो, आपली चांदणीच. द्या टाळी.

(टाळी देतात. चांदणी पुढं येते.)

**चांदणी** : कुठं दोघांची पोळी पिकलीया वाटतं! (हसते)

**कबजी** : चांदणे, फार हसत्येस ग? मला पाहून की काय?

**चांदणी** : व्हय, व्हय, कबजीबाबा. तुम्हाला बघून कोण हसणार नाय? तुम्ही नजरेला येताच, अगूदर तुमच हे पोट पुढं आलेलं दिसतं अन मंग तुम्ही आलेलं दिसता.

**जिवाजी** : अग चांदणे, राजकारणी प्रधानजीचं हे गर्भश्रीमंत पोट आहे. ते खपाटी राहून कसं चालेल? या पोटात शकुनीलाही शरम वाटेल, अशी कैक कृष्ण-कारस्थानं एकसारखी अहोरात्र खदखदत असतात. तुला एखदं कपट कारस्थान पार पाडायचं आहे का? बघ. हे मायपोट आपलं आहे.

**चांदणी** : (नेत्रसंकेत करून) अस्सं, कबजीबाबा,-

**जिवाजी** : थांब, ही तुझी नेत्रपल्लवी आणि करपल्लवी भाषा, मुत्सद्यांना कळत नसते, तुम्ही तरुणींचे नयनबाण, आम्हा वृद्धांना मदनबाणाबरोबर अचूक लागतात हे खरे; पण त्याच बरोबर म्हाताऱ्यांना लोकनिंदेचे वाग्बाणही सहन करावे लागतात. शिवाय काळाच बाण-भाता आमच्या उरावर बेमुदत मारा करायला जय्यत तयार आहेच! तेव्हा तू प्रधानजींना आर्जवी भाषेत सारं काही सांग.

**चांदणी** : बरं तर. कबजीबाबा, कदमापाशी अर्जी करत्ये की, मला त्या मान्यानं लग्नाची जोरदार मागणी केलीया. खातुया जहागीरीचं वतन आपलं आन फितूर होऊन चकरी करतुया मोंगल पादशहाची. तवा,-

**कबजी** : (मध्येच) आलं लक्षांत. मान्यांचं जहागिरीचं वतन, खालसा करून ते तुझ्या नावं कायमचं बक्षीस करायच. ठीक आहे. पंत, या चांदणीला मान्याचं वतन, आमच्या खास हुकुमाच्या सही-शिक्क्यानिशी स्वदस्तूरनं आजच्या आज जावळप्रांती जाऊ द्या.

**जिवाजी :** अगदी. 'शुभस्य शीघ्रम' खास सांडणीस्वार रवाना करतो.

**कबजी :** तसंच, आमच्या शतचंडीचा महोत्सव आम्ही तुमच्या वेताळ-मंदीरात उद्या साजरा करणार आहोत. चांदणे, तू सुद्धा तीर्थप्रसादाला ये.

**चांदणी :** नग-नग. बाबा, मी हाय अशी लंकेची पार्वती.

**कबजी :** आलं लक्षांत. तुला दागदागिने आणि उंची कपडे नाहीत. ठीक. चल, आत्ताच माझ्या बरोबर आणि घे हवे तेवढे.

**जिवाजी :** चांदणे, बघ. हे विशाल गगनाएवढं मोठं उदार झालेलं पोट, आज तुझ्यावर निहायत खूष झालेलं आहे. अग, "अनंत हस्ते कमलावराने! देता किती घेशील दो कराने," माग-माग.

**कबजी :** माग, चांदणे, बिल्कुल मागचा-पुढचा विचार करू नकोस. वाटल्यास देहूलाही बरोबर घेऊन ये.

**जिवाजी :** चांदणे, बघ. अग जुळ्याचे दुखणं संपून, भाग्य उचकटायला लागलं आहे. हे लक्षात ठेवून होकार दे. कारण, भाग्य हे दारिद्र्याचं कौतुक करीत नसतं. लाभाची वेळ आली म्हणजेच हतभाग्याला आंधळ्याच्या भिकेचे डोहाळे आठवतात. अग हो म्हण.

**चांदणी :** येते. पण पंत, तुमी माज्या संग असा. (जाऊ लागते)

**कबजी :** थांब, ही घे तुला अत्तराची कुपी. चांगली उंची गुलाबी अत्तराची आहे.

**चांदणी :** आणा. (ती अत्तराची कुपी घेऊन तडक निघून जाते)

**जिवाजी :** हँ हँ, मलाही एक चांगली अस्सल हिन्याची कुपी बक्षीस हवीय.

**कबजी :** कशाला? या सुतकी वेषात. आणि नऊ वर्षापूर्वी तुम्ही आमची हातचलाखीनं बिनखरेदीची कुपी हातोहात लांबविली, ती.

**जिवाजी :** हातचलाखीत जमा होऊन, निकाली खर्चात निघाली. आज तिचं रूपांतर मागणीत झालंय.

**कबजी :** ठीक घ्या ही. (दुसरी कुपी देतो) मात्र, आत्ताचं हे चांदणीचं प्रकरण, अत्तराप्रमाणं वाऱ्यावर उडवू नका म्हणजे झालं.

**जिवाजी :** छे! छे! अगदी वाऱ्यालासुद्धा वाट मोकळी ठेवणार नाही. सारं काही बंदिस्त. धन्यानं फक्त आपल्या थैलीचं तोंड सैल करावं.

**कबजी :** त्याबद्दल निर्धास्त रहा. (जाताना) जय जगदंब. जय कालिका. (जातो)

**जिवाजी :** जय चंडिके. जय कमलेश्वरी. माझ्या "कलमबोध" संहितेचा हा शेवटच्या विसाव्या दशकातला अखेरचा दहावा समास. आज चांदणी-प्रकाशात पूर्ण झाला.

कलमें संहारली सृष्टी । कलमे विस्तारिली दृष्टी ।
इंद्र वैभवाचि इष्टी । कलमे केलीच पाहिजे ॥६॥

इति श्री कलमबोधे, जिवाजीपंत संवादे, कलम ब्रह्मनिरूपणनाम संपूर्णम ॥ या सांबापुढच्या नदीनं सुचविल्याप्रमाणं, मान्यांचं जहागिरीचं वतन, चांदणीच्या नावे रुजु करून बरखास्त करावं. म्हणजे हिंसेला रडीवरच पुनर्जन्माचा पाळणा, स्मशानातील तिरडीवर हिंदोळत राहतो त्यातून काळपुरुषही जिथं महाकल्पापलिकडे जाऊन सृष्टीकर्त्या ब्रम्हदेवाला सुद्धा मिठी मारायला भीत नाही; तिथं मर्त्य मानवांचा क़ोण केवा?

(जातो)

---

**<u>प्रवेश पाचवा</u>**

(स्थळ: सातारा जलमंदिरातील आरसे महाल. शृंगारिक तुळशी
पलंगावर गाढ झोपेत असून, कोणत्या तरी एका भेसूर स्वप्नामुळे
ती अंतःस्थ सूडाचे स्पष्ट बोल नवऱ्याच्या नावाचा उच्चार करीत
बडबडत आहे. अंतरिक्ष आवाजही मारलेल्या दौलतराव शिर्क्याचा
भय़ाण पिशाच्च बोलाप्रमाणंच घुमत असतो)

(पडद्यातून – अंतरिक्षांतर्गत भूत-ध्वनी)

'तुळशी सटवे. मला मारून राजशृंगाराचा जुगारी खेळ, उधळी उमाप होऊन विलासी बनली आहेस. रांडे, नवऱ्याजवळ केलेल्या प्रतिज्ञेची आठवण कुठं गेली?

**तुळशी :** (झोपेत बरळते) तुळशीभोवती घिरट्या घालण्याऱ्या जीवा. अरे, तू मेल्यावर तरी गोड वाणीनं माझं स्वप्नरंजन कर. मी केलेली प्रतिज्ञा विसरले नाही.

(पडद्यातून : पुन्हा तोच भूत-ध्वनी)

"मग हे काय चालले आहेत तुझे शृंगारिक चाळे? महाराष्ट्रराज्यजरिपटक्याची काचोळी केलीस आणि उरीच्या जोबनशाहीची लाज संभ्याच्या हाती देऊन शिणगार साजण्याचा ऐने महाल सजविलास. चांडाळणी, प्रतिज्ञा विसरलीस."

**तुळशी** : नाही, सख्या नाही. जिवलगा, तुमच्या जित्या रक्तानं रंगलेला हा पहा जीवखडा. अहोरात पदरात बांधून मी, "आईऽऽऽग. छातीवर दगडाची दरड रचू नका.

(पुन्हा तिसऱ्यांदा तोच भूत-ध्वनी)

"बोलभांड अवदसे. सर्पानं खाल्लेल्या चांगल्या पदार्थाचं जसं उत्तम विष होतं, तसेच मला हे तुझे चाललेले छिनाल शृंगारिक चाळे दिसतात. बंद कर हे आणि संभ्याला आलमगीराकडे कैद करून रवाना कर. मग महाराष्ट्रधर्माचा नाश, इस्लामी सत्तेनं लवकर कर."

**तुळशी** : (ओरडत) करत्ये सारं करत्ये. पण मला भेडसावून छेडू नका. हिणवू नका. पण मला राजभूषणासकट महाराणी येसूबाईंचं मोंगलांना दान द्यायचंय. त्याकरताच आपली ही तुळशी अरे-अरे मेल्या मांगा. (रडून) मेले हो मेले. धावा हो धावा. हा मेलेला मुडदा, माझ्या छातीवर जळते निखारे पसरतोय. तापलेल्या लोखंडी घणाचे घाव मारून माझं रक्त पितोय. मेलेल्या दौलतीच्या जिवंत भूता, थांब. (उठून कावरीबावरी होत, इतस्ततः महालात हिंडत राहते) महाराज, कुठं आहे माझा सखा जिवलग. (डोळे विस्फारून सर्वत्र पाहत) काळोखानं गिळलेल्या पदार्थाची रूपं, काळ्या ढगाप्रमाणंच दिसतात. आज तुळशीलाही सारी इथली शृंगार-साधनं विषासारखी भासतात. वणव्यात उसळलेल्या आगडोंबावानी दिसतात. (मोठ्यांदा ओरडून) मी यात होरपळून जळणार का? राया तुम्हांला संगं घेऊन मरणार? राया, धावा. धावा. या, (विकटहास्यात)

**संभाजी** : (प्रवेश करीत) कोण तुळशी, साजणे, स्वप्नात तू भ्यालीस का या रणमर्दावर रुसलीस? (एकदम तिचा हात धरून, मंचकावर बसवितो व तुळशीचं चुंबन घेत) थांब, प्रेम वाचाळपणानं बडबडत नाही. तर ते डोळ्यातं दिसतं आणि गालाशी असं गुलाबी बोल बोलून, हृदयाला हृदय जोडीत मौनं धरतं. समुद्रमंथनानंतर देव, अमृतपानासाठी तुम्हा स्त्रीयांच्या ओठावरच, स्वर्गीय सुखात सतत रमलेले दिसतात. वस्तीलाही तिथंच असतात. अमृताच्या कुंडात बुडून मरण्यापेक्षा, (वक्षःस्थलाकडे पहात) या दोन अमृत कुंभांना उराशी घट्ट धरून चुंबन घेणारे देव-दानव-मानव नेहमीच अशा चुंबन विलासात मग्न होतात. (तो जवळ घेऊ पाहतो. तुळशी आढेवेढे घेते.) सबूर, डोळ्यांत प्राण एकवटले म्हणजेच तरुणांना अधरामृताची जरुरी लागते. (चुंबन घेतो).

**तुळशी** : शीः पुरे ना राया. अशी काय राजांना तुळशीची ओढणी लागलीय की, जीवा-लग्नाच्या जन्मगाठीची राजसाला विसरणी पडलीय.

**संभाजी** : चुंबनाची मोहनिद्रा, ही शून्यातल्या संसाराचं सौंदर्य दाखवते. तुळशी, विशाल सौंदर्याचं आकलन करण्यासाठी, तितकंच विशाल हृदय असावं लागतं. नाहीपेक्षा, तुझ्या रसरसलेल्या उरोज-कुंभांवर महाराष्ट्र-जरीपटक्याची काचोळी, या संभाजीनं हौसेनं चढविलीच नसती.

**तुळशी** : (रागानं पलंग सोडून दूर होत) हं, राजे, पुरे करा हे मायावी प्रेम.

**संभाजी** : ते तुमच्या बोलांत असतं. ओठात नसते पण स्त्रीहृदयात राहतं. आम्हा पुरुषांना शुद्ध प्रेम, हे स्त्रीयांच्या अधरामृतातच दिसतं. कारण, स्त्रीहृदयातलं विष, चुंबनात उतरू नये, म्हणूनच पुरुषांना एकांतात स्तनमर्दनाचा मायावी प्रयोग करावा लागतो. कारण, नखाग्रांनी मदोन्मत्त हत्तीचं गंडस्थळ फोडणारा वीर हा आपल्या वीररमणीच्या वक्षस्थलावरील स्तन-युग्म हंसपक्ष्यांना अगदी सहज लीलेनं कुरवाळू शकतो.

**तुळशी** : राजांनी या असल्या वर्णनाशिवाय तुळशीला काय दिलंय? तोंडानं तुळशीच्या सौंदर्याचे गोडवे गायचे, भोगदासी समजून तिला भणंग भिकारिणीप्रमाणं महालात कोंडून संशयानं पाह्यचं आणि मन  मानेल तशी आपली भोगलालसा पुरी करण्याचं व्रत, मराठ्यांच्या मानी राजांनी कुणाच्या सल्ला मसलतीनं आरंभिलंय? प्रेमाची पखरण वरवरची. पण अंतरीची प्रतारणा फुलत्या अंगाराची.

**संभाजी** : (किंचित रागान) तुळशी, भणंग भिकारणीला हा आरसेमहाल, सुंदर सुवासिक सुमनांच्या मालेनं हा सजविलेला चंदनाचा नक्षीदार मंचक, केशर-कस्तुरीची उटणं, निर्मळ मदिरा आणि हिऱ्या माणकांचे अलंकार, सेवेला दास दासी,-

**तुळशी** : (गळ्यातील रत्नमाला फेकून देत) हे सारे एखाद्या जोगतिणीनं घातलेल्या कवड्या रेवड्याच्या माळेप्रमाणंच मला टाकावू वाततात. ही काय राजभूषणं म्हणायची? महाराष्ट्र-जरीपटक्याची काचोळी तुळशीच्या अंगावर चढविली. पण ही, - (काचोळी अंगातून काढू पाहते; संभाजी तिला ओढून पलंगावर बसवितो.)

**संभाजी** : थांब, लाडके, असा आततायीपणा करून तो उघड्या अंगानं उघड करू नकोस. कारण, तिचं प्रतिबिंबित अमंगल स्वरूप, अलम मराठेशाहीच्या परिसरात ओंगळ दिसू लागेल.

**तुळशी** : तर मग राजांनी आज मी घेतलेला राजभूषणांचा हट्ट पुराअ करावा.

**संभाजी** : बोल, कोणती राजभूषणं तुला हवीत.

**तुळशी** : राजाकडून तुळशीला वचन मिळाल्याशिवाय मी त्याची मागणी करणार नाही!

**संभाजी** : कैकयीचा संचार झालेला तुला दिसतोय. (वचन देत) हे घे मग. कोणकोणती राजभूषणं तुला हवी आहे?

**तुळशी** : (मद्याचा पेला तोंडाला लावीत.) सख्या, मला आज आपल्या महाराणी येसूबाईच्या पायांत असणाऱ्या सव्वाशेर वजनाच्या सोन्याच्या साखळ्या हव्यात.

**संभाजी** : (बेहोषीत) बस्स हीच का तुझी मागणी, बिलकुल मामुली. अगदीच क्षुल्लक. (पडद्यात चौघडा होतो.) पहाट झाली वाटतं.

**मंजुळा** : (प्रवेश करून) राजदर्शनाला कबजी पंतासह आले आहेत.

**संभाजी** : येऊ दे त्यांना आत. मंजुळे, महाराणीसाहेबांना आमचा निरोप सांगी कर, ताबडतोब पायांत सोन्याच्या साखळ्या घालून आम्हाला भेटायला या. जा.

**तुळशी** : थांब, पायांत नको, हातांत घेऊन यायला सांगा.

**संभाजी** : नाही. पायातच पाहिजे. दिलवर तू गप्प रहा. मी राणीसाहेबांनाच तुझ्या पायांत त्या घालायला लावणार आहे. मंजुळे, जा लवकर. बोलाव सगळ्यांना झाडून राजदर्शनाला. सर्वांनी राजमुजरा करायला या म्हणावं. त्या हिरोजी-साबाजीलाही बोलाव. तुळशीला सोन्याच्या साखळ्यांतील सजविलेली मंगळागौर अलम मराठेशाहीला दाखवायची आहे. हिला घेऊन मिरवायचंय.

(मंजुळा जाते. कबजी जिवाजीपंतासह प्रवेश करतो)

**कबजी** : (मुजरा करून) राजांचा विजय असो.

**जिवाजी** : (मुजरा करीत) छत्रपती संभाजीमहाराजांचा त्रिखंड जयजयकार असो.

**संभाजी** : (धुंदीत) काय रे ए सिद्ध-साधकांनो, आमच्याबरोबर या तुळशीलाही मुजरा करून, तिचा जयजयकार करा. मूर्खांनो प्रभेशिवाय सूर्य, धुराविना अग्नी किंवा पाऱ्याविना आरसा, कधी तरी कुठं तुम्ही पाहिला आहे का?

**जिवाजी** : रास्त आहे राजांचं बोलणं. शिवाय सूर्याशिवाय मृगजल, त्यात पिकणारी ती शेती आणि मृगजळाच्या महापुरात सापडलेल्या पर्वत...

**संभाजी** : (मध्येच रागावून) ए कलमदान्या, आम्हाला तुमच्या उपमा दृष्टांत नको. महेंद्रपर्वताला हाती धरून या सह्याद्रीच्या शिखरावर बसविण्याची आम्ही हिम्मत बाळगतो. (रागानं) कबजी, तुळशीसकट आमचा जयजयकार करा. त्रिवार करा.

**कबजी-जिवाजी** : (एकदम त्रिवार ओरडून) श्रीमतछत्रपती संभाजीराजे तुळशीपती यांचा सदैव जयजयकार असो! त्रिखंड विजय असो!

**संभाजी** : बोला आता. काय म्हणतोय गोवेकर फिरंग्या?

**कबजी** : तो एक कोट रुपये देत नाही म्हणतो. फिरून त्यानं आग़ळिक चालविली आहे.

**संभाजी** : अस्सं. त्याच्यावर चालून जाण्याची–आत्ताच्या आत्ता फिरून जय्यत तयारी करा. फोंड्यापासून दक्षिण, उत्तर साऱ्यांची नाकेबंदी करा. नाही. अगोदर तुम्ही पुढं व्हा. जा.

**कबजी** : पण महाराज उद्या मला शतचंडीचं होमहवन पुरं करायचंय.

**संभाजी** : ते आल्यावर पुरं करा. अगोदर आमची (तुळशीकडं पाहात) ही रणचंडी दूधसागराच्या धबधब्यावर प्राणप्रतिष्ठित करायला पुढं व्हा. आमच्या शृंगारविलासाची तयारी, तेथील निसर्गदत्त सौंदर्यात इंद्राच्या नंदनवनाप्रमाणं शोभिवंत करा.

**तुळशी** : कबजी, तुमच्या शतचंडीचा होम, जिवाजीपंत पुरा करतील. पंत तुम्ही कबजीचा वेष घेऊन-

**जिवाजी** : (मध्येच) यांचा यज्ञयाग शेवटास नेतो. इतकेच नव्हे तर आपण सगळे मोहीमेहून परत इथं येईपर्यंत मी प्रधानजीची दुय्यम प्रतिमा बनतो.

**संभाजी** : बुजगावणं बनून कबजीचं सोंग घेऊ नका; तर इथली राज्यव्यवस्था नीट पहा.

**जिवाजी** : (आनंदून) राजांनी भलताच अनुग्रह करून विश्वासात घेतलं. महाराजांनी काही काळजी करू नये. उभयतांचा आशीर्वाद असावा.

**तुळशी** : पंत, विजयी व्हा.

**जिवाजी** : अगदी वारांगनेनैव नृपराजनीतीचाच हा मला साक्षात्कार झाला.

**तुळशी:** तसंच आम्ही येईपर्यंत माझ्या मंजुळेला सांभाळा.

**जिवाजी** : अगदी पोटच्या पोरीप्रमाणं सांभाळतो. तुमच्यासारखीच अहोरात्र जवळ बाळगतो.

(पडद्यात : श्रीमन्महाराणी येसूबाई मासाहेब, छत्रपती शाहूमहाराजांसह राजांशी मुकाबला करायला मराठा फर्जंदानिशी इकडे येत आहेत. हुश्शियार.)

**कबजी** : मुकाबला. हुश्शियार. राजे हा काय प्रकार?

**संभाजी** : (संतापून) चालते व्हा! नसत्या चवकशा, हे गैरसमजाचं अंग असतं. दोघेही विसरू नका! चालू लागा इथून (दोघेही जातात)

(ते दोघे गेल्यावर महाराणी येसूबाई, बाळराजे शाहू हे आपल्या बरोबर एक आठ वर्षांचा हुजऱ्या घेऊन हिरोजी फरजंदासह प्रवेश करतात! कोणीही राजांना मुजरा करीत नाहीत. मात्र शाहूराजांचा आठ वर्षांचा हुजऱ्या हा एकटाच शाहूच्या खुणेनं संभूराजांना मानाचा मुजरा करतो.)

**संभाजी** : (पाहून) हा कोण चिमखडा बाळराजे, हा तुमचा खेळगडी कां हुजऱ्या?

**हिरोजी** : (स्वगत) हाय रे कर्मा! हे दृश्य पाहाण्यापेक्षा, देवा! या घडीलाच माझे डोळे कायमचे का मिटवीत नाहीस?

(एकीकडे तोंड फिरवून स्तब्ध उभा राहतो)

**तुळशी** : राया, पोटच्या पोरीचं हे राजवैभव पाहून, या थेरड्यानं बघा कसे आपले डोळे मिटून घेतले आहेत. तोंड फिरवून निमूट उभा राह्यला लाज नाही वाटत?

**संभाजी** : (संतापून) तुम्हा साऱ्यांच्या वाचा बंद पडल्या की काय? बाळराजे, आम्हाला मुजरा न करता, तो या लहानश्या हुजऱ्याकडून का करविलात? बोला पाहू?

**शाहू** : आमच्या मासाहेब आपल्याशेजारी बसलेल्या नाहीत. सबब आम्हाला मुजरा करता येत नाही.

**संभाजी** : म्हणून तुम्ही या आपल्या छोट्याशा हुजऱ्याकडून आम्हाला मुजरा दिलात.

**शाहू** : होय. मासाहेबांच्या जागी जर ही बाई चालते, तर आमच्या जागी मुजऱ्याला हा हुजऱ्या का चालू नये?

**संभाजी** : (संतापत) समजलो. मासाहेबांनी साबाजी-हिरोजींच्या कानी लागून हा असा आमचा पाणउतारा करायचा कट केलेला दिसतो; पण पांगळ्याला तुफानी वाऱ्याबरोबर पळण्याची पैज मारता येत नाही.

**शाहू** : नसेल. पण आम्ही आकाशाचं मोठेपण आकाशालाच देत असतो. पृथ्वीचं वजन पृथ्वीलाच. मासाहेब त्या मासाहेबच. त्यांची तुलना टोली-दमडीच्या दासी कुळंबिणीशी करणं, हा शुद्ध वेडेपणाच ठरेल.

**संभाजी** : हिरोजी, बाळराजांचा हा उद्धटपणा तुम्ही स्वस्थ चित्तानं ज्या अर्थी ऐकता आहात; त्या अर्थी तुमची अंतःस्थ फूस त्यांना आहे असं आम्ही का समजू नये?

**येसूबाई** : महाराज, एकनिष्ठ सेवकावर हा आरोप चुकीचा होतोय. म्हणून बोलणं भाग आहे. जलचरांना समुद्रात राहूनही त्याचा अंत कळत नसतो.

**शाहू** : समुद्र खवळला तरी जलचरांना त्याची भीती नसते.

**संभाजी** : पहा, राणीसाहेब, युवराज कसे सवाल-जवाब करू लागले आहेत. ही सारी तुमची शिकवणूक.

**शाहू** : आईची शिकवणूक म्हणजे सरस्वती मातेचा प्रसाद. तिचे बोल म्हणजे तिची अमृतवाणी. दुर्दैवानं ती महाराजांना मिळाली नाही. नाहीपेक्षा हे नाटकशाळेचं चित्र, आज आम्हांला दिसतंच ना?

**तुळशी** : (चरफडत) रायगडच्या रणधीरा तुमच्या समक्ष कोण हा तुळशीचा अपमान. मानभंगापेक्षाही माझा हा होत असलेला मनोभंग, मला मरणासारखा जाणवतोय!

**येसूबाई** : विस्तवानं लाकुड जळाल्यावर त्याची निशाणी राखेतच जमा होते. तेव्हा स्वारीनं बाल-युवराजांचं बोलणं अगदीच बालबुद्धीचं समजू नये. चंद्रकिरणांच्या प्रकाशात, चंद्रकांत मण्याचा पर्वत पाझरला तरी त्यात महापुराची धास्ती ही नसतेच.

**शाहू** : शृंगारलक्ष्मीचे चाळे, चळलेल्या पुरुषांनाच प्रिय वाटतात.

**येसूबाई** : युवराज. गप्प रहा पाहू? (संभाजीस उद्देशून) राजांनी कशाकरता आम्हांला बोलावणं केलं?

**संभाजी** : राणीसाहेब, या आपल्या पायांतल्या सोन्याच्या साखळ्या काढून त्या तुम्ही आपल्या हातानं या तुळशीच्या चरणी समर्पण करा.

**येसूबाई** : महाराज ही राजभूषणं आहेत आणि ती कुलपरंपरेनं कुबेराच्या भांडाराप्रमाणं भोसल्याची बरकत म्हणून सांभाळली आहेत. ही आम्ही आपल्या हातानी कधीही उतरून, दुसऱ्याची धन करणार नाही. कारण मामंजींनी राजगडच्या किल्लेतटाचं बांधकाम केलं त्यावेळी सापडलेल्या मोहरांच्या हंड्यात, आईभवानीचा प्रसाद त्यांना दृष्टान्तानं मिळालेला आहे. तो कुणाच्याही पायदळी पडता कामा नये, अशी थोरल्या महाराजांची निर्वाणीची आज्ञा आहे.

**संभाजी** : ती त्यांच्या निर्वाणाबरोबरच मातीमोल झाली. आज काय त्याचं? हं राणीसाहेब, काढा या आपल्या पायांतल्या सोन्याच्या साखळ्या आणि घाला या आमच्या लाडक्या तुळशीच्या पायांत.

**येसूबाई** : नाही. भोसल्यांची ही पिढीजाद राजभूषणं मी आपल्या हातांनी मुळीच उतवरणार नाही. वाटल्यास आपल्या हातांनी ही उतरावीत.

**संभाजी** : नाही-नाही. राणीसाहेबांनीच आपल्या हातांनी ही उतरली पाहिजेत. आमची ही आज्ञा तुम्ही पाळलीच पाहिजे.

**येसूबाई** : (निर्धारानं) नाही. आपली ही आज्ञा प्राणांतीही पाळली जाणार नाही. कारण राजांनी कल्पतरूच्या फांद्या तोडून शेताला कुंपण घालण्याचा उपद्व्याप चालविला आहे. चिंतामणीचा दगड, गोफणीनं मारून शेताची राखण करीत राहाणं, हे शहाणपणाचं नव्हे.

**संभाजी** : (उठत) अस्सं. आम्ही आपल्या पायांत या साखळ्या ठेवल्या आहेत; म्हणून राणीसाहेबांना हे शहाणपण सुचतंय. नाही का? ठीक आहे. आम्ही या सोन्याच्या साखळ्या, जातीनं काढून त्या तुळशीच्या पायांत –

(संभाजी धडपडत उठून येसूबाईच्या पायातील साखळ्या काढायला जाणार
तोच हिरोजी फरजंद, विजेप्रमाणं कडाडत संभूराजांना अडवितो)

**हिरोजी** : (कमरेची तुळशी तरवार उपसून संभाजीला अडवीत) हां, राजे, उचललेलं पाऊल मागं घ्या. या भोसल्यांच्या भाग्य-भाण्डाराला, या राजलक्ष्मीच्या राजभूषणांना उतरविण्यासाठी पुढं पाऊल टाकाल, तर पायबंदी होईल. पिंडीला पाय लावला तर पायाची जायबंदी केल्याशिवाय हा हिरोजी फरजंद कधी राहणार नाही.

**तुळशी** : थेरड्या, पर्वत पाषाणहृदयी असला, तरी तो नदीला समुद्राकडे सासरी पाठविताना ओढ्या-नाल्याच्या मोहनमाळा स्वखुशीनं देत राहतो. पण-

**हिरोजी** : (तुळशीस) चूप. छिचोर बनलेल्या कायेसकट, अधिक बडबड केलीस तर छिनाल जिभेलाही मला छाटावी लागेल. राजे अमृताचा उपयोग सडा-संमार्जनाकरता करू नका.

**संभाजी** : आम्हाला उपदेश ऐकायची बाळपणापासूनच सवय नाही. कालकूट विष अग्नीला दिलं काय किंवा अमृताची धारा ओतली काय दोन्हीही तो पचविणार. हिरोजी, तुम्ही आणि साबाजींनी आबासाहेबांना अंगाखांद्यावर खेळवलंत, या जोरावर तुम्ही आबासाहेबांच्या डोक्यावर बसलात. आज तुम्हाला आमच्या डोक्यावर बसता येईना, म्हणून तुम्ही बाळराजांनाही आमच्या डोक्यावर बसवू पाहता? पण आबासाहेबांच्याप्रमाणं आम्ही तुम्हाला आणि तुमच्या शिक्षणानं शेफारणाऱ्या बाळराजांनाही आमच्या डोक्यावर बसू देणार नाही. आबासाहेबांना मान देण्यासाठी, राणीसाहेबांच्या मुरवतीखातर आम्ही तुमचे लाड चालू देतो. नाही तर, -

(पडद्यात: कर्णे-शिंग-तुताऱ्यांचा नाद-ध्वनी. नंतर साबाजी शिरके हा नवीन जरिपटक्यासह भगव्या – झेंड्यानिशी मोठ्या लवाजम्यानं प्रवेश करीत.)

**साबाजी** : नाही तर काय? राजे आबासाहेबांच्या गोष्टी कशाला काढता? आम्ही तुम्हांला कुठं कटी खांदी खेळविलं नाही? आबासाहेबांच्या गोष्टी आबासाहेबांच्या बरोबर गेल्या; त्या आता काढून जिवाची फुकट हैराणी मात्र व्हायची! राजा, सर्जेराजानं दैवयोगानं चांगल्या माणसांची संचनी केली. सत्तवीस किल्ल्यांची उभारणी झाली. तटबंदीनं तिची मेळवणी जुळविली. स्त्री-धन-विद्यादी मिळवून 'षडगुणैश्वर्यसंपन्न" झाले. पण संभूराजे, आज हे तुम्हांला सांगून काय उपयोग? मराठेशाहीची मरणघडी तुम्ही आपल्या स्वैर वर्तनानं उद्यांची आज आणली. तिचा मरण काळ कोण थांबविणार? (उसासत) प्रलयाग्नीनं आग्नेयास्त्र सोडलं नाही, तरी विश्व दग्ध होणाराच. दगडावर पाणी ओतून, अंकूर फुटत नसतात.

**संभाजी** : साबाजी, ही कसली नवीन तयारी? हा जरीपटका.

**साबाजी** : महासती झालेल्या साध्वी पुतळाआईच्या पैठणी पदराचा केला आहे.

**संभाजी** : आणि हा भगवाझेंडा-

**साबाजी** : सज्जनगडीच्या राष्ट्रसंतांचा श्रीसमर्थांचा हा गुरुप्रसाद आहे. समर्थभक्त दिवाकरांकडून तो आला आहे.

**संभाजी** : एकूण तुम्ही जोगडे गोसावड्यांचं सैन्य उभारून आमच्या विरुद्ध बंडाचं निशाण उभारलेलं दिसतंय. प्रलयाग्नीला प्रचंड सहाय्य करायला प्रलयकालचा प्रभंजनसुद्धा तुम्ही पाचारण करून विश्वाला आग लागण्याचे थांबविणार आहांत वाटतं? पाप्याला जसा मोक्ष दूर असतो, तसा शांतीचा लेश नसला तर सुखविलासही दूर राहतो! साबाजी, खरंच का तुम्ही सारे आमच्या विरुद्ध बंड करणार आहात?

**साबाजी** : का करू नये? संभूराजा, बाळा. कायरे तुझा हा पाशवी शृंगार चाललेला आहे? हा पाहून पशूंनासुध्दा किळस वाटेल. अरे, मृगजळात पाणी नसतं. विषयात सुख नसतं. चंद्राला कावळ्याची ओळख नसते पण तो चकोराचा स्नेही असतो. संभुबाळा, राजा हा राज्योपभोगविरहित वैराग्यसंपन्न असावा लागतो. सारे राज्यभोग आणि संपत्ति-विलास जरी त्याला अनुकूल असले तरी पण त्या मोहातून, राजाला अलिप्तच राहाणं भाग पडतं. कारण, वैरग्यसंपन्न झालेले सर्जेराजे, श्रीसमर्थांच्या उपदेशानं ब्रह्मसाक्षात्कारासाठी एकदा वनवासी झाले होते.

**तुळशी** : (उठून संतापात) हां. तेव्हा राजे. तुम्हीही तसेच अंगाला राख फासून वनवासी व्हा. ऐका या थेरड्याचं आणि म्हणा जयजय रघुवीर समर्थ! तुम्ही खुशाल झोळी-कुबडी घ्या आणि व्हा रामदासी. राजे, ही मी निघाले, चालल्ये.

**संभाजी** : थांब, दिलवर, थांब. कुठं निघाली आहेस?

**तुळशी** : सूर्य कमलिनीला सूर्याचाच सहवास सतत हवासा वाटतो.

**साबाजी** : कावळी झालेल्यांना चंद्रही पिवळा दिसतो.

**येसूबाई** : पापण्यावरील केसांची कुणी चवरी करीत नाही.

**हिरोजी** : बचनागावरील किड्यांना, त्याचं विष हेच अमृत वाटतं.

**शाहू** : आकाशात धुराचे लोट फुकटच जातात. कमळाचं पान रात्रंदिवस पाण्यात राहूनही कोरडंच राहतं.

**तुळशी** : (जाता जाता रागानं) राजे, ऐका ही साऱ्यांची कुचकी नासकी बोलणी. तुळशीला वचन दिल्याप्रमाणं सोन्याच्या साखळ्या मिळाल्या नाहीत. म्हणून आज या घडीला मी तुमची राहिले नाही. नागवेल न फळताही सार्थकी लागते आणि सगळ्यांची तोंड लालभडक करत्ये हे या पुढं ही तुळशीच समक्ष दाखवून देईल. (रागारागानं निघून जाते.)

**संभाजी** : तुळशी-तुळशी. थांब. आमच्याशिवाय एकटी जाऊ नकोस. आम्हीही येतोच. (पाहून) छे. गेलीच ही. साबाजी सोसाट्याच्या वावटळीनं, मेघही आपल्या गर्जनेसह पळ काढतात. तसेच आम्ही तुळशीच्या प्रतिज्ञा-बोलामुळं राज्याचा त्याग करून तिच्या शोधाकरता जात आहोत महाराणीसाहेब, सांभाळा हे राज्य. आम्ही चाललो. तुळशी-तुळशी -

(सैरावैरा मनःस्थितीत संभूराजे तुळशीचा पाठलाग करतात)

**साबाजी** : अरेरे ! मनाची ओढणी म्हणजे अनर्थाची पेरणी. मुली सहनशील रहा. कारण, आकाशाची करेल चौघडी, महामेरूची बांधवेल पुडी, परि विषयी मनाची ओढी दुर्निवार. हिरुबा, डोंगरमाथ्यावरील कडा कोसळल्यावर तो आपल्या बरोबर वाटेत आड येणाऱ्याचाही चक्काचूरच करीत असतो. गड्या, प्रसंग बाका उद्भवलाय. एकीकडे महाराष्ट्रराज्याचं रक्षण. तर दुसरीकडे संभूराजांना संरक्षण. दुहेरी कर्तव्याच्या कात्रीत तुम्हा सर्वांना यापुढं डोळ्यात तेल घालून, ते पार पाडायला हवं. आता भस्मात आहुती देऊन यज्ञ पुरा करता येत नाही. तू मासाहेबांना घेऊन परिवारासह रायगडी निवाऱ्याला निघ. मी संभूबाळाला परत राजधनीला आणण्याच्या भगीरथ प्रयत्नात राहतो. चल, निघ, घे सर्जेराजाचं नाव आणि चालू लाग. अरं भिंतीवरली चित्रं, भिंत पडल्यावर जशी मातीमोलाची ठरतात, तशी राजांच्या जाण्यानं आपली गत होता कामा नये.

(परस्पर दिशेनं जातात)

**अंक तिसरा समाप्त**

**अंक पाचवा**

---

प्रवेश पहिला

(स्थळ: सातारा. वेताळ पेठेतील जिवाजी कलमदाने यांच्या घरातील शक्तिदेवतेचा देव्हारा. त्यात भव्य नग्नचंडिकेची काळीकभिन्न मूर्ती. सभोवार चंडिका भुवनेश्वरी, चिन्नामस्तादि क्षुद्र देव-देवतादि आणि अष्टभैरव, आग्यावेताळादि ग्रामदेवतांची भिंतीवरील चित्रे : 'ओम ऱ्हां ऱ्हीं भ्रां' स्वाहाः इ. मंत्रांच्या त्यावर ठळक अक्षरातील चिठ्ठ्या . यंत्रपट लिंबे, मोरपिसांचा कुंचा राखेची दगडी, उदाचे डमरूवजा धुपाटणं व समोर यज्ञकुंडातील अग्नी पेटवीत असून, नखशिखांत दागदागिन्यांनी सजलेली चांदणी, लावणी म्हणत येते)

**चांदणी:**

लावणी

काशिमाराचा बाबा । लुच्चा लबाड हाय ग ॥
पोटामंदी काळंबेरं । घातकी मुडदा हाय ग ॥१॥
महाराजानं जवळ केला । कवड्या नागोबा हाय ग ॥२॥
लोकांनी बी मान दिला । 'थातुर मातुर' फायलं ॥३॥
देहूरायासाठीं मला । घबाड चेटूक गावलं ॥४॥

**देहू** : (फुंकणीनं यज्ञकुंड फुंकीत) छे. तालमीत रोज हजारो जोर बैठका काढून जो मला दम लागला नव्हता, तो हे यज्ञकुंड पेटवताना एखाद्या दमेकऱ्यासारखा श्वास लागला आहे. (पुन्हा फुंकतो) च्यामारी, हे जिवाजीपंताचं यज्ञकुंड आहे की नर्ककुंड आहे? जो जो फुंकतो, तो तो राखच डोळ्यांत शिरते. बाकी जिवाजीपंतांना राखेचा मोठा छंदच आहे म्हणा. पूजेला ही होमाची राख आणि घरात तर काय चोवीस तास राखेशीच संबंध. (हसत) हो-पण सध्या मराठेशाहीचं राजकारणच जिथं राखेच्या नजरफुंकीनं चाललं आहे, तिथं सर्वस्वापहारात तिची राखरांगोळी न होईल तरच ते आश्चर्य. चांदणे, कंटाळलो बुवा फुंकून, फुंकून. तू तरी फुंकून पहा. कारण तुमचा संबंध सदैव फुंकणीशी सोनाराप्रमाणं जिव्हाळ्याचा असतो.

**चांदणी** : अरे मी तर आज साऱ्यांचीच फुंकून राख करणार आहे. आन् ती सावडायला तुला बोलावणार हाय. ए सख्याहरी, अरं जरा वर नजर टाकून बघ की माझ्याकडं.

**देहू** : (तिच्याकडं पाहात) आँ! तू तर दाग-दागिन्यानं मढलेली आहेस. कुठून हे दागिने आणलेस? महाराणी साहेबांचा जामदारखाना चोराकडून लुटवलास की काय? खरं सांग. मी कोतवाल आहे. चोरीच्या गुन्ह्याला मी हात छाटण्याची कठोर शिक्षा देत असतो.

**चांदणी** : तो चोर हुडकून त्याला दे. माझ्यावर आषक होऊन बक्षीस देणाऱ्या अंगचोरा तू कोणती शिक्षा करणार हैस? बोल की राया. (कानात सांगत) हे बघ कान कर इकडे. (सांकेतीक खुणा करत्ये).

**देहू** : अरेच्या! एकूण, हे वडीलधारे दोघं चोर, चांदणीवर मोर-होऊ पाहातात, होय? पण सर्वांचा शिरजोर म्हणून उनाड ठरलेला हा देहू दसरी उरावर बसून चितपट कुस्ती मारणारा आहे. हे त्या कलम कसायांना आत्ताच दाखवितो.

**चांदणी** : आरं पन राया. राजांच्या गळ्यातला ताईत तो काश्मीरचा बाबा कलुषा कबजी तर नेलाय संभूराजानं आपल्या बरोबर.

**देहू** : खरंच, चांदणे. लाख वेळा माझ्या मनात येतं की, संभूराजांना ताळ्यावर आणण्यापेक्षा, या कबजीचा काटा, कायमचा इथून दूर करावा.

**चांदणी** : कशाला? मरू दे की त्याला आपल्या मरणानं. गुळानं मरणाऱ्याला विष रं कशाला? महाराज भोळं पडलं. काय पण लुबाडुनश्यान हे दोघं मराठेशाहीची दौलत लुबाडताहेत? हे माझ्या खांद्यावरलं खंडीभर दागिनं बघ. लाळघोट्या कबजीला झुलवलं नाय तोच सारी राणीसाहेबांची खास लेणी.

**देहू** : (मध्येच) राहू दे ती तशीच अंगाखांद्यावर. थांब (विचारपूर्वक) तू आता असं कर. जरा वेळानं तू इथं अशीच ये. नंतर मी या माझ्या गुरूला चांगला कोतवाली अडसट्ट्यात पकडून त्याची साताऱ्याहून निघता निघता चांगली गाढवावरून धिंड काढतो, आणि मग गोव्याहून आल्यावर त्या कबजीचेही पाच पाट काढून त्याच्या तोंडाला काळं फासतो. पंत, लेखणीची किमया फारच गातो. आता गाठ आहे या कोतवाल बनलेल्या माझ्या करेलीशी. जा. तू सध्या इथं त्याच्या नजरेला पडू नकोस.

**चांदणी** : राया, हे अंगावरलं अलंकार राणीसाहेबांना पळत जाऊन देऊन येते.

**देहू** : नको. ते आपण दोघे मिळून मांसाहेबांच्या पायांवर वाहू. तुझ्या अंगावरील हे अलंकार म्हणजे या तुझ्या कोतवालाला मिळालेला अफरातफरीचा पुरावा आहे. तेव्हा सध्या राहू दे तसेच तुझ्या अंगावार. जा. जरा बाजूला हो. तो मैंद स्नान करून इकडेच येतोय.

(चांदणी जाते. देहू आडोशाला उभा राहातो)

(नंतर जिवाजीपंत कलमदाने स्नान करून पीतांबर नेसलेला,
कपाळभर शेंदूर, डोळ्यांत काजळ, दंडात मोरपिसे व लिंबे इ.
प्रकारानं सजलेला अघोर कर्म्या मांत्रिकाच्या वेषात प्रवेश करतो.)

**जिवाजी** : जय धुमावती, रणचंडिके, यज्ञारंभी उत्तिष्ठ हो. जागृत रहा. जय सर्वजन क्षोभिणी. ॐ. र्‍हां, र्‍हीं, र्‍हं, स्वाहा. (यज्ञकुंडाजवळच्या आसनावर बसतो) कलुषाचं हे देवकार्य, तो गोव्याला गेल्यामुळं मला दत्तक वारसानं पुरं करणं भाग पडतंय. काय करावं? श्रीमंतांचा सहवास म्हणजे कळकाच्या सावलीचा आश्रय. बाकी, कळकाचं झाड वाढलं तरी त्याला फुलं नी फळं येतच नाहीत. पान कुस्कराव तर रसच निघत नाही. काय अजब निर्मिती कळकाच्या बांबूची आहे पहा. संसारातल्या टोपल्या सुपापासून तो थेट तिरडी-ताटीच्या मंगल-अमंगल कार्याला उपयुक्त होणारं कळाकाचं झाड आणि आंब्याच्या डहाळ्या, असली बेढब जोडी, आम्हा हिंदूंच्या धर्मसंस्काराशिवाय अन्य धर्मात दिसणार नाही. जाऊ द्या. धर्ममार्तंडाच्या चुका, कर्मकांडाला पाह्यला वेळ नाही. आपण पूजाविधीला लागलं पाहिजे. देहू – ए - देहूराया कुठं गेला हा शिष्योत्तम?

**देहू** : विद्योत्तमा, आपला हा कल्याणशिष्य हजर आहे. गुरूंची काय आज्ञा आहे?

**जिवाजी** : शिष्याचं काय म्हणणंय?

**देहू** : आपल्यजवळ मला काही सांगायचं नसल्यामुळे, कोणतीही गोष्ट ऐकायला सध्या मी रिकामाच आहे!

**जिवाजी** : अस्सं. पण गुप्त भाषणं आडून ऐकणाऱ्याला कधी कधी स्वताच्या विरुद्ध ऐकायला सापडून चांगलीच अद्दल घडते. बच्चा, हा स्वानुभाव आहे. नीट ध्यानात ठेव.

**देहू** : ठेवतो. पण, सदगुरू. मला एक शंका आहे. तिचं निरसन करा बरं. माणसानं आपलं डोकं, भुताच्या उलट्या पायाप्रमाणं चालवावं का?

**जिवाजी** : अजाण जीवा, बेधडक चालवावं पण स्वार्थाचं बरं-वाईट स्वरूप पाहून. (हसत) तुला या आपल्या वेताळ पेठेतल्या इथल्या या राहात्या घराचा इतिहास सांगतो. नीट श्रवण कर. या घरात एक जादूटोणा करणारी, केगामती या नावाची सुंदर देवलसीबाई होती. वयानं मध्यम पण दिसण्यात लावण्यमयी. तेव्हा तिच्याकडे भूतबाधा नसणारेच स्त्री-पुरुष फार यायचे. त्यात बायका नसलेल्या बायका जशा घोळक्यानं तिच्याकडं यायच्या, तसेच त्यांच्या नवऱ्यांचे नवरेही तिथं जमायचे. अनौरस मुलाबाळांचा नामकरणविधी, औरस संततीच्या सुखसोहळ्यात सटवाई अंगात संचारून पार पाडण्याची तिची लोकविलक्षण चतुराई. एका मूल नसलेल्या बाईच्या कपाळावर केगामतीनं नुसतं कुंकू लावताच तिच्या कपाळी संतानाऐवजी काळा नायटा उपजला. झालं गावभर कंडी पिकली की, अंबाबाई देवळात पण स्वरूप नायटे बाईच्या करणी कुशलतेत. मग काय, भविष्य विचारायला लोक झुंडीच्या झुंडीनं तिच्याकडे अहोरात्र येऊ लागले. तुझा भविष्यावर विश्वास असेलच,-

**देहू** : फारसा नाही. पण भविष्य आपल्या हाती आहे, अशी खरी गोष्ट असली तरी त्याच्यासाठी ज्योतिषाच्यापुढं हात पसरणं हे मी नामर्दपणाचं लक्षण समजतो. उगीच हात दाखवून अवलक्षण समजून घ्या कशाला. मारामारीपुरतीच मला हात दाखविण्याची संवय आहे.

**जिवाजी** : तीसुद्धा जन्मकाळच्या ग्रहकलहामुळंच आता पुढं ऐक. तेव्हा, त्या बाईकडं असाच झोपेकाचून रात्र आणि कामावाचून दिवस घालविणारा एक व्यसनी वेडा होता. तो या पेठेत विनावस्त्राचा हिंडत होता. त्याला लोकांनी नाव दिलं होतं 'हल्या वेताळनाथ.' एके दिवशी बाईची उदंड उमराणी ऐकून, हल्या तिच्या घरात शिरला आणि एकदम तिचा हात धरून म्हणाला, ' अग, करणपुतळे, नवऱ्याला सोडून हा जादूटोण्याचा खेळ, छिनालपणा करीत या गावात सुरू केलास, होय? पण मी हल्या वेताळनाथ तुझा लग्नाचा नवरा आहे, असं म्हणून तो वेडापीर, तिला गुरासारखा बडवत सुटला. गावाला खरं वाटलं, बाई शिंदल ठरली. हां हां म्हणता सारा गाव तिला पतिव्रतधर्माचे पाठ देऊ लागला. शेवटी त्या बिचाऱ्या बाईनी तो

हल्या बुवा पत्करला. मग मात्र दोघांनी आख्खा सातारा आपल्या भजनी लावून, या मोहल्ल्याची 'वेताळपेठ' केली. व्यसनी नवऱ्याच्या आळसावर, बायकांची जीभ हा जरी रामबाण उपाय असला तरी पण नवऱ्याच्या हातातही त्यांच्या त्या बेमुर्वत बोलण्यास कालभैवरावाचा दंडुका अडसर म्हणून सतत तो उठ-बस असावाच लागतो. तरच पुरुषांचा निभाव बायकांपुढं लागतो. सारांश, या वेताळ पेठेच्या इतिहासात हत्या उजवला आणि चेटकीण चुळीजवळ बसून तिनं मग वेताळनाथाला जन्म दिला.

**देहू** : गुरुजी, मी आहे पेहलवानी पेशाचा तरूण. सुंदर स्त्रीयांच्या मानेकर हात ठेवण्यापेक्षा मला कुस्तीच्या जोडीदाराच्या मानेवरच हात ठेवायला बलदंड आनंद वाटतो.

**जिवाजी** : रास्त आहे. पण आम्ही उनाड पोरींच्या संगतीत बालपणापासून राहिल्यामुळं माथ्यावरील केस पिकवून घेतले खरे; पण शरीर आणि मन, रंगेल तरुणाचंच कमावून आज़ ऐन म्हातारपणातही रंगेल राहिलो आहोत अरे राजा. उसाचा चरक स्त्रीयांचं यौवन सारखंच.

**देहू** : हे भगवन् कश्यावरून हो तुम्ही एवढं ज्ञान पैदा केलंत?

**जिवाजी** : अरे, बेट्या. संवयीच्या अनुभवानं. धार काढणारा कुशल असला म्हणजे म्हाताऱ्या गाईलासुद्धा तो सहज पान्हवू शकतो. मोसमात पाडाच्या आंब्याला पोपटानं चोच मारून जमिनीवर पाडल्यानंतरच भुंग्याना त्याची खरी गोडी लागते. प्रेमवेड्या देहूराया हा सारा निसर्गाचा खेळ आहे. रजनी अरुणाचं नाव घेऊन लाजते, तेव्हा कुठं पृथ्वीच्या कुशीतली लाल कमळं उमलायला लागतात मगच भुणभुणमारे भुंगे एकत्र जमतात. तात्पर्य, हा स्त्रीपुरुषांच्या शरीरसंबंधाचा एक सृष्ट्य चमत्कार आहे. चोर, कामुक आणि गरीब वाटसरू, यांना कोंबडा आरवूनच सावध करतो. बरं, राहु दे हे सारं. हे यज्ञकुंड अजून थंडच.

**देहू** : अहो, यज्ञेश्वर योगीराज, ते फुंकून फुंकून माझी छाती फुगायच्या ऐवजी फुटायला लागली.

**जिवाजी** : अरे, राया, सर्पणाशिवाय अग्निला जसं आपलं तेज प्रगट करता येत नाही; तस स्त्रीला वश करायला तोंडभर स्तुती करून उपयोग नाही. पाण्यानं ऊस

वाढतो; पण तो बरोबरीनं गोडी निर्माण करतो. पण मौज ही की, उसाच्या रसापासून साखर आणि गूळ जन्माला येतात.

**देहू** : पण चवीला निरनिराळे लागतात.

**जिवाजी** : हाही मूळचाच पाण्याचा प्रताप अंगातलं पाणी, बायकांच्या डोळ्यांत पुरुषानं जरी खेळवलं तरी त्याच्या शरीरावर हिऱ्यामाणकांचं पाणी हे दाखवावंच लागतं. तुझ्या चांदणीलाही आज माझ्या कलमेश्वरीनं अशी गजांतलक्ष्मी बनविलेली तू पाहशील.

**देहू** : खरं. माझी लक्ष्मी-चांदणी. राणीसारखी तुम्ही सजविली आहे. पंत, हे ऐकून नाकातोंडात पाणी गेल्यावर जसं तोंडचं पाणी पळतं, तशी माझी भेदरल्यागत स्थिती झाली आहे.

**जिवाजी** : आस्ते कदम. बेटा देहू, असा भेदरून गांगरू नकोस. अरे, बाबा पाण्याच्या लाटा कशाही उसळत्या, तरी त्या पाणीच पिणार. असा अधीर होऊ नकोस. जेवायला बसलं की, घासाघासाने भूक ही कमी होणारच. जा. आत जाऊन मंजुळेनं मांसाचे कबाब शिजवून ठेवले आहेत ते तेवढे या गोमुखीत भरून आण? (ती देतो) मग मी तुला हा कालिकेचा महाप्रसाद देतो. तो पी. (मद्याचा पेला भरतो)

**देहू** : (साश्चर्य) काय दारू! छे, बुवा. पंत आम्ही पेहेलवान गडी. मस्तपैकी श्रीशंकराचा प्रसाद-शांभवी-विजया, थंडाई म्हणून बदाम गुलकंदाची खडीसाखरमिश्रित पौष्टिक भांग घेत असतो. भांग पिओ और मस्त बनो. दारू जीवनावर उदार असते.

**जिवाजी** : भांग स्वतःविषयी माणसांना चिंताग्रस्त करते.

**देहू** : राजांच्या रसशृंगारावरून दारू ही पश्चातापाला कारण होते.

**जिवाजी** : भांगेने माणूस शांत राहून वेड्यासारखा हसत सुटतो.

**देहू** : दारू दुसऱ्याविषयी बोलकी बनून शिविगाळ करीत सुटते. तर भांग आध्यात्मिक विचाराला चालना देते. (आत जाताना) दैत्यगुरू. हा आईचा प्रसाद तुमचा तुम्हीच घ्या. वाटल्यास तुमच्या एखाद्या बाईला पाजा. (देहू आत जातो)

**जिवाजी** : पोऱ्या अगदीच पेहेलवानी बाण्याचा सरळ सीधा गडी आहे. तेव्हा आरशात पहू पाहणारं तोंड, तेच ते फिरफिरून हा पाहत बसणार. नवीन नवीन चेहऱ्यांच्या चटक चांदण्या, पहाव्यात आम्ही कलमदान्यांनीच. चांदणी हाताला नाही गवसली; तर तुळशीची मंजुळा आहेच बिनबोभाट घरात ठेवलेली. तेव्हा; तूर्तास

बिघडलेल्या दुधापेक्षा चांगलं ताकचं बरं. बाकी या राजवाड्यात ह्या दासी डोळ्यांच्या चवऱ्या आणि पदराच्या अबदागिऱ्या दाखवून केव्हा हातातल्या केरसुण्या पुढं करतील, ते राजनिष्ठ सेवकच जाणोत. (यज्ञकुंडात डोकावून) छे. यातही कोरडी राखच दिसते. तेव्हा राखेत दूध-तूपच काय; पण समुद्रातला वडवानळ जरी या यज्ञकुंडात वस्तीला आला तरी तो ही राख पाहून थंडगारच होणार. राहू द्या हे असंच. अगोदर आपण आपला आत्मा, राखेविना जो थंडावत चाललेला आहे, तो या आईच्या आचमनानं शांत करावयास हवा. (मद्याची आचमनं घेत) केशव, नारायण, माधव-गोविंद. अहाहा! हा प्रसाद पोटांत घशावाटे घोटभर घेतला म्हणजे स्वतःच्या छातीला हात लावून दुसऱ्याच्या गळ्यावर हात ठेवण्याची प्रतिज्ञा कराविशी वाटते. एकंदर ही प्राणावर बेतणारी माझी शक्तिपूजा पाहून चांदणी मला भिऊन तर पळणार नाही? कारण स्मशानाचा भयाण देखावा पाहिल्यावरच आकाशातल्या चांदण्या न चमकता, नुसत्या थरथरत राहतात.

**चांदणी** : (प्रवेशून) देवलसी दादा. नमस्कार करते. आशीर्वाद द्या.

**जिवाजी** : चांदणे, अग लाडके, आशीर्वाद देऊ तरी कोणता? 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' हा आशीर्वाद खरा होऊ लागला; तर चौपट वाढीनं दुसरी पिढी चौपदरीची धनीण व्हायची. ये बैस जवळ.

**चांदणी** : पंत, पोरवडा व्हायचा मला आशीर्वाद नको. राजाची राणी व्हायचा काई मंत्र-तंत्र तुमास्नी येत असेल तर तो सांगा.

**जिवाजी** : सांगतो. हा कुंकवाचा करंडा घे. (पाहून चपापतो) अरेच्या, इथला तो राणीच्या शकुनाचा सोन्याचा कुंकवाचा करंडा कुणी पळवला की काय?

**देहू** : (गोमुखी घेऊन प्रवेशत) पंत, तुमची मंजुळा आत नाही. तेव्हा, मीच हे अर्धेकच्चे कबाब शिजवून गोमुखीतून आणले आहेत.

**चांदणी** : (जवळ जाऊन) देहूराया, अरं तू कोतवाल आहेस की गाई कसाई आहेस? बामणांचं कबाब करायला, तू खाटिक, मांग, कोण हैस राया?

**देहू** : थांब. तुलाही दाखवितो माझा अधिकार. (खिशातून चाबूक काढून) बोल चांदणे. हे राणीसाहेबांचे मूल्यवान अलंकार कुठून तुला मिळाले? तुझ्या अंगावर हे कोणी घातले?

**जिवाजी** : आणि राणीसाहेबांच्या दृष्टांताचा सोन्याचा कुंकवाचा करंडाही इथून कुणीतरी चोरून नेलेला आहे.

**देहू** : (संतापून चाबूक दाखवीत) पण तो तुमच्या य देवपूजेत आलाच कसा? खरं बोल गुरुजी. मी आता तुमचा शिष्य देहू दप्तरी नाही; तर कर्दनकाळ कोतवाल आहे. चांदणे, उतर ते अंगावरले अलंकार. आणि चल कोतवाल चावडीत. मला तुझी जबानी लिहून घ्यायची आहे.

**चांदणी** : (दागिने काढीत) मंग त्यासाठी कोतवालीत कशाला रं राया, आमास्नी नेतुयात. (उपरोधीत) आमी दोघं तिघं लई अब्रूदार मानकरी गब्रू आहोत.

**देहू** : तिसरा कोण आहे चोर? त्या हरामखोराचं नाव सांग.

**चांदणी** : तो राजांच्या नाकातला बाल आहे. पंतांनाच नाव घ्यायला लावा.

**जिवाजी** : तो राज्याचा पंतप्रधान आहे. तो सध्या गोव्यात फरारी नाही, संभूराजांबरोबर स्वारी शिकारीवर आहे. फितुऱ्यांच्या हाती राणीचे सौभाग्यालंकार लागू नयेत, म्हणून मंजुळेसह हे दागिने इथं माझ्याकडे सुरक्षित ठेव -

**देहू** : (पंतांना चाबुक मारीत) सुरक्षित ठेव काय? गुरुजी, खोटं बोलता? खरं सांगा. नाही तर हा देहू दप्तरी कोतवाल, तुमच्या अंगाची चांगलीच चामडी लोळवील. चांदणे, जा आत. आणि हंडाभर मिठाचं पाणी तयार करून आण. ते याच्या पाठीवर ओतून या चाबकाने फोडून शेकतो चांगली. जपून रहा बच्चमजी. स्त्री, पैसा, मत्सर आणि मार हे सत्याला शोधण्याचे चार आश्रमच आम्हा कोतवालीत काम करणाऱ्यांना माहीत असतात. चांदणे, मिठाचं पाणी तयार कर.

**चांदणी** : पण कोतवाल साहेब, अशानं खाल्लेल्या मिठाचा अपमान व्हायचा. अवो, पंत अन् प्रधानजी ही काय निमकहराम जोडी आहे? निमकहलाल आहेत निमकहलाल.

**जिवाजी** : वत्सा, थांब. या देवीला कौल लावूनच आपण विचारू या.

**देहू** : माझी ही मूर्तीमंत देवी, तोंडानं खरं सांगायला तयार झाल्यावर तुमच्या या कोंबड्या बकऱ्यांचा बळी घेणाऱ्या अघोरी देवीचा कौल कशाला? देवीला कौल लावण्यापेक्षा, पंत तुमच्या कमरेला चापच मला लावायला हवा. मंजुळेसारख्या दासीला नादी लावून. तिनं फारच हलवाहलवी चालविली आहे. गुरुमहाराज, देवीभोवती फेऱ्या घालण्यानं दैवाच्या फेऱ्यातून सुटका होत नाही. बसा इथं. मी

आत जाऊन आणखी तुमच्या साऱ्या सामानांची झडती घेणार आहे. चांदणे, उतरलेस सगळे अलंकार.

**चांदणी** : व्हय. कोतवालसाहेब. (लाजून) माझी एक मागणी हाय जी.

**देहू** : एक का? दोन मागण्या तुझ्या मला मंजूर आहेत.

**चांदणी** : तर मग घराच्या झडतीत मला माफीचा साक्षीदार करून कबजीबाबांच्या वेषांत पंतांना मोकळीक द्यावी.

**देहू** : पंत, कबजीचं सोंग घेऊन तुम्ही इथून फरारी व्हायला तयार आहात? बोला, तसं कराल तरच तुमची या चोरीच्या प्रकरणातून मी सुटका करीन.

**जिवाजी** : चांदणे, आण ती पंतप्रधानकीची – कबजीची महावस्त्रं.

**चांदणी** : (आत जाते व पोषाख घेऊन येते) घ्या. सजू द्या सोंग.

**देहू** : गुरुजी, वाईट वाटून घेऊ नका. न्यायाची चाड, राखेसारखी जवळ राखता येत नाही. पण ती मनापासून जवळ करावी लागते. समजले. आता कोतवालीवर माझ्या बरोबर चला. आणि शेवटची जबानी म्हणून लेखणीला खरं लिहायला शिकवा.

**जिवाजी** : थांब, देहू., चिलटानं समुद्र ओलांडण्यासारखी घाई, माझ्या लेखणीनं केली, हे त्रिवार सत्य आहे. या माझ्या जबानीतच मी मझ्या स्वैर लेखणीचा संचार उघड करतो. आणि त्याबरोबरच तुझ्या कोतवाली करेलीची सपशेल शरणागती लिहून देतो. आण इकडे ते आतलं माझं दप्तर. (आत जाऊन दोन दप्तरं घेऊन येतो)

**देहू** : गुरुजी, या दोन दप्तरांपैकी कोणतं ते तुम्हीच पहा आणि लिहा.

**जिवाजी** : (कलमबोधाचं दप्तर देहूच्या पायावर अर्पण करीत) देहूराया. मी लिहिलेला हा 'कलमबोध' तुझ्या चरणी अर्पण करीत आहे. हा कोतवालीवर नेऊन याची होळी कर. नाही पेक्षा तो तुकारामाच्या अभंगाप्रमाणं लोकांच्या तोंडी बसेल.

(कलुशाच्या वेषात जिवाजीपंत जबानी लिहू लागतो. देहू व चांदणी अभ्यासाला बसलेल्या विद्यार्थ्याप्रमाणं हसत हसत पहात राहतात.)

---

**<u>प्रवेश दुसरा</u>**

(स्थळ: दूधसागरानजीकची वनश्री. कलुषा कबजी व मोरे मसलतीने बोलत प्रवेश करितात)

**कबजी** : हे पहा मोरे, हरणाची शिकारसुद्धा पारधी चारी बाजूंनी करतो हे लक्षात घ्या आणि आमची मसलत माना. तुळशीबाईवर फारसं विसंबून राहू नका. कारण, आपल्याला राजांना त्यामुळं मोंगलाच्या हवाली करता येणार नाही.

**मोरे** : कां बरं? घरात चाललेलं पुष्कळवेळा घरच्या कर्त्यांनासुद्धा कळत नसतं. पण तेच गावभर झालं म्हणजे षट्कर्णी मसलत राहात नाही. आणि म्हणून तर मी या आपल्या मसलतीत अजून मान्यांनासुद्धा घेतलं नाही. शिवाय माने हे सध्या तुमच्या पातळीवर असून ते सातार्‍यास गेले आहेत. तेव्हा तुळशीनं प्रथम आपला मनोदय असा उघड केला की दूधसागराचा धबधबा पाहात असतानाच संभाजीला त्यात लोटून जीवं मारावं; पण पुन्हा तिनं, -

**कबजी** : (मध्येच) बेत फिरविला असंच ना? मोरे, सूर्यापुढं जसं चंद्राचं तेज फिक्कं, तसं प्रियकराच्या विलासापुढं प्रेयसीचं मन मुकं. नृपराजनीती ही वारांगनेसारखी. राजावर भाळलेल्या स्त्रीचं राजकारण म्हणजे माकडानं माडाच्या झाडावरून तोडलेला नारळ. धड मुखात खोबरंही नाही, की हातात नारळाची आई नरोटी नाही. तेव्हा तुळशीकडून दूधसागराच्या धबधब्यातून निघणार्‍या कारंज्याच्या धारंत तुळशीचा विचाराच्या अग्नीधारा प्रगट होतील आणि त्यांत संभूराजे ठार होतील, असं मला नाही वाटत.

**मोरे** : एकापरीनं शंका बरोबर. तरी पण ऊन-पावसातच इंद्रधनुष्याला प्रेमाचा पोरखेळ हा स्वर्गातूनच पृथ्वीला दाखवावा लागतो.

**कबजी** : याचाच गर्भित अर्थ हा की, प्रेम आणि वैराग्य हे अगदी जवळच्या नात्यातून हातात हात घालून जिवंत राहात असतात. जानव्याची गाठ ब्रह्मस्वरूप असते. म्हणून विहिरीच्या दोरीची गाठ त्यास्वरूपाची मानणं हा मूर्खपणाच ठरेल. अगडबंब मूर्तीच्या पुढं सुतपुतळी काय कामाची हो.

**मोरे** : कबजीबोवा, या तुमच्या शंका खर्‍या मानल्या; तरीपण तुळशी ही जशी शृंगाररसाची हिरकणी आहे, तशीच ती छेडलेली वाघीण आहे. सुडाळलेली नागीण आहे, हेही विसरू नका.

**कबजी** : पण या सार्‍या तिच्या देहस्वभावात, प्रेमाचं पिशाच्च थैमान घालतंय, हेही नजरेआड करता कामा नये. देव दगडाचे म्हणून जशी माणसांची त्यांवर भक्ती तशी तारुण्याच्या उर्मीतली उतू जाणारी प्रीती. म्हणून मी म्हणतो की राजांना बेसावध

असताना पकडूनच त्यांना तुम्ही आम्ही मोंगलांच्या हवाली करू या. अहो, मनोविनोदनार्थ मांडलेल्या प्रयत्नात कालक्षेप न करणं हेच मुळी यश. तेव्हा तुम्ही गणोजी शिरक्यांकडून संगमेश्वर कसब्यात भाईचाऱ्याच्या भोजनाचा बेत आखा. मी राजांना तुलशीच्या आग्रहावरून त्याठिकाणी घेऊन येतो. आणी मग तुम्ही आम्ही--

**मोरे** : (एकदम मध्येच आनंदून) एकदम मोंगली सौन्याचा वेढा घालून संभ्याची शिकार अचूक साधायची. (हातावर हात देत) बस बस कबजीबाबा, सोळा आणे तुमची ही मसलत. सुरेख बेत.

**कबजी** : हो. पण मोरे. राजांना पकडायचा हा बेत, म्हणजे बलदंडाबरोबर भाईचाऱ्याच्या भोजनाचा बेत तसाच शाल्योदनी थाटामाटाचा अगदी टोलेजंग करायला हवा.

**मोरे** : समजलो. म्हणजे एका बाजूनं वाद करता करता, सहज दुसऱ्या बाजूला जाऊन मिळतं जुळतं – घ्यायला हवं. कबजीबाबा, तुम्ही काळजी करू नका. भाईचाराचा बेत असा आखतो की, जणू काय अभिमन्यू-वधाचा चक्रव्युह! राजाला पाण्यात पाहण्याऱ्या तुळशीला वाटावं की, संभ्यावर आग पाखडून मग त्याला आगीत लोटावं.

**कबजी**: पाहू या तुम्ही कसा काय बेत रचता तो? मुक्याला बुद्धीच्या बृहस्पतीशी पैजहोड जिंकायची आहे. नैवेद्याच्या ताटातल्या खिरीनं, क्षीरसागराला मेजवानी देणार आहात? हे मोरे विसरू नका. अहो, नक्षत्रांनी प्रकाशलेलं आकाश, समुद्रात प्रतिबिंबित झालं म्हणून ते खाली, गळून पडलेलं आहे, असं समजून नसत्या भ्रमात बेसावध राहू नका. गाठ आहे, शूर छत्रपती संभाजी राजांच्या बाहुबलाशी.

**मोरे** : अहो, ते समजूनच आम्ही पादशाही सल्ल्यानं तुमच्या मसलतीत सामील झालो. कबजीबाबा, संभाजीला कैद केलं की, तुमच्या मागणीचा विचार शहानशहाकडून पुरा झालाच म्हणुन समजा.

**कबजी** : पहा बुवा, कारण, आपला गरजुपणा दुसऱ्याच्या दृष्टीला पडण्यात आमच्यासारखा कुलीन-मोठ्या मनाला फार इजा वाटते.

**मोरे** : साहजिक आहे. स्वाभाविक गरजांचा आपल्यासारख्या महत्वाकांक्षी श्रीमंत मनावर त्याचा घोर परिणाम होण्याची भीती असते.

**कबजी** : अहो, ती सुद्धा दाखवायला आमच्या मोठ्या उदार मनाला संकोच वाटतो. मोरे, राजांना पकडून देण्याची ही मसलत मला तुम्हाला सांगताना माझं विचारी मन आतल्या आत जळून खाक होतंय याची तुम्ही जरा माझ्या दृष्टीनं कल्पना करा. अंधार सूर्याला गिळतो की काय? असं वाटतंय. अमृताला मरण आलंय की काय? असं दिसतंय. भुजंगाला बेडूक गिळतोय की काय? असं पाहतोय! सर्वत्र भयाण भय़ाण भेसूर असं काहीतरी अंधारल्यागत जाणवतंय. जिवावरला ह बेत, माझ्याच प्राणावर बेतणारसं स्पष्ट होतंय.

**मोरे** : जाऊ द्या, कबजीबाबा, हे सारे देवमाणसांचे विचार आहेत. साधुसंतांच्या मनांतले ते शांतीचे चाळे आहेत. आपण सध्या आस्मानात वावरणाऱ्या सैतानी विचारात आहोत. आणि कलियुगाच्या युगपुरुषाची आपण करणी करणार आहोत. अहो, सत्ययुगात सत्यव्रत असण्यात विशेष काय आहे? लंकेतील सोन्याची वीट जवळ बाळगली, तरी रहात्या घराला मातीच्याच विटांची गरज असते. तेव्हा आपल्यासारख्या काव्यविहार करणाऱ्या छंदोगामात्य ज्ञानी कवीनं,

**कबजी** : (मध्येच) थांबा. मोरे भलताच गैरसमज करून घेऊ नका. केवळ स्त्री-शृंगार जिज्ञासा तृप्त करण्यासाठी मी ज्ञानी झालो आहे. राजे-तुळशीचा चाललेला प्रणयशृंगार पाहून मी कालच त्यावर एक श्लोक केला आहे. आशय प्रौढांचे सुरत युद्धात! ऐका:

अंग अस्साहे छबि अधरन सौहेंचढी ।
आलसकी मोहें धरै आभारति रोजकी ॥
'सुकवी कलश' तैसे लोचने पगे हैं नेह ।
जिनमें निकाई अरुणोदय सरोजकी ॥
राजे रदमंडली कपोल मंडलीमें मानो ।
रूपके खजानेपर मोहर मनोजकी ॥

**मोरे** : वा. बहोतही सुंदर. रसिकता तर शृंगारानं न्हाऊन निघाली आहे.

**कबजी** : म्हणून म्हणतो की, आपली ही मसलत नीट सावधगिरीनं पार पाडा. आम्हाला मराठेशाहीचा मांडलीक म्हणून मान्यता द्या. आलमगीराच्या कदमावर आम्हाला रुजू करा. म्हणजे मग आम्हाला चांदणीशी संधान साधता येईल.

**मोरे** : (हसत) वा. तुम्हा परदेश्याचं चांदणीशी सख्य म्हणजे शाळूच्या शेतात तुरीची पेरणी म्हणायची.

**कबजी** : काहीही म्हणा. पण भग्न हृदयावरल्या स्मृती म्हणजे कड्याला बिलगलेल्या वेलीप्रमाणंच त्या दुरून उजळ नि सुंदर दिसतात.

**मोरे** : अस्सं. बरं. तो विचार आपण ठरलेली मसलत पार पाडल्यावर करू. तुम्ही जाऊन तुळशीला, संभूराजांना दूधसागरात अपघाती मरण देण्याची आठवण करा. त्यात यश आलं तर काम भगलं. नाहीपेक्षा तुमच्या मसलतीच्या तयारीला लागतोच मी. (जातो)

**कबजी** : सत्यासत्य आणि न्यायान्याय यांचा विचार करताना अगोदर जिभेला बायकोप्रमाणं जसं कह्यांत ठेवावयास हवं, तसंच माथ्यातील मेंदू हा सैतानाच्या डोक्यातून क्षणभर उसनवार मागायला हवा. तरच अशा कृतघ्नतेच्या मसलती खाल्ल्याघरचे वासे मोजीत विजयी होत राहतात. हे कडू औषध महत्वाकांक्षी राक्षसी जिभेला प्रथमदर्शनी गोड रुचकर जाणवलं, तरीपण गळी उतरताना अंतिम ते घशाला खूपच झोंबणारं प्राणघातक होतं. नव्हे कुत्र्याच्या मौतीचं मरणही देतं. (जातो)

---

<u>**प्रवेश तिसरा**</u>

(स्थळ: दूधसागर घबधब्याच्या मध्यंतराच्या खडकातील एक निसर्गरम्य पोकळी व त्यातील संभाजीमहाराजांकरिता खास विश्रांतीचे उभारलेले निवासस्थान. वरून दुग्धधारांप्रमाणे भासमान होणारा वर्षाव व त्यातून सूर्यकिरणांमुळे निरनिराळ्या रंगांची इंद्रधनुष्ये निर्माण होत आहेत! संभूराजे तुळशीच्या गळ्यात हात घालून पण उंची मद्याची लज्जत अधून मधून घेत धबधब्याचे सौंदर्य पहात आहेत)

**संभाजी** : (गोड धुंदीत) तुळशी, समुद्रमंथनातून देवांच्या हाताला अमृत लागलं असूनही त्यांनी ते बंद केलं नाही, शेवटी त्यांच्या हाती विश्वास आग लावणारं कालकूट विष आलं. महाकालाबरोबर खेळण्याचं सामर्थ्य एकट्या मृत्युंजय

महादेवाच्या मनगटात होतं; म्हणूनच ते भोळेपणानं घटाघट प्राशन करून नीलकंठ झाले.

**तुळशी** : राजांचे सामर्थ्यही तसंच आहे. आता फिरंगी पुन्हा वर डोकं काढणार नाही.

**संभाजी** : (तुच्छतेनं) स्वतःच्या सामर्थ्याचं अज्ञान, हेच फार वेळा पराभवाचं कारण असतं. शत्रूच्या बातम्या काढण्यापेक्षा आपल्याकडे त्यांना लक्ष न देण्याइतकं सामर्थ्य, मनगटाच्या जोरावर आणी वाणीच्या जरबेवर शत्रूंना सतत दाखववावयास हवं. आधी गाजवावे तडाखे मग भूमंडळ धाके. ही समर्थवाणीची करणी आम्ही आत्मसात केलेली आहे. जाऊ दे हा लढाईचा विषय. तूही एक आमच्या हातून मद्याचा घोट घे. आणि पहा हा दूधसागराचा धबधबा. एखाद्या महर्षीच्या सत्वपरिक्षेसाठी विधात्यानंही मद्य आणि मदिराक्षीबरोबर अशा निसर्गरम्य स्थलांची निर्मिती केलेली दिसते. लाडके, या चंचल आणि मायावी जगात, विद्वान लोकांपुढं दोनंच मार्ग आहेत. पहिला अशा ठिकाणी राहून आत्मज्ञानाच्या आनंदात निजानंदी मग्न होणं. किंवा सौंदर्यसंपन्न रूपवतीच्या उन्नत स्तनभाराचा आश्रय घेत, मांसल मंचकावर मोहनिद्रेत पहुडणं, हेच ते होत. नवयौवनेच्या कंचुकीआड मदनराजानं काळ्या मोहरा सीलबंद करून ठेवलेले सुवर्णकुंभ म्हणजे तुम्हा तरुणींचे स्तन. किंचित् उमललेल्या मोगरीच्या कळ्यांचा गजरा, मस्तकावर फणा उभारलेल्या केशकलापाच्या काळ्या सर्पिणीवर खोवलेला आहे. तिला धुंद फुत्कारण्याकरता मधुयौवनेनं आपलं सर्वांग उटी-चंदनाच्या केशर कस्तुरीनं विलेपित करीत आपला उरोभाग कामी पुरुषांच्या दृष्टीत भरवून त्याला थोडासा स्पर्श करण्याचा नेत्र कटाक्षानं इशारा देत आहे, अशावेळी प्रणयी वसंतऋतू हा मदनाला जागं करीत प्रेमी जोडप्यांना स्वर्गप्राप्तीचा आनंद न देईल तरच ते आश्चर्य. तुळशी, हा घे आणखी एकच मद्याचा घुटका. तो घेतला असता आम्हाला निसर्गदत्त कलेचं सौंदर्य, विशुद्ध प्रेमाचा लाभ आणि त्यातच ईश्वरी आनंदाचा खरा साक्षात्कार होतो. तुळशी घे हा. (तिला मद्य देतो) आज तुझ्या सौंदर्याची लज्जत बाकी अपूर्वच वाट्ते.

**तुळशी** : राजीवेंद्रा. अरसिकाच्याही अभिरुचीला मोह पाडणारं हे सह्याद्री सौंदर्य आहे. तुळशीचं नव्हे. पण माझ्या खऱ्या मनोगताला हे आपलं सोंदर्य-वर्णन ओशाळल्यागत वाटतंय. पाण्याच्या लाटा पाण्यात विरतात. उमलतं सौंदर्य वयाच्या

वाढीबरोबर कोमेजून जातं. (उसासून) राजे, भडकलेल्या अग्नीला लोण्याचं आमिष. तसंच हे राजांचं चाललेलं सौंदर्यपूजन. अमृत आणि कालकूट ही सख्खी भावंडं असूनही मरणाच्या भीतीनं ते 'अमर' म्हणविणाऱ्या देवांनी सुद्धा पिण्याचं टाळलंच ना?

**संभाजी** : तुळशी, गंभीर वृत्तीतला कुलीन वृद्धवयाचा कालपुरुष, हा प्रणयीजनांच्या सुखमय एकांताचे वेळी, लज्जाशील वृत्तीच्या वेगात पावलं टाकीत निघून जातो! पण तोच दुःखीजनांचे समधानपर सांत्वन करण्यासाठी तिष्ठत राहून सोबत करतो. तारका, चंद्र आपणांकडे पाहात आहे, असं जे दुःखी प्रणयी जोडप्याला वाटतं, याचं कारणही हेच. (तुळशी खिन्न होऊन मुग्ध बनते) तुळशी, तू गप्प का? समुद्रावर आतल्या गाठीचा मनुष्य पोटात 'असेल नसेल' ते ओकू लागतो, तसाच या सूर्यास्ताची सोनेरी किरणं, उसळत्या धबधब्याच्या दुग्ध राशींतून इंद्रधनुष्यात चित्र-विचित्र रंग भरत असलेला हा दूधसागराचा प्रदेश आपल्याला बेफाम बडबडताना सभोवार दिसतोय. मग तूंच यावेळी मुखदुर्बल का? बोल ना?

**तुळशी** : राजसा, काय बोलू? अमृताचा सागर गवसल्यावर त्यात बुडून मरण्याची भीती कोण बोलून दाखविणार? बरं, चंद्र हाती आल्यावर उकाड्याचा श्वास कशाला? प्रत्यक्षात पंख फुटल्यावर पाखरं गगनात भिरभिरणारच. राया, सख्या! तुळशी दर्यात आलिंगन देताना प्रथम लाजली पण आज समक्ष ते मिळत असताही मला आपली सावली बाधली. जीव धास्तावून मुक्यानं म्हणतो, सूर्य मावळल्यावर चांदण्या या आकाशात लुकलुकणारच. सारा हा आपल्या विनाशी जीवनाचा शृंगारिक खेळ चालला आहे. तुळशीचा साजशृंगार धन समर्पणानं पुरा होणार नाही. अन्नसंतर्पर्णांना भुकेलेल्या जीवांनाही संतुष्ट करणारा नाही – तर शेवटी, यमाच्या हाती दर्पण देऊन आपलं नि माझं तर्पण करणारा ठरणार आहे. सुंदर स्त्रीयांना स्वतःच्या सौंदर्याचा उपभोग घेता येत नाही. पण त्यानं पुरुषांना मात्र मारता येतं. साराच हा प्रेमाभास. आणि त्यातच आपल्याला वाटणारा हा भ्रम.

**संभाजी** : तुळशी, कसल्या थोर भ्रमाच्या विवंचनेतं तू आपलं प्रफुल्ल मन संशयाच्या जाळ्यात गुंतवणुकीनं उदास करून बेचैन बनली आहेस? जरा आनंदी हसऱ्या मुद्रेनं या दुतर्फा पसरलेल्या सुंदर वनश्रीच्या सौंदर्याकडं पहा. दिवसभर थकून भागून दमलेला तो चंडप्रताप भगवान सूर्यनारायण पहा. तो आपल्या सहस्त्र-

किरण सेवकांनिशी अग्निरथांतून अस्तंगत होत आहे. ते पाहून उषेनं आपलं गोरंमोरं तोंड, विरही सूर्यकमलिनीकडं फिरवून तिच्या लीला मावळत्या आशेनं पाहात आहे. चोरून मकरंद पिण्याऱ्या भ्रमराची वाट, अंधुक आशेमुळे तिला दिसताच कमलिनीला अंधाराबद्दलची आदरभावना निर्माण होत आहे. कोकिळ-कूजनांना मयूर पक्ष्यांनी आपल्या केकारवात प्रतिसाद देऊन सुंदर मोरपिसाऱ्यांची रंगीबेरंगी प्रभावळ उभरल्यामुळं स्त्रैण-शिखंड्यांनाही वीरोचित शृंगाररसात अथांग बुडण्याची संधी या इथल्या निसर्गरम्य वनश्रीनं क्षणैक कां होईना पण ती यावेळी दिलेली आहे. क्षणभंगुरतेच्या जोडीला, क्षणिकता ही सौंदर्याबद्दलची उत्कंठा वाढवीत आहे. वर आकशाकडे पहा. बिजलीचं चांचल्य, हे कामातूर झालेल्या मेघांना कोरड्याच गर्जना करायला लावीत आहे. तर चिरकालीन सौंदर्यात दिव्यत्वाचा प्रकाश देणाऱ्या अनंत तारका या चंद्रोदयाची उत्कंठा रोमांचित राहून लुकलुकत आहेत.

**तुळशी** : राजेन्द्रा, पण हाही सारा भ्रमाचाच खेळ. निसर्ग हा वनश्रीशी खेळून आपलं क्षणभंगूर जीवित तिच्यावर विश्वास टाकून मातीमोलाचं करीत आहे, असं नाही का आपल्याला वाटत? भ्रम. भ्रम. निव्वळ हा भ्रमच. उपेन्द्रा, या भ्रमाच्या झाकल्या मुठीतच पापाच्या अनंत राशी झाकल्या जातात. पण उदास मनानं त्या साऱ्या खिन्न मुखावर उघड होतातच. जडाव्याच्या तुळशीनं जडणी जडल्या. कायेनं करणी घडल्या; पण प्रेमाच्या घड्या विस्कटल्या. (उसासा टाकीत) रायाच्या संगतीत राहून प्रलयकालाच्या कडाडलेल्या विजा पाहिल्या. रायगडच्या रणमर्दाची रंभाराणी राहून शृंगारशेज सजविली. राजहंसाची कलहंसी बनून जोबनशाहीचा जलविहार केला. रायगडला माझ्या उरी रसरसलेली गुलाबी गेंद दिसली. गाली सुरमांचे बुंद, ठसठसलेली मर्दानी नजरेत भरलेली पाहिली म्हणून तर राया, ही तुळशी तुम्हाला मिठी मारून फसली. तुळशीच्या सौंदर्याचं सुकाणू सख्या, तुम्ही माझ्या मतानं 'आंवळं' मारीत हांकारलं; पण तेच आज उलट्या वाऱ्यावर भिरभिरून बुडायला लागलं.

**संभाजी** : तुळशी-तुळशी. आम्ही काय केलं म्हणजे तू या भ्रमातून दूर राहशील? अशी भ्रमिष्टासारखी पाहात्येस काय?

**तुळशी** : आपल्या दोघांचा नाश! प्राणाचा अंत!! जीवनाचा शेवट!!! राज्याचा अस्त. (विकट हास्यात) मराठेशाहीची मौत. महाराष्ट्रधर्माचं मरण. राया, रती एवढी आपली भूक. पण ती भुकेली रती आज उपरतीला मारून अधोगतीच्या खोल गर्तेत रुतून बसली आहे. राजीव-नैना, आता आपण तुळशीच्या मानेवर आपल्या हाताचा विळखा घालून, या अवघड ठिकाणी बेहोष धुंदीत उभे आहात. अशा वेळी मी माझ्या जोबन लेहऱ्याच्या पदरसावडीनं जर राजांना खाली ढकलून कडेलोटाची हौस पुरी केली, तर या तुळशीचं आपण काय कराल? खरंच विचारते की, यावेळी मी आपल्याला खाली ढकललं तर आपण काय कराल?

**संभाजी** : म्हणजे? तू मला खाली ढकलून देण्याचा बेत निश्चित केला आहेस का? (ती बोलत नाही) का? बोलत नाहीस. तुळशी, तूं मला खाली ढकलून देण्याची, फार काय पण हौसेनं बोलण्याचीसुद्धा तुझी छाती नाही. पहा माझ्या डोळ्यांकडं. मी मराठ्यांचा राजा आहे. आबासाहेबांच्या देवतुल्य पुण्याईचा अंश तुला माझ्या डोळ्यांत, आदित्याच्या बारा डोळ्यांतील प्रखर तेजाप्रमाणंच तो दिसेल. लक्षात ठेव. मी हाती खडे घेऊन ती हिरंमाणकं आहेत असं म्हणून पुढं केली तर ती नाही म्हणायची तुझीच काय, पण प्रत्यक्ष कुबेराचीसुद्धा छाती नाही. तू मला पाताळांत नेऊन गाडलंस तरी शेषाची टाळू फोडून त्याचा सर्पमणी, मी गगनांतील तारांगणात तो भिरकाऊन देईन आणि आबांच्या पुण्याईनं काळाचा जबडा फाडूनही मी तुला जिवंतच असलेला दिसेन. तुळशी ढकल पाहू मला या धबधब्यात? आहे तुझी हिंमत?

**तुळशी** : नाही. राजसा मुळीच नाही. मदिरेच्या कैफामुळं ही तुळशी चळली. वचनापासून ढळली. रात्रंदिवस कमळ पाण्यात राहूनही ते भिजत नसतं. तशीच माझी गत. प्रेताच्या हाती रत्न. जन्मांधाला प्रकाश किवा कावळ्याला चांदण्याचा स्पर्श. अशक्यच नाही का? सर्पाबरोबर खेळणं, वाघाशी झुंजणं, हलाहल पचविणं या गोष्टी अतिमानुषशक्तीच्या अलौकिन पुरुषांच्या नित्याच्याच सवयी असतात, हे मी विसरले.

**संभाजी** : तुळशी, अलौकिक पुरुष आपल्या कार्याच्या जगातून, सुखासाठी सर्वांना साधारणीभूत अशा इच्छेच्या क्षेत्रात उतरताच सामान्य जनांना त्यांचं आपलं साम्य पटू लागतं. या साम्यामुळं सलगी वाढते. जीभ मोकळी होते. अनादरात पर्यवसान

होतं. अपमानात आनंद रमतो. त्याचे सर्व अलौकिकच असेल, अशी लोककल्पना असते. समानशील हे सख्यत्वाचं म्हणजे आनंदाचं जसं मूळ आहे, तसंच ते पाहणंही एक प्रकारचं खूळचं म्हणावं लागेल. वृक्ष आपली आतडी भूमातेच्या उदरात ठेवूनही त्यांना तो जिथं फुलं फळं दाखवू शकत नाही, तिथं जिवापाड जोपासलेले जीवाला जीव देत कसे जगणार?

**कबजी** : (घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करून) महाराज, फोंडा घाट ओलांडून मोंगली सैन्यानिशी शहाजादा आलम नजीक येऊन ठेपला.

**संभाजी** : (बेफिकिरीत) येऊ दे. कबजी जा. त्याला घेऊन या इथं. सांगा मराठ्यांचा राजा कसे विलास करतो आहे, हे शिकायचं असेल तर जरूर या वेळी मोंगल शहाजाद्या आलमला पाह्यला घेऊन या. तुळशी भर तो पेला आणि बैस अशी जवळ. शृंगारिक विलास, काय मोंगलांना रति-मदनानं दान दिले आहे?

**जोत्याजी** : (धापा टाकीत व घाबरलेला प्रवेश करून) राजे, मोंगलांचा वेढा या दूधसागराभोवती लवकरच पडेल. महाराजांनी राजापूरकडे कूच करावी.

**तुळशी** : राजांनी या आपल्या एकनिष्ठ जोत्याजी केसकेरांवर विश्वास ठेवून, त्याचा सल्ला विचारात घ्यावा. शिवाय, आपल्या शत्रुंच्या चांगल्या गुणांशी आणि मित्राच्या पडक्या गुणांशी राजांना यापुढं तोंड द्यावं लागणारच.

**संभाजी** : आम्ही या वेळी तुझ्या मुखचंद्राला आणि या मद्याच्या प्यात्याला तोंड देऊनही शत्रूंच्या सैन्याला तोंड देऊ शकतो. तुळशी घाबरू नकोस. कबजी, राजापुराकडे कूच करा. सैन्याला माघार घेताना आमची आज्ञा कळवा की, येथून थेट राजापूरपर्यंतचा मुलूख बेचिराख करा. साऱ्या विहिरीत विष कालवा. शहाजाद्यांना त्यांच्या सैन्यासाठी धान्याचा एक कणन् कणही मिळता कामा नये. प्रतिवर्षी नवीन जन्म घेणारी वनस्पती सृष्टी अशा वेळी कामी येते हे विसरू नका. जा. (कबजी जातो)

(पडद्यात : 'दीन दीन!' व "अल्लाहो अकबर" च्या आरोळ्या)

जोत्याजी, आमचा खास जिलबीचा घोडा तयार ठेवा. आम्ही तुळशीला घेऊन येतोच.

**जोत्याजी** : (जाता जाता) जी सरकार. घोड्यावर जीन तयार आहे. (जातो)

(पडद्यात : पूर्वोक्त गलबला. तुळशी रड्ण्याच्या आविर्भावानं सूडाच्या मुद्रेत)

**तुळशी** : राया, मला तुमची काळजी –

**संभाजी :** वेडी आहेस. मृत्युलोकची वस्ती इतकी क्षणभंगूर आहे की प्रथम चुंबनानं रंगलेले प्रणयी कपोल, अंत्यविरहाच्या अश्रुंनी कधी कधी धुतले जातात. अग, भित्येस कशाला? यांच्यापैकी एकाचीही मला पकडण्याची हिंमत नाही. हे बघ. तुला अशी बकोटीला धरून मोगली सैन्याची फळी फोडून हा मराठ्यांचा राजा इथुन बिनधोक पुढं पाऊल टाकीत आहे.

(तुळशीसह संभूराजे जातात)

(पडद्यात: “दीन दीन” व “ हरहर महादेव” च्या गर्जना होतात)

---

**<u>प्रवेश चवथा</u>**

(स्थळ : वरंध घाटानजीकची रामघळ. जिवाजी कलमदाने हा कलुषा कबजीच्या वेषांतरातून जीव बचाविण्यसाठी परांगदा होत असलेला घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो)

**जिवाजी :** (श्वास सोडीत) सुटलो बुवा त्या दासी कुळंबिण्यांच्या नजरेतून. त्यांच्याशी लगट करणं म्हणजे बोरी-बाभळीनाच कवटाळणं होय. अधिक अंगलगट करायला गेलो आणि अंगवस्त्राच्या चिंध्या करून तेही गमावून पळत सुटलो. अंग चोरून पळायला हा चांदणीनं मिळविलेला कबजीचा वेष, ऐन वेळेला जीव वाचविण्यासाठी उपयोगी पडला, हे एकतरी पथ्यावरच पडलं.

**माने :** (सेवकासह प्रवेश करून) पकडा या हरामखोराला. (सेवक जिवाजीला कैद करतात) चोरा, मान्यांचं वतन खलास करणं म्हणजे काय मराठेशाहीचं दान, मोंगलांच्या हातावर उदक सोडण्यासारखं तुला वाटलं? बोल ना रे ए कनोज्या. माझं वतन चांदणीला कुलमुखत्यारीनं लिहून द्यायला, तू काय अत्तराच्या फायाचा मोफत नमुना समजलास?

**जिवाजी :** (मध्येच काकुळतीनं) नाही हो, माने, मी कलुषा कबजी नाही. वेषानं मनोमन मिळणी, तुम्हाला दिसली, तरी पण लेख़णीची करामत अंतरंगाच्या उमाळ्यात झालेली आहे. जहराच्या थरथरत्या लहरी, बोरूच्या काळ्या कलमानं शिऱ्याची काळी शाई पीत, त्या पांढऱ्यावर काळं करीत उठल्या आहेत इतकंच.

दरिद्री माणसांचे विचार आणि विधवेची वक्षःस्थलं ही जागचेजागी जिरतात! तसंच आम्हा कारकुनांच्या कुरकुरत लिहिणाऱ्या लेखणीवर खरेपणाचा आरोप करणं म्हणजे स्वप्नातल्या संमतीबद्दल जागरण करणाऱ्यांना जबाबदार धरण्यासारखं आहे हो.

**माने** : वारे परदेश्या! ठीक. तू हे बोलताना चेहरा इतका निर्मल ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला आहेस की चित्रगुप्तानंसुद्धा तुझ्या या गोष्टीची जमा न जाणता, घडलेल्या पातकांतच केली असेल.

**जिवाजी** : छे, हो. चित्रगुप्ताच्या पापाचीही नोंद, स्वप्नात विश्वामित्राला राज्यदान देणाऱ्या सत्वशील हरिश्चंद्रराजाप्रमाणं मी करणारा एक कसबी कारकून आहे. मानेसाहेब, अर्धनारी नटेश्वराच्या स्वरूपात स्त्री-पुरुषांचे लिंगभेद जसे गुप्तपणानंच पाहावे लागतात; तसेच वेषांतरित व्यक्तीची मनं,-

**माने** : (मध्येच) चौकशी न करता ती फितुरी समजून तडकाफडकी नाहीशी करणं, हे पहिलं काम. वाटेला जाणाऱ्यांची प्राणांतिक वाट लावणं जर वेळेवर केलं नाही; तर शत्रुला विल्हेवाट लावायला वाट मोकळी सापडेल. दूध प्याल्यावर मरण येत नाही तर त्यांत विष कालवलं म्हणजेच ते येतं. समजलास.

**जिवाजी** : (गयावया करीत) खरंच मानेसाहेब! अहो, माझ्यावर दया करा. मी कबजी नाही.

**माने** : कबजी नसल्यास त्याचं सोंग घेणारा एखादा पाजी असशील.

**जिवाजी** : आहे, मी एक मोडी लिहिणारा पण बाळबोध वळणाचा गरीब कारकून आहे. मानेराजे, स्थीरबुद्धीत अमृताचा झरा असतो. माझे प्राण न घेता मला जीवदान द्याल, तर मरेपर्यंत मी आपले उपकार विसणार नाही.

**माने** : तेच मला नको आहे. (सेवकांस) अरे, या बहुरूप्याला आपल्या छावणीत नेऊन, याचा ताबडतोब शिरच्छेद करा. मला पादशहाला कुर्निसात करायला वेळेवर हजर राहिलंच पाहिजे.

(माने घाईघाईन निघून जातो)

**जिवाजी** : (जाता जाता) अरेरे! राजकारणात लेखणीचा दुरुपयोग करून पंतप्रधानकीच्या बढतीत तात्पुरता चढलो, पण तिनंच माझा जिवानिशी घात केला. कलुषामुळं ज्या चांदणीसाठी, जिवाजी तू चळलास, तिनंच मला मृत्युदंडाची शिक्षा

दिली. हाय रे कलमेश्वरा! शेवटी तुझ्या नागाच्या फणीची छाया, बेडकाला घेता येत नाही, हेंच खरं. (सेवक धक्का देत आत नेऊ लागतात) थांबा, बाबांनो. या जिवाजी कलमदान्याला जिवं मारणार आहात तेव्हा असा सफाईनं माझ्या मानेवर वार करीत प्राण घ्या की मी मरेपर्यंत माझ्या लेखणीचे आणि मान्यांचे उपकार विसरणार नाही.

(जिवाजीला मान्यंचे सेवक एका बाजूला घेऊन जातात तोच दुसऱ्या बाजुनं कलुषा कबजीला कैद करून मोरे आपल्या सेवकानिशी प्रवेश करतो.)

**मोरे** : माफ करा, कबजी. कारण ज्या प्रवासाचा शेवटचा मुक्काम निश्चित नसतो, त्यात ही अशी प्राणांतिक दिशाभूल होणारच. भेसूर दिसणाऱ्या चित्रांनीसुद्धा उठून उभं राहावं, अशी तुमची एकेक कृष्णकृत्यं मराठेशाहीत झालेली आहेत. ती पाहून आम्ही मरठे यापुढं तुम्हा परकियांकडे नुसते चित्रासारखे तटस्थ राहून पाहू शकत नाही. मराठ्यांच्या दुहीचा फायदा घेऊन तुम्ही प्रत्यक्ष आपल्या अन्नदात्यावरही सापाप्रमाणं उलटलात. तेव्हा अशा बेईमानी माणसाला आलमगीराच्या हवाली करणं हे या मोऱ्यांचं पहिलं कर्तव्य आहे.

**कबजी** : मोरेसाहेब, आपण मला विश्वासात घेऊन सल्ला मसलतीत घेतलं आणि राजांना पकडून दिलं, त्याचं हे मला बक्षीस?

**मोरे** : पुढं आलेले दात, पुढं पुढं करणाऱ्या परदेशी माणसाप्रमाणं दुसऱ्याच्या दातांना आपल्यासारखेच करायला लागतील, तर त्याची तोंडफोड करून सारी बत्तीशी घशात घालायची किमया, आम्हा मराठ्यांना उपजतच कळलेली असते, हे विसरू नका. तुमच्या पोकळ डोक्यात कवडीइतकीही अक्कल नसताना, मराठेशाहीचा पंतप्रधान म्हणून स्वतःचा उदो उदो करून घेतला आणि उसाचा फड आयता हाती आला असं समजून तुम्ही आपल्या अधिकारसत्तेचा चरक सुरू केलात. पण नारळात काय पाणी असतं हे आपटल्यावाचून जसं समजत नाही, तसंच मराठ्यांच्या पाणीदार डोळ्यांतील पाणी काय असतं, हे तुम्हा लुडबुड करणाऱ्या विदेशी माणसांना थप्पड दिल्यावाचून (श्रीमुखात भडकविणार तोच विचार करून) पण नको. या थोबाडाला हस्तस्पर्शाचा विटाळसुद्धा मला करायंच काही कारण नाही. आलमगीरापुढं यानं केलेली दुष्कृत्यं, हीच छीः थू करायला पुरी आहेत. (सेवकांस) घेऊन चला या

मांगाला मोंगलांच्या छावणीत. – तुळापुरी. मी साबाजी हिरोजीसकट राणी येसूबाईला कब्ज करून येतोच तिकडे.. (जातो)

**कबजी** : अरेरे! लायकी नसताना अधिकारपदाचा हव्यास धरला. बुद्धीशून्यतेमुळं राजकारण करता आलं नाही ते नाहीच. परंतु घरभेदेपणा करीत राज्यात फितुरीचं विष मात्र फैलावत गेलो. त्यातच चांदणीसारख्या नीच वातावरणात वाढलेल्या पोरीवर नजर ठेवून, वयाची जबाबदारी अधिकारांत विसरलो. म्हणून आता असंख्य चांदण्या काजव्याच्या रूपानं डोळ्यासमोर चमकू लागल्या. मग आता जिवाचं तारांगण मोंगलाकडून होणारच. चंडिका, माताजी! हा कलुषा सेवाधर्माची एकनिष्ठतारूप जबाबदारी विसरला. तेव्हा तुझा न्याय हा कलियुगातही मानणं भगच आहे.

(सेवक कलुषा कबजीला धक्के मारीतमारीत आत नेतात.
नंतर उलट बाजूनं शिलेदारीच्या वेषात देहू दसरी व चांदणी
ही सशस्त्र ढालाईत बनलेली, हसत हसत प्रवेश करतात)

**चांदणी** : बघितलंस, देहूराया. वंगाळ करणी केल्यावर कसं कबजीबाबांवानी जितंपणी झाडा झडती द्यायचा वखुत माणसावर येत त्यो.

**देहू** : त्याची फिकीर वाईट कृत्य करणाऱ्यांना. जाऊ दे. त्याचा विचार सध्या आपण कराच कशाला? आपल्याला अगोदर महाराणी येसूबाईची सेवा-चाकरी इमानानं बजवावयची आहे, हे विसरता काम नये. मलाही छोट्या छत्रपतींना, जिवापाड जतन करायला हवं. त्या कबजीच्या कारकीर्दीनं आज मराठेशाहीवर काळ मोठा धामधुमीचा ओढवलाय. प्रत्येकानं सावध राहून या कडू काळाला विचारानं आणि निर्धारानं टक्कर दिली पाहिजे. सखे, निष्पाप बालपणात आकशातल्या तारा आवडतात. तारुण्यात फुलं नि मुलं हवीशी वाटतात.

**चांदणी** : त्येबी थोरलं महाराजाच्या कृपेनं आपल्याला लाभतील बघ. राया, तुला शिवाजीमहाराजावानी मोठं व्हावसं वाटतंय ना? तर मग आपण आपल्या पहिल्या पोराचं नावंच “आबासाहेब” ठेवू म्हंजी झालं.

**देहू** : त्या साऱ्या दैवाधीन पुढच्या गोष्टी. देवदयेनं सारं काही द्यावं आणि घ्यावं. चांदणे, बाळपणात खाऊ म्हणून माती खावीशी वाटते; पण म्हातारपणात मातीचं मोल मौतीच्या मोलानं माणसाचं ठरत राहतं.

**चांदणी** : राया! कसं जादूगारावानी मन भारून, सख्या बोलतुयास कितीरं चल, माझी सोबत तुझी सती होईतो राहील. मर्दा, बेडर होऊन कामाला लाग आन् संभूराजांची सुटका करायचा एकच ध्यास घे. मी हैच तुझ्यासंगं कारण असं बघ.

लावलं मला तूं नादी ।
सखया ताईत गंडे वाहीन येड्यावानी ।
तुला मी बिब्बं-फुल्यानं मारीन ।
काजळ, लिंबू, शेंदूर फासोनी ।
आता मी नाड्याअ-पुड्यानं बांधीन ।
मिरच्या उदाची धुरी देवोनि ॥२॥
नग भिऊस संमदी भूतावळ दाविन ।
आग्यावेताळ बावनवीर धाडीन ॥३॥
मग ही चंद्रा, मनांत पूजीन ।
भोळ्या भावाचा देहूराया मानीन ॥४॥

(दोघेही हातात हात देऊन हसत हसत आत जातात)

---

**<u>प्रवेश पाचवा</u>**

(स्थळ: संगमेश्वर कसब्यानजिक पडलेल्या औरंगजेब बादशाहाचा तळ.
संभाजीराजांना पकडून मोऱ्यांच्या स्वाधीन केलेली तुळशी,
ही मंजुळेसह संतापलेली प्रवेश करते)

**तुळशी** : (रागानं) मंजुळे, तुला मी बजावून सांगितलं होतं.

**मंजुळा** : होय, बाईसाहेब. पण महाराणी येसूबाईंच्या पायांतील सोन्याच्या साखळ्या लांबवायला तशी वेळच मिळाली नाही.

**तुळशी** : मंजुळे, खबरदार त्या येसूबाईला महाराणी म्हणशील तर. आज ही तुळशीच राजांना, मोऱ्यांच्या हवाली करून, स्वतःच राजाविना मी राणी झाल्ये आहे. सध्या मोरे-माने माझ्या हुक्मात आहेत.

**माने** : (घाईघाईनं प्रवेश करून) तुळशीबाई,-

**तुळशी** : सबूर. तुळशी 'राणी' म्हणून अगोदर मुजरा कर.

**माने** : (मुजरा करीत) राणीसाहेब, मान-पान पाहण्याची ही वेळ नव्हे. संभाजी सावध होऊन धक्कबुक्कीनंच जवळपास येणाऱ्यांना ठार करतोय.

**तुळशी** : ऊं:, नागानं गिळलेल्या अर्ध्या बेडकानं तोंडात माशी पकडण्यासारखी राजांची ही शेवटची धडपड आहे. शौर्याला भीतीनं खाल्लं. परिसाला लोखंड पारखं झालं. सूर्याला अंधारात कोंडलं. या तुळशीनं आज भीमपराक्रम केला. जा. माने, राजांना चांगलं जखडबंद करून, या तुळशीराणीच्या दर्शनाला घेऊन या. जा. (माने मुजरा करून जातो) गंगेच्या पात्रात घाण पाण्याचे ओढे-नालेही पाणलोटांच्या पायानं आत घुसतात. तसे हे मोरे माने मला हाताशी धरून खेळवावेसे वाटतात.

**मंजुळा** : राणीसाहेब, मला सोन्याच्या साखळ्या आणता आल्या नाहीत. पण मराठ्यांच्या राणीचा सोन्याचा करंडा मात्र मी, (देते)

**तुळशी** : (तो घेऊन) चोरून आणलास? अग पण सटवे, मला रांडवेला ही कुंकवाची उठाठेव कशाला? मराठेशाहीचं कपाळचं मी जिथं पांढरं फटफटीत करायला निघाले आहे, तिथं हे कुंकू आणि हा करंडा पायदळी तुडवून मोंगलांच्या गोटात लाथेनं ठोकरून रिकामा करत्ये. चल निघ इथून.

(मंजुळा घाबरून आत जाते. करंड्यातील कुंकू जमिनीवर सांडून सोन्याचा रिकामा करंडा दूरवर भिरकावून द्यायला व संभूराजांना सेवक घेऊन यायला एकच गाठ पडते, तुळशी विकट हास्य करत्ये.)

**तुळशी** : या देशोधडीला लाज लावलेल्या आपल्या या आवडत्या निर्लज्ज तुळशीचा राजांना हा अखेरचा बादशाही सलाम. पतंग दिव्याचा मत्सर करतो; पण मरतो मात्र बिनचूक.

**माने** : राणीसाहेब, राजांचे डोळे इतके तांबडे लाल दिसू लागले की पतंगसुद्धा दिव्याला सोडून या डोळ्यांवरच झेपावू लागले,

(विकट हास्यात जातो)

**संभाजी** : बदमाष. पळाला. मला बेसावधपणानं कैद करून, माझ्या विलासाची नशेची अशी थट्टा करतोस? आणि ही माझी अंगअंगना अवदसाही,

**तुळशी** : बिनबोभाट राजाविना राणीच्या दिमाखात संभाजीपुढं उभी आहे. पारध्याच्या जाळ्यातून पक्षी पळाला म्हणजे तो निर्भय होतो, तशी आज ही तुळशी,

बेजबाबदार राजांच्या शृंगारिक मगरमिठीतून मुक्त झाली आहे. सूडाळलेल्या नागिणीप्रमाणं डूक धरून कडकडून चावा घेणार आहे. चुंबनाऐवजी दंश करणार आहे.

**संभाजी** : घे. म्हणजेच माझ्यासारख्या भोगलोलुप विलासी राजांना कळून चुकेल की स्त्री-दंभात सत्याचा कोथळा फोडून त्यात प्रतारणेनं दुष्ट कृत्यांचा पेंढा भरलेला असतो, आणि तोच त्याच्या नाशाला कारण होतो.

**तुळशी** : सौंदर्यशांतीला लुबाडणारे तुमच्यासारखे उल्लू राजे, हे स्त्रियांचे पातिव्रत्य नेहमीच लुतत राहतात. गरती स्त्रियांना मायारूप मांगणीची अवकळा आणतात. मग साधू-तपस्व्यांचे तांडे त्यांनी भ्रष्ट करून विवेकाची गळचेपी केली किंवा वैराग्याची खोड मोडली तर धर्मनिष्ठ राजांनी दोष कुणाला द्यावा? स्त्रीलंपट शृंगार सजणा, बोल ना?

**संभाजी** : काय बोलणार? भ्रांतीच्या मुठीत चौदा भुवनही कमी पडतात.

**तुळशी** : (मध्येच) तशी भातुकली खेळणारी भ्रांती, ही तुळशीच्या रूपानं विषयांध राजा, आज तुला 'केल्या कर्माची' आणि 'मेल्या राजधर्माची' आठवण करून देत आहे. नीट ऐक या तुळशीचा हा उपदेश. अरे, स्त्रीसह सर्पावर पहुडणं, हे श्रीविष्णूलाच शोभून दिसतं. विषयसुखात, भोगविलासात आनंद मानून, "ना विष्णुः पृथिवीपतीः" म्हणून विषयांध राजांनी मिरवायचं नसतं. समुद्रात राजा चळला तेव्हाच तो तुळशीचा गुलाम झाला. लगीनघाईचा लागाबांधा साधणारा नावाचा दौलती नवरा मेला आणि तुळशीला त्याचा मरता बोल प्रतिज्ञेनं पुरा करावा लागला.

(पडद्यातून पूर्वोक्त आंतरिक्षबोल घुमलेले ऐकू येतात-
"केवळ मराठेशाहीच्या ईमानाच काय पण मी महाराष्ट्र-
धर्माचासुद्धा संन्यास करीन. संभाजीचा सूड घेईन.")

**संभाजी** : अरेरे! आज अग्नीलाच लाकडं भस्म करायला निघालेली दिसतात.

**तुळशी** : पण भस्म झालेल्या अग्नीत तेला-तुपाची धार सोडूनही तो पुन्हा पेट घेत नाही. मराठ्यांच्या राजांचा तेजोभंगही या तुळशीनं असाच सोन्याच्या साखळ्यांची माग़णी करून केलेला आहे. नादान राजा, तुळशीला महाराष्ट्र धर्माचा झेंडा फ़ाडू दिलास; मराठी राज्याचा वैभवशाली जरीपटका माझ्यासारख्या रांडवेला काचोळी

करण्याकरता त्याच्या चिंध्या करायला लाविल्यास. त्यामुळंच मला माझ्या नवऱ्याची प्रतिज्ञा, शेवटांस नेणं फार सोपं झालंय.

**संभाजी** : तुळशी, तुला तुझ्या प्रतिज्ञेकरता जे जे आणखीन काय करायचं असेल ते ते खुशाल कर. पण आम्हाला अगोदर आमच्या जागेवर जाऊ दे. वणव्यानं पर्वत पेटल्यावरच त्याच्या माथ्यावर हिरवंगार गवत उगवत असतं. ते पाहून ठेंगण्या-ठुसक्या टेकड्याही हिरवटपणानं, पावसाळ्यात पर्वताशी स्पर्धा करू लागता. तुझं बोलणंही-

**तुळशी** : (मध्येच) राजनीतीला वेश्या बनविणारं होय ना? हॉं, तसंच, पंचारतीनं दोघांची तोंडं काळवंडली. पण आज तीच पंचारतीची पुजारीण, मी मोऱ्यांची बटीक करणार आहे. महाराष्ट्राधर्म बुडवीत राजांना मोंगलांकडून हालहाल करून ठार करविणार आहे. याकरता, तुळशीला आलमगीराशी धर्मांतर करून निका लावावा लागला, तरी बेहत्तर.

**संभाजी** : चांडाळणी, जा. हवं ते कर. पण हे लक्षात ठेव की. आमच्या बलिदानानंतर प्रत्येक लंगोटी लावलेला मावळा, मोंगलाशी शर्थीनं झुंजत राहील. पण महाराष्ट्रधर्माला जिवंत ठेवील.

**तुळशी** : (हसत) लेंढ्यांच्या विस्तवातून धूरच निघतो. लंगोटी लावलेला मावळा, मोंगलांना फितुर होऊन तो लुंगीवाला बनला आहे. आज मोरे माने हे आलमगीराचे 'आलमपन्हा' म्हणून महाराष्ट्राची मालक बनले आहेत.

**संभाजी** : तुळशी, जिवाला-जीव देऊन, शेवटी तू आम्हाला असा दगा दिलास? बेसावध ठेवून भाईचारांत आम्हाला देशद्रोही मोऱ्यांचा कैदी बनविलास? जीवाला जीव देत, जीव घेतलास?

**तुळशी** : केवळ पतिव्रतेचं कठोर कर्तव्य म्हणून. पतीची प्रतिज्ञा पुरी करणं, हा पतिव्रता स्त्रीचा धर्म आहे. तो मी आपल्याला कैद करून पाळला. राजे, शरीरानं ही तुळशी तुमचीच शृंगारदासी बनून जन्मोजन्मीची शय्यासोबत करील. तुळशीचा मरताबोल कुडीचा प्राण सोडतांनाही "श्रीछत्रपती संभाजीमहाराज", हाच राहील. सख्या, जिवलगा, या तुळशीला क्षमा करा! सतीचं वाण, हे असं महाभयंकर असतं. (संभाजीच्या पायाला वंदन करते)

(पडद्यात हुश्शीयार सलतनत मोगल ई आझम शहानशहा पातशहा

आलमगीर की सवारी आ रही है निगा रख्खो – हुश्शीआर)

चला राजे, तुम्हाला आलमगीराच्या छावणीत पोहोचवून, मला पुढील प्रतिज्ञेच्या तयारीला लागलं पाहिजे. (सेवकासं) राजांना नीट बंदोबस्तानं घेऊन चला. (तडक निघून जाते)

**संभाजी** : (जाता जाता) शिव! शिव! राज्योपभोगात आयुष्याची दिशा चुकली. शृंगाराला दाहीदिशा मोकळ्या केल्या. स्त्रीविलासाच्या रतिसुखावर अंधविश्वास टाकला. तेव्हा राजा, झालेली ही दिशाभूल, तुला प्राणांतिक ठरणारच. जय श्रीशंकर. जयभवानी ईश्वर.

(संभूराजांना सेवक आत घेऊन गेल्यावर, दुसरीकडून औरंगजेब बादशहा मुल्ला अहमदबरोबर, कैद केलेल्या हिरोजी फर्जंदासह प्रवेश करतात.)

**औरंगजेब** : (मुल्ला अहमदास) क्यो बिरादर? क्या है खबरे?

**मुल्ला अहमद** : खाविंद! अस्मानी फत्ते हो गई. मराठ्यांचा राजा, बायका-मुलांच्या कबिल्यासह कैद करून मोरे यांनी हुजुरांच्या कदमावर पेश केला आहे.

**औरंगजेब** : (हिरोजीकडं पाहात) यह कोन है?

**मुल्ला अहमद** : महाराणीका खिदमतगार और इज्जत आसार हिरोजी फरजंद.

**औरंगजेब** : (पाहून) मुल्लाजी! आप बुढ्ढोंकी हिफाजत जानते नही? इतनी उमर गुजरान करनेवालों को, बुढे शरीफ को गिरफ्तार करना, पाक पैगंबर को मंजूर नही. छोड दो इन्हे पेहले.

(सेवक हिरोजी फरजंदाला बंधमुक्त करतात)

**हिरोजी** : (कुर्निसात करून) बादशहा नवरंग! ऐंशी वर्षांच्या या पिकल्या पानाचा- हिरोजी फरजंदाचा हा कुर्निसात. मराठी बोलीचा राम राम! बादशहाच्या पायी एक नम्र विनंती अर्ज आहे.

**औरंगजेब** : बेशक फर्मायीए! कहो! बयान करो. बोलो क्या ख्वाईष है?

**हिरोजी** : जीर्ण शरीरावर ताबा घेण्यात काय जीव नाही, हे समजून खाविंदानी माझी सुटका केली. परंतु जीवाला जीव देण्यात माझी कसूर झाली, हे पाहुन मला मेल्याहून मेलं झालंय. तेव्ह बादशहानं दयावंत होऊन माझा जीव घेण्यात तरी कमीपणा मानू नये. पकडलेल्या महाराणीच्या मेण्याबरोबर माझ्या उमरीचा जिगर बाळपणाचा खेळगडी साबाजी शिर्के, हाही हुजूरांचा कैदी झाला आहे. तो आणी मी

एकाच कर्तव्याच्या गुंतवणीत असता, एकत्र मरण ईश्वरानं द्यावं,  अशी आम्ही दोघं, एकमुखी प्रार्थना करीत होतो. आज ती ईश्वरानं म्हणा अथवा अल्लानं समजा; पण आपल्या अवतारानं पुरी होण्याची सोन्याची संधी, -

**औरंगजेब** : (दरडावून) खामोष. सबूरीसे बाते कहो. मुल्लाजी, महाराणीका मेणा हाजिर करो.

(तो खूण करतो. भोई मेणा घेऊन येतात व खाली ठेवतात.
कैद केलेल्या साबाजीला सोडण्याचा मुल्ला संकेत करतो)

**साबाजी** : (कुर्निसात करून) बादशा नवरंग! सर्जेराजांचा श्रीमच्छत्रपतींचा हा सच्चा सेवक आपल्यास कुर्निसात करतो. दंडवत घालतो. हुजूर ऐंशी वर्षाच्या उमरीत, आजवर हे मस्तक शिवछत्रपतीखेरीज देवापुढंही नम्र केलं नाही, ते हे माझं मस्तक याक्षणी मी आपल्या चरणांवर ठेवून विनंती करतो की, या मराठ्यांच्या महाराणीची बेअदब करू नका आणि तिच्या केसालाही कुणाकडून धक्का लागू देऊ नका.

**हिरोजी** : वाटल्यास खाविंदानी आम्हा दोघांचा शिरच्छेद करावा; पण महाराणी येसूबाईचं शील, कलम होऊ देऊ नये; तर त्याकरता आम्ही आपलं शीर बादशहा नवरंगाला मोठ्या आनंदानं अर्पण करायला उत्सुक आहोत.

**साबाजी** : हुजूर! महाराष्ट्र-राज्यलक्ष्मीची अब्रू, घरभेद्या मराठ्यांच्या फितुरीनं आज आपल्या गोटात आणली आहे. तिचं जतन करून महाराणीला संरक्षण द्यावं. कारण, खाविंदांच्या बेगमसाहिबा त्यांना सख्ख्या बहिणीप्रमाणं मान देतात.

(मेण्यातून पडदानशीन असलेली राणी येसूबाई बाहेर येत असता,
बादशहा औरंगजेबाच्या दृष्टीला तिच्या गळ्यातला ताईत सहजपणे दृष्टीला
पडतो, आणि खाली उतरताच येसूबाईलाही तुळशीनं उधळलेला कुंकवाचा
करंडा पायाला ठेचाळत लागतो. ती उचलून घेते व वंदन करते.)

**येसूबाई** : (सोन्याचा कुंकवाचा करंडा घेत) हे काय? हा तर माझा सांडलेला कुंकवाचा करंडा. हा इथं कसा आला? आणि हे यातलं कुंकू कुणी कशा करता उधळलं ? आई भवानीमाते, ही नसतीच पीडा दूर कर.

(बाजूला पडदानशीन होत पुन्हा स्तब्ध उभी राहते)

**औरंगजेब** : (पाहून) या अल्ला परवरदिगार, मैं इस वक्त यह क्या देख रहा हूं? मुल्लाजी बढी ताजूब की बात.

**मुल्ला अहमद** : हुजूर, वो कौन सी?

**औरंगजेब** : जरा इधर आवो! और मेरी आँखोंसे इस लडकी के गलेके तरफ अच्छी तरह से देखा करो! देखलिया. यह मक्के की हाज का पाक पैगंबरका ताबीत, इस महारीणी के बदनपर – गलेमे कहाँ से आया? जरा सोचिये.

**मुल्ला अहमद** : जी हुजूर! मैं पूछता हूं (येसूबाईस) महाराणिसाहिबा, आपल्या गळ्यात हा मक्केचा,- हाजयात्रा पुरी केल्याचा हा आमचा पवीत्र ताईत कुठून मिळाला? कुणी आपल्या गळ्यात बांधला? खाविंदाना कुदरती कमाईची इच्छा जाणून घ्यायची आहे. न भिता खरी हकिकत सांगा.

**येसूबाई** : आईभवानीनं थोरल्या राजांना राजगडाच्या पोटी दडलेला खजिना मिळाला. त्या वेळी प्रतापगडच्या अंबाबाईनं जिजामातोश्रींना जो सोन्याचा कुंकवाचा करंडा दृष्टांतानं दिला, तोच आज सांडलेला इथं मिळाला. तेव्हा याला साक्ष ठेवूनच मी सारी खरी हकीकत सांगते. ऐका महाराज. कल्याणच्या सुभ्यात लूट म्हणून सुभेदार मुल्ला अहमदची सून, -

**मुल्ला अहमद** : (मध्येच) हुजूर यह तो मेरी, -

**औरंगजेब** : हां! सुनिये! बयान पुरा होने दो! बेटी, कहो आगे? डरो मत् ,

**येसूबाई** : खजिन्याबरोबर मामंजीपुढं नजराणा म्हणून उभी केली. परंतु शिवाजीराजांनी त्या गोष्टीचा धिःकार करून कारभाऱ्यांना बजाविलं की, " आमच्या जिजामातोश्रीही अशाच सौंदर्यगुणसंपन्न रूपवती आहेत. तेव्हा यांना आमची चोळी-बांगडी करून मोठ्या सन्मानानं दिल्लीश्वराकडे रवाना करा."

**औरंगजेब** : वाहव्वा! ऐसान आल्लाह! छत्रपती शिवाजेराजे, रूबरू आप खुदा की खूबसूरती मे इस किस्सेसे जिंदे हो! अमर रहे हो.

**येसूबाई** : पुढं ऐकावं खाविंद. ही गोष्ट यांच्या सुनेनं आपल्या बेगमसाहिबांना रोषनाराताईंना सांगितली आणि त्यानंतर स्त्रीयांचं शील-सौभाग्य संरक्षण करणाऱ्या वीर पत्नीच्या गळ्यात, सती साध्वी बनलेल्या माझ्या पुतळादेवी सासूबाईंना दिल्लीला बेगम रोषनारांनी बोलावून घेतलं आणि हा पाक पैगंबराचा, हाजच्या यात्रेचा पवित्र ताईत, आपल्या बेगमसाहेबांनी प्रसाद म्हणून त्यांच्या गळ्यात बांधला! तोच हा ताईत सती जाताना सासूबाईंनी माझ्या गळ्यात बांधून मला हा जिवापाड जतन करण्याविषयी आज्ञा दिली.

**औरंगजेब** : (आनंदून) अये पाक परवरदिगर, मुझे रहम कर. रहम कर! मेरे हाथोंसे इस लडकीके बारे में कुछभी अन्यायकी बुराई न होने दो! शिवाजीराजे, तुम्ही या आपल्या पवित्र करणीनं दिल्लीपती या औरंगजेबाला ऋणी करून ठेवलं आहे. तुम्हीच खरे दिलाचे. मरूनही आज अमर झाला आहात, ऐ खुदाकी पाक मुहब्बत.

(येसूबाईजवळ जाऊन तिला एकदम पोटाशी धरून पाठीवर हात फिरवीत)

आव, बेटी गले मिल जाव! घबराव मत. (साबाजी-हिरोजीस) अये मेरे वफादार और नेकजात इमान के दोस्तो, जाव, साबाजी, हिरोजी, आपण यावेळी सगळे मोकळे आहात. मुल्लाजी, यांना सुखरूपपणानं नीट बंदोबस्तात रायगडाला पाठवा. मराठ्यांच्या बेईमानानं मराठ्यांच्या महाराणीला मुसलमानांच्या गोटात आणून घातली; पण पाक मुसलमीयांचं ईमान पुन्हा त्यांना त्यांच्य गोटात पाठवीत आहे.

**साबाजी** : दयेनं दिलाचा दर्या उसळला म्हणजे भगवंताच्या क्षीरसागरालाही आनंदाचं भरतं येतं.

**औरंगजेब** : गोष्ट खरी. पण साबाजी-हिरोजी, या मुलीच्या संरक्षणात झालेल्या आनंदानं ढिलाई करू नका. कारण, हिचा भाऊच खरा वैरी आहे. तो आज ना उद्या आमच्या गोटात हिला राणी म्हणून अटक करून आणणारच. करू द्या. आमच्या बेगमसाहिबा या माय-लेकरांना मायाममतेनंच वागवतील. कारण, फुलाला पाखरण करण्यासाठी वेलीला शिकवावं लागत नाही. तरी पण सावध रहा. हे आलमगीराचं कडवं राजकारण आहे.

**येसूबाई** : दयावंत या मुलीला आशीर्वाद द्या. (पायावर मस्तक ठेवणार तोच, तिला उठवीत असताना, त्याची दाढी येसूबाईच्या गालावर रुळते. ती शहारलेली पाहून) बेटा अशी घाबरू नकोस. बिचकू नकोस. भिऊ नकोस. माझा कट्टा दुष्मन पण दिलाचा पाक तुझा तो सासरा, - तो पहाडचा डोंगरी चुव्वा, छत्रपती शिवाजीराजा भोसला, या वेळी जर जिवंत असता; तर त्याची वाढलेली आणि पिकलेली शुभ्र पांढरी दाढी, ही अशी आज तुझ्या गालावर मायेनं रुळलेली दिसली असती. जा. बेटा, त्याचंच पुण्यस्मरण करीत तू रायगडावर निर्धास्त जा.

(सर्वजण बादशहाला कुर्निसात करून महाराणी येसूबाईला मेण्यात बसवितात. भोई मेणा घेऊन सर्वांसह आत जातात)

**औरंगजेब** : (सकौतुक मेण्याकडं पाहात) आये खुदा. अजब है तेरी मुहब्बत. इस दुनिया की रहम कर.

(बादशहा औरंगजेब मुल्ला अहमदसह गुडघे टेकून
नमाज पढत अल्लाची प्रार्थना करू लागतात)

**अंक चवथा समप्त**

****

**(या ठिकाणी वि. ना. कोठीवाले यांचे नाट्यलेखन पूर्ण झाले.)**

**अंक पाचवा**

---

**<u>प्रवेश पहिला</u>**

(सोन्याच्या साखळ्या हातात घेऊन उभी असलेली येसूबाई
व लोखंडाची बेडी हातात घेऊन उभी असलेली तुळशी.
दोघी एकेमेकींकडे पाहात आहेत. आसपास नोकर वगैरे)

(पडद्यात)

"मोऱ्यांनी मात केली ! राजाला गिरफदार केले!"

"मोऱ्यांनी शर्थ केली ! संभाजीला कैद केले!"

(येसूबाई सोन्याच्या साखळ्या व तुळशी बेडी एकेमेकींकडे टाकून देतात)

**येसूबाई** : ऐकायचे नव्हते ते ऐकिले!

**तुळशी** : ऐकायचे होते ते ऐकिले! (पदरचा दगड काढिते) दर्यासागर दौलतराव, तुमच्या अर्धांगीने आपली प्रतिज्ञा पूर्ण केली! केवळ कबजीसारख्यांच्या मसलतीने आणि मोऱ्यांसारख्यांच्या मदतीने सुताचा साप आणि सुईचा सूळ करून या तुळशीने केला, करार पुरा केला! त्या दिवशी तुमच्या बापाने तुमच्या देहाची दैना केली तेव्हा, तुमच्या जित्या रक्ताने रंगलेला हा दगड, तुमच्या जात्या जिवाच्या साक्षीने, या तुमच्या धर्मपत्नीने, तुमच्या क्रियाकर्मासाठी जीवखडा म्हणून उचलून घेतला. दर्यासागर! तुळशीभोवती घिरट्या घालणाऱ्या आपल्या जिवाचा कान करून ऐका! त्या वेळचे माझे बोल आज पुन्हा आठवा. या दगडाला उरापोटाशी धरून,

याच्या संगतीने छातीचा दगड करीन; तुमच्या प्रेताच्या काळ्या भेसूरपणाच्या शपथेने जिवाचा वेतळा करीन; दख्खनी दुनियेचे दारूकाम बनवून त्याच्या आतषबाजीने तुमच्या सरणाचा भडाग्नी चेतवीन. भोसलेशाहीच्या मानकऱ्यांना या होळीचे होळकर करीन; मराठेशाहीची माती करून तिने तुमच्या जिवाला मूठमाती देईन; संभाजीच्या बायकोला – मराठ्यांच्या महाराणीला – गाय करून, तुमच्या नावाने मोगलांच्या हातांवर तिचे गोप्रदान सोडीन! बोला, दौलतराव, दिल्या बोलातला बोलन् बोल खरा केला ना? कोण आहे तिकडे? धरा या राणीला आणी सवाशेर सोन्याच्या साखळ्यांच्या जागी तो सव्वा मणाचा लोखंडी लंगर तिच्या पायात अडकवा.

(दोघे तिघे नोकर पुढे येतात; एकदम दुसऱ्या
बाजूने हिरोजी व शाहूमहाराज येतात)

**हिरोजी** : हां, खबरदार; पुढे पाऊल टाकाल तर पावलापावलासाठी प्राण गहाण ठेवावा लागेल! मासाहेबांच्या अंगाला हात लागला तर त्या हाताचे कलम करून टाकीन; मासाहेबांकडे वाकड्या नजरेने पाहिले तर तापल्या सळईने डोळे काढून खेळायला दे ईन!

(नोकर थबकतात)

**तुळशी** : काय मर्दानी जात आहे पहा! अरे चांगले पुरुषासारखे पुरुष होऊन या एका थेरड्याच्या तोंडाकडे पाहून हाय खाता? त्या वेळी माझा घात केलास; आज बाजी बदलली आहे! आज तुझ्या सारख्या हलक्या हुजऱ्याची ही पोरगी राजावाचून राणी झाली आहे आणि ही तुझी राणी मोऱ्यांची बटीक झाली आहे! आता मान वर करून असा पाहू लागलास तर तुझ्या पांढऱ्या केसांचाच तिला गळफास बसेल.

**शाहू** : (तलवार अर्धी उपसून) मासाहेब, हिच्या बेफाम जिभेचे या तलवारीने तुकडे करून -

**येसूबाई** : (त्याला थांबवून) भलतेच! वाटेल त्या बोलभांड बायकोच्या जिभेवर तुमच्या तलवारीला नाचावयाची आहे काय? धाकटे महाराज, थोरल्या आबासाहेबांच्या श्रीभवानी तलवारीच्या नमुन्याची ही बाळभवानी मुहूर्तावर स्वतः खाशांनी कमरेला बांधिली ती एवढ्यासाठी वाटते? हिने मराठेशाहीची एकछत्री इभ्रत

राखायची आहे. बायकांच्या जिभेसारखे वळवळायचे नाही. बायकांच्या बडबडण्याने उद्याच्या छत्रपतीचे मन ढळत नाही!

**तुळशी** : येसूबाई, बायकांच्या बडबडण्याने पडलेला गळफासही चळत नाही! तुझ्या चढेल मोठेपणाला पायमाल करायला आता कितीसा वेळ लागणार? (नोकरास) अरे, आणा त्या साखळ्या इकडे! पुन्हा त्या म्हाताऱ्याकडे पाहाता? मोऱ्यांनी ही नामर्दाची पैदास कोठून जमा केली? ही पहा दौलतरावाची मर्दानी विधवा मराठेशाहीचे हे अहेव लेणे आपल्या पायांनी तुडवून टाकीत आहे.

(साखळ्या पायांत घालू लागते)

**हिरोजी** : तुळशी, कारटे, काय केलेस हे? पिंडीला पाय लागला तर पायबंदीच होईल अशी साधी सजा एकट्या राजांनाच फर्माविली होती; पण दुसऱ्या देहाला मात्र या आई भवानीच्या भांडाराला असा पाय लागला तर जिवानिशी जायबंदी व्हावे लागेल. फरजंदाच्या घराण्यात, रक्तामांसाच्या जिभेने जे बोलावे ते पोलादी जिभेने करावे असा कुळाचार आहे. (कमरेची तलवार काढितो) (स्वगत) तुळशी, कमरेची मिठी सोड! राजांनी भवानी आईच्या साक्षीने श्रीभवानी तलवार उचलली, त्याच मुहुर्तावर पण साबाजीने बिजली आणि हिरोजीने ही तुळशी उचलली. बेईमान दौलतरावाच्या गळ्यात पडताना साबाजीची बिजली ईमानाला जागली! बेटा तुळशी, आजवर तुला कडेवर खेळविली, आज ईमानाला जागी हो! तुझी नावरस सांगून तुझ्या नावाला बट्टा लावणाऱ्या फरजंदांच्या या कमअस्सल अवलादीला, केवड्याच्या बनातल्या या सुंदर नागिणीला, एक घाय उभी चिरून टाक! (उघड) मासाहेब, ती पहा, दिवसाढवळ्या केवढी चांदणी तुटून पडली!

(तुळशीच्या विरुद्धा दिशेकडे बोट दाखवितो. येसूबाई वगैरे तिकडे पाहतात. हिरोजी तुळशीवर वार करतो. ती पडते)

**येसूबाई** : कुठे पडली चांदणी?

**हिरोजी** : (तुळशीकडे बोट दाखवून) ही पहा!

**तुळशी** : करायचे ते केल्यावर मरण आले तरी बेहत्तर! हिरोजी पोटच्या पोरीवर घाव घालतान तुझ्या डोळ्यांला पाणी आले नाही! जिव्हारी घाव जाऊन बसला तरी तुळशी रडणार नाही! दर्यासागर दौलतराव, लग्नाने तुमच्या नावाशी जखडलेली तुळशी तुमच्या ऋणातून मोकळी झाली! (दगडावर बांगड्या फोडून) दुबळ्या

दौलतीच्या नावाने भरलेला वज्रचुडा त्याच्याच जीवखड्यावर फोडून टाकून साता जन्मांच्या संसाराच्या साखळदंडातून ही तुळशी आज सुटून जात आहे! देवा, पुढल्या जन्मी मला मराठेशाहीच्या जवानमर्दाची- रायगडच्या रणमर्दाची – माझ्या छत्रपती संभाजी महाराजांची शृंगार दासी कर! छत्रपती संभाजी महाराज, या जन्मी आपल्याला पाहिले, आता पुढल्या जन्मी श्रृंगारदेवा, - तुळशीच्या परमेश्वरा, मला पदरात घ्या! कुणीतरी छत्रपतींना माझा शेवटचा निरोप सांगा की, तुळशीने मरताना देवाचे नाव घेतले नाही; पण तिचा मरता बोल "छत्रपती संभाजी महाराज" – (मरते)

**येसूबाई** : हिरोजी, काय केलेत हे!

**हिरोजी** : मासाहेब, हे ऋणाबंधाचे लागेबांधे आहेत! साबाजीच्या पोटी दौलती आला; त्यानंतर एका वर्षाच्या आत ही माझ्या पोटी आली. साबाजीच्या हातून दौलती मेला; त्या एकाच वर्षाच्या मुदतीत ही माझ्या हातून मेली. या तुळशीला आजवर परक्या रक्ताने पोसली. तिच्या अंगात माझे जातिवंत रक्त खेळत होते; आज या तुळशीची माझे रक्त पिण्याची हौस फेडून टाकिली.

(पडद्यात – कोणत्या हरामखोराने तुळशीच्या अंगाला हात लावला?)

**हिरोजी** : मासाहेब, जरा आडबाजूला व्हा! देवळातल्या देवाला दगलबाजीने विटाळणारा हाच तो हरामजादा मोरे!

(मोरे प्रवेश करतो)

**मोरे** : कोणी तुळशीच्या अंगावर वार केला? तुळशीच्या रक्ताच्या थेंबागणिक त्या गुन्हेगार देहाचे तुकडे केल्याखेरीज मोऱ्यांची तलवार विसावणार नाही. कोणी केला खून हा? (नोकर हिरोजीकडे बोट दाखवितात) हिरोजीने? म्हातारचळाच्या नादात तुझ्या तलवारीची तहान बेसुमार वाढल्यासारखी दिसते. कोणाचे रक्त तुझ्या तलवारीला लागले आहे हे?

**हिरोजी** : हे माझे रक्त आहे – हिरोजी फरजंदाचे ईमानी रक्त आहे हे.

**मोरे** : थेरड्या, मग तुळशी कशी मेली?

**हिरोजी** : देवास कळे! माझे जातीचे रक्त तेवढे मी काढून घेतले ! तिच्या बाकीच्या बेईमान रक्तामधे जितेपणाचा जिव्हाळा नव्हता. नुसत्या मुर्दाड मांसाने माणूस जगत नाही.

**मोरे** : हा पहा, तुझ्या जिवंत मांसाला मातीत मिसळून तुझा बोल खोटा करून टाकतो! (तलवार उपसून धावतो)

**येसूबाई** : हां, छोटे छत्रपतीमहाराज, आता खुषाल आपली तलवार उपसा आपल्या ईमानी नोकरांच्या धावण्या धावा! तुमच्या प्राणांची रया झाली तरी हरकत नाही; पण हिरोजींच्या थकलेल्या केसांना धक्का लागू देऊ नका!

(शाहूमहाराज हिरोजी व मोरे यांच्यामधे येतात)

**हिरोजी** : मासाहेब, काय हा अविचार! धाकट्या राजांना मागे घ्या!

**शाहू** : पुढे पाऊल टाकिले ते मागे घेण्यासाठी नाही. वीरांचे तुटलेले मस्तक मागे पडते, पाऊल कधी पडत नाही! भोसल्यांच्या तीन पिढ्या तुम्ही हातांवर वाढविल्या; तुमच्या सेवेची कसोटी आणखी किती पहावयाची? चला, मागे सरा; मी तुमचे संरक्षण करणार! मासाहेब, पाहा बरे हिरुबाबा कसे ऐकत नाहीत ते! हिरोजी, तुझा राजा तुला मागे होण्याचा हुकूम करीत आहे! मराठेशाहीला हे दिसलेच पाहिजे की, आपल्या ईमानी नोकरांवरचा तलवारीचा ताप चुकविण्यासाठी छत्रपती आपल्या अंगाचे छत्र करीत असतात!

**हिरोजी** : (मोऱ्यांना उद्देशून) जावळीच्या रानातल्या जातीच्या दगडा, या बोलांनी विरघळून तुझे पाणी रे कसे होत नाही. (शाहूमहाराजांना उचलून त्यांचा मुका घेतो) आई, आई, आई; राजे, ही पोपटपंची कुणी बरे पढविली आमच्या रायगडच्या चिमण्या राघूला! (शाहूमहाराजास खाली ठेवितो), देवा, माझ्या बाळराजांना अठ्ठावीस युगांचे आयुर्दाव दे! मासाहेब, आमच्या जिवाच्या मीठ मोहऱ्या ओवाळून यांची दृष्ट काढा! आनंदाच्या आसवांनी डोळे भरून आले नसते तर माझीच नजर यांना लागली असती! भोसल्यांचे वंशातला हा कुलदीपक पदराखाली झाकून घ्या आणि जरा बाजूला व्हा!

**येसूबाई** : फरजंद, तुमच्यावर अशी काळाची कट्यार लटकत असताना तुमच्या राजाने आपल्या अंगाची ढाल करायला नको का? तुम्हाला असे टाकून आम्ही कुठे तोंड दडवावे?

**हिरोजी** : (एकदम रागाने) मुली, मोठेपणाला प्रसंगी तर काही सीमा हवी ना? तुझ्या सासऱ्याने माझा बोल खाली पडू दिला नसता; आणि तू गुडघ्याएवढी पोर मला म्हाताऱ्याला गोष्टी सांगतेस! रायगडच्या राउळातला हा नंदादीप आम्हांला आमच्या

जिवांच्या ज्योतीनी पाजळता ठेविलाच पाहिजे! हा जीव सलामत असला तर उद्या मुड्द्यांची माणसे करता येतील. चल, घेऊन जा याला तिकडे! मुली, बोलू नये ते बोलावयास लावतेस? म्हातारपणी माझं मोल केलेस? प्रसंग काय आणि तुझे बोलणे काय? पोरीच्या जातीला असा हट्ट शोभत नाही. चल एकदम पुढे!

(येसूबाई शाहूमहाराजांसह जाऊ लागतात)

**हिरोजी** : (गहिवरून) मासाहेब, जरा थांबा! अखेरवेळी या थेरड्याची जिव्हा चळली; गुन्हा माफ करा! काळाची करणी कडू असते; पुन्हा गाठी पडणे केवळ दैवाधीन! तुम्हा दोघांना डोळे भरून एकदा पाहू द्या; ओथंबलेल्या अंतःकरणाच्या आशीर्वादाने तोंड गोड करून घेऊन मग चला! (काहीवेळ त्याच्याकडे पाहतो) हाय रे कर्मा! ही देवमाणसे आता देवाघरी सुद्धा दिसायची नाहीत. मासाहेब, आजवर या तापल्या जीवाला आपल्या नजरेने न्हाऊ घातले; आज पुण्याई सरली; इथून आपले दर्शन अंतरले! मासाहेब, बाळराजांना जिवापाड जपा; चला पुढे!

(येसूबाई व शाहूमहाराज जाऊ लागतात)

**मोरे** : हां येसूबाई, थांब! भोसल्यांच्या जनान्याचा गोषा उडवून टाकण्याचा मोऱ्यांनी विडा उचलला आहे! अरे पकडा रे या बाईला आणि या पोराला!

**हिरोजी** : तो विडा चघळल्यावाचून नुसते तोंडच नाही, पण सारे अंग रंगून निघेल. मोरे तुझ्या चांडाळ जिभेने या देवतांची नावे बाटवू नकोस. नामसंकीर्तनाचे पुण्यसुद्धा यावेळी तुझ्या फळास येणार नाही. हिरोजीच्या तलवारीला माणसाची मुरवत नाही, धरल्या हाताची हुकमत नाही! मासाहेबांना मुकाट्याने जाऊ देत! मासाहेब, आता थांबाल तर तुम्हाला थोरल्या राजांच्या पायांची आण आहे.

(येसूबाई व शाहूमहाराज जातात)

**मोरे** : हिरोजी तुझ्या खिळखिळ्या हाडांचा खुळखुळा करून मोऱ्यांची मुलेसुद्धा खेळत बसणार नाहीत! तुझ्या छातीत अशी एक लाथ मारून तुला वाटेतून बारा गाव पलीकडे उडवीन!

**हिरोजी** : राजांच्या रायगडचा दगडी हाडांचा किल्लेकोट एक वेळ जागचा हलेल पण हिरोजीच्या छातीचा कोट हटायचा नाही!

**मोरे** : (नोकरांस) चला रे, सारे एकदम या थेरड्यावर असे तुटून पडाल, की पहिल्या पळात याचे डोके तुटून पडेल! (त्यांची झटापट होते. हिरोजी घाव लागून पडतो. माने घाईघाईनं येतो)

**माने** : धनीसाहेब, तिकडे बाका बखत येऊन ठेपला आहे. सावध झालेल्या संभाजीने बेफाम होऊन चार मुडदे जमीनदोस्त केले.

**मोरे** : अव्वल मुडदे होते म्हणून पडले! संभाजीने उभे मुडदे आडवे केले असे का सांगत नाही? चला, माने, आधी तुळशीच्या देहाला डाग देण्याची व्यवस्था करा; (नोकर तुळशीचे प्रेत नेतात) आणि मग खाशी मोहऱ्याची माणसे बरोबर घेऊन येसूबाईला कब्ज करा. येसूबाई गवसली नाही तर तुमचे प्राण हरपतील हे खूप ध्यानात धरा. जावळीच्या गवळवाड्यातल्या गाईंच्या दावणीत येसूबाईला तिच्या वेणीच्या पेडाने खुंटाला बांधल्याखेरीज मोऱ्यांच्या बेचाळीशीला सदगत लाभणार नाही! या थेरड्याला असाच पडू देत!

(मोरे, माने व नोकर जातात)

**हिरोजी** : साबाजी, धाव रे धाव! साबाजी, धाव! धाव!

(साबाजी, मागाहून रायाजी, येसूबाई, शाहूमहाराज, चिटणीस वगैरे प्रवेश करितात. साबाजी हिरोजीला उचलून धरितो)

**साबाजी** : साबाजीचा साडेतीन हात देह शाबुत असताना हिरोजीच्या या प्राणाला धक्का कुणी लाविला! हिरोजी भिऊ नकोस! हिरु, धास्तावल्यासारखा असा आखलेल्या आखांनी माझ्याकडे का पाहतोस? मी तुझा साऊ तुझ्याजवळ आहे!

**हिरोजी** : (हसून) साऊ, वेडा मी स्वतांसाठी का तुला आरोळी घातली? मासाहेब कुठे आहेत? आताच मोऱ्यांनी धाकट्या राजांना आणि मासाहेबांना – तुला कोणत्या तोंडाने सांगू – साऊ, त्यांना या पावली गडावर घेऊन जा. माझ्या आशेला आता गुंतू नकोस; जखम थेट जिवाला जाऊन भिडली आहे. राजांनी मला पुन्हा सेवेसाठी बोलाविले आहे ती पहा, साऊ- तुला दिसायची नाहीत – मरत्या डोळ्यांना दुसरी दुनिया दिसायला लागते – दक्षिणच्या देवाची देवपावले दिसताहेत – साऊ, राजांनी विचारले तर मासाहेबांची खुषाली काय सांगू?

**साबाजी** : राजांना सांग, तुमची पुण्याई अढळ आहे; राजांच्या नावाची द्वाही मिरवीत धाकटे राजे खुशाल रायगडावर निघून जातील!

**हिरोजी** : राजाचे नाव – भोळा भाव – सिद्धीस जाव! (मरतो)

**साबाजी** : देवास पाव! (उठून उभा राहतो) मासाहेब, फरजंद देवरूप झाले! उजू हातांनी राजांच्या रुजवातीला निघून गेले.

**येसूबाई** : अगबाई, हिरोजी काय हो केलेत हे? अशी कशी हो माझी फसवणूक केलीत? तुमचा शेवटचा बोल अजून माझ्या कानापर्यंत आला नसेल, आणि साबाजी, इतक्यात कसे हो यांनी असे केले? सांगून सवरून प्राण जावा आणि उघड्या डोळ्यांनी खेळ पहावा तशातली गत झाली! राजांपरी राजांना फसविले – यांनी तर असा गळाच कापला! सासरमाहेर एकदम पारखे झाले! सटीसंकष्टी केव्हाही मागे पाहिले म्हणजे फरजंद एखाद्या डोंगरासारखे उभे असायचे! हिरोजी, मला कोणाच्या हाती निरवून गेलात हो? मला दटावणीने बोलायला आता कोणी आहे का? रागाने बोलायचे ना एकदा आपल्या वेड्या मुलीला! सासुरवासात आपल्या देवसावलीने माझे माहेरपण केले आणि आज मला असे फसविले! हिरुबाबा, मी नाही जाऊ द्यायची तुम्हाला!

(त्याच्या पायांवर मस्तक ठेवतात)

**साबाजी** : (स्वगत) 'तरिच जन्मा यावें! दास ईश्वराचे व्हावें॥' माझ्या हिरूची पुण्याई साधुसंतांच्या पलीकडे गेली. 'तरिच जन्मा यावें! दास ईश्वराचे व्हावें!' धन्यांनी पायांवर मस्तक ठेवावे तर सेवाधर्म! वा रे वा! काय नुसता दंडासारखा पसरला आहे!

**येसूबाई** : (निरखून) अहो, पाहा हो डोळ्यांची टक थोडी हलल्यासारखी वाटली; कसल्यातरी आशेत जीव गुंतून राहिला आहे हो.

**साबाजी** : आपली वेडी आशा भोळ्या डोळ्यांनी पाहते! ही आशेची माणसे नव्हत! अशा कडव्या तब्बेतीच्या माणसांना आशेचे वावडे असते! राजांच्या दरबारी ! फरजंदांना निराशेचा गाव जहागीर होता! उठा, मासाहेब, आता हिरोजीसाठी रडायची वेळ नाही! देवाने अगदी योजून वेळ आणिली! तिकडे राजांना मोऱ्यांनी गिरफदार केले! इकडे पायरीचा चिरा निखळला, पण तिकडे मंदिराचा कळस ढळला! आधी कलत्या कळसाला हात दिला पाहिजे! ताकदीने, हिंमतीने, हिकमतीने शंभूराजे म्हणजे थोरल्या राजांनासुद्धा भारी! 'बडे बापका सवाई बेटा" म्हणून ख्यात केली; पण आज दैवाने पलट खाल्ली! आज सह्याद्रीचा सवाई सरजा सुताच्या सरकगाठीत

सापडला! आधी आशा लावून राजांनी तोंडघशी पाडिले! भरल्या ताटावरून उपाशीपोटी उठणे आले.

**येसूबाई** : साबाजी, अजून घतका उलटली नसेल, पण इतक्यातच, राजांच्यावाचून दाही दिशा कशा सामसूम, सुनसाट दिसतात. जिकडे तिकडे अंधारल्यासारखे होऊन दिनदुनिया दीनासारखी दिसू लागली! आपल्या नजरेतील आग जगाला लागेते; आपल्या जीवाची छाया सर्वांघटी पसरते! महाराज, सगळ्यांनाच कसे हो वैतागपद बांधायला लाविलेत! दिवसाढवळ्या ढगावाचून दिवसाचा देव दिसेनासा झाला, रात्रीच्या राजाची कळा हरपली!

(पंचकल्याणी घोडा अबलख़ – लावणी)
आडला राजगडीचा राणा ।
पडला आज शिपाईबाणा ।
ज्या राजवटी त्या रानवटी परि जाणा ।
जन अवघे उघडे, नाही ठावठिकाणा ॥१॥
बारा मावळ एकच दैना ।
चवदा ताल कोंकणी * रैंना ॥
गगनांत झांकिती देवदेवता नैना ।
रानांतहि प्याल्या शेंदुर राघू मैना ॥२॥

**साबाजी** : (स्वगत) दगडावर शेंदूर थापून त्याला देवपाणाने बोलायला लावण्याची हुकमत हरपून आज स्वताच शेंदूर पिऊन दगडासारखे व्हायचा वखत आला आहे!

**रायाजी** : (स्वगत) शिवांगी! माझी गरीब शिवांगी माझ्याविणे अशीच आगीत करपून निघत असेल! शिवांगी, शुभांगी, शिवगंगा! दिल्यामुदतीचा आज सरता दिवस! आजचा सूर्य मावळताना माझ्या शिवांगीचे पंचप्राण आपल्या सोनेरी किरणांनी बांधून नेईल; उद्या उगवत उजळली तरी माझ्या नजरेला अंधाराच्या काळ्या राईतच रखडावे लागेल!

**येसूबाई** : साबाजी, मी काय करू हो? मला भोवती रान पेटल्यासारखे वाटते! मला सारखे भेदरल्यागत झाले आहे! माझ्या भित्या जिवाला कसा हो धीर देऊ?

**साबाजी** : आई, धीर धर; असे बोलून आम्हा मुलांना घाबरवू नकोस. तू आम्हा मराठ्यांची माय माऊली आहेस! आई, तू असे हातपाय गाळलेस तर आम्हां उपाशी

कच्याबच्च्यांना – तुझ्या लाख लेकरांना भरल्या हाताने दूधभात कुणी भरवायचा? आई वेगळ्या मराठी बाळांनी आशेने कुणाच्या तोंडाकडे बघायचे? आई, तुझ्या लग्नाचे साडे झाले त्या वेळी मातोश्री सईबाईसाहेबांनी, माझ्या मुलीच्या पावलांनी सप्तशृंगीची देवी रायगडावर रहिवासाला आली असे म्हणून आम्हांला तोंडभर साखर चारली! तुझ्या आहेरासाठी, सर्जेराजांनी आम्हा मानकऱ्यांचा दरबार भरवला – शिवनेरीच्या त्या भवानी शंकराच्या भोळ्या दरबारात आम्हा हुजऱ्यांचे सुद्धा मानकरी झाले त्या दिवशी तुझ्या अंगाची लगीनहळद अजून पुरती निघाली नव्हती – तशा थाटात विडासाखर वाटण्यासाठी तुल हिंडताना पाहून राजांनी तुझे कौतुक केले की, तुळजापुरच्या गाभाऱ्यातल्या काळोख्या कोंडमाऱ्याला कंटाळलेली श्रीभवानीआई आमची चढती दौलत नजरेने न्याहाळण्यासाठी भांडाराची भूषणं लेवून या दरबारात चरणचाली मिरवीत आहे! ती वेळा आठवली म्हणजे आज ऊर भरून येतो. आम्हांला पोटाशी धरून, डबडबलेल्या डोळ्यांतली ही आठवणीची आसवे मायाममतेच्या पदराने पुसून टाकण्याचा, आई, तुझ्यावाचून कोणाचा अधिकार आहे? सप्तशृंगीची देवी, भोसलेशाहीची भवानी आई, महाराष्ट्राची महिषासूरमर्दिनी, दक्षिणची दुर्गेश्वरी, अशी आपल्या सिंहासनावरून उतरू लागली तर आमचे दुर्घट कोण निवारील? आमच्याकडे पहा; हिंमत सोडू नकोस. आई, आम्हा सर्वांचा हा लाखाचा जीव देवाने तुझ्या ओटीत निरवला आहे त्याची जोपासना करायला नको का?

**येसूबाई** : साबाजी, ही पहा, आली आसवे पुन्हा गिळून टाकिली. राजांची राणी, सर्जेराजांची सून या पुढे तुमच्याकडे कोरड्या डोळ्यांनी पाहील.

**साबाजी** : मासाहेब, अशा नजरेने आपण पाहिले म्हणजे या साबाजीची थकलेली काया वज्राची होऊन, गेली गुजरी पुन्हा उभी करण्याची त्याला हिंमत येईल! ऐंशी वर्षांच्या उमरीत गोगलगाईच्या पावलांनी आलेले म्हातारपण हरणटप्प्यांनी माघारे पळाले! आता सेनासागर, तुम्ही असे करा-

**रायाजी** : अरे, मला कोणी प्रेमसागर का म्हणत नाही?

**साबाजी** : अगदी अफाट वेडा माणूस! कोणा माणसावर काय प्रसंग आणि हा आपला –

**रायाजी** : साबाजी, वेडा म्हणून हिणविल्याने जातवेड जाईल का? प्रेम प्रसंगाला जुमानीत नाही, माणसाला मानीत नाही? प्रेमाच्या जगात दोन जीवांपुरतीच जागा असते!

**साबाजी** : रायाजी, तू मराठ्यांचा सेनासागर आहेस ना? वडिलांनी केवढी कीर्त करून ठेविली! माझा तानाजी म्हणजे रणाचा रणशूर, मनाचा मनशूर, म्हणूनच स्वतः थोरल्या राजांनी गुणांचे पवाडे गायले. सुभेदार मालुसऱ्यांनी एकदा मनगटासारख्या मिश्यांना पीळ भरला म्हणजे मी मी म्हणणाऱ्या मर्दांनी, पहायला आणलेल्या पोरीची लाज उसनी घ्यावी! हाती घेतलेल्या कामाची थेट जीवाला पकड बसायची! कोंडाण्यावर पट्ट्यानिशी लढताना, उदेभानाने हात उतरून टाकला तेव्हा देहापासून हात तुटला पण हातातून पट्टा सुटला नाही! आल्या प्रसंगाला पुढे पाऊल, माघार माहीत नाही! त्यांचे नाव सांगून ते बुडवायला तुझ्यासारखा वेडापीर-

**रायाजी** : वेडापीर हे खरे ना? मग अशा बोलांनी वेड्याला का मारिता? प्रेमापुढे कीर्तीचा पवाड नाही, नावाची चाड नाही! राखेच्या ढिगातून अंगार भडकविण्यासाठी फुंकर मारला तर डोळ्यांत राख उडेल एवढाच काय तो लाभ! साबाजी, तरण्या दिलाची आग कुणाला सांगून कळत नाही. मी काय करू हो? माझ्या मनाची उचलच मेली आहे. तुमचा दौलतराव प्रेमाचा शेवट झाला म्हणून मेला; हा रायाजी प्रेमाचा उगम गवसत नाही म्हणून मेल्यासारखा झाला आहे. दर्यासागर तसा मेला, सेनासागर असा मेला.

**साबाजी** : नादान मुला, मालुसऱ्यांच्या घराण्यात जन्माला येऊन, आल्या कामाला अशी कुचराई करितोस! तुम्हा मालुसऱ्यांचा कुळधर्म मोठा कठीण आहे! लहानपणी तुझ्या लगीनमुहुर्तावर सर्जेराजांचे प्रमाण ऐकताच, तुला बांधल्या बाशिंगाने बोहल्यावर टाकून देऊन, उदेभानाच्या बाटग्या कट्यारीशी निका लावण्यासाठी सुभेदार उसन्या घाईने, कोंढाण्याच्या बोहल्यावर चढून गेले! सर्जेराजांनी त्यांचा दिवस केला तेव्हा, दुखवट्याची पागोटे डोकीला बांधून, त्याच हातांनी तानजीबाबांची ही तलवार – सुभेदारांची ही राजेश्वरी तुझ्या कमरेला बांधिली; त्या वेळी शंभूराजांच्या पावलावर पाऊल टाकण्याची भाक देऊन, बापाच्या नावाने क्रीया केलीस; आणि आज राजांना मोऱ्यांनी ठाणबंद केले असून, तू असा मोकाट सुटला आहेस! तुझ्याकडे पाहून, वरच्या दरबारात, सुभेदारांचा सिंहाचा जबडा चिमणीसारखा

झाला असेल! अरेरे, क्रीयानष्टा, देवकळा दवडून दगड होण्याची ही हौस तुला कुठून आठवली! बिरवाडीच्या बहाद्दराच्या बीजाला बाट लाविलास तर उद्या तुझ्या नावाने बायकापोरी की रे बोटे मोडतील! सारा जनलोक तोंडावर थुंकेल!

**रायाजी** : साऊबाबा, उगीच शीण करून घेऊ नकोस; तुझ्या हुकुमाची तामिल करण्यात माझ्याकडून समजून कसूर होणार नाही; प्रेमाचे वेडे पाऊल कुठे चळले तर मात्र मला माफी कर. सांग मी काय करू ते!

**साबाजी** : शाबास, हे बोललांस एवढ्यानेच मराठेशाहीला मूठभर मांस चढले! चल, आधी आपल्या उधळलेल्या लोकांची जमात कर; अजून राजांना घेऊन मोरे निघाले नसतील त्यांना पायबंद घाल. म्हापशाच्या राण्यांना सत्तरी महाल धुंडाळून आपली बाजू बांधायला सांग. तुझ्या हाती लागण्यापूर्वी मोरे मोगलांना मिळालेच तर, बादशहाच्या छावणीत बेगमसाहेबांची भेट घेण्यासाठी मी तुळापुरी जाऊन बसतो. राजे सुटले तर अजून एक हात ब्रह्मांडाला कव घालता येईल. चल, सुटल्या तीराच्या तडफेने धाव घे; वेळेला आता मोल नाही. माझा म्हाताऱ्याचा तुला आशीर्वाद आहे.

**रायाजी** : आई भवानी काय अब्रू राखील ते खरी.

(येसूबाईस मुजरा करून जातो)

**साबाजी** : एक झाले, मासाहेब आपण धाकट्या धन्यांना घेऊन रायगडच्या रस्त्याला लागावे. आपल्या दिमतीला द्यायला या चिटणिसाखेरीज आज दुसरे कोणीही नाही. चिटणीस, आज वेळ येऊन ठेपली आहे. खंडोबा, हे जिवाचे जोखीम तुला गडावर न्यायचे आहे. मराठेशाहीच्या सौभाग्याची ही केशरकस्तुरी जपून रायगडच्या करंड्यात नेऊन ठेवण्याचे काम तुझ्याकडे आहे; तिच्या कुंकवाचा टिळा आणण्यासाठी मी तुळापुरी जातो. मासाहेब, म्हणून आपला निरोप घेऊन मी जाणार आहे. बेगमसाहेबांना खूण पटण्यासाठी आपला कुंकवाचा करंडा तेवढा मजजवळ देऊन ठेवा. चिटणीस, राज्यांच्या घरची अब्रू बरोबर घेऊन निघाला आहेस. तुला काय सांगू? (त्याला जवळ घेऊन व त्याचा हात हातात घेऊन) अरेरे, भवानीश्वरा! कोण्या दैवाचा दिवस दाखविलास हा! मोहऱ्यांसारखे मोहरे हरपून आज मराठेशाहीची अब्रू या एवढ्याशा मुलाच्या बाळमुठीत ठेवावी लागत आहे. बाळ मोऱ्यांची माणसे तुमच्या मार्गावर आली तर आल्या अडचणींतून, आपली ही एकवटलेली पुण्याई, मूर्तिमंत मराठेशाही, अब्रूनिशी निभावून नेण्यासाठी बृहस्पतीच्या

बुद्धीने आणि बारा हत्तींच्या बळाने नेहमी सावध राहा! बाळ, मरता काळ ओढवला तरी विसरू नकोस की, तुला बाळाजीबाबांचे नाव लावायचे आहे आणि बाजी देशपांड्यांची जात सांगायची आहे. कायस्थाच्या ईमानापासून चळू नकोस.

**चिटणीस** : झाकली मूठ सव्वा लाखाची; बोलून काय दाखवायचे! साऊबाबा, मोऱ्यांच्या माणसांना आमचा माग लागू नये म्हणून या श्रीभवानीचे उमटते पाऊल धुऊन टाकण्यासाठी, माझ्या रक्ताचे शिंपणे करीन; माझ्याबद्दल तुम्ही निर्धास्त रहा.

**साबाजी** : मासाहेब, तोंडातून बोल निघत नाही, पण आता निरोप घ्यायचा! काळ येऊ नये तो आला. निभाऊन नेणार श्रीउमामहेश्वर समर्थ आहेत. पुण्याई सबळ असली तर साबाजी पुन्हा सेवेला चरणापाशी येईल; नाहीपेक्षा हीच अखेरची भेट! मासाहेब, इतका वेळ अवसानाने बोललो, पण आता उरी फुटण्याची वेळ आली. मी आपल्याला माझ्या वडीलकीने धीर दिला; पण आता मला धीर कोण देणार? शिरक्यांच्या या कुळदैवताच्या पायांची पुण्याई! माझ्या बाळराजांची देवमूर्ती (शाहूमहाराजांना साष्टांग नमस्कार घालतो) रायगडच्या देवा, या दुबळ्या देहाला आशीर्वाद द्या - या पायाच्या चाकरीची आठवण ठेवा – चुकल्या कामाची – उण्याअधिकाची साबाजीला माफी करा!

(येसूबाई त्याला उठवितात)

**येसूबाई** : मामासाहेब, हे काय बरे असे भलतेच? आजोबाला मांडीवर खेळवून नातवाच्या पाया पडायचे? ऐंशी वर्षांची तपश्चर्या करून आठ वर्षांच्या बाळाच्या पायांवर मस्तक ठेवायचे? बाळ, आजोबांच्या पायांवर डोके ठेवून त्यांचा आशीर्वाद माग!

**साबाजी** : ऐंशी वर्षे आणि आठ वर्षं! आई उमर फत्तराला असते, फुलाला नसते. फुलाची नुसती जात पहायची असते. माझा म्हाताऱ्याचा बोल आपला ऐकून ठेव – तुझ्या पोटी हा सर्जेराजांनी नवा अवतार घेतला आहे. देवाघरचा जीव जपून ठेवायचा आहे. बरे, मासाहेब, वेळेने वेळ वाढते. देवाचे नाव घेऊन शुभलक्षणी पाऊल पुढे टाकायचे!

**येसूबाई** : आबासाहेबांच्या नावाखेरीज दुसरे कोणत्या देवाचे नाव घ्यायचे! आबासाहेब, आपल्या कुळीच्या कुलदीपकाला – आपल्या नावकऱ्याला नीटपणे घरी न्यायचे आपल्याकडेच आहे!

(एकट्यारे मल्हारा यांवाचुनी – लावणी)
निघते घेऊनि तुमच्या नांवा ।
देवा शिवनेरीच्या शिवा ॥
जरि करि सोबत भ्याल्या जिवा ।
पदराखलीं चिमुकला दिवा ॥
झड घाली तरी कसा वारा उजवा डावा ।
घ्या सांभाळुनि; हा न्या आशेच्या गांवा॥

मामासाहेब, (हिरोजीच्या प्रेताच्या व साबाजीच्या पायां पडते) येऊ आतां? लौकर पाय दाखवायचे; वडिलांच्या छत्रावाचून उघड्या सारखे वाटेल! राजांना सांभाळा – स्वभाव थोडा – (रडतात)

**साबाजी** : मुली, अखंड वज्रचुडेमंडित हो! (येसूबाई वगैरे सर्व जातात) झाले; दगडाच्या दिलाने इतका वेळ धीर धरला आणि आल्या प्रसंगाशी टक्कर दिली! सारी कामे निरवली; आता हिरोजी, तुझ्यासाठी रडायचे तेवढे राहिले (हिरोजीच्या प्रेताकडे पाहतो) संसारातल्या सफरीतला सच्चा सोबती – दिलाचा दोस्त - जिवाचा जोडीदार (एकदम त्याला मिठी मारून आक्रोशाने) हिरोजी, हिरू, वचन दिलेस काय आणि हे केलेस काय? खांद्याला खांदा भिडवून लढलो, गळ्यात गळा घालून रडलो, हातात हात घालून देवलोकी चढलो, असे दोघांनी हसत राजांना सांगायचे. एका आईच्या पोटी जन्म मिळाला नाही तरी धरित्रीमातेच्या उदरी एकठाय मरण मिळवायचे असे हातावर हात मारून वचन दिलेस आणि आज असा बेमान होऊन हातोहात निघून गेलास! राजांनी नेहमी नावाजणी करावी की माझा हिरूबाबा जिभेचा सच्चा, हिरूबाबा जिभेचा सच्चा म्हणून! पण आबासाहेब, तुमच्या लाडक्या फरजंदांनी आपल्या जीवाच्या सवंगड्याशी अखेर अशी दगलबाजी केली! मला एकट्याला मागे लोटून, आपल्या चाकरीच्या लोभाने हिरोजी आपलपोटीपणाने निघून गेले! हिरू, आजवर जगाकडे चार डोळ्यांनी पाहिले, आज या माझ्या दोनच डोळ्यांना इकडे तिकडे पाहण्याची भिती वाटते. तुझ्याकडे पाहाताना तर ऊर दडपून जातो आहे! हिरू, राजांच्या पायाची तुला आण आहे, एकदा तरी डोळे उघडून पहा रे! अरेरे! हिरकणी, तुझ्या रक्ताला माती की रे लागली ही! त्या मातीमोल मोऱ्यांनी

असा हिऱ्यासारखा हिरा मातीला मिळविला! शंभूराजे, तुम्ही राजधर्म सोडला त्याची अशी फळे मिळाली; जिवाची जोड नसलेयामुळे हातापायांची पुण्याई नुसती धडपडीसारखी दिसते. मूळ पायाशुद्धा नसल्यावर विस्ताराचा पसारा फळाला येत नाही. बचनागाच्या बनातून निघालेली गंगा बारामुलूख विखारीत जाळीत जाते! शंभूराजे, शंभूराजे, कडू बोलांची माफी करा – पण, तुमच्या राजवटी हिरोजी अशा हलक्या मरणाने मेला! हिरू, काय करू रे, शंभुदेवाला सोडविण्यासाठी मला जायचे आहे! माझा हात रिकामा असता तर तुझ्याबद्दलचा सूड पुरतेपणी घेतला असता! मोऱ्यांच्या मागच्या बेचाळिशीचे गाडलेले मुडदे उकरून यांच्या हाडांच्या हिरक्यांनी तुझे सरण रचिले असते; आजच्या मोऱ्यांच्या हाडांची काडे काढून तुझी तिरडी तयार केली असती. मोऱ्यांच्या पुढच्या बेचाळिशीच्या कोवळ्या नाळवारांनी तुझ्या ताटीसाठी नाड्या केल्या असत्या; या मोऱ्यांचे मुंडके छाटून त्याची रक्ताळलेली शिंकाळी या हातात घेऊन, राजांच्या नावाने गर्जतगाजत तुझ्या देहाच्या मिरवणुकीपुढे त्रिखंड नाचत सुटलो असतो! पण हिरोजी, माझा हात संभाजी महाराजांच्या मुजऱ्यात गुंतला आहे. आपण रायगडाच्या रियासतीची माणसे; आपल्या देहावर दौलतीची सत्ता आहे! एवढ्यासाठीच तू आपल्या सोबत्याला मागे टाकून देह सार्थकी लावलास! राजांना सोडविण्यासाठी मलासुद्धा इतक्या ताताडीने जायचे आहे की, तुझ्या तोंडात असे तोंड घालून मोकळ्या मनाने रडण्याचे भाग्य, हिरा, माझ्या कपाळी नाही. हिरूबाळा, रागावू नकोस; तुझ्या तोंडावरचे रक्त पुसून टाकून मग जाऊ म्हणतोस? देवा, तुमची दुनियादारी परोपरीची आहे! आजवर, पित्या बाळाचा मुका घेतल्यामुळे आईच्या ओठाला तिचे दूध लागले असेल; तरुणाचे ओठ तरुणीच्या चुंबनाने प्रेमाच्या कल्पनेमुळे अमृताने न्हाऊन निघाले असतील; पण अशा म्हातारड्या मुक्याने, आपल्या जिव्हाळ्याच्या रक्ताने आपले ओठ अजून कुणी रंगविले नसतील! (त्याचा मुका घेतो) हिरकणी, हीच आपल्या स्नेहाची शेवटची सेवा? तुझ्या मूठमातीची काळजी मी कशाला करीत बसू? सार्थकी लागलेल्या जीवाची उत्तरक्रीया देवांना करावी लागते. देवांच्या तेहेतीस कोटी तुझ्या देहाच्या दिमतीला, जोडल्या हाती उभ्या राहतील! भाई, आता मला निरोप द्या! जीवाच्या जीवासाठीसुद्धा चाकरीला चोर होता येत नाही. हिरोजी, साबाजी शंभुराजांच्या सोडवणुकीसाठी निघाला! पण आज मला तुझ्या धीराचा पाठिंबा नाही.

हिरा, देवाच्या दरबारात, तुम्हा जिवाशिवांच्या गाठी पडल्यावर, राजांजवळ भीड घालून त्यांना सांग, साबाजी अगदी थकला, उतारवय झाले – आता ही दगदग होत नाही; त्याला लौकर सोडवून घ्या! हिरू, आता पुन्हा भेट राजांच्या सनोर! हिरकणी, वरच्या वाटेने जपून जा; वाटेत तुला तुझ्या साऊची आता सोबत नाही! आता ही एवढी एक – एक - एकच अखेर मिठी आणि संबंध तुटला! (उठून उभा राहात) संपला स्नेहाचा संसार! फरजंद! नोकरी पेशातल्या साबाजी शिरक्यांचा, तुमच्या वीर देहाला हा शेवटचा रामराम!

(त्याच्या पायावर डोके ठेवतो. पडदा पडतो)

---

**<u>प्रवेश दुसरा</u>**

(स्थळ : घाटमाथ्यावरील रस्ता. चिटणीस व रायाजी प्रवेश करतात)

**चिटणीस** : अरेरे, दैवाची दिशाभूल झाली म्हणजे अशी फसगत होते.

**रायाजी** : मोऱ्यांनी पल्लेदार मजला मारून राजांना तुळापुरी बादशाही छावणीत येवून गुदरले; मी माझ्याकडून काही कसूर केली नाही.

**चिटणीस** : सेनासागर, तुम्ही मोठी माणसे; मन स्थावर नसले तरी तुमच्या हातून भाग्याची करणीच होते. गंगा गढूळली म्हणजे समुद्र सोडून काही डबक्यात जाऊन जीव देत नाही. बरे, पुढे काय? साबाजींनी तुम्हांला माघार घ्यायला सांगितले?

**रायाजी** : मोऱ्यांनी मान्यांना पाठविले इकडे धाकट्या राजांना आणि मासाहेबांना धरण्यासाठी – तेव्हा माणसाला माणूस वाढावे म्हणून साबाजींनी मला इकडे पाठविले आणि बेगमसाहेबांच्या भेटीसाठी आपण तुळापुराकडे गेले.

**चिटणीस** : सेनासागर, आता मान्यांचा मारा चुकविणे मुष्किलीचे झाले आहे. माझ्या बालबुद्धीचा बेत तुमच्या मनास येईल का?

**रायाजी** : खंडोबा, तुला बालबुद्धीचा कोण म्हणेल? मोठमोठ्या पंडितांशी, मांडीला मांडी लावून, बरोबरीने बोलत बसण्याची तुझी लायकी आहे. काय तुझा बेत आहे सांग पाहू.

**चिटणीस** : आपण असे एकमेळी निघालो तर वेळेवर एक घाव दोन तुकडे व्हायचे; म्हणून माझा मनसुबा असा आहे की, आपण फुटून रायगडाकडे दोन वाटांनी जावे;

तुम्ही मासाहेबांना घेऊन तळकोंकणातून चला; मी धाकट्या राजांच्या संगती वाईदेशावरून येतो. अशाने भीती दुभावून मृत्युचे निदान अपमृत्युवर तरी भागेल.

**रायाजी** : तुझा सल्ला पोक्तपणाचा आहे.

**चिटणीस** : चला तर मग, याच पावली मासाहेबांना हे कळवून मार्गाला लागू.

(दोघेही जातात. पडदा पडतो)

---

**<u>प्रवेश तिसरा</u>**

(स्थळ : तुळापूर; बादशाही छावणी. बेगमसाहेबांचा शामियाना.
जाळीदार पडद्यामागे बेगमसाहेब, दासी, पुढे साबाजी)

**साबाजी** : मी साबाजी शिरके बेगमसाहेबांच्या पायभेटीसाठी आलो आहे.

**बेगम** : उठा, आमच्या येसूबाईसाहेब तुम्हाला वडीलपणाने लेखतात. साबाजी, ताईसाहेबांनी या गरीब बहिणीची आठवण का केली?

**साबाजी** : हुजूर, ऐकावा त्यांचा निरोप. घरधनी आपल्या वडिलांच्या अटकेत गुंतले आहेत; घरात कर्तेपणाने बघयला कोणी नाही; आणि करंड्यातले कुंकू वाढवायची वेळ आली आहे; तेव्हा आईसाहेबांनी हा करंडा आपल्याकडून भरून – कुंकवाने भरून – मागितला आहे. हुजूर जाणतच आहेत की, हिंदूंच्या बायकांना कुंकू हेच सौभाग्याचे लेणे आहे.

**बेगम** : हुशार हेजीब, आपली अडचण माझ्या लक्षात आली; पण हा नाइलाजाचा कम्बख्त आहे. आमच्या घरी कुंकू लाभण्याची आशा नाही; पाक दीनाचे मुसलमीन काळा अबीर-बुक्का वापरात.

**साबाजी** : मासाहेबांना आपली मोठी आशा आहे; निदान मला राजांशी बोलायला मिळाले तर मी राजांच्या तोंडची चार सोन्याची अक्षरे मांसाहेबांना ऐकणासाठी घेऊन जाईन.

**बेगम** : ठीक आहे; पाठवा तो करंडा इकडे.

(दासीबरोबर साबाजी करंडा पाठवितो)

**साबाजी** : (स्वगत) आई, अंबाबाई, या वेळी तू बेगमसाहेबांच्या मनीमुखी उभी रहा; या अवकळी करणेचा विस्तार केला नाहीस तर माझ्या आशेचा सारा गाव ओसाड पडेल.

(दासी करंडा परत आणून देते. साबाजी तो उघडून पाहतो)

**साबाजी** : साहेबा, हा तर खुद्द बादशाही शिक्क्याचा मोहरबंद परवाना आहे.

**बेगम** : हो; हा परवाना जवळ असल्यावर तुम्हांला बिरखा पांघरूनसुद्धा वाटेल तिथे, वाटेल त्या वेळी वावरायला कोणाची अटक नाही.

**साबाजी** : पण याने बेगमसाहेबांच्या जीवाला काही त्रास होणार नाही ना?

**बेगम** : या देहातल्या रक्ताची लाली, मराठ्यांच्या महाराणीच्या मेहेरनजरेनेच पाक राहिली आहे; साबाजी, ताईसाहेबांना बेफिकीर सांगा की, यामुळे प्रसंग ओढवलाच तर मुसलमानांच्या अबीराचे हिंदूकरिता लाल कुंकू करण्यासाठी, बेगमसाहेबा आपले रक्त शिंपडायला तयार आहे. ताईसाहेबांना फार फार विचारले म्हणून सांगा – धाकट्या शिवाजीराजांना माझा आशीर्वाद सांगा!

(साबाजी कुर्निसात करतो. पडदा पडतो)

---

---

**<u>प्रवेश चवथा</u>**

(स्थळ: घाटमाथ्यावरील आंबराई. रायाजी प्रवेश करितो)

**रायाजी** : आता अगदी अखेर, अखेर होण्याची वेळ आली! इच्छा बळावलेली आणि इलाज अगदी पांगळा, अशी अवकळा जिवाला वेड लाविते. अधिऱ्या मनाला विरंगुळा पडावा म्हणून माथ्यावर, कामगिरी घेऊन पाहिली, पण अनुभवाने उलट्या गोष्टी सांगितल्या. आज जिवाची बेचैनी बेहद्द वाढली आहे. बेकार बसा वा कारस्थानत असा – प्रेमाच्या पेचातून जीव काही सुटत नाही. शिवगंगा, शुभांगी, शिवांगी! प्यारी, आतल्या आत तळमळ होऊन काही सुचेनासे झाले आहे. एक विचार, एक अनुभव जीवाभोवती घिरट्या घालून त्याला एकलेपणाने राहायला लावितो आणि दुसऱ्या गोष्टींना जवळ येऊ देत नाही. धडपडत्या मनाने सारखा विचार करूनही, काय करावे याचा धागा लागत नाही. जिवा, जाऊ देत! दगडाप्रमाणे

जडावलेल्या डोक्याला घडीभर या दगडाच्या जातीची सोबत द्यावी म्हणजे झाले! शिवांगी, शुभांगी, शिवगंगा! नुसती तळमळ आग चालली आहे!

(दगडावर डोके ठेवून पडतो; एका बाजुने शिवांगी येते)

**शिवांगी** : (स्वगत)

(चाल – कुठवर पाहूं वाट माथ्यावर चंद्र – लावणी)

आजवर पाहुनि वाट सुंदरा देह किरे झुरला । जिवलगा रे॥
डोळ्यात प्राण बघ उरला ॥
भरास आला खेळ – जाब हा कोणी तरी उकला ॥
माझाच डाव कां हुकला ॥
पुरती झाली सांज, कळप हा विसांवत बसला ॥
तो कीर (पोपट) कुणिकडे फसला ॥
घरिं घरिं चाले थाट देवावर फुलवरा चढला ।
हा एक हार कां पडला ।
बहरुनि आला बाग, चहुंकडे रंगरस झुकला ।
माझाच मोगरा सुकला ॥
(चाल) का पाडिसी देवा, वज्रचुड्याला तडा ।
कुणिकडे उडाला मुद्रिकेंतला खडा ।
हरपला मणिच मग उदास नागिणफडा ।
धरुनि भरंवसा जीव ज्यावरति आजवर ठरला ।
जिवलगा रे तो आज वायदा सरला ॥ १ ॥

राया, राजसा, हट्ट तरी किती करायचा? हा मुलखाविरहित रुसवा कधीबरे सरायचा? राया, केलीस ती छळणा पुरेशी नाही का रे झाली? बायकांचा वेडा विश्वास; भोळ्या जिवाने दोन्ही डोळ्यांनी पाखरासारखी भिरभिर वाट पाहिली; दिल्या मुदतीची पाच वर्षे – राया रे, एकेका प्राणाने एकेक वर्ष मोजले; आज मुदत ढळून पाचवा दिवस! दिवसा दिवसाच्या श्वासाने प्राणामागून प्राण पळून, कठोरा, तुझ्या शिवांगीची आशा आज मरणार रे! वेड्या जीवाला नादी लावलेस; तुझ्या नावासाठी चारचौघांत बदनाम झाले, रानारानांतल्या राघूमैनांना तुझ्या नावाची पढवणूक देत आले; दगडदगडाला तुझा ठाव विचारला, फुलाफुलाला तुझा गाव विचारला!

काट्याकुट्यांतून देहाची चाळण करून, तुझ्या पायधुळीत प्राणांची पेरणी करीत तुझ्यामागे देशोधडी केली! आला दिवस गेला अन् जीव भरवशावर मेला! राया, अशी वंचना का रे केलीस? अमृताच्या आळ्यात वाढविलेल्या वेलीला विषाची की रे फळे आणिलीस! राया, धाव, धाव! तुझ्याविना मी परदेशी झाले रे! प्रेमाने पाहू नकोस, रागाने पहा – पण पुढे उभा रहा! तुझ्या पावलांची उमटली साक्षी राखण्यासाठी कुडीची छाया धरीन; तुझ्या नजरेच्या मोहनीवरून जीवाची कुरवंडी करीन! सख्या, जीवाचा धीर सुटला! (मोठ्याने) राया, राया, माझे भान सांडले! राया, आता सांभाळ रे सांभाळ! राया, राया तुला कोणत्या डोळ्यांनी पाहू – तुला कोणत्या बोलांनी वाहू? राया, संभाळ आता! (ती बेभान पडू लागते; रायाजी दचकून उठून तिला सावरून धरितो)

**रायाजी :** कोण, माझी शिवगंगा – माझी शिवगंगा?

**शिवांगी :** (खाली पाहून) तुझी – तुझी – सात जन्मांची तुझी शिवगंगा! (त्याच्याकडे निरखून पाहत) राया - जिवलगा, (एकदम जोराने त्याला मिठी मारून) निष्ठुरा, इतके दिवस कुठे रे होतास? मला सावरून धर! नाही तर वेड्या आनंदाने ऊर कोंडून मी मरून जाईन! मला टाकून जाऊ नकोस रे!

**रायाजी** : (स्वगत) अहाहा! आनंदाचे आऊर (पूर) लोटले! आकाशातून अमृताची झरणी लागून, काया काटेफुलांनी डवरून निघाली! चौऱ्यांशी लक्ष जन्मांची तपश्चर्या फळाला आली! पुंडलीका भेटी परब्रह्म आले गा! माझी शिवांगी – साता जन्मांची माझी शिवगंगा, तानाजीबाबांच्या पुण्याईने पुन्हा पाहिली! बाबा, बाळपणी माझ्या लग्नात विघ्न आल्याने, सुनमुख पाहण्याची तुमची हौस पुरली नाही म्हणून सर्जेराजांना सुद्धा खंत वाटत होती. बाबा, आज दोघे जण मिळून, आम्हा बाळांवर अमृताचा अभिषेक धरा, नक्षत्रांच्या अक्षता उधळा आणि आनंदी आसवांचा आहेर करा! बाबा, आपल्या सुनेला डोळे भरून पाहून तिला आपला आशिर्वाद द्या! (उघड) शिवांगी, माझ्या बाबांच्या आसवांच्या पावसात आपण अशीच अखेरपर्यंत उभी राहू!

**शिवांगी** : राया, आता मला टाकून जाणार नाहीस ना रे?

**रायाजी** : आता तुला टाकून जाणे? माझा प्राण गेला तरी प्राणेश्वरी, माझा मुडदा अशा मगरमिठीने तुझ्या सेवेला सादर राहील!

(नोकर धावत येतो)

**नोकर** : सेनासागर, घात झाला! मान्यांनी आंबराईला चौफेर घेरा घातला! आता मासाहेबांचे कसे होणार? सेनासागर, कसे हो असे आळसात फसलात? मान्यांनी अगदी मोका साधला!

**रायाजी** : मान्यानी अगदी दुस्मानदावा साधला! जा, मासाहेबांना इकडे घेऊन ये.

**नोकर** : मासाहेबांना इकडे घेऊन येऊ? त्यांना कोणत्या जिभेने असे-

**रायाजी** : तुला काय त्याचे! हुकमाच्या ताबेदाराला स्वतःची जीभ नसते. जा!

(नोकर जातो)

**रायाजी** : (स्वगत) वडील माणसांचा उपमर्द झाला तरी फिकीर नाही, पण आता माझ्या शिवांगीच्या या मिठीतून माझी सुटका – सुटका – माझी सुटका – पण मासाहेबांची सुटका मग कशी करायची आणि कुणी करायची? मासाहेबांच्या अब्रूला धक्का लागण्याची - मराठेशाहीच्या इज्जतीवर आकाश कोसळण्याची वेळ आली असताही मी जर अशा मोहाच्या मिठीत मग्न राहिलो तर – तर .. दुभंगलेल्या आभाळाच्या फटीतून थोरले राजे धडधडणाऱ्या छातीने माझ्यावर आशाळभूत – दैन्यवाणी आशाळभूत नजर टाकतील – मला प्रेमाच्या अशा मगरमिठीत गवसलेला पाहून, सर्जेराजे उसासा टाकून माझ्या बाबांच्याकडे पाहतील – या कुलांगाराच्या लाजिरवाण्या करणीने ओशाळून बाबा मान खाली करतील? सुभेदारांचा सिंहासारखा जबडा चिमणीसारखा होईल! उद्या वर गेल्यावर, सुभेदार सुनमुख पाहण्याचा कंटाळा करतील! नाही, मला ही मिठी सोडविलीच पाहिजे, मासाहेबांची सुटका – पण ती कशी करायची? बरोबर वीस तरी माणसे असती तर या रायाजीने या राजेश्वरीच्या रणरंगाने मान्यांच्या हजारांशी हिंमतीने हुज्जत घातली असती! काय करावे? कशा रीतीने मासाहेबांना बाहेर न्यावे? दुसऱ्या एखाद्या वेषाने मासाहेबांना – की, मासाहेबांच्या वेषाने दुसऱ्या एखादीलाच मान्यांच्या हाती देऊन – हो, मान्यांनी अजून मासाहेबांना कधीच बघितलेले नाही – सोन्याच्या साखळ्या जिच्या पायांत दिसतील तिलाच माने ऐकिवाने मासाहेब म्हणतील – पण अशी बाईसुद्धा कोणी नाही; कोणाच्या जीवावर असा उदार होऊ? या रायाजीच्या रासवटी जीवाचा या वेळी काय उपयोग? मग या माझ्या नाजुक जीवावर – (तिला एकदम जोराची मिठी मारून) अरेरे, माझी दीनदुबळी, कमनशीब शिवांगी! मालुसऱ्यांचा कुळधर्म मोठा

कठीण आहे. या माझ्या नाजुक जीवावर – या प्रेमाच्या पंचप्राणांवर पाणी सोडलेच पाहिजे.

**शिवांगी** : राया, ही असली मिठी! राया, तुझ्या मनात काहीतरी पाप आले. तू असा मुखजड का? अशा वेळी तोंडाला येईल ते सारखा बोलत रहा. तुला वाटेल ते बोल – अगदी वेड्यासारखे बोल! पण काहीतरी बोल! मला आनंदाच्या उकळ्या फुटून येताहेत; तुझ्या बोलण्याकडे लक्ष लावण्यासाठी धडपडणे उरले नाही तर हा जीव आनंदाच्या गुंगीत बुडून मी मरून जाईन! राया, मनात असेल ते बोल! वेड्या, किती परोपरीने तुला आळवायचे बरे? राया, राया, बोल ना रे राया! असे काय बरे?

बोल मोरे राजारे नैनू अब मोसे बोल ।
चाहे पिया जान ।चाहे पिया रैन ।
दिल की बातें बोल ॥धृ०॥
कबसे मैं थाडी थाडी, रहां तकत हूं ।
कबसे मैं थाडी तोपे अरज करेत ।
मुखसे मीठे बोल । बोल मोरे ॥१॥

बोलणार ना? ही मी अशी ऐकत राहते बरे ! ( त्याच्या खांद्यावर मान ठेविते)

**रायाजी** : (स्वगत) जिभेवरचा बोल ओठांवर मरतो – डोळ्यांतला बोल आसवांनी झरतो! सुभेदार तानाजी मालुसरे, उदेभानाने हात कलम केला तेव्हा देहापासून हात तुटला, पण हातापासून पट्टा सुटला नाही! त्या तुमच्या पट्ट्याची करारी कुवत, आज आपल्या रायाच्या जिभेच्या पट्ट्याला द्या! बोला, सेनासागर, कमरेच्या राजेश्वरीची जीभ करून तिने बोला!

**शिवांगी** : बोल, राया बोल रे, जिवाच्या राया, बोलाबोलाने मला बेभान करून टाक!

**रायाजी** : (स्वगत) साऊबाबा, देवकळा दवडून दगड होऊ नकोस म्हणून सांगितलेस पण आता दगड होऊन अंगी देवकळा आणायला नको का?

**शिवांगी** : नाही बोलत तू? हट्टी राया, तुझ्या मनात मग मी मरावे असे का आहे?

**रायाजी** : हो!

**शिवांगी** : वेड्या, मग हे बोलायला का भ्यालास? राया माझ्या शिपायासाठी जिवाचे रान करायला शिवांगीने नाही कधी म्हटले? तुझ्यासाठी जगायचे – तुझ्यासाठी मरायचे! माझा राया अगदी अगदी वेडा आहे!

(त्याला मिठी मारावयास जाते; तो थांबवून तिचे हात धरितो)

**रायाजी** : शिवांगी, थांब; तुझा शिपाई तुला वाटतो तितका गरीब नाही. तुझा राया एखादा बेजबाबदार शिपाईप्यादा नाही!

**शिवांगी** : राया, राजेश्वरा, तुला गरीब कोण म्हणेल? कुबेरभांडाराची सारी संपदा माझ्या रायाच्या नावावरून ओवाळून टाकावी! माझ्या सावळ्यासुरतीचा सरदार, माझ्या ऐन अमदानीचा अमीर, माझ्या उमलत्या उमेदीचा उमराव, या नव्या नवतीचा नवरंग, माझ्या बढत्या बहारीचा बादशहा – तू गरीब? शिवांगीच्या शिलेदाराला गरीब कोण म्हणेल?

**रायाजी** : प्रेमाच्या जीवा, तुझ्या मनाचे म्हटले ते जनालाही पटले आहे! तुझ्या ऐन अमदानीचा अमीर, मराठी अमदानीचा अमीर आहे; तुझ्या सावळ्या सुरतीचा सरदार, सत्तावीस किल्ल्यांचा सरदार आहे; तुझ्या उमलत्या उमेदीचा उमराव, उमराठ्याचा उमराव आहे; तुझ्या नव्या नवतीचा नवरंग, या राजेश्वरीचा रणरंग आहे; तुझ्या बढत्या बहारीचा बादशहा, बिरवाडीच्या बहाद्दराचा बेटा आहे! शिवांगीचा शिलेदार, संभाजीराजांचा सेनासागर आहे! जिवा, सिंहगडच्या सिंहाचा छावा – सुभेदार तानाजी मालुसऱ्यांचा रायाजी म्हणून त्याला म्हणतात तोच, शिवांगी, हा तुझा शिपाई.

**शिवांगी** : उमराठ्याचा उमराव, राजेश्वरीचा रणरंग, संभाजीराजांचा सेनासागर ! (एकदम हुंदका देऊन) राया – राया – तू मोठा खोटा आहेस रे! सर्जेराजांच्या नावासारखी तुमची मोठाली नावे! आपले मन माझ्यापासून चोरून ठेवून मला भलत्या भरी पाडलेस! देवा रे, तुझे पृथ्वीमोलाचे भाग्य या रंक पोरीला कसे रे धार्जिणे होणार! राया, अजून मला आपली म्हणशील का? राया, मला तुझे मोठेपण लाभेल का रे?

**रायाजी** : मोठेपणाचा मार्ग मरणाच्या मैदानातून जातो. माझ्या बाबांनी मालुसऱ्यांचे नाव सिंहगडावरून स्वर्गावर चढवून दिले आहे. मालुसऱ्यांचे मोठे नाव मिळविण्यासाठी रायाची शिवगंगा त्या रस्त्याने जाईल का? शिवांगी, रायाचे नाव राखण्यासाठी जीवाचा मोह तुला सुटेल का? प्रेमाने माझी झालीस – प्यार जीवा – माझ्या धर्माने तशी माझी होशील का? शिवांगी, माझे मनोगत तुला सांगू का?

**शिवांगी** : राया –

(चाल : बा उभा ठेवुनी कर कटीं)

कां सख्या शिणविशी अशी । आपुली दासी ।
मन होत; हिंपुटी (कष्टी) तसा शीण जिवासी ।
तो तुझ्या मुखींचा बोल पडू दे राया ।
पसरीन जिवांचें जाळें त्यासी झेलाया ॥धृ०॥
फुलवंती राजसबाळी । तिचा तूं माळी ।
जिवलगा तीनही काळीं ।
ही माळ धरा हृदयाशीं । वहा देवासी ।
परवा न सख्या आम्हांसी ।
देहाची नाहीं माया । जिवाच्या राया ।
शिवगंगा तुमची छाया ।
करुनिया मनाचा रमणा । अहो भगवाना ।
लुटवा या पंचप्राणां ।
तो बोल एकदा बोल, वाहतें आणा ।
तूं सुखी तरी सुख मजला – हा एकच बाणा ॥१॥

**रायाजी** : शिवांगी, आपल्या जीवाचा धडा करून ऐक! आत्ताच ऐकलेस ना, की मान्यांनी आंबराईला वेढा दिला म्हणून! मासाहेबांना रायगडावर नेण्याची कामगिरी माझ्याकडे आली आहे; संभाजी राजांची ही महाराणी शिवाजीराजांची ही पुण्याई, मराठ्यांची अब्रू या नापाक मान्यांच्या हाती सापडली तर एकजात मराठेशाहीत मालुसऱ्यांच्या कुळाची, तानाजीबाबांच्या आठवणीची – शिवांगी, तुझ्या रायाच्या नावाची – नुसती रेवण उडून जाईल! आता निभावणीचा एकच रस्ता आहे! या मान्यांनी अजून मासाहेबांना कधी पाहिलेले नाही. मासाहेबांच्या सोन्याच्या साखळ्या पायात घालून, त्यांचे नाव सांगून, त्यांच्या जागी तुला उभे रहावे लागेल; भोसलेशाहीच्या साखळ्यांची खूण पटून, माने तुलाच मासाहेब म्हणून मोऱ्यांसमोर घेऊन जातील आणि आम्ही रायगडावर जाऊ! पुढे मोऱ्यांनी तुला ओळखल्यावर, संतापाच्या भरात सूड घेण्यासाठी, त्यांनी तुझ्या देहाची – तुझ्या रायाच्या प्रेमाची – विटंबना करण्याकरिता आपला हात पुढे करिताच -

**शिवांगी** : शिवांगीच्या नशिबा, त्यावेळी जिवाची सांडणूक कशी करायची एवढे एकदा सांग म्हणजे झाले! सांग, कोणत्या उपायाने?

**रायाजी** : शाबास, शाबास, दिलदार जिवा, देवाधर्माच्या नावाने! शाबास! हा पहा निर्वाणीचा उपाय! ही सर्जेराजांच्या नावाची हिऱ्याची अंगठी – माझ्या बहाद्दर प्रेमा, (त्या वेळी पोटात गिळायची अंगठी तिच्या बोटात घालतो) प्रीतीच्या अफाट राज्यात प्रेमळ वल्लभांनी, आपल्या प्रेमाची जन्माची खूण राहावी म्हणून प्रियतमांना मुद्रिका दिल्या असतील; पण आपल्या प्रेमाची जन्माची खूण नाहिशी करण्यासाठी अशी अंगठी आजवर कोणी कोणाला दिली नसेल! शिवांगी, खरोखरीच माझ्या सांगण्याप्रमाणे तुझ्या हातून घडेल का?

**शिवांगी** : मालिक, तुझ्या मनाची मोडणी करण्यासाठी का शिवांगीने तुझ्या नावाशी अशी सलगी केली आहे? वेड्या आम्हा बायकांना सासरचे नाव जोडायला माहेरच्या ममतेचं मूळ तोडावे लागते. या हिऱ्याच्या तेजाने माझा रस्ता दिसल्यावाचून राहिल का? तुझ्या प्रेमासारखे या हिऱ्याचे तेज चमकत आहे खरे! पाहा बरे नीट!

**रायाजी** : हो, पाहिले; नीट पाहिले! (स्वगत) हेच पाहिले की हिरा पचनी पडणे कठीण आहे – दुर्दैवी संसारात प्रेम पचनी पडणे कठीण आहे!

**शिवांगी** : राया, आता पुन्हा डोळेभेट कधी घडायची?

**रायाजी** : लाडक्या जीवा, आता पुन्हा भेट? पुढल्या जन्मी!

**शिवांगी** : डोळ्यांत आसू आन् तोंडावर हसू! लबाडा, लाडके हसून असे फसवू नकोस! आधीच आपले तुला बजावून ठेविते – राया, इतका धीर माझ्याने मुळीच निघायचा नाही हो! कुडीतून सुटका होताच, शिवांगीचा अधिरा जीव, उडत्या पाखराच्या पंखांनी तुझ्याभोवती घिरट्या घालील; घडीपळाने म्हणून तुला विसंबायची नाही! राया, दरबारी थाटात तुझ्या शिरपेचावरची शोभा होईन; मोकळ्या मनाच्या मिजलशीत तुझ्या शराबावरची लाली होईन; शिकारीच्या तळपत्या तापात माझ्या रायाच्या डोक्यावरती घार होईन – ऐन रणाच्या गर्दीत माझ्या रणरंगाच्या राजेश्वरीची धार होईन! पण राया, इतक्या वेळात पहिल्यासारखा मला विसरणार तर नाहीस ना?

**रायाजी** : तुला विसरेन? एकेका प्राणावर तुझ्या नावाचे अक्षर गोंदवून पंचप्राणांच्या प्रभावळीत "श्रीशिवगंगा" जडवून ठेवीन!

**शिवांगी** : राया, माझ्या मरण्याने तुला इतके का सुख होणार? किती रे मे दैवाची!

**रायाजी** : मला एकट्यालाच सुख होईल? अलम मराठेशाही तुला आनंदाने दुवा देईल. उद्याच्या लग्नाची तुझ्या माझ्या नावांनी देवके बसतील; देवी शिवगंगा! तुझ्या प्रेमळ जीवाच्या उदार आधारावर महाराष्ट्रात गंगायमुना वाहतील! तू वर गेल्यावर सुभेदार अभिमानी कौताकाने तुला राजांसमोरे नेतील; मातोश्री सईबाईसाहेब आसवांच्या मोत्यंनी तुझा भांग भरतील; सिंहगडी, कल्याण दरवाज्यावर बाबांच्या हातून गतीस मिळालेल्या चंद्रावळी हत्तीवरून सर्जेराजे तुझी मिरवणूक काढतील; तुझा साजशिणगार हेरून माझी जानकीआक्का भोळ्या आनंदाने गदगदून हसेल; चंद्रावळीवरून माझ्या शिवांगीला मिरविताना पाहून, ऐरावताची धनीण हेव्याने ओशाळून खाली पाहील; तेव्हा आपल्या श्रीजिजाऊसाहेब आपल्या हाती तुझी दृष्ट काढतील; आणि बाबांचा पवाडा गाणारा तुळशीदास – मंडईच्या बाजारी असलेला – फणीआळीच्या फडात देसाई - देशमुखांसमोर बसलेला – रघु सोनाराच्या घरी बसलेला – आपला मराठेशाहीचा शाहीर – देवादिकांच्या देखत, गंधर्वांच्या तांड्यासमोर, डफतुणतुण्यांच्या तालासुरांत आणि मराठी बोलांच्या ऐन पुरात – तुझ्या माझ्या अखेरभेटीचा, जिव्हाळ्याच्या जुन्या गाण्याला जितेपणाच्या जमाने, नव्या धाटणीचा कटिबंध जोडील आणि तुझ्या जिवाच्या पेरणीने मराठी मनाच्या माळावर मोत्याचे पीक तोडील (पाहून) शिवांगी, त्या पहा मासाहेब येताहेत; चल, या मराठमोळ्याच्या मायगंगेला प्रणाम करू! मात्र सोन्याच्या साखळ्या आपल्या हाती येईपर्यंत आपल्या आताच्या बेताबद्दल आधी त्यांच्यादेखत काही बोलू नकोस!

(येसूबाई येतात)

**रायाजी** : मासाहेब, ही माझी – ही – ही आपली -

**येसूबाई** : नव्या जाऊबाई ना? सेनासागर, जाऊबाईपेक्षा तुम्हीच जास्त लाजला! तुम्हाला असे लाजताना पाहून राजे मनापासून हसले असते! (ती दोघे येसूबाईस नमस्कार करतात) उदंड आयुष्यमान व्हा!

**रायाजी** : मासाहेब, वडिलांनी कोरडा आशीर्वाद दिला म्हणजे मुलांची मने विरस होतात. माझी शिवांगी मोठ्या हळव्या जीवाची आहे. माझ्या नव्या नवरीसाठी मासाहेबांजवळ मी मूलपणाने एका अलंकाराची मागणी करणार आहे. आजवर शिवांगीच्या प्रेमाखेरीज मी देवाजवळसुद्धा याचना केली नाही. तानाजीबाबांचे शुभ

झाल्याचे ऐकल्यावर, सर्जेराजांनी माझ्या आईला सांगून पाठविले की, जसा माझा शंभू, जसा माझा राजाराम, तसाच तिसरा रायबा! त्या दिवसापासून आजतागायत, रायगडच्या रणमर्दाच्या पावलामागे पाऊल टाकून, या राजेश्वरीच्या रणरंगाने जगाला रामलक्ष्मणांची मराठी जोडी दाखविली! मासाहेब, केल्या कामाची चोरी नाही; आज मला माझा मुशाहिरा पाहिजे. तोंडातून अवाक्षर काढल्यावाचून, मासाहेब माझा बालहट्ट पुरवाल का?

**येसूबाई** : सेनासागर, अखेर बोलून घालविलेत! आधी मागायचे तरी होते! काय पाहिजे तुमच्या नव्या नवरीला?

**रायाजी** : मासाहेब, मी सांगेन त्याप्रमाणे वागण्याबद्दल माझ्या राजेश्वरीची आण वाहा पाहू!

**येसूबाई** : (रायाजीच्या तलवारीवर हात ठेवून) भोसल्यांच्या भाग्याच्या भांडारावर पहाऱ्यासाठी तळपणाऱ्या या तुमच्या नागिणीची मालुसऱ्यांच्या पिढीजात राजेश्वरीची मला ग्वाही आहे.

**रायाजी** : शिवांगी, आपण मिळविले! मासाहेब, आपल्या पायांतल्या सोन्याच्या साखळ्या माझ्या शिवांगीसाठी पाहिजेत!

**येसूबाई** : रायाजी, मी लोभाने म्हणत नाही – राजांचे चरण साक्ष आहेत – पण रायगडच्या राणीच्या या साखळ्या, परक्या पायांना नागिणीचा विळखा घालून विखारी चावा घेतात; यांच्या स्पर्शामुळे नवथर जीव, देहाची शीव सांडून, देशोधडी लागतो! परवापावेतो ही सांगायची गोष्ट होती; तुळशीच्या अनुभवाने आमच्या कुळीच्या या कडू कहाणीला खरेपणा आणला आहे.

**रायाजी** : मासाहेब, आपण राजेश्वरीच्या साक्षीने बोल दिलेला आहे! थोरांना एक गोष्ट दोन तऱ्हांनी बोलता येत नाही. आता वेळ सरता होत आहे; मान्यांनी राईला असा चौगर्द घेरा घातला आहे की, उडत्या पाखरालासुद्धा पळवाट मिळायची नाही. माने इतक्यात आपल्या तपासासाठी इकडे येतील. पण त्यांनी अजून आपल्याला पाहिलेले नाही; तेवढ्यात, आपल्या साखळ्या घालून, औट घटकेसाठी आपले नाव लेवून, माझी शिवांगी आपल्या जागी उभी ठाकेल! शिवांगीच्या जिवापुरत्या सुटकेसाठी, राजांनी बाबांना दिलेली हिऱ्याची अंगठी मुहुर्तावर मी मघाशीच तिच्या

बोटी घातली आहे. शिवांगीची दुबळी दौलत घडीभर आपण स्वीकारून आमच्या नावाला पावन करावे! माने खुशाल शिवांगीला घेऊन जातील!

**येसूबाई** : सेनासागर, सेनासागर, निव्वळ मांगाची करणी केलीत! गोड बोलून माझा गळा गुंतविलात! बाई, काय ग तुझ्या संसाराची परवड ही!

**शिवांगी** : राया, मासाहेब रागावल्या वाटते? आता कसे बरे करायचे? थांब, मी घालते त्यांची समजूत. बाई, माझ्या रायावर अशा रागावू नका, मासाहेब, आईसारख्या ना तुम्ही मला? मग माझे का बरे सांगणे मोडायचे? माझा राया अगदी भोळा आहे हो!

(येसूबाई शिवांगीला पोटाशी धरितात)

**रायाजी** : मासाहेब, वचनाला बाध आला तर माझ्या राजेश्वरीच्या इज्जतीला बट्टा लागेल!

**येसूबाई** : ती राजेश्वरी नाही – पण खाटकाचा सुरा आहे! तिनेच माझा गळा कापलात – या भाबड्या, गरीब गाईचा गळा उतरलात! आणखी असे निर्दयासारखे हसता आहात - शुद्ध कसाब, कसाब आहात!

**रायाजी** : मासाहेब, सोईरसंबंधाच्या गोष्टी व्हायच्या त्या झाल्याच पाहिजेत! आई भावानीच्या साक्षीने, पहिल्या पिढीत, भोसल्यामालुसऱ्यांच्या सोयरिकी जमून सर्जेराजांनी ही आमची राजेश्वरी सेवाधर्मासाठी पदरी घेतली, त्याच वेळी, या पोरीच्या आंदणासाठी मालुसऱ्यांचा औट हातांचा मळा भोसल्यांच्या नावे, जिवाच्या मिराशीपासून कायमदायम तोडून दिला! भोसल्यांच्या अमंगळाची इडापिडा, व्याहीभेटीत आमच्या भोगवट्याला आली! आमच्या आजच्या विहिणीच्या पायावर विरवल्या रेखाटण्यासाठी, शिवांगीच्या रक्ताची सांडणूक व्हायलाच पाहिजे!

**येसूबाई** : अशा रक्ताभरल्या पावली गडावर गेले तर रायगडाचा रेतीचूर होईल. मोठेपणाचा कर्मभोग मराठ्यांच्या छत्रपतींवर पावलोपावली ओढवतो आहे! भोसल्यांच्या खाशांना, ताटाला बसण्यासाठी इमानी सोयऱ्यांच्या प्राणाहुती घालून, त्यांच्या पिंडीच्या रगतभाताने आपला पिंड पोसावा लागतो! सेनासागर, तुम्हा सर्वांच्या उपकाराचे आमच्या पाच पिढ्यांच्या पुण्याईनेसुद्धा पांग फिटायचे नाहीत!

**रायाजी** : मासाहेब, माने अचानक येऊन थडकले तर मसलत फसेल! सीतामाईंनी लक्ष्मणाच्या बोलण्याचा अव्हेर केला तेव्हा – जाऊ देत, अभद्राची उजळणी भलत्या

वेळी कशाला हवी? सोन्याच्या साखळ्या लवकर काढून द्या! मासाहेब, आता माझी, राजांची, धाकट्या राजांची आण आहे!

(येसूबाई साखळ्या काढतात व शिवांगीला देतात)

**रायाजी** : (स्वगत) आधी राजेश्वरीची शपथ दिली म्हणूनच ही देवी नवसाला पावली! (उघड) शिवांगी, घाल त्या साखळ्या पायांत!

**शिवांगी** : मला नाही बाई जमायचे ते! राया, तुझ्या प्रेमासाठी, राजांच्या नावासाठी, आणखी एकदा मरायला सांग – पण या साखळ्या आपल्या हाती कशा लेतात हे नाही मला माहीत! तूच ये कसा! पण तुला पुरुषाला तरी काय कळायचे आहे त्यात? बाई, आम्ही आपली रानची जनावरे आहोत. तुमच्या नावाने आम्हांला तरून जायचे आहे. माझ्या रायाच्या पुण्याईने ही भुषणे मला लाभली; एरवी बघायलासुद्धा मिळायची नाहीत. तुम्हीच आपल्या हाती घाला पाहू या साखळ्या माझ्या पायी! राया, बाईंना सांग बरे तू एकदा! येता ना बाई? राया, बाई जरा हट्टीच आहेत का रे?

**रायाजी** : (हसून) मासाहेब, माफ करा – माझ्या रानफुलाचा रंग जरा भडक आहे; पण वास नाजुक आहे. मनाची मोठी कोवळी जात आहे ही! आपल्या चरणी वाहिले आहे; पुजा कशी तरी साजरी करून घ्या! तोंडाचा रांगडा राक्षसगण आहे; पण दिल देवगणाचा आहे! घाला त्या साखळ्या पायांत!

**येसूबाई** : सेनासागर, शिळारसाच्या रतिबाने मन पोसून, तुम्ही बोलायला शिकला आहात! मी काय बोलू? तुमच्या राजेश्वरीने माझी जीभच कातलेली आहे! बेटा, ये अशी; नशिबाचा छळवाद व्हायचा तितका झालाच पाहिजे.

(येसूबाई साखळ्या घेऊन पुढे होतात)

**शिवांगी** : राया, या मासाहेबाच्या साखळ्या – या पायांत घालू नयेत ना? हे बघ, या हातांतच घातल्या तर नाही का चालायचे? हे पुजेचे निर्माल्य पायदळी कसे पाडायचे?

**रायाजी** : वेडी, माझी भाग्याची वेडी! देवाचे नाव घे आणि खुशाल साखळ्या पायांत घाल! दामाजीवर संकट आले तेव्हा भक्तासाठी भगवंतांनी भणंगाचा वेष घेतला; आज काळाची गंगा उलटी वाहत आहे; देवाघरचे साकडे दूर करण्यासाठी आज भिकाऱ्यांनी भाग्यवंताचे नाव घ्यायचे आहे. सतीचे सोंग घेतल्यावर पाटावाची परवा ठेवून चालत नाही. मासाहेब, उगीच वेळ वाढतो आहे.

**शिवांगी** : खरेच बाई, घाई करा गडे! माझा राया इतके सांगतो आहे – आपण जिवाभावाच्या मैत्रिणी – माझ्या भाग्याची उजरी वेळ आणि तरी तुमचा हात आपला जडच! रायाला राग येईल बरे!

(चाल – साजन होरे)

साजणि बाई । सजवी मजसी करि घाई ।
लगिनघडी जाई । वेळ आली भरा ।
देव आले घरा । करी चतुराई ॥१॥
साजणि बाई । नटुनि थटुनि लवलाही ।
निघतें अगाई । राजराजेश्वरा ।
जवळिं याहो जरा । बघिन मुख काही ॥२॥
साजणि बाई । चपळ पळत मन पाहीं ।
जवळ नच राही । मंगलाचे सडे ।
टाकि चोहींकडे । दावि नवलाई ॥३॥

(साखळ्या घालून होतात)

**येसूबाई** : सेनासागर, सांगा आणखी काय करायचे राहिले आहे ते । पोरीचे एकेक बोलणे ऐकताना आतड्याला पीळ बसवून जीव तटतटा तुटतो अगदी! हं मीच फिरवू का सुरा हिच्या मानेवरून? सेनासागर, काय मांडले आहे तुम्ही हे?

**रायाजी** : मासाहेब, आज माणूसबळ खुंटले म्हणून बाशिंगबळ तुटले!

**शिवांगी** : राया, या साखळ्या घातल्या खऱ्या पण मी राजाच्या राणीसारखी शोभते तरी का रे?

**रायाजी** : परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने झाले! शिवांगी, आपल्या प्रीतीचा प्रवाह गंगास्वरूप झाला; प्रेमाच्या पोरखेळातली रायाजीची राणी, मरणाचे मोल देऊन मराठ्यांची महाराणी झाली! माझी शिवगंगा – श्रीमहाराष्ट्रगंगा झाली!

**शिवांगी** : राया, मरताना मला भीती वाटेल का रे? पण माझ्या राजेश्वरीच्या रणरंगाला मरणाचा कोण केवा! बाई, बायकांना मरताना भीती वाटते का हो? अगबाई, तुमच्या डोळ्यांला पाणी आले! तुम्हाला तरी मी कशाला विचारले कुणास ठाऊक! या अंगठीवर शिवरायांचे नाव आहे आणि रायाच्या जिवाचा भाव आहे; मला

वेडीला एवढे कळले नाही, की शिवरायांचे नाव तोंडी असताना, मला मरायची भीती ती काय वाटणार?

(नोकर धावत येतो)

**नोकर** : सेनासागर, माने आले – अगदी जवळ आले!

**रायाजी** : खुशाल येऊ देत – अगदी जवळ येऊ देत! अरे, हे बघ, मासाहेबांना आता शिवांगी म्हणावयाचे आणि या या आपल्या – वेड्या प्रेमा, आता बोलताना थांबू नकोस. प्रेमाच्या बरळण्याला सगळ्या जगानेच वेड्यात काढिले आहे! अरे, या आपल्या मासाहेब! येसूबाईसाहेब, क्षमा करा – माझ्या मरत्या 'प्रेमाचा हा अखेरचा उमाळा आहे! पुंडलिका भेटी परब्रह्म आले गा!' पण, भक्तराज पुंडलिकाने, मातापितरांची सेवा साधण्यासाठी, श्रीपांडुरंगस्वरूप परब्रह्माला अठ्ठावीस युगे विटेवर तिष्ठत ठेविले; महाराष्ट्राच्या मातापितरांच्या नावासाठी; प्रेमस्वरूप परब्रह्मा, हा रायाजी तुला शेवटचा प्रणाम करीत आहे.

(तिला दंडवत घालितो. नंतर नोकरांसह माने येतो )

**माने** : हं, हीच येसूबाई! सोन्याच्या साखळ्यांनीच अखेर हिला दगा दिला! काय रे! ही दुसरी कोण? तो वेडापीर रायाजी कुठे आहे? आणि तू कोण आहेस?

**रायाजी** : (तलवार उपसून) तो वेडापीर रायाजी मेला; ही मासाहेबांची दासी शिवांगी; आणि मी कोण हे ही माझी तल-

**माने** : कंगाल, तुझी तलवार राहू दे तुजजवळ; आम्हांला ही राजाची राणी हवी आहे! हं, चला रे हिला घेऊन!

(नोकर शिवांगीला घेऊन जातात)

**रायाजी** : अहो, मासाहेबांच्या बरोबर एखादी असू द्या हो! या शिवांगीला तरी घेऊन चला!

**माने** : राणीचीच दासी करायला न्यायची आहे. तिथे ही शिवांगी कशाला न्यायची मरायला!

**रायाजी** : बेवकूब! शिवांगीच न्यायची आणि तीसुद्धा मरायलाच!

(रायाजी काही वेळ शिवांगीकडे पाहत राहतो. तलवारीकडे पाहून)

राजेश्वरी, आपली शिवांगी गेली! आता तुमची आमची जनमगाठ!

**येसूबाई** : रायाजी -

**रायाजी** : मासाहेब, आत्ताच सांगितले – रक्तामांसाचा रायाजी मेला, समशेरीपुरता सेनासागर काय तो आता राहिला आहे! शिवांगीचे पंचप्राण, रायाजीचे दहा प्राण, वैराणात दाही दिशा वेरून टाकिले! रायाजीच्या प्रेमाशी पिढ्या तुटल्या; प्रेमाची दोन पाखरे वणव्यात होरपळून मेली! मासाहेब चला लौकर.

(सर्व जातात. पडदा पडतो)

---

**<u>प्रवेश पाचवा</u>**

(स्थळ : तुळापूरची मोगल छावणी – तुरुंग. पात्र : मांडी घालून पायांवर हात टाकून बसलेले श्रीसंभाजीमहाराज. भोवती साधारण अंधार)

**संभाजी** : (स्वगत) मरणाचा कोणाला अनुभव नाही म्हणून; पण माझी ही स्थिती म्हणजेच मरण असेल का? काही दिसत नाही, काही भासत नाही. विखारलेले मस्तक सुन्न झाल्यामुळे काही सुचत नाही, आठवत नाही, कळत नाही! जीव जड झाला आहे आणि शरीर हलके वारेमोल झाले आहे. मी जमिनीशी खिळून बसलो आहे, की वाऱ्यावर वावरतो आहे हेच उमजत नाही! अरेरे, हे काय झाले! मराठ्यांचा राजा मोऱ्यांचा कैदी झाला; वाघाची गरीब गाय झाली; मर्दाचा मातीमोल मुडदा झाला, होत्याचे नव्हते झाले! आता काय व्हायचे राहिले आहे? हो, या जित्या मरणाची जाळती जाणीव अजून बाकी आहे! मेल्या माणसात आणि जिवन्मृतात एवढी तफावत असते, की, मेलेल्या माणसाला आपण जिवंत असूनही मेल्यासारखेच आहोत अशी जहरी जाणीव मुळीच नसते. हे मरण नाही; ही मरणाहून भयाण, अजून कोणाच्याही अनुभवाला आलेली नाही अशी – मरणाच्या नंतरची जीवदशा आहे! मग सर्वस्वाचा विसर पाडण्याऱ्या मरणाने, माझ्या जीविताचा सुखी शेवट व्हायचा चुकून तसाच राहिला का? सुखाचे मरण तर नाहीच, पण मरणाचे सुखही या कमनशीब संभाजीला पारखे झाले का? (मोठ्याने) क्रूर, कठोर काळा! ये, क्षणभर देवाहून दयाळू होऊन ये आणि माझ्या गळ्यात आपला बळकट बाहुपाश घाल! (पाहून) कोण आहे ते?

(साबाजी बुरखा पांघरून असा येतो व संभाजीराजांचे पाय धरितो)

**संभाजी** : कोण आहे? खरोखरच काळपुरुष माझ्या गळ्यात मगरमिठी मारण्यासाठी धावून आला आहे काय?

**साबाजी** : राजे, ही आपल्या गळ्याची काळाची मगरमिठी नाही, पण आपल्या पायाच्या चाकराची आपल्या पायाशी प्रेमाची मिठी आहे.

**संभाजी** : कोण, साबाजी? ऊठ! तुझ्या तपोमूर्तीला या पामरासाठी इतक्या कष्टात कशाला पाडिलेस? या तुझ्या नीच धन्याची सेवा करण्याची हौस अजून फिटली नाही का? माझी आज्ञा शिरसामान्य करण्यापेक्षा, माझा शिरच्छेद करण्याचा इतका तिटकारा तुला अजून आला नाही का? साबाजी, चल, तुझ्या बिजलीच्या एकाच चमकीने या संभाजीच्या निर्जीव देहाचा नायनाट करून टाक! दौलतरावाच्या बेइमानाला कंठस्नान घालून तुझ्या बिजलीनेच पावन केले. पोटच्या पोराच्या पापाबद्दलच पक्षपाती होऊन मला परकेपणाने त्या पुण्याईपासून दूर लोटू नकोस.

**साबाजी** : राजा, तुला मरण देण्यासाठी मी तुझ्याकडे आलो नाही, पण मराठेशाहीसाठी जीवन मागण्याकरिता आलो आहे. चल, हा बुरखा पांघर, हा परवाना घे – यावर बेगमसाहेबांचा शिक्का आहे. हा दाखविला म्हणजे कुठेही मज्जाव नाही – हा घे आणि इथून बाहेर पड!

**संभाजी** : आणि तू? हा तुरुंग म्हणजे बळी मिळण्यासाठी काळाने उघडलेला जबडा आहे!

**साबाजी** : तुला इथे राहून जे करावे लागणार ते मी करीन. तुझे पडेल ते काम हट्टाने करण्याचा, या तुझ्या साबाजीचा हक्कच नाही का?

**संभाजी** : स्वर्गाला कंटाललेले देव का रे तुमच्या मनीमानसी वसतीला उतारा करितात? अमृताच्या चुळा टाकीत का तुमची रसवंती अवतरत असते? साबाजी, मेलेल्याला मारण्यात काय मौज आहे बरे? तुझ्या भलाईने मला किती खाली पाहावयाला लावणार? तुला येथे काळाच्या तोंडात लोटून मी चालता होऊ? तुझ्या पवित्र प्राणांच्या मोबदल्याने या कवडीमोल शरीराचा सांभाळ करू? अरे, अगदी रौरवाचे रहिवाशीसुद्धा माझ्या शेजाराचा किळस करतील! साबाजी, संभाजीचे मस्तक अजून मोगलांनी उडविले नाही! ते ठिकाणी आहे. अशा राक्षसी रीतीने वाचण्यापेक्षा मला मरणाचे महत्व जास्त वाटते.

**साबाजी** : लाख मरोत पण लाखांचा पोशिंदा न मरो! राजा, तुझ्या हुकमाच्या एकेका बोलाबरोबर मोहरलेल्या झाडांना साबाजी लागतील. खिंडखोऱ्यांतल्या दगडांचे देव होतील! साबाजी आता मेला काय आणि जगला काय! आधीच आखडलेल्या नाड्यांनी बांधलेले हे शरीर बेडीने जखडले तर त्यात काय नुकसान होणार? या हाडांच्या सापळ्यातून जिवाचे सावज सुटले तर सुखी होऊन जाईल! उलट, तुझ्या मूर्तीकडे सारी मराठेशाही डोळे लावून बसली आहे. तुझ्याविणे आईभवानीची पूजा थांबली आहे. या जित्या मुड्द्याची पायरी करून तिच्या मंदिरात पाऊल टाक; नाही म्हणशील तर या पांढऱ्या केसांची शपथ आहे.

**संभाजी** : साबाजी, अगदी वेडा नव्हेस का? आईभवानीची पूजा बांधायला तुझ्यासारखी कल्पवृक्षाची फुले टाकून माझ्यासारखे निर्जीव दगड का गोळा करायचे! साबाजी, असे बोलून आता मला लाजवू नकोस! या संभाजीच्या छातीने एकदा दगडांशी धडका दिल्या, पण आज नुसत्या बोलाफुलांनी माझा दिल फाटून जात आहे. माझ्या हातून आता काय होणार? तो संभाजी मरणावाचून मेला, आणि हा संभाजी जिवावाचून जगत आहे. जिवात जीवपण नाही, देहात देहपण नाही, नुसते संभाजी हे नाव राहिले!

**साबाजी** : राजा, नको रे नको असे बोलू! जे तुझ्या नुसत्या नावी आहे ते आमच्या गावीसुद्धा नाही.

**संभाजी** : गाव वाहून गेले, नाव राहून गेले. माझ्या नावाचा डंका वाजतो आहे तो थोडा झाला का? साबाजी, नेत्या पुरुषाची जबाबदारी मला न कळल्यामुळे मी मराठेशाही मातीला मिळविली; बाळाजी चिटणिसांसारख्यांना हत्तीच्या पायांखाली तुडविले, आणि कबजीसारख्या कंगालाला डोक्यावर नाचविले. माझे नाव ऐकल्याबरोबर जातीचा मराठा कानांवर हात ठेवील.

**साबाजी** : तुझे नाव! रामनामाने नुसते डोंगर तरले; पण राजा, तुझ्या नावाने, मराठेशाहीच्या छत्रपतींच्या नावाने, नवखंड पृथ्वी उद्धरून जाईल. दुर्गादेवीच्या दुष्काळात मेलेले जीव तुझ्या नावाच्या संजीवनी मंत्राने पुन्हा सजीव झाले असते; तुझ्या बिरुदावलीतल्या एकेका बोलाला वेदवाक्याची योग्यता आहे. तुझे नाव घेऊन मृत्युयोगावर बाहेर पडणाराला अमृताच्या वेळा लाभतील. ऐक, राजा, तुझे नाव नीट ऐक. गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज!

**संभाजी** : गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपती संभाजी महाराज! नाही, साबाजी, ही माझी किताबत नाही! संभाजी हा म्हणजे केवळ रंडीबाज छाकटा! काशीची गंगा आणि रामेश्वराचा सागर एकवटून छत्रपतींनी बांधिलेल्या राष्ट्रतीर्थाची – श्रीगंगासागराची ज्याने व्यभिचाराच्या दिवाणखान्यातली मोरी बनवली तो हा संभाजी! वैराग्याच्या वेगाने फडफडण्याऱ्या भगव्या झेंड्याला दारुबाजाचे तोंड पुसण्याचा दस्तरुमाल केला! महारष्ट्रलक्ष्मीच्या वैभवाचा जरीपटका फाडून त्याची रांडेसाठी काचोळी केली! साबाजी, माझ्या नऊ वर्षाच्या नावलौकिकाची इमारत नीटपणे पहा! चिटणिसाला हत्तीच्या पायांखाली तुडवून तिचा पाया घातला. मातोश्री सोयराबाई साहेबांना जितेपणी भिंतीत चिणून तिच्या भिंती उभारल्या; ती पातकी इमारत उंचावता उंचावता कळसाला पोचण्यापूर्वीच कोसळून तिच्याखाली संभाजीचा चुराडा होऊन गेला. साबाजी मी बाहेर पडून लोकांना काय तोंड दाखवू? आपला राजा सुटला असे पाहताच, माझी प्रजा आपखुषीने देश सोडून हद्दपार होईल. साबाजी, या काळोखातसुद्धा मला तोंड लपवावेसे वाटते. खाली पाहीन तर हत्तीच्या पायांनी पाताळापर्यंत गाडलेला बाळाजी पुन्हा जमिनीतून वर येईल अशी भीती वाटते. भोवताली पाहिले, तर कोपऱ्याकोपऱ्यांतून आईसाहेबांचे डोळे माझ्याकडे टवकारून पाहतील. वर पाहिले तर शिरक्यांची उडविलेली शिरे आकाशातून जयद्रथाच्या मस्तकाप्रमाणे येऊन माझ्या मस्तकावर आदळतील! साबाजी, मी आता कोणीकडे पाहू? सह्याद्रीचा सिंह आता अगदी भयभीत झाला आहे.

**साबाजी** : राजा, धीर धर. कल्पनेच्या काहुराने मराठेशाहीचा मोहरा रायगडचा रणमर्द – भ्याला हे कोणाला कसे सांगायचे?

**संभाजी** : रायगडावर उभा राहून साऱ्या मराठेशाहीला ओरडून सांग, की मराठेशाहीचा मोहरा नामोहरम झाला; रायगडचा रणमर्द मनाचा नामर्द ठरला. मातेला मरण दिले; प्रजा म्हणजे पोटच्या पोरासारखी – कन्येशी व्यभिचार केला. देवीसारख्या पत्नीचा राक्षसाप्रमाणे छळ केला. सर्वांना जाऊन माझा शेवटचा प्रणाम सांग. महाराष्ट्रात, महाराष्ट्राच्या राजाला तोंड दाखवायला कुठेही जागा नाही! आबासाहेबांच्या सर्व मराठे वीरांना या संभाजीचा शेवटचा प्रणाम सांग. आणि सरतेशेवटी, महाराष्ट्रलक्ष्मीच्या मंगल मंदिराला – मराठेशाहीच्या माहेरघराला – दक्षिणच्या दुर्गदेवाला – राजांच्या रायबाला – त्या श्रीमान् रायगडाला माझा दंडवत

सांग – त्याला हात जोडून सांग, की संभाजी, मोकळा असता तर तुझा भ्रष्ट केलेला गंगासागर त्याने अपल्या रक्ताने आणि आसवांनी भरून काढिला असता.

**साबाजी** : राजा तुझ्या एका शब्दासरशी ही मोकळीक तुला मिळणार आहे.

**संभाजी** : ही मोकळीक! या मोकळिकीने मी साताजन्मांचा बांधला जाईन.

**साबाजी** : महाराज, अशी माझी निराशा करू नका! तुमच्या पायांवर मस्तक ठेवून माझ्या पंचप्राणांची शपथ घालून -

**संभाजी** : साबाजी, असा अविचार मी तुला करू देणार नाही. तू मस्तक वाकवायचे ते माझ्यापुढे नाही, तर तुझ्यासारख्या सेवकांना खऱ्याखुऱ्या धनीपणाने साजून दिसणाऱ्या – साबाजी, ती पहा शिवछत्रपतींची तसबीर! तो पहा एकेक अस्मानतारा तुटून त्यांच्या प्रभावळीत शोभू लागला, तो पहा बिरवाडीचा लढवय्या – तो हिरडस मावळचा हिरा – साबाजी, या वीरांच्या तेजाने माझे डोळे दिपून जात आहेत. इकडे पाहू का तिकडे पाहू असे मला झाली आहे; आणि साबाजी, ही पहा, माझ्या राक्षसी रागाने मारलेल्या माणसांची सारी भुतावळ जागी होऊन राजांजवळ दाद मागण्यासाठी जमा झाली आहे. मेलेल्या जीवांनो, क्षमा करा. तुमच्या केविलवाण्या नजरेने माझी पातके राजांजवळ सांगू नका! साबाजी, ते पाहा, राजे रागाने माझ्याकडे पाहू लागले! गोब्राह्मणप्रतिपालक हिंदुपदपादशहा श्रीमंत छत्रपती शिवाजी महाराज, या पातक्याला क्षमा करा. आबा, आपल्या चुकल्या बाळाला क्षमा करा. साबाजी, आबांच्या नजरेची मला भीती वाटते. साबाजी, मी कुणीकडे तोंड लपवू? साबाजी, मला सांभाळ रे!

**साबाजी** : बेटा, असा रडू नकोस! महाराष्ट्राच्या मूर्तीमंत पराक्रमा, तू हिंमतीनं हसायला लाग; तुझ्याबरोबर सह्याद्रीवरच्या फत्तराफत्तराला फुलं येऊन ती हसायला लागतील! तुझ्या जुन्या नोकराच्या गळ्याची शपथ आहे. माझ्या करिता एकदा तरी हास पाहू –

**संभाजी** : (हसून) विराट संसाराचे हसे झाले, तिथे काय हसायचे?

**साबाजी:** राजा, काय भेसूर हे हसणे! तुझ्या रडण्यापेक्षाही हे भेसूर आहे! या हसण्याकडे पाहिले तर माझी म्हाताऱ्याचीच काय, पण साक्षात रायगडाचीसुद्धा कडेकोट कंबर खचून जाईल! राजा, लहानपणीच्या मोकळ्या आनंदाने एकदा हास! तू चार वर्षांचा बच्चा होतास – डोळे पाण्याने भरून आल्यामुळे त्या वेळचे गोंडस

बाळ आज डोळ्यांसमोर दिसत नाही – शिकारखान्यातल्या एका वाघाच्या पिंजऱ्यासमोर तुला खेळवीत असताना माझी नजर दुसरीकडे लागून तू पिंजऱ्याच्या जवळ गेलास, त्यासरशी वाघाने तुझ्या हातावर पंजा मारला. तू जरासा मागे सरलास; तुझ्या चिमुकल्या हातातून कोवळ्या रक्ताचे ओघळ वाहत होते; पण तिकडे तुझे लक्षसुध्दा गेले नाही! मागे सरकल्यामुळे किंचित हलणारे कपाळावरचे ते कुरळे केस, विजयमुद्रेने लकाकणारे ते चिमणे डोळे, तोंडावरची ती लबाड भीती, वाघाच्या गुरकावण्याला वेडावण्यासाठी गोल वळविलेले ओठ; त्या वेळेस किती मनापासून हसलास! बेटा, तसा एकदा हास पाहू! तुला राजांच्या पायाची शपथ -

**संभाजी** : साबाजी, आबासाहेब अजून माझ्याकडे रागाच्या नजरेने पाहत आहेत. त्या रागाने जळून जाईन अशी मला भीती वाटते. साबाजी, मला सांभाळून घे. साबाजी, आबांना पुन्हा आठवण करून दे. त्यांनीच तुला सांगितले होते ना – आबांना म्हणावे, शंभूबाळ अजून हूड आहे; त्याच्याकडे असे रागाने पाहू नका. आबासाहेब, आपण असे रागाने पाहू लागला म्हणजे आपल्या या लाडक्या शंभूबाळाने तोंड कुठे लपवावे? मी काय करू? आबासाहेब, अजून तरी माझ्या बालबुद्धीला रस्ता दाखवा. आपल्यासारख्या लोकोत्तर अवताराला सदगुरु रामदासांचा उपदेश घ्यावासा वाटला, मग या चुकलेल्या बाळाला – साबाजी, ती पाहा श्रीसमर्थांची भव्य मूर्ती! साऱ्या राज्याच्या सनदा काढून आबांनी समर्थांच्या झोळीत टाकल्या. राजाने बैराग्याला भीक घातली. साबाजी, खरा शिष्य, खरा सदगुरु! हाच राजसंन्यास! एकाचा राजसंन्यास, दुसऱ्याचा योगसन्यास! दोघांतून मोठा कोण? (एकदम) साबाजी, लहान तोंडी मोठा घास घेतला. आबासाहेब, आता अजून रागाच्या नजरेने पाहण्याचे काही कारण नाही. अशा राजसंन्यासात मला दर्शन देण्याचा आपला हेतू समजला. माझ्या अयोग्य मस्तकावर आपला जिरेटोप अजून आहे. त्याचा मी अजून संन्यास केला नाही – थांबा, आबासाहेब, पाहा, संभाजीवर सूड घेण्यासाठी तळमळणाऱ्या जीवात्म्यांनो, क्षणभर शांत व्हा. साबाजी, तुमच्या चरणी प्रत्यक्ष शिवछत्रपतींनी मस्तक ठेविले आहे. श्रीसमर्थांच्या साक्षीने आबासाहेबांच्या डोळ्यांदेखत मराठेशाहीचा हा जिरेटोप, साबाजी, छत्रपतींच्या मस्तकस्पर्शाने पवित्र झालेल्या तुमच्या तीर्थस्वरूप चरणी अर्पण करीत आहे. हा नेऊन, माझ्या धाकट्या भावाच्या – सोयराबाईसाहेब, ऐका – आईसाहेबांच्या राजारामाच्या – उद्याच्या तुमच्या

श्रीराजाराममहाराजांच्या मस्तकावर ठेवा. शंभूदादाचा राजबाळाला आशीर्वाद सांगा. महाराष्ट्राच्या महाराजाला या कमनशीब मराठ्याचा रामराम सांगा. उद्याच्या उगवत्या सूर्याला या मावळत्या सूर्याची शेवटची किरणे नेऊन पोहोचवा; आणि रायगडच्या जुन्या राजाची नव्या राजाला शेवटची एवढीच वाणी ऐकवा की, **राजा म्हणजे जगाचा उपभोगशून्य स्वामी! राज्यउपभोग म्हणजे राजसंन्यास! ना विष्णुः पृथिवीपतिः!** .

(जिरेटोप पायांवर ठेवतो. पडदा पडतो)

ब्रह्मार्पणं ब्रह्महविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ।
ब्रह्मैव तेन गन्तव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥

श्रीगीतोपनिषत्सु – श्रीभगवान्

# समाप्त

***